सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१

# महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६

**(दिनांक १५ सप्टेंबर २०११ पर्यंत सुधारित)**

## MAHARASHTRA ACT No. XLI OF 1966

# MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966

*(As modified upto 15th September 2011)*

*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रीत आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित
२०१५
[ **किंमत** : रुपये ]

# महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६

## अनुक्रमाणिका

[(अ) (ब) (क) ]

**उद्देशिका** पृष्ठे

कलमे

प्रकरण एक

**प्रारंभिक**


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव व प्रारंभ | ... | ... | ... |
| २ | व्याख्या | ... | ... | ... |


**महसुली क्षेत्रे**


| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | राज्याची महसुली क्षेत्रांमध्ये विभागणी | ... | ... | ... |
| ४ | महसुली क्षेत्र घटित करणे | ... | ... | ... |


प्रकरण दोन

**महसूल अधिकारी : त्यांचे अधिकार व कर्तव्ये**


| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | महसुलीबाबींच्या बाबतीतील मुख्य नियंत्रक प्राधिकरी | ... | ... | ... |
| ६ | विभागातील महसूल अधिकारी | ... | ... | ... |
| ७ | जिल्ह्यातील महसूल अधिकारी | ... | ... | ... |
| ८ | भू-मापन अधिकारी | ... | ... | ... |
| ९ | पदांचे संयोजन | ... | ... | ... |
| ९-क | अधिकारांचे प्रत्यायोजन | ... | ... | ... |
| १० | तात्पुरत्या रिकाम्या जागा | ... | ... | ... |
| ११ | अधिकाऱ्यांची दुय्यमता | ... | ... | ... |
| १२ | नेमणुका अधिसूचित करणे | ... | ... | ... |
| १३ | महसूल अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये | ... | ... | ... |
| १४ | भू-मापन अधिकारी, मंडल अधिकारी इत्यादींचे अधिकार व कर्तव्ये | | ... | ... |
| १५ | राज्य शासनाने महसूल अधिकाऱ्यांचे अधिकार इतर व्यक्तींना प्रदान करणे | | ... | ... |
| १६ | मुद्रा | ... | ... | ... |


**पैसा, कागदपत्रे किंवा इतर सरकारी मालमत्ता परत मिळविण्यासंबंधी तरतुदी**


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | पैसा, कागदपत्रे वैगरेबाबतच्या मागण्या संबंधित व्यक्तींना लेखी कळविणे | | ... | ... |
| १८ | सरकारी पैसासुद्धा महसुलांच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल आणि कागदपत्रे किंवा मालमत्ता परत मिळविण्यासाठी झडतीचे अधिपत्र (वारंट) काढता येईल. | | | |
| १९ | तुरुंगात असलेल्या अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस तारण देऊन आपली सुटका करून घेता येईल. | | | |

अनुक्रमाणिका—चालू


कलमे | प्रकरण तीन | पृष्ठे

**जमिनींबाबत**

२० इतरांची मालमत्ता नसलेल्या सर्व जमिनी, सार्वजनिक रस्ते इत्यादींमधील राज्याचा मालकी हक्क.

२१ जनतेच्या उपयोगासाठी आवश्यक नसलेला कोणताही सार्वजनिक रस्ता, गल्ली किंवा मार्ग, यांतील किंवा यांवरील लोकांचे हक्क नाहीसे होणे.

२२ विशेष कारणांसाठी जमिनींचे अभिहस्तांकन करता येईल आणि अभिहस्तांकन करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीवाचून तिचा अन्यथा उपयोग करण्यात येणार नाही

२३ कुरणाच्या वापराचे नियमन ... ... ...

२४ विवक्षित जमिनींतून अनधिकृतपणे काढून नेलेल्या नैसर्गिक उत्पन्नाची किमत वसूल करणे ...

२५ धारण जमिनीतील झाडांवरील हक्क ... ... ...

२६ शासनाकडे निहित असलेली झाडे व जंगले ... ... ...

२७ अनधिकृतपणे विनियोजित केलेली झाडे वैगरे यांची किंमत वसूल करणे ... ...

२८ लाकडे तोडण्याचे व त्यांच्या पुरवठ्याचे नियमन, वैगरे ... ... ...

**जमीन देण्याबाबत**

२९ जमीन धारण करणाऱ्या व्यक्तींचे वर्ग ... ... ...

३० संहितेच्या तरतुदींअन्वये मंजूर करण्यात आलेल्या बिनदुमाला जमिनीचा भोगवटा ...

३१ भोगवट्यात नसलेली जमीन शर्तीवर देता येईल ... ... ...

३२ शासनाकडे निश्चित असलेली जलोढ जमीन देणे ... ... ...

३३ लहान जलोढ जमिनींबाबत तात्पुरता हक्क ... ... ...

३४ मृत्यूपत्ररहित वहिवाटींचा विनियोग ... ... ...

३५ सोडून दिलेल्या किंवा जप्त केलेल्या पोट-विभागाचा विनियोग ... ... ...

३६ विवक्षित निर्बंधांना अधीन राहून वहिवाट हस्तांतरणीय व वंशपरंपरागत असणे ... ...

३६-क जमातीतील व्यक्तींकडून करण्यात येणाऱ्या वहिवाटीच्या हस्तांतरणावर निर्बंध ... ...

३६-ख विवक्षित प्रकरणांमध्ये वहिवाटींचा वापर आणि भोगवटा केल्याबद्दल नुकसानभरपाई ...

३६-खख प्लीडर इ. ना. हजर राहण्यापासून वगळलेले असणे ... ... ...

३६-ग दिवाणी न्यायालयाच्या किंवा प्राधिकरणाच्या अधिकारितेस रोघ ... ... ....

३७ भोगवटादाराचे अधिकार शर्तीस अधीन असतील ... ... ....

३८ पट्ट्याने देण्याचा अधिकार ... ... ....

३९ भोगवटादाराने ठरविण्यात आलेला जमीन महसूल देणे आणि शासकीय पट्टेदाराने ठरविण्यात आलेला खंड देणे.

४० शासनाचे अधिकार राखून ठेवणे.

## अनुक्रमाणिका—चालू


कलमे | जमिनीच्या उपयोगाबाबत | पृष्ठे

४१ शेतीच्या प्रयोजनांसाठी जमीन धारण करणाऱ्या, व्यक्तीस कोणत्या कारणासाठी आपल्या जमिनींचा उपयोग करता येईल.

४२ अकृषिक उपयोगासाठी परवानगी ... ... ...

४३ उपयोगावर निर्बंध

४४ जमिनीच्या वापराचे एका प्रयोजनातून दुसऱ्या प्रयोजनात रूपांतर करण्याकरिता कार्यपद्धती

४४-क जमिनीच्या खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी परवानगीची आवश्यकता असणार नाही.

४५ परवानगिशिवाय अशारितीने जमिनीचा उपयोग करण्याबद्दल शास्ती.

४६ गैरवापर केल्याबद्दल कुळाची किंवा इतर व्यक्तीची जबाबदारी.

४७ कलमे ४१, ४२, ४४, ४५ किंवा ४६ यांच्या तरतुदींच्या कक्षेतून जमिनींना सूट देण्याचा राज्य शासनाचा अधिकार..

४७-क जमिनीच्या वापरातील बदलादाखल, रूपांतरण कर देण्यासंबंधातील जमीन धारकाचे दायित्व.

४८ खाणी व खनिजे यांवरील शासनाचा हक्क ... ... ....

४९ इतर व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीतून पाण्याचे पाट बांधणे ... ... ....

### जमिनींवरील अतिक्रमणासंबंधी

५० शासनाकडे निहित असलेल्या जमिनीवरील अतिक्रमणे दूर करणे; शास्ती व इतर आनुषंगिक बाबी यासाठी तरतूद.

५१ अतिक्रमणे नियमात बसवणे ... ... ...

५२ किंमत व जमीन महसूल कसा मोजावा ... ... ...

५३ शासनाकडे निहित असलेल्या जमिनींचा अनधिकृतपणे भोगवटा करणाऱ्या व्यक्तीस संक्षिप्तरीत्या चौकशी करून निष्कासित करणे.

५४ संक्षिप्तरीत्या चौकशी करून निष्कासित केल्यानंतर उरलेली मालमत्ता सरकारजमा करणे आणि ती काढून टाकणे.

५४-क लायसन समाप्त करण्यासाठी आणि कोणत्याही जमिनींवरील किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशातील जी कोणतीही इमारत किंवा बांधकाम जप्त केले असेल ती इमारत किंवा बांधकाम काढून टाकण्यासाठी आणि बेदखलीनंतर जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर पुन्हा प्रवेश करणाऱ्या किंवा राहणाऱ्या व्यक्तींना काढून टाकण्यासाठी तात्पुरते अतिरिक्त अधिकार.

### जमीन सोडून देण्यासंबंधी

५५ जमीन सोडून देणे ... ... ...

५६ दुमाला जमीन सोडून देणे ... ... ....

५७ सोडून दिलेल्या जमिनीत जाण्याचा अधिकार ... ... ...

५८ विवक्षित प्रकरणात कलम ५५च्या प्रवर्तनाची व्यावृत्ती ... ... ...

५९ अनधिकृतपणे जमिनीचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तीस संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकणे.

६० कलम ५५ ची अंमलबजावणी तहकूब करण्याचा राज्य शासनाचा अधिकार ... ...

**अनुक्रमाणिका-**–चालू


| कलमे | **विवक्षित वहिवाटींचे न्यायालयीन कार्यवाहीपासून संरक्षण** | पृष्ठे |
|---|---|---|
| ६१ | वहिवाट ही दिवाणी न्यायालयाच्या आदेशिकेस केव्हा पात्र नसेल, न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अंमलात आणणे. | |
| ६२ | जप्ती किंवा विक्री यास मनाई ... ... ... | |
| ६३ | भूमिधारकाचा गहाण सोडविण्याचा हक्क नष्ट करण्यास, तो जप्त करण्यास किंवा त्याची विक्री करण्यास मनाई. | |
| | प्रकरण चार | |
| | **जमीन महसुलासंबंधी** | |
| ६४ | विशेषरीत्या सूट दिली असेल त्याव्यतिरिक्त सर्व जमिनी, जमीन महसूल देण्यास पात्र असणे. | |
| ६५ | जलोढ जमिनी, जमीन महसुलास पात्र असणे ... ... ... | |
| ६६ | पाण्याने जमिनीची धूप झाली असेल तर जमीन महसुलाची आकारणी ... ... | |
| ६७ | आकारणीची रीत आणि आकारणीतील फेरफार ... ... ... | |
| ६८ | आकारणी कोणी निश्चित करावयाची ... ... ... | |
| ६९ | धारकाबरोबर करावयाची आकारणीसंबंधीची जमाबंदी प्रत्यक्ष राज्य शासनातर्फे करणे ... | |
| ७० | पाण्याच्या वापरासाठी दर ... ... ... | |
| ७१ | या संहितेअन्वये आकारणी निश्चित करणे हे साधारण जमीन महसुलापुरतेच मर्यादित असणे | |
| ७२ | जमीन महसूल हा जमिनीवरील सर्वश्रेष्ठ भार असेल ... ... ... | |
| ७३ | जप्त केलेल्या जमिनीचा कब्जा घेता येईल आणि अन्यथा त्याचा विनियोग करता येईल ... | |
| ७४ | भोगवटा जप्त होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून भोगवटादाराखेरीज इतर विवक्षित व्यक्ती जमीन महसूल देऊ शकेल. | |
| ७५ | दुमाला जमिनीची नोंदवही ... ... ... | |
| ७६ | पावत्या ... ... ... | |
| ७७ | पावत्या देण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती ... ... ... | |
| ७८ | जमीन महसूल कमी करणे, तो तहकूब करणे किंवा त्यापासून सूट देणे ... ... | |
| | प्रकरण पाच | |
| | **महसुली मोजणी** | |
| ७९ | राज्य शासनास राज्यातील कोणत्याही भागात महसुली मोजणी सुरू करता येईल ... | |
| ८० | भू-मापन अधिकाऱ्यास सामान्य नोटीस किंवा समन्स याद्वारे जमीन वगैरे धारण करणाऱ्यास योग्य ती सेवा करण्याबाबत फर्मावता येईल. | |
| ८१ | जमिनींची मोजणी किंवा वर्गीकरण करण्याच्या कामात जमीनधारक व इतर यांच्याकडून देण्यात येणारे सहाय्य. | |
| ८२ | भू-मापन क्रमांक हे विशिष्ट व्याप्तीपेक्षा कमी असणार नाहीत. | |

**अनुक्रमाणिका**—चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ८३ | नव्याने मोजणी करण्याविषयी आणि आकारणीची फेरतपासणी करण्याविषयी निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | |
| ८४ | भू-मापन क्रमांक व उप-विभाग यांची अभिलेखात नोंद … … | |
| ८५ | विभाजन … … … | |
| ८६ | भू-मापन क्रमांकाची नवीन भू-मापन क्रमांकामध्ये विभागणी … … … | |
| ८७ | भू-मापन क्रमांकाची उप-विभागात विभागणी … … … | |
| ८८ | हक्क-लेखांविषयीचा विशेषाधिकार … … … | |
| ८९ | या संहितेच्या प्रारंभापूर्वी केलेले भू-मापन हे या प्रकरणान्वये केले असल्याचे मानणे … | |

प्रकरण सहा

**शेत जमिनीच्या जमीन महसुलीची आकारणी व जमाबंदी**

| | | |
|---|---|---|
| ९० | अर्थ लावणे … … … | |
| ९१ | जमाबंदीसंबंधी अंदाज … … … | |
| ९२ | कोणत्याही जमिनीच्या जमीन महसुलाची प्राथमिक किंवा सुधारित जमाबंदी करण्याबद्दल निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | |
| ९३ | जमाबंदीची मुदत … … … | |
| ९४ | आकारणी कशी निर्धारित करतात … … … | |
| ९५ | धारकांच्या खर्चाने केलेल्या सुधारणांमुळे सरासरी उत्पन्नात झालेली वाढ विचारात न घेणे … | |
| ९६ | जमाबंदी अधिकाऱ्याने जमीबंदीचे काम कसे सुरू करावे … … … | |
| ९७ | जमाबंदी प्रतिवृत्त छापणे व प्रसिद्ध करणे … … … | |
| ९८ | हरकती वगैरेच्या विवरणपत्रासहित व त्यावरील जिल्हाधिकाऱ्यांच्या अभिप्रायासह जमाबंदी प्रतिवृत्त शासनाला सादर करणे. | |
| ९९ | महसूल न्यायाधिकरणाकडे निर्देश … … … | |
| १०० | जमाबंदीच्या प्रतिवृत्तावरील आदेश … … … | |
| १०१ | पाण्याच्या फायद्याबद्दलच्या आकारणीपासून सूट देण्याचा राज्य शासनाचा अधिकार … | |
| १०२ | जमाबंदीची सुरूवात … … … | |
| १०३ | महसूलमुक्त जमीन धारण करण्यासंबंधीच्या हक्क मागण्या … … … | |
| १०४ | जमीन महसूल देण्यापासून संपूर्णतः सूट दिलेल्या जमिनीवरील आकारणी … … | |
| १०५ | पाण्याच्या फायद्याबद्दल आकारणी बसविण्याबाबत निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार | |
| १०६ | चुका दुरुस्त करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार … … … | |
| १०७ | या संहितेपूर्वी केलेली जमाबंदी ही या प्रकरणान्वये करावयाची असल्याचे मानणे … | |

प्रकरण सात

**अकृषिक प्रयोजनांकरिता वापरलेल्या जमिनींच्या जमीन महसुलाची आकारणी व जमाबंदी**

| | | |
|---|---|---|
| १०८ | अर्थ उकल … … … | |
| १०९ | जमिनींचा अकृषिक उपयोग आणि नागरी व बिगर-नागरी क्षेत्र विचारात घेऊन जमिनीवरील अकृषिक आकारणी निर्धारित करणे. | |

**अनुक्रमाणिका**—चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ११० | बिगर-नागरी क्षेत्रातील कृषीतर जमिनींची अकृषिक आकारणी निर्धारित करताना अनुसरावयाची कार्यपद्धती | |
| १११ | नागरी क्षेत्रातील अकृषिक आकारणी निर्धारित करताना अनुसरावयाची कार्यपद्धती ... | |
| ११२ | अकृषिक आकारणी ही संपूर्ण बाजारमूल्याच्या तीन टक्क्यांपेक्षा अधिक नसावी ... | |
| ११३ | अकृषिक आकारणीचा प्रमाण दर ठरविण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार ... | |
| ११४ | अकृषिक प्रयोजनांसाठी उपयोगात आणलेल्या जमिनींवरील आकारणीचा दर ... | |
| ११५ | अकृषिक आकारणीच्या प्रारंभाचा दिनांक ... ... ... | |
| ११६ | [* * * * वगळण्यात आले] | |
| ११७ | अकृषिक आकारणी देण्यापासून सूट मिळालेल्या जमिनी ... ... ... | |
| ११८ | सूट रद्द करणे ... ... ... | |
| ११९ | जमीन महसूल देण्यापासून संपूर्ण सूट मिळालेल्या जमिनींची अकृषिक आकारणी ... | |
| १२० | संहितेच्या प्रारंभापूर्वी निश्चित केलेली अकृषिक आकारणी, तिच्यात फेरफार करण्यात येईपर्यंत अंमलात राहील. | |


प्रकरण आठ

## गावांच्या, नगरांच्या आणि शहरांच्या जागांतील जमिनी


| | | |
|---|---|---|
| १२१ | प्रकरण लागू असणे ... ... ... | |
| १२२ | गावांच्या, नगरांच्या आणि शहरांच्या जागांच्या हद्दी कशा निश्चित कराव्या ... ... | |
| १२३ | विवक्षित बाबतीत गावांच्या, नगरांच्या किंवा शहरांच्या जागेतील जमिनीवर कोणताही जमीन महसूल न आकारणे. | |
| १२४ | जिल्हाधिकाऱ्याने सूट मिळण्यासंबंधीचा अधिकार निर्धारित करणे ... ... | |
| १२५ | पार्डी व वाडा जमिनीस जमीन महसूल देण्यापासून सूट असणे ... ... ... | |
| १२६ | गावाच्या जागांतील जमिनींचे भू-मापन कसे करावे ... ... ... | |
| १२७ | विवक्षित बाबतीत भू-मापन फी आकारणे ... ... ... | |
| १२८ | गावातील जागांचे नकाशे ... ... ... | |
| १२९ | कोणत्याही अधिक आकाराशिवाय सनद देणे ... ... ... | |
| १३० | धारण जमिनीतील फेरफारानंतर सनद देणे ... ... ... | |
| १३१ | सनदेची दुसरी प्रत देता येईल ... ... ... | |


प्रकरण नऊ

## सीमा व सीमाचिन्हे


| | | |
|---|---|---|
| १३२ | सीमा निश्चित करणे व त्या आखणे ... ... ... | |
| १३३ | गावांच्या सीमा निश्चित करणे ... ... ... | |
| १३४ | शेताच्या सीमा निश्चित करणे ... ... ... | |
| १३५ | गावे, भू-मापन क्रमांक आणि पोट-विभाग यांमधील सीमांबाबत वाद ... ... | |
| १३६ | भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागाच्या सीमांची आखणी ... ... ... | |

१३७ वेड्यावाकड्या सीमा सरळ करणे ... ... ...
१३८ सीमा निश्चितीचे परिणाम ... ... ...
१३९ भू-मापन क्रमांक आणि गावे इत्यादींच्या सीमांची चिन्हे लावणे व ती दुरुस्त करणे ...
१४० सीमा चिन्हे व भू-मापन चिन्हे सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ... ... ...
१४१ भू-मापन चालू केल्यानंतर सीमा चिन्हे व भू-मापन चिन्हे जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन असणे
१४२ धारण केलेली जमीन व ग्रामरस्ता यांच्यामधील सीमा चिन्हांची आखणी व ती सुस्थितीत ठेवणे
१४३ सीमांवरून रस्त्यांचा अधिकार ... ... ...
१४४ नगररचना योजनेखालील किंवा सुधार योजनांखालील किंवा एकत्रीकरण योजनेखालील क्षेत्रात सीमांची आखणी करणे.
१४५ सीमा चिन्हांचे नुकसान केल्याबद्दल शास्ती ... ... ...
१४६ या प्रकरणाच्या अंमलबजावणीतून सूट देण्याचा अधिकार ... ... ...

प्रकरण दहा

## भूमि अभिलेख

## क-अधिकार अभिलेख

१४७ या प्रकरणाच्या तरतुदींपासून सूट ... ... ...
१४८ अधिकार अभिलेख .. ... ...
१४९ अधिकार संपादन केल्याचे प्रतिवृत्त देणे ... ... ...
१५० फेरफार नोंदवही व विवादग्रस्त प्रकरणांची नोंदवही ... ... ...
१५१ माहिती पुरविण्याचे बंधन, जमीन धारकास किंवा कुळास, अधिकार अभिलेखातील नोंदी, इत्यादी पुस्तिकेच्या रूपाने पुरविण्याचे बंधन आणि पुस्तिका वैगरे ठेवणे.
१५२ माहिती देण्यात हयगय केल्याबद्दल दंड ... ... ...
१५३ नकाशे तयार करण्याच्या कामी सहाय्याची मागणी ... ... ...
१५४ नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी हस्तांतरणाबाबत माहिती कळविणे ... ...
१५५ लेखन-प्रमादांची दुरुस्ती ... ... ...
१५६ भूमि अभिलेख ... ... ...
१५७ अधिकार अभिलेख व फेरफार नोंदवही यांमधील नोंदी बरोबर असल्याचे गृहीत धरणे ...
१५८ दाव्यास प्रतिबंध ... ... ...
१५९ संहितेच्या प्रारंभाच्या वेळेचे अधिकार अभिलेख ... ... ...

## ख—भोगवट्यात नसलेल्या जमिनीबाबतचे अधिकार

१६० कलमे १६१ ते १६७ यांच्या तरतुदी लागू करणे ... ... ...
१६१ निस्तारपत्रक .. ... ...
१६२ निस्तारपत्रकात तरतूद करावयाच्या बाबी ... ... ...

**अनुक्रमाणिका**—चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १६३ | विवक्षित बाबींची निस्तारपत्रकात तरतूद करणे … … … | |
| १६४ | दुसऱ्या गावातील पडीत जमिनीवरील अधिकार … … … | |
| १६५ | वाजिब-उल-अर्ज .. … … | |
| १६६ | मच्छिमारी इत्यादींचे नियमन … … … | |
| १६७ | तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा .. … … | |


प्रकरण अकरा

## जमीन महसुलाची आणि इतर महसूलविषयक मागण्यांची वसुली


| | | |
|---|---|---|
| १६८ | जमीन महसुलाचे दायित्व … … … | |
| १६९ | राज्य शासनाला येणे असलेल्या रकमाना इतर सर्व मागण्यांवर प्राधान्य देणे … … | |
| १७० | ज्या दिनांकाला जमीन महसूल देय होतो आणि द्यावयास पाहिजे ते दिनांक … …. | |
| १७१ | तात्पुरती जप्ती आणि गाव किंवा गावाच्या हिस्सा याची व्यवस्था … … | |
| १७२ | तारण देण्यात आल्यानंतर गावाची किंवा गावाच्या हिश्याची तात्पुरती जप्ती किंवा व्यवस्था सोडून देणे (काढून घेणे). | |
| १७३ | ‘ थकबाकी ’ विषयी ‘ कसूर करणारी व्यक्ती ’ … … … | |
| १७४ | जमीन महसूल भरण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती … … … | |
| १७५ | प्रमाणित केलेले हिशेब हे थकबाकीविषयीचा पुरावा असणे … … … | |
| १७६ | थकबाकीच्या वसुलीची कार्यपद्धती … … … | |
| १७७ | मागील वर्षाच्या महसुली मागण्या कशा वसूल करावयाच्या … … … | |
| १७८ | मागणीची नोटीस केव्हा देता येईल … … … | |
| १७९ | ज्या वहिवाटींबाबत किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनींबाबत थकबाकी येणे असेल त्या वहिवाटी किंवा धारण केलेली दुमाला जमीन जप्त करता येईल. | |
| १८० | कसूर करणाऱ्या व्यक्तींची जंगम मालमत्ता अटकावणे व तिची विक्री … … | |
| १८१ | कसूर करणाऱ्या व्यक्तींच्या स्थावर मालमत्तेची विक्री … … … | |
| १८२ | कसूर करणाऱ्या व्यक्तींची स्थावर मालमत्ता जप्त करण्याचा आणि ती व्यवस्थेखाली आणण्याचा अधिकार | |
| १८३ | कसूर करणाऱ्या व्यक्तीस अटक करणे आणि स्थानबद्ध करणे … … | |
| १८४ | अटक करण्याच्या अधिकाराचा वापर कोणी करावयाचा … … | |
| १८५ | कसूर करणाऱ्या व्यक्तींचे गाव जप्त करण्याचा आणि व्यवस्थेखाली आणण्याचा अधिकार … | |
| १८६ | अशा गावाच्या जमिनी भारांपासून मुक्त अवस्थेत परत मिळणे … … | |
| १८७ | शासनाच्या मालकीची नसलेली परंतु राज्य शासनाच्या तात्पुरत्या व्यवस्थेखाली असलेली गावे किंवा संपदा यांची महसूल व्यवस्था. | |
| १८८ | शिल्लक राहिलेल्या नफ्याचा विनियोग … … … | |
| १८९ | अशा रीतीने जप्त केलेले गाव परत देणे … … … | |
| १९० | गाव वगैरे बारा वर्षांत विमोचित करण्यात आले नाही तर ते राज्य शासनाकडे निहित होणे … | |

**अनुक्रमाणिका**—चालू


| कलमे | | | | | पृष्ठे |
|---|---|---|---|---|---|
| १९१ | परंतु तारण दिल्यानंतर सर्व कार्यवाह्या थोपविणे | … | … | … | |
| १९२ | विक्री करण्याच्या वेळेची कार्यपद्धती | … | … | … | |
| १९३ | विक्रीची अधिसूचना | … | … | … | |
| १९४ | विक्री कोणी करावयाची, विक्रीची वेळ इत्यादी | … | … | … | |
| १९५ | विक्री तहकूब करणे | … | … | … | |
| १९६ | नाशवंत वस्तुंची विक्री | … | … | … | |
| १९७ | विक्री केव्हा थांबविता येईल | … | … | … | |
| १९८ | जंगम मालमत्तेची विक्री कायम केली जाण्यास केव्हा पात्र असेल | | … | … | |
| १९९ | विक्री अंतिमरित्या समाप्त करण्यास आली असेल तेव्हा जंगम मालमत्तेबद्दल रक्कम देण्याची रीत | | | | |
| २०० | विक्री कायम केली जाण्यास पात्र असेल तेव्हा रक्कम देण्याची रीत | | … | … | |
| २०१ | स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या बाबतीत खरेदीदाराने रक्कम अनामत ठेवणे | | … | … | |
| २०२ | खेरीदीची रक्कम केव्हा द्यावयाची | … | … | … | |
| २०३ | कसूर केल्याचा परिणाम | … | … | … | |
| २०४ | फेरविक्रीमुळे झालेल्या नुकसानीबद्दल खरेदीदाराची जबाबदारी | … | … | … | |
| २०५ | फेरविक्री करण्यापूर्वी अधिसूचना | … | … | … | |
| २०६ | जंगम मालमत्तेची विक्री रद्द करणे | … | … | … | |
| २०७ | स्थावर मालमत्तची विक्री रद्द करण्यासाठी अर्ज | … | … | | |
| २०८ | विक्री कायम करणारा किंवा ती रद्द करणारा आदेश | … | … | … | |
| २०९ | विशिष्ट परिस्थितीत खरेदीदारास विक्री रद्द करण्यासाठी अर्ज करता येईल | | … | … | |
| २१० | मालमत्तेची मालकी असणाऱ्या किंवा त्यात हितसंबध धारण करणाऱ्या व्यक्तीने विक्री रद्द करण्यासाठी करावयाचा अर्ज. | | | | |
| २११ | विक्री रद्द करण्यात आली असेल तेव्हा अनामत रक्कम किंवा खरेदीची रक्कम परत करणे | | | … | |
| २१२ | विक्री कायम करण्यात आल्यावर खरेदीदीरास ताबा देणे, खरेदीचे प्रमाणपत्र | | … | … | |
| २१३ | प्रमाणित खरेदीदारावर दावा करण्यास मनाई | … | … | … | |
| २१४ | विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग | … | … | … | |
| २१५ | शिल्लक राहिलेल्या रक्कम न्यायालयाच्या आदेशाखेरीज घनकोस न देणे | | … | … | |
| २१६ | नंतर देय असलेल्या जमीन महसुलाबद्दल प्रमाणित खरेदीदारच केवळ जबाबदार असणे | | | … | |
| २१७ | खरेदीदाराचा हक्क | … | … | … | |
| २१८ | जप्त केलेल्या मालमत्तेवर केलेले दावे कसे निकालात काढावे | … | … | … | |
| २१९ | विक्रीच्या वेळी बोली वगैरे बोलण्यास महसूल अधिकाऱ्यास प्रतिबंध | | … | … | |
| २२० | नामामत्र बोलीवर खरेदी करणे | … | … | … | |
| २२१ | या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये वसूल करता येईल अशी रक्कम | … | … | … | |
| २२२ | मोफत अनुदानांचा गैरवापर केल्यास, महसुलाच्या थकबाकीप्रमाणे ती वसूल करणे | | | … | |
| २२३ | जामिनदारांकडून पैशाची वसुली करणे | … | … | … | |

**अनुक्रमाणिका**—चालू

प्रकरण बारा

## महसूल अधिकाऱ्यांची कार्यपद्धती


| कलमे | | पृष्ठे |
| --- | --- | --- |
| २२४ | महसूल अधिकाऱ्यांची दुय्यमता ... ... ... | |
| २२५ | प्रकरणे हस्तांतरित करण्याचा अधिकार ... ... ... | |
| २२६ | दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून किंवा त्यांच्याकडे प्रकरणे हस्तांतरित करण्याचा अधिकार | |
| २२७ | पुरावा देण्यासाठी व दस्तऐवज सादर करण्यासाठी व्यक्तींवर समन्स बजावण्याचा अधिकार ... | |
| २२८ | समन्से लेखी, सही कलेली व मुद्रा असलेली असणे, समन्सांची बजावणी ... ... | |
| २२९ | साक्षीदारास उपस्थित राहण्यास भाग पाडणे ... ... ... | |
| २३० | नोटीस बजावण्याची रीत ... ... ... | |
| २३१ | साक्षीदारांना हजर करण्याविषयीची कार्यपद्धती ... ... ... | |
| २३२ | पक्षकारांच्या अनुपस्थितीत सुनावणी करणे ... ... ... | |
| २३३ | सुनावणी स्थगित करणे ... ... ... | |
| २३४ | रीतसर चौकशीत पुरवा घेण्याची रीत ... ... ... | |
| २३५ | निर्णय लिहिणे व त्यांचे स्पष्टीकरण ... ... ... | |
| २३६ | संक्षिप्त चौकशी कशी करावी ... ... ... | |
| २३७ | रीतसर व संक्षिप्त चौकशी न्यायिक कार्यवाही समजणे ... ... ... | |
| २३८ | सामान्य चौकशी कशी करावी ... ... ... | |
| २३९ | प्रती व अनुवाद वैगरे कसे मिळवावे ... ... ... | |
| २४० | कसूर करणाऱ्यास अधिपत्र (वॉरंट) काढून अटक करणे ... ... ... | |
| २४१ | जमिनीवर प्रवेश करण्याचा व भू-मापन करण्याचा अधिकार ... ... ... | |
| २४२ | बेकायदेशीररीत्या जमीन कब्जात ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस निष्कासित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने कशी कार्यवाही करावी. | |
| २४३ | खर्च मंजूर करण्याचा आणि तो वाटून देण्याचा अधिकार ... ... ... | |
| २४४ | महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यांसमोर ज्यांना उपस्थित होता येईल आणि अर्ज करता येईल अशा व्यक्ती. | |
| २४५ | व्यावृत्ती. ... ... ... | |


प्रकरण तेरा

## अपिले, पुनरीक्षण व पुनर्विलोकन


| | | |
| --- | --- | --- |
| २४६ | हे प्रकरण लागू असणे ... ... ... | |
| २४७ | अपील व अपील प्राधिकारी ... ... ... | |
| २४८ | राज्य शासनाकडे अपील केव्हा करावे ... ... ... | |
| २४९ | पुनर्विलोकन किंवा पुनरीक्षण याविरुद्ध अपील ... ... ... | |
| २५० | ज्या मुदतीत अपिले केली पाहिजे ती मुदत ... ... ... | |
| २५१ | मुदत संपल्यानंतर अपील दाखल करुन घेणे ... ... ... | |
| २५२ | विवक्षित आदेशांच्या विरुद्ध अपील करता येणार नाही ... ... ... | |
| २५३ | अपील करण्याचा शेवटचा दिवस रविवार किंवा सुट्टीचा दिवस असेल तर त्याबाबत तरतूद ... | |

**अनुक्रमाणिका**—चालू

**कलमे** **पृष्ठे**


२५४ अपिलाच्या विनंतीअर्जासोबत आदेशाची प्रत देणे … … …

२५५ अपील प्राधिकाऱ्याचा अधिकार … … …

२५६ आदेशांची अंमलबजावणी स्थगित करणे … … …

२५७ राज्य शासन व विवक्षित महसूल आणि भू-मापन अधिकारी यांचा त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांचे अभिलेख व कार्यवाही मागविण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा अधिकार.

२५८ आदेशांचे पुर्नविलोकन … … …

२५९ जे निर्णय किंवा आदेश स्पष्टपणे अंतिम म्हणून जाहीर केले असतील त्याबाबत नियम …

प्रकरण चौदा

**मुंबई शहरामध्ये जमीन महसुलाकरिता विशेष तरतुदी**

२६० या प्रकरणाची व्याप्ती … … …

२६१ निर्वचन … … …

**जमीन महसुलाची आकारणी व वसुली**

२६२ जमीन महसुलाची आकारणी निश्चित करण्याचा व ती बसविण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार

२६२-क आकारणीचा दर बाजारमूल्याच्या टक्केवारीपेक्षा अधिक असणार नाही … …

२६२-ख आकारणीचा प्रमाणभूत दर … … …

२६२-ग आकारणींचे प्रमाणभूत दर प्रसिद्ध करणे … … …

२६२-घ आकारणीचे प्रमाणभूत दर सुधारण्यात येईपर्यंत दहा वर्षांकरिता अंमलात असणे

२६२-ङ हमीची मुदत … … …

२६३ आकारणाविषयक समझोता कोणाबरोबर करावा … … …

२६४ जमीन महसुलाचे दायित्व … … …

२६५ राज्य शासनाच्या हक्क मागण्यास प्राधान्य देणे … … …

२६६ महसूल देण्याच्या संबंधात निदेश देण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार … …

२६७ थकबाकीची रक्कम देय झाल्यानंतर मागणीची नोटीस बजावणे … … …

२६८ विक्री कशी करावयाची … … …

२६९ कसूर करणारांस पकडता व अटकेत ठेवता येईल … … …

२७० जप्ती व विक्रीपासून सूट … … …

२७१ प्रथमतः जिल्ह्याधिकाऱ्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी. परंतु प्रतिभूती दिल्यानंतर अंमलबजावणी तहकूब करता येईल.

२७२ हरकत नोंदवून रक्कम दिल्यानंतर आणि अपील सादर केल्यानंतर व प्रतिभूती दिल्यानंतर सक्ती करणाऱ्या आदेशिकेची अंमलबजावणी थांबविणे.

२७३ कसूर करणाऱ्याची मालमत्ता जप्त करण्यासाठी व तिची विक्री करण्यासाठी अधिपत्राच्या (वॉरंटच्या) संबंधात फी जादा फी.

२७४ महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढील अपिले … … …

२७५ न्यायालय शुल्क … … …

२७६ महसूलमुक्त जमिनी देण्याचा राज्य शासनाचा अधिकार … … …

**अनुक्रमाणिका**—चालू


| कलमे | **मुंबई शहर भू-मापन व सीमा चिन्हे** | पृष्ठे |
|---|---|---|
| २७७ | मुंबई शहर भू-मापनास मान्यता ... ... ... | |
| २७८ | राज्य शासनाने भू-मापन करण्याचा आदेश देणे आणि अधीक्षक नेमणे ... .. | |
| २७९ | जिल्हाधिकारी किंवा त्याच्या हाताखालील व्यक्ती यांना जमिनींवर प्रवेश करता येईल ... | |
| २८० | उपस्थित राहण्याकरिता जमिनधारकावर बजावावयाची नोटीस ... ... ... | |
| २८१ | नोटिसा बजावल्यानंतरच अधीक्षकाने भू-मापनाचे काम सुरू करणे ... ... | |
| २८२ | भू-मापन नकाशा आणि नोंदवही ... ... ... | |
| २८३ | अधीक्षकास सीमाचिन्हे उभारता येतील ... ... ... | |
| २८४ | तात्पुरती सीमाचिन्हे सुस्थितीत ठेवणे ... ... ... | |
| २८५ | भू-मापन फीची आकारणी करता येईल ... ... ... | |
| २८६ | भू-मापनासंबंधातील सर्व कागदपत्रे जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविणे ... ... ... | |
| २८७ | भू-मापन नकाशा आणि नोंदवही ठेवणे ... ... ... | |
| २८८ | नकाशांची सुधारणा ... ... ... | |
| २८९ | सीमाचिन्हे सुस्थितीत ठेवण्याची व त्यांची दुरुस्ती करण्याची जबाबदारी ... ... | |
| २९० | जिल्हाधिकाऱ्याला भू-मापनाची नवीन चिन्हे उभारण्यास किंवा त्यात दुरुस्ती करण्यास वरिष्ठ धारकास भाग पाडता येईल. मागणी कशी करावी. | |
| २९१ | कसूर केल्यावर जिल्हाधिकारी किंवा सहायक यास प्रवेश करता येईल व चिन्हांचे नवीकरण करता येईल किंवा ती दुरुस्त करता येतील. चिन्हांचे नवीकरण करण्याचा किंवा ती दुरुस्त करण्याचा आकार. | |
| २९२ | स्वामित्वपत्राचा विशेषाधिकार ... ... ... | |
| २९३ | अनौपचारिकतेमुळे कामकाजावर परिणाम न होणे ... ... ... | |
| | **शासकीय जमिनी व किनाऱ्यालगतचा प्रदेश** | |
| २९४ | जमिनी व किनाऱ्यालगतचा प्रदेश यांवरील शासनाचा अधिकार ... ... | |
| २९५ | अशा जमिनी व किनाऱ्यालगतचा प्रदेश यांचा कसा विनियोग करावा ... ... | |
| | **जमिनी वैगरेचे हस्तांतरण** | |
| २९६ | जमिनी वैगरेच्या मालकी हक्काच्या हस्तांतरणाबाबत जिल्हाधिकाऱ्यास नोटीस देणे ... | |
| २९७ | नोटीशीचा नमुना ... ... ... | |
| २९८ | नोटीस देण्यात हयगय केल्याबद्दल शास्ती ... ... ... | |
| २९९ | मालकी हक्क हस्तांतरित करणारी परंतु त्याबाबत सूचना देण्याचे टाळणारी व्यक्ती महसुलास पात्र असल्याचे चालू राहणे. | |
| ३०० | नोंदीबद्दल किंवा हस्तांतरणाबद्दल वाद असल्यास कार्यवाही ... ... ... | |
| ३०१ | नोंदीमुळे किंवा हस्तांतरणामुळे शासनाच्या अधिकारास बाध न येणे | |
| | **कार्यपद्धती** | |
| ३०२ | समन्स वैगरेना कायदा लागू करणे ... ... ... | |

**अनुक्रमणिका**—चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| | **घरभाडे, फी, शास्ती वगैरे बसविणे** | |
| ३०३ | येणे असलेल्या रकमा महसुलाबाबतच्या मागण्या म्हणून वसूल करण्यायोग्य असणे ... | |
| ३०४ | येणे असलेल्या रकमांच्या वसुलीसाठी इतर जिल्हाधिकाऱ्यांना सहाय्य करण्याचा मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार. | |
| ३०५ | जिल्हाधिकाऱ्याने नोंदवह्या आणि खंडाबाबतचे पत्रक ठेवणे ... ... ... | |
| ३०६ | नियम ... ... ... | |
| ३०७ | व्यावृत्ती ... ... ... | |
| | प्रकरण पंधरा | |
| | **महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण** | |
| ३०८ | व्याख्या ... ... ... | |
| ३०९ | महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण .. ... ... | |
| ३१० | अध्यक्ष व सदस्य ... ... ... | |
| ३११ | पद रिकामे होणे व तात्पुरती गैरहजेरी ... ... ... | |
| ३१२ | प्रबंधक व उप-प्रबंधक ... ... ... | |
| ३१३ | मुख्यालय ... ... ... | |
| ३१४ | बैठकीची जागा ... ... ... | |
| ३१५ | न्यायाधिकरणाची अधिकारिता ... ... ... | |
| ३१६ | विवक्षित बाबतीत अधिकारितेस प्रतिबंध ... ... ... | |
| ३१७ | न्यायाधिकरणास इतर कायद्यांन्वये मिळालेल्या अधिकारांस बाध येणार नाही ... ... | |
| ३१८ | न्यायाधिकरणास दिवाणी न्यायालयाचा अधिकार असणे ... ... ... | |
| ३१९ | प्रथा व कार्यपद्धती ... ... ... | |
| ३२० | विवक्षित बाबतीत राज्य शासनाची बाजू ऐकून घेणे ... ... ... | |
| ३२१ | राज्य शासनाकडे अपील दाखल करता येणार नाही आणि न्यायालयांच्या अधिकारितेस प्रतिबंध | |
| ३२२ | न्यायाधिकरणाच्या आदेशांचे पुर्नविलोकन ... ... ... | |
| ३२३ | न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशांची बजावणी करण्याची रीत ... ... ... | |
| ३२४ | न्यायालय शुल्कासाठी तरतूद ... ... ... | |
| ३२५ | नियम ... ... ... | |
| ३२६ | व्यावृत्ती ... ... ... | |
| | प्रकरण पंधरा | |
| | **संकीर्ण** | |
| ३२७ | नकाशे आणि जमिनी संबंधीचे अभिलेख तपासणी, इत्यादींसाठी खुले असणे ... ... | |
| ३२८ | नियम ... ... ... | |
| ३२९ | नियम आगाऊ प्रसिद्ध करणे आणि नियमांचा भंग केल्याबद्दल शास्ती यासाठी तरतूद ... | |
| ३३० | विधानमंडळापुढे नियम ठेवणे ... ... ... | |
| ३३०-क | अधिकारांचे व कर्तव्यांचे प्रत्यायोजन ... ... ... | |
| ३३१ | दुभाला गावास विवक्षित तरतुदी लागू असणे ... ... ... | |

**अनुक्रमाणिका**—समाप्त


| **कलमे** | | | | | **पृष्ठे** |
|---|---|---|---|---|---|
| ३३२ | दुमाला गावातील जमीनधारक | ... | ... | ... | |
| ३३३ | या संहितेचा अन्वयार्थ लावणे | ... | ... | ... | |
| ३३४ | अधिनियमितींची सुधारणा | ... | ... | ... | |
| ३३५ | अडचण दूर करण्याचा अधिकार | ... | ... | ... | |
| ३३६ | निरसन व व्यावृत्ती | ... | ... | ... | |
| ३३७ | संदर्भाचा अन्वयार्थ लावणे | ... | ... | ... | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अनुसूची** | क | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | ख | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | ग | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | घ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | ङ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | च | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | छ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | ज | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | झ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | ञ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| | ट | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |

## सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१[१]

## (महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६)

[राष्ट्रपती यांची संमती २२ डिसेंबर १९६६ रोजी मिळाली, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग-चार, दिनांक ३० डिसेंबर १९६६ मध्ये प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केला]

पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या—

सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४.

सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.

सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०*

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ (१-१२-१९७३)†

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५** (६-७-१९७४)†

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ (१४-४-१९७६)†

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ (२६-४-१९७६)†

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ (३०-७-१९७६)†

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ (१९-३-१९७७)†

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० (१६-८-१९७७)†

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

---

[१] उद्देश व कारणांचे निवेदन पाहण्यासाठी कृपया " **महाराष्ट्र शासन राजपत्र** " १९६५, भाग-पाच, असाधारण, पृष्ठे ७५६-७६३ (इंग्रजी) पाहावी, संयुक्त समितीचा अहवाल त्याच **राजपत्रात**, भाग-पाच (१९६६), पृष्ठे २१९-३५३ (इंग्रजी) वर पाहावा.

*सन १९७० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३, हा सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३ याद्वारे निरसित करण्यात आला.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

** सन १९७४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३, हा सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम १० याद्वारे निरसित करण्यात आला.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७* (२९-७-१९८१)†

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५** (५-२-१९८२)†

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ (१-१२-१९८६)†

---

* सन १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८, हा सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १४ याद्वारे निरसित करण्यात आला.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम २ पुढीलप्रमाणे वाचावे :—

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याखाली मुंबई विभागाची रचना करणे.

" २. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेत किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी मुंबई शहर हा एक जिल्हा म्हणून स्थापन करण्यात आल्याचे मानण्यात येईल. मुंबई उपनगर जिल्हा हा, कोकण विभागातून वगळण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि उक्त संहितेअन्वये मुंबईचा विभाग या नावे संबोधण्यात येणाऱ्या एका नवीन विभागाची स्थापना करण्यात आल्याचे मानण्यात येईल. त्यामध्ये, ज्या क्षेत्रात नंतर फेरबदल करण्यात येऊन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा नावांच्या दोन किंवा अधिक जिल्ह्यांत विभागणी करण्यात येईल अशा, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा यांचा समावेश होईल. ".

१९६६ चा महाराष्ट्र ४१.

** सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १० पुढीलप्रमाणे वाचावे :—

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १३ खाली जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारांची अपर तहसीलदाराकडे केलेली सोपवणूक व त्यांचे कामकाज यांचे विधिग्राह्यीकरण.

" १०. जमीन महसूल संहितेच्या कलम १३ मध्ये किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश असला तरी, कलम ३६, पोट-नियम (३) खाली किंवा उक्त संहितेच्या इतर कोणत्याही तरतुदीखाली असणारे जिल्हाधिकाऱ्यांचे कोणतेही अधिकार, उक्त कलम १३, पोट-कलम (१) च्या परंतुकाखाली जिल्हाधिकाऱ्याने अपर तहसिलदारांना सोपवले असता या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही एका किंवा अनेक कालावधीमध्ये त्यांचा वापर करणाऱ्या अपर तहसिलदारांकडे ते उक्त कालावधीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी वैधरित्या सोपवले होते असे मानण्यात येईल; आणि तद्नुसार, उक्त कालावधीमध्ये उक्त अपर तहसिलदारांनी, जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारांचा वापर करताना किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारांचा वापर केल्याने अभिप्रेत असताना, त्यांनी चालवलेले कोणतेही कामकाज, दिलेले आदेश, मंजुऱ्या, प्रमाणपत्रे, केलेली प्रतिज्ञापत्रे किंवा इतर कारवाई या गोष्टी जणूकाही त्या प्रयोजनांसाठी त्यांच्याकडे अधिकार यथोचितरीत्या सोपवण्यात आले होते असे मानून विधिग्राह्यरीत्या व परिणामकारकरीत्या करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल. आणि त्यांच्याकडे अधिकार यथोचितरीत्या सोपवले नव्हते किंवा त्यांना कोणतीही अधिकारिता नव्हती याच केवळ कारणावरून, कोणतेही न्यायालय किंवा न्यायाधिकरण यांजपुढील कोणत्याही कामकाजात त्याबद्दल कोणताही आक्षेप घेता येणार नाही. ".

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १* (१-१-१९९१)†
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७** (१-५-१९९३)†
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६†† (२-२-१९९४)†
सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ (९-२-१९९८)†
सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ @ (१-३-१९९९)†
सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ @@ (१-८-२००१)†

---

* सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १, कलम ७ पुढीलप्रमाणे वाचावे :—

जमातीच्या हस्तांतरकाला जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी कार्यवाहीस सुरुवात करणे.

" ७. शंका निरसनासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्याने एक तर स्वाधिकारे कार्यवाहीस प्रारंभ केला नसेल किंवा या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात येण्यापूर्वी असल्याप्रमाणेच्या उक्त अधिनियमाच्या कलम ३६ किंवा ३६-अ मध्ये किंवा मुख्य अधिनियमाच्या कलम ३ किंवा ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये जमातीच्या हस्तांतरकांकडून, उपरोक्त तरतुदींअन्वये जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी कोणताही अर्ज करण्यात आला नसेल तर, जिल्हाधिकारी, स्वाधिकारे कोणत्याही कार्यवाहीस सुरुवात करण्यास किंवा जमातीचा हस्तांतरक या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमाच्या किंवा मुख्य अधिनियमाच्या तरतुदींअन्वये जमातीच्या हस्तांतरकांकडे जमीन प्रत्यार्पित करण्यासाठी अर्ज करण्यास, सक्षम राहील. ".

किंवा मुख्य अधिनियमाच्या

** सन १९९३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७, कलम २६ पुढीलप्रमाणे वाचावे :—

विधि ग्राह्यीकरण.

१९९३ चा महा- राष्ट्र १७.

१९६६ चा महा- राष्ट्र ४१.

" २६. (१) कोणत्याही न्यायालयाचा कोणताही, न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेस यात काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसवणे व सुधारणा) अधिनियम, १९९३ याद्वारे सुधारण्यात आलेली महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ हिच्या कलम ११३ चे पोट-नियम (२-अ) अन्वये, १ ऑगस्ट १९७९ रोजी सुरू होणाऱ्या आणि ३१ जुलै १९९१ रोजी संपणाऱ्या, हमीच्या पहिल्या कालावधीत निश्चित केलेल्या किंवा सुधारणा केलेल्या, अकृषिक आकारणीच्या प्रमाण दराने केलेले अकृषिक आकारणीचे कोणतेही निर्धारण आणि बसवलेली अकृषिक आकारणी ही, उक्त सुधारणा अधिनियमांद्वारे सुधारण्यात आलेल्या उक्त कलम ११३ चे पोट-कलम (२-अ) हे जणू काही सर्व संबंधित वेळी सतत अंमलात होते असे मानून कायद्यानुसार निर्धारित केलेली आणि बसवण्यात आलेली असल्याचे मानण्यात येईल; आणि सुधारणा केलेल्या स्वरूपातील उक्त पोट-कलम (२-अ) हे अस्तित्वात नव्हते याच केवळ कारणावरून अशा निर्धारणास किंवा बसवलेल्या आकारणीस कोणत्याही न्यायालयामध्ये किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर हरकत घेता येणार नाही ; आणि त्यानुसार, त्या संबंधात कोणत्याही न्यायालयासमोर किंवा कोणत्याही न्यायालयामध्ये किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा इतर कार्यवाही चालविण्यात किंवा चालू ठेवण्यात येणार नाही .".

---

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

†† सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २, हा सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ५ द्वारे निरसित करण्यात आला.

@ सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४, हा सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ५ द्वारे निरसित करण्यात आला.

@@ सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २९, हा सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४ द्वारे निरसित करण्यात आला.

# महाराष्ट्र राज्यातील जमीन व जमीन महसूल यांच्या संबंधीच्या कायद्यांचे एकीकरण करण्यासाठी आणि त्यात दुरुस्ती करण्यासाठी अधिनियम

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील जमीन व जमीन महसूल यांच्या संबंधीच्या कायद्यांचे एकीकरण करणे व त्यात दुरुस्ती करणे आणि तत्संबंधित बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, असे म्हणावे.

(२) ही संहिता सबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल; परंतु प्रकरण तीन (जमिनीवरील अतिक्रमणांच्या संबंधातील तरतुदी खेरीज करून) चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ, दहा, अकरा, बारा (कलम २४२ खेरीज करून) आणि सोळा (कलमे ३२७, ३२९, ३३०, [१] [३३०-क], ३३५, ३३६ आणि ३३७ खेरीज करून) यांच्या तरतुदी मुंबई शहरास लागू होणार नाहीत.

(३) राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकास [२] तो सबंध महाराष्ट्र राज्यात अंमलात येईल आणि निरनिराळ्या तरतुदींसाठी निरनिराळे दिनांक नेमता येतील.

व्याख्या.

**२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर, या संहितेत,—

(१) ‘‘ कृषिवर्ष ’’ या संज्ञेचा अर्थ राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील त्या दिनांकापासून सुरू होणारे वर्ष असा होतो ;

(२) ‘‘ दुमाला ’’ या संज्ञेचा अर्थ खंड किंवा जमीन महसूल देण्याचे राज्य शासनाचे हक्क जेथवर संबंधित असतील तेथवर पूर्णतः किंवा अंशतः कोणत्याही व्यक्तीच्या मालकीत हस्तांतरित झालेली, असा होतो ;

(३) ‘‘ सीमांची चिन्हे ’’ या संज्ञेचा अर्थ, उभी केलेली कोणतीही निशाणी, मग ती मातीची असो, दगडाची असो किंवा इतर पदार्थाची असो आणि तसेच जमिनीच्या कोणत्याही भागाची सीमा नियोजित करण्याकरिता, त्याबाबत प्राधिकार असलेल्या भू-मापन अधिकाऱ्याने किंवा महसूल अधिकाऱ्याने उभारलेले, लावलेले किंवा निर्दिष्ट केलेले कोणतेही कुंपण, बिन-नांगरलेला बांध किंवा जमिनीची पट्टी किंवा अन्य, नैसर्गिक किंवा कृत्रिम वस्तू, असा होतो ;

(४) ‘‘ इमारत ’’ या संज्ञेचा अर्थ शेतातील इमारत नसलेले कोणतेही बांधकाम असा होतो ;

(५) ‘‘ इमारतीची जागा ’’ या संज्ञेचा अर्थ बांधकाम करण्याच्या प्रयोजनांकरिता धारण केलेला जमिनीचा भाग असा होतो— मग त्यावर प्रत्यक्षपणे कोणतीही इमारत उभारण्यात आली असो किंवा नसो, आणि त्यामध्ये, त्यावर उभारलेल्या कोणत्याही इमारतीने परिवेष्टित किंवा तिच्याशी संलगन असेलेली मोकळी जागा किंवा अंगण यांचा समावेश होतो ;

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

[२] १५ ऑगस्ट १९६७ (शासकीय अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक यूएनएफ-१०६७-आर, दिनांक ११ ऑगस्ट १९६७ पहा).

१८७२ चा एक. (६) “ प्रमाणित प्रत ” किंवा “ प्रमाणित उतारा ” या संज्ञेचा अर्थ, भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ याच्या कलम ७६ अन्वये विहित केलेल्या रीतीने प्रमाणित केलेली, यथास्थिति, प्रत किंवा उतारा असा होतो ;

(७) “ चावडी ” या संज्ञेचा अर्थ, गावाचा कारभार चालविण्यासाठी ग्राम अधिकाऱ्याकडून सर्वसाधारणपणे वापरण्यात येणारी जागा असा होतो ;

(८) “ भू-संपत्ती ” या संज्ञेचा अर्थ, जमिनीतील कोणताही हितसंबंध आणि ती जमीन धारण करण्यास पात्र असलेल्या व्यक्तींकडे किंवा व्यक्तीसमुहांकडे निहित असलेले एकूण हितसंबंध असा होतो ;

(९) “ शेतातील इमारत ” या संज्ञेचा अर्थ, आकारणी केलेल्या किंवा शेतीच्या कारणाकरिता धारण केलेल्या जमिनीवर, अशा जमिनींच्या किंवा तिच्या धारकाच्या मालकीच्या किंवा त्याच्याकडून लागवड करण्यात येत असलेल्या कोणत्याही इतर जमिनींच्या संबंधातील पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी,—

(क) शेतीची अवजारे, खत किंवा वैरण साठविण्यासाठी,

(ख) शेतीचे उत्पन्न साठविण्यासाठी,

(ग) गुराढोरांना निवारा मिळण्यासाठी,

(घ) जमीन धारकाच्या कुटुंबातील व्यक्तींच्या, सेवकांच्या किंवा कुळाच्या निवासासाठी, किंवा

(ङ) लागवडीसंबंधीच्या त्याच्या व्यवस्थेचा एक अभिन्न भाग असलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनासाठी बांधलेले बांधकाम असा होतो

(१०) “ गावठाण ” किंवा “ गावातील जागा ” या संज्ञेचा अर्थ, कलम १२२ अन्वये निश्चित करण्यात आल्याप्रमाणे गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेमध्ये समाविष्ट असलेली जमीन असा होतो ;

(११) “ शासकीय पट्टेदार ” या संज्ञेचा अर्थ, कलम ३८ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे शासनाकडून पट्ट्याने जमीन धारण करणारी व्यक्ती असा होतो ;

(१२) “ जमीन धारण करणे ” किंवा “जमीनधारक असणे किंवा जमिनीचा धारक असणे ” या संज्ञेचा अर्थ, वैधरीत्या जमिनीचा कब्जा असणे असा होतो—मग तो प्रत्यक्षात असो किंवा नसो ;

(१३) “ धारण जमीन ” या संज्ञेचा अर्थ, धारकाने धारण केलेल्या जमिनीचा भाग असा होतो ;

(१४) धारण जमिनीच्या संबंधात “ सुधारणा ” या संज्ञेचा अर्थ, ज्यामुळे जमिनीच्या किमतीत महत्त्वपूर्ण वाढ होते व जे अशा जमिनीवर करणे योग्य आहे. तसेच ज्या कारणाकरिता जमीन धारण करण्यात आली असेल त्या कारणाशी जे सुसंगत आहे आणि जे काम धारण जमिनीवर केले नसेल, तरीही ते तिच्या प्रत्यक्षपणे फायद्यासाठी केलेले असेल किंवा काम झाल्यावर त्या जमिनीस प्रत्यक्षपणे फायदेशीर करून देण्यास येत असेल असे कोणतेही काम, असा होतो; आणि पूर्ववर्ती तरतुदींना अधीन राहून, यामध्ये,—

(क) शेतीच्या प्रयोजनांसाठी पाण्याचा साठा, पुरवठा किंवा वाटप करण्यासाठी तलाव, विहिरी, पाण्याचे पाट, बंधारे व इतर बांधकामे बांधणे ;

(ख) जमिनीवरील जलनिस्सारणासाठी किंवा पुरामुळे किंवा धूप होण्यामुळे किंवा पाण्यामुळे होणाऱ्या इतर नुकसानीपासून जमिनीचे संरक्षण करण्यासाठी बांधकामे करणे ;

(ग) झाडे लावणे आणि जमीन लागवडयोग्य करणे, साफ करणे, जमिनीला कुंपण घालणे, ती सपाट करणे किंवा ताली बांधणे ;

(घ) धारण जमिनींचा सोयीस्कररीत्या किंवा फायदेशीर उपयोग करण्यासाठी किंवा तिचा भोगवटा करण्यासाठी अशा धारण जमिनीवर किंवा तिच्या परिसरात गावठाणाव्यतिरिक्त इतरत्र इमारती बांधणे; आणि

(ङ) वरीलपैकी कोणतेही बांधकाम पुन्हा नव्याने बांधणे किंवा त्याची पुन्हा बांधणी करणे किंवा त्यामध्ये फेरफार किंवा वाढ करणे. या गोष्टींचा समावेश होतो ;

मात्र, त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होत नाही—

(एक) त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांकडून शेतीच्या नित्य व्यवसायात सामान्यतः करण्यात येणारी पुढील कामे म्हणजे, तात्पुरत्या विहिरी आणि पाण्याचे पाट व बंधारे बांधणे, जमीन सपाट करणे, कुंपण घालणे किंवा अन्य कामे करणे किंवा अशा प्रकारच्या कामात किरकोळ फेरबदल करणे किंवा दुरुस्ती करणे; किंवा

(दोन) भोगवटादार किंवा कुळ म्हणून कोणत्याही इतर व्यक्तीच्या कब्जात कोठेही असलेल्या कोणत्याही जमिनीची किंमत वस्तुतः कमी करणारे कोणतेही काम :

**स्पष्टीकरण**.—जे काम, अनेक धारण जमिनींना फायदेशीर होते ते अशा धारण जमिनींपैकी प्रत्येक धारण जमिनीच्या बाबतीत केलेली सुधारणा आहे असे समजण्यात येईल.

(१५) " संयुक्त धारक " किंवा " संयुक्त भोगवटादार " या संज्ञेचा अर्थ, जमिनीचे सहहिस्सेदार म्हणून ती धारण करणारे धारक किंवा भोगवटादार असा होतो. मग ते हिंदू कायद्यानुसार अविभक्त कुटुंबातील सहहिस्सेदार असोत किंवा अन्य रितीने असोत, आणि ज्यांच्या हिश्यांची मोजून-मापून विभागणी करण्यात आली नाही असे धारक किंवा भोगवटादार; आणि जेव्हा जमीन संयुक्त धारकांनी किंवा संयुक्त भोगवटादारांनी धारण केली असेल तेव्हा, यथास्थिती, " धारक " किंवा "भोगवटादार " याचा अर्थ, सर्व संयुक्त धारक किंवा संयुक्त भोगवटादार असा होतो ;

(१६) " जमीन " या संज्ञेत, जमिनीपासून मिळावयाच्या फायद्याचा आणि भूमीस संलग्न असलेल्या वस्तूंचा किंवा भूमीस संलग्न असलेल्या वस्तूंशी कायम जोडलेल्या कोणत्याही वस्तूंचा, आणि तसेच, गावाच्या किंवा निश्चित केलेल्या इतर प्रदेशांच्या महसुलातील किंवा खंडातील हिस्सा किंवा त्यावरील आकार, यांचा समावेश होतो ;

(१७) " जमीन मालक " या संज्ञेचा अर्थ, जमीन पट्ट्याने देणारा असा होतो ;

(१८) " भूमि-अभिलेख " या संज्ञेचा अर्थ, या संहितेच्या तरतुदींअन्वये, किंवा त्याच्या प्रयोजनांकरिता ठेवलेले अभिलेख असा होतो आणि त्या संज्ञेत राज्यांत अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही क्षेत्रात अंमलात आलेल्या आणि अशा कायद्यान्वये किंवा अन्यथा कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेल्या अंतिम नगररचना योजनेचे, सुधारणा योजनेचे किंवा धारण जमिनीच्या एकत्रीकरणाच्या योजनेचे नकाशे व आराखडे यांच्या प्रतीचा समावेश होतो ;

(१९) " जमीन महसूल " या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही व्यक्तीने धारण केलेल्या किंवा तिच्याकडे निहित असलेल्या जमिनीबद्दल किंवा तीत असलेल्या हितसंबंधाबद्दल किंवा त्यावर चालवता येण्याजोग्या हक्काबद्दल तिच्याकडून राज्य शासनाला किंवा राज्य शासनाच्या वतीने मिळालेल्या किंवा वैधरित्या मागमी करण्याजोग्या पैशाच्या स्वरूपातील सर्व रकमा किंवा द्यावयाच्या रकमा—मग अशा रकमा कोणत्याही नावाखाली देण्याजोग्या असोत—आणि राज्य शासनाने त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींअन्वये अधिकृत केलेला कोणताही उपकर किंवा पट्टी असा होतो आणि त्यात कोणत्याही जमिनीबद्दल इनामदाराकडून देण्याजोगे कोणतेही पट्टामूल्य (प्रिमियम), खंड, पट्ट्याची रक्कम, उक्ता खंड (क्विटरेंट), जुडी किंवा कोणत्याही अधिनियमान्वये, नियमान्वये, करारान्वये किंवा लेख्यांन्वये तरतूद केल्याप्रमाणे द्यावयाची इतर कोणतीही रक्कम यांचा समावेश होतो ;

१९६१ चा २५. (२०) ‘‘ विधि व्यवसायी ’’ या संज्ञेचा अर्थ, अधिवक्त्यांबाबत अधिनियम, १९६१ यात जो दिलेला असेल तोच असेल

(२१) ‘‘ अकृषिक आकारणी ’’ या संज्ञेचा अर्थ, अकृषिक प्रयोजनांसाठी केलेल्या जमिनीच्या उपयोगाच्या संदर्भात, या संहितेच्या तरतुदींअन्वये किंवा तद्न्वये केलेल्या नियमांन्वये कोणत्याही जमिनीवर निश्चित केलेली आकारणी असा होतो ;

(२२) ‘‘ भोगवट्याची जमीन ’’ या संज्ञेचा अर्थ, भोगवटादाराने धारण केलेल्या जमिनीचा भाग असा होतो ;

(२३) ‘‘ भोगवटादार ’’ या संज्ञेचा अर्थ, कूळ किंवा शासकीय पट्टेदार खेरीजकरून, बिनदुमाला जमिनीचा प्रत्यक्ष कब्जा असलेला धारक असा होतो ; परंतु प्रत्यक्ष कब्जा असणारा धारक हा कूळ असेल त्याबाबतीत, भूमिधारक किंवा, यथास्थिती, वरिष्ठ जमीनमालक हा भोगवटादार आहे असे मानण्यात येईल ;

(२४) ‘‘ भोगवटा ’’ या संज्ञेचा अर्थ, कब्जा असा होतो ;

(२५) ‘‘ जमिनाचा भोगवटा करणे ’’ या संज्ञेचा अर्थ, जमीन कब्जात असणे किंवा कब्जात घेणे असा होतो ;

(२६) ‘‘ पार्डी जमीन ’’ या संज्ञेचा अर्थ, गावठाणातील घरांशी संबंधित असलेली लागवड केलेली जमीन असा होतो ;

(२७) कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात ‘‘ लोकसंख्या ’’ या संज्ञेचा अर्थ, ज्या जनगणनेची संबंधित आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे अशा निकटपूर्वीच्या जनगणनेत ठरविलेली लोकसंख्या असा होतो ;

(२८) ‘‘ विहित ’’ या संज्ञेचा अर्थ, राज्य शासनाने या संहितेअन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा होतो ;

(२९) ‘‘ मान्यताप्राप्त अभिकर्ता ’’ या संज्ञेचा अर्थ, या संहितेअन्वये कार्यवाहीतील कोणत्याही पक्षकाराने अशा कार्यवाहीमध्ये, त्याच्या वतीने उपस्थित राहण्यासाठी व अर्ज करण्यासाठी आणि इतर कामे करण्यासाठी लेखी प्राधिकृत केलेली व्यक्ती असा होतो ;

(३०) ‘‘ संबंधित कुळवहिवाट कायदा ’’ या संज्ञेचा अर्थ,—

१९४८ चा मुंबई ६७. (क) महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्राच्या संबंधात, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८.

१९५० चा हैदराबाद २१. (ख) महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्राच्या संबंधात, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५० ; आणि

१९५८ चा मुंबई ९९. (ग) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ प्रदेशाच्या संबंधात, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ असा होतो ;

(३१) ‘‘ महसूल अधिकारी ’’ या संज्ञेचा अर्थ, या संहितेच्या कोणत्याही तरतुदींअन्वये नेमलेला आणि जमीन महसुलाच्या किंवा भूमापनाच्या, आकारणीच्या, हिशोबाच्या किंवा तत्संबंधी अभिलेखाच्या कामकाजात किंवा कामकाजांच्या संबंधाने नियुक्त केलेला कोणत्याही दर्जाचा प्रत्येक अधिकारी असा होतो ;

(३२) '' लोकसंख्या '' या संज्ञेचा अर्थ, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जो दिनांक नेमील अशा दिनांकापासून सुरू होणारे वर्ष असा होतो ;

(३३) '' साझा '' या संज्ञेचा अर्थ, कलम ४ अन्वये साझा म्हणून रचना करण्यात आलेल्या तालुक्यातील गावांचा गट असा होतो ;

[1][ (३३क) '' साठवणुकीचे यंत्र (Storage Device) '' याचा अर्थ, संगणकामध्ये माहिती साठवून ठेवण्यासाठी वापरण्यात येणारे इलेक्ट्रॉनिक्स/विद्युत यंत्र, असा आहे. आणि यात, यंत्रसामग्री व आज्ञावली (हार्डवेअर व सॉफ्टवेअर) या दोन्हींचा समावेश होतो. ] ;

(३४) '' उपविभागीय अधिकारी '' या संज्ञेचा अर्थ, जिल्ह्याच्या एका किंवा अनेक उप-विभागांचा कार्यभार ज्याच्याकडे सोपविण्यात आला आहे असा सहायक किंवा उप-जिल्हाधिकारी असा होतो ;

(३५) '' भू-मापन क्रमांकाचा पोट-विभाग '' या संज्ञेचा अर्थ, भू-मापन क्रमांकाच्या ज्या विभागाचे क्षेत्रफळ आणि आकारणी, भूमि-अभिलेखांत ज्या भू-मापन क्रमांकाचा तो भाग असेल त्या क्रमांकानंतर, दर्शक क्रमांक देऊन स्वतंत्रपणे नोंदली असेल तो भाग असा होतो ;

(३६) '' भू-मापन निशाणी '' या संज्ञेचा अर्थ, या संहितेच्या प्रयोजनांसाठी भू-करासंबंधी (कॅडॅस्ट्रल) भू-मापनाच्या प्रयोजनांसाठी उभारण्यात आलेली निशाणी असा होतो ;

(३७) '' भू-मापन क्रमांक '' या संज्ञेचा अर्थ, भूमि-अभिलेखात दर्शक क्रमांक देऊन त्याखाली जमिनीच्या ज्या विभागाचे क्षेत्रफळ आणि आकारणी स्वतंत्रपणे नोंदण्यात आली असेल तो जमिनीचा भाग असा होतो आणि, त्यामध्ये—

(एक) कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही क्षेत्रात अंमलात आलेली अंतिम नगररचना योजना, सुधारणा योजना किंवा धारण जमिनीच्या एकत्रीकरणाची योजना यान्वये पुर्नःप्रस्थापित भू-खंडाचा (प्लॉटस्); आणि

(दोन) नागपूर, वर्धा, चांदा व भंडारा या जिल्ह्यांतील खसरा क्रमांक म्हणून ओळखण्यात येणाऱ्या, कोणत्याही दर्शक क्रमांकाखाली भूमि-अभिलेखात नमूद केलेल्या जमिनीच्या कोणत्याही भागाचा. समावेश होतो ;

(३८) प्रकरण १४ खेरीज, '' वरिष्ठ धारक '' या संज्ञेचा अर्थ, इतर भूमिधारकांकडून (ज्यांना कनिष्ठ धारक असे म्हटले आहे) खंड किंवा जमीन महसूल घेण्याचा हक्क ज्या भूमिधारकास आहे तो भूमिधारक असा होतो; मग तो अशा खंडाबद्दल किंवा जमीन महसुलाबद्दल, किंवा त्यांच्या कोणत्याही भागाबद्दल राज्य शासनाला जबाबदार असो किंवा नसो :

परंतु, दुमाला जमिनीचा धारक म्हणून भूमि-अभिलेखात अधिकृतरित्या नोंदण्यात आलेल्या धारकाने, विवक्षित अशा विशिष्ट परिस्थितीत, जमीन पुन्हा परत घेतली जाण्याच्या हक्कास अधीन राहून, खंडाच्या किंवा जमीन महसुलाच्या माफीसह जमीन दिलेली असेल तेव्हा, असा धारक, ज्याला ती जमीन दिली असेल त्याच्या बाबीतीत, त्याने अशा रितीने दिलेल्या जमिनीचा वरिष्ठ धारक आहे असे मानण्यात येईल, आणि ज्याला जमीन देण्यात आली असेल तो, ज्याने जमीन दिली त्यांच्या बाबतीत अशा जमिनीचा कनिष्ठ धारक आहे असे मानण्यात येईल. आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, याची कलमे १४७, १५१ आणि १५२ च्या प्रयोजनांसाठी, यापुढे ''कूळ '' या संज्ञेच्या व्याख्येत काहीही अंतर्भूत केलेले असले तरीही, तो अशा जमीन देणाऱ्या व्यक्तींचे कूळ आहे असे मानण्यात येईल. १९६२ चा महा.५.

(३९) '' भू-मापन अधिकारी '' या संज्ञेचा अर्थ, कलम ८ अन्वये, किंवा त्यामध्ये तरतूद केलेल्या रीतीने नेमलेला अधिकारी असा होतो ;

[1]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २ द्वारे खंड (३३क) दाखल करण्यात आला.

(४०) “ कूळ ” या संज्ञेचा अर्थ, पट्टेदार असा होतो—मग तो लेखान्वये जमीन धारण करणारा असो, किंवा तोंडी करारान्वये जमीन धारण करणारा असो—आणि त्यामध्ये, कब्जासहित कुळाचे हक्क गहाण घेणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो; परंतु त्यामध्ये प्रत्यक्षपणे राज्य शासनाकडून जमीन धारण करणाऱ्या पट्टेदाराचा समावेश होत नाही.

(४१) “ भोगवट्यात नसलेली जमीन ” या संज्ञेचा अर्थ, भोगवटादार, कूळ किंवा शासकीय पट्टेदार यांनी धारण केलेल्या जमिनीखेरीज गावातील जमीन असा होतो ;

[१] [ (४२) “ नागरी क्षेत्र ” याचा अर्थ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित करण्यात आलेल्या कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट केलेले क्षेत्र असा आहे आणि “ नगरेतर क्षेत्र ” या शब्दप्रयोगाचा अर्थ त्यानुसार लावला जाईल. ]

(४३) “ गाव ” या संज्ञेत, नगराचा किंवा शहराचा आणि गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या सर्व जमिनींचा समावेश होतो ;

(४४) “ वाडा जमीन ” या संज्ञेचा अर्थ, गुरे-ढोरे बांधण्यासाठी किंवा पीक किंवा वैरण, खत किंवा तत्सम इतर वस्तू साठविण्यासाठी वापरलेली गावठाणातील खुली जागा असा होतो.

## महसुली क्षेत्र

**३.** या संहितेच्या प्रयोजनासाठी, राज्याची विभागांमध्ये विभागणी करण्यात येईल आणि यामध्ये [२] [ (मुंबई शहर धरून) ] एका किंवा अनेक जिल्ह्यांचा समावेश असेल, आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये एका किंवा अनेक उप-विभागांचा समावेश होऊ शकेल, आणि प्रत्येक उप-विभागामध्ये एका किंवा अनेक तालुक्याचा समावेश होऊ शकेल आणि प्रत्येक तालुक्यामध्ये विवक्षित गावांचा समावेश होऊ शकेल. राज्याची महसुली क्षेत्रांमध्ये विभागणी.

**४.** (१) राज्य शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे,— महसुली क्षेत्र घटित करणे.

(एक) ज्या जिल्ह्यांचा मिळून एक विभाग होईल ते जिल्हे [२] [ (मुंबई शहर धरून) ] ;

(दोन) ज्या उप-विभागांचा मिळून एक जिल्हा होईल ते उप-विभाग ;

(तीन) ज्या तालुक्यांचा मिळून एक उप-विभाग होईल ते तालुके ;

(चार) ज्या गावांचा मिळून एक तालुका होईल ती गावे ;

(पाच) ज्या स्थानिक क्षेत्रांचे मिळून एक गाव होईल ते स्थानिक क्षेत्र ;

या गोष्टी विनिर्दिष्ट करता येतील ; आणि

(सहा) अशा रितीने घटित करण्यात आलेल्या अशा कोणत्याही महसुली क्षेत्राच्या हद्दींमध्ये एकीकरण करून, विभागणी करून किंवा इतर कोणत्याही रितीने फेरबदल करता येईल किंवा असे कोणतेही महसुली क्षेत्र रद्द करता येईल आणि अशा कोणत्याही महसुली क्षेत्रास नाव देता येईल व त्याच्या नावामध्ये फेरबदल करता येईल; आणि जेव्हा कोणत्याही क्षेत्रास पुन्हा नाव दिले असेल अशा कोणत्याही बाबतीत, कोणत्याही कायद्यामध्ये, लेखामध्ये किंवा इतर दस्तऐवजामध्ये त्या क्षेत्रासंबंधी त्याच्या मूळच्या नावाने असलेले सर्व उल्लेख हे, अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली नसेल, तर त्या क्षेत्रात पुन्हा जे नाव दिलेले असेल त्या नावासंबंधीचे उल्लेख असल्याचे समजण्यात येईल :

---

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २ द्वारे खंड ४२, ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ३ व ४ द्वारे “ (मुंबई शहर वगळून) ” याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, या संहितेच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य शासन, तत्सम अधिसूचनेद्वारे प्रत्येक वाडी आणि वेगळे निवासस्थान असलेल्या एखाद्या गावाच्या गावठाणाच्या हद्दीबाहेरील कोणतेही क्षेत्र, गाव म्हणून प्रस्थापित करील (अशा वाडीची किंवा क्षेत्राची लोकसंख्या [१] [जी तहसीलदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा महसूल अधिकारी निश्चित करील] अशी तीनशेपेक्षा कमी नसेल) आणि अशा रीतीने प्रस्थापित केलेल्या गावाच्या हद्दी त्या अधिसूचनेत निर्दिष्ट करील.

(२) जिल्हाधिकाऱ्यास, विहित केलेल्या रीतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेशाद्वारे, तालुक्यातील ज्या गावांचा मिळून एक साझा होईल अशा गावांची, आणि तालुक्यातील ज्या साझ्यांचे मिळून एक मंडल होईल अशा साझ्यांची रचना करता येईल आणि अशा रितीने रचना करण्यात आलेल्या कोणत्याही साझ्याच्या किंवा मंडलाच्या हद्दींमध्ये फेरबदल करता येईल किंवा कोणत्याही साझा किंवा मंडल रद्द करता येईल.

(३) ही संहिता अंमलात येण्याच्या वेळी अस्तित्वात असलेले विभाग, जिल्हे, उप-विभाग, तालुके, मंडले, साझे आणि गावे ही, या कलमान्वये अन्यथा त्यात फेरबदल केले नसतील तर, असे विभाग, जिल्हे, उप विभाग, तालुके, मंडले, साझे आणि गावे म्हणून त्यांची अनुक्रमे जी नावे असतील त्याच नावाने चालू राहतील.

(४) या कलमान्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना किंवा आदेश पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असेल ; आणि मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम २४ च्या तरतुदी ज्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीनंतर करावयाच्या नियमांच्या संबंधात लागू होतात त्याप्रमाणे त्या शक्य असेल तेथवर, अशा अधिसूचनेच्या किंवा आदेशाच्या संबंधात लागू होतील. १९०४ चा मुंबई १.

प्रकरण दोन

## महसूल अधिकारी : त्यांचे अधिकार व कर्तव्ये

महसुली बाबींच्या बाबतीतील मुख्य नियंत्रक प्राधिकारी.

**५.** आयुक्ताच्या विभागातील जमीन महसुलाशी संबंधित असलेल्या सर्व बाबतीतील मुख्य नियंत्रक प्राधिकार हा, राज्य शासनाच्या अधीक्षणास, निदेशास व नियंत्रणास अधीन राहून आयुक्ताकडे निहित असेल.

विभागातील महसूल अधिकारी.

**६.** राज्य शासन, प्रत्येक विभागाकरिता एक आयुक्त नियुक्त करील, आणि त्यास एखाद्या विभागात आयुक्तास सहाय्य करण्यासाठी एक अपर आयुक्त आणि इष्ट वाटतील तितके सहायक आयुक्त नियुक्त करता येतील :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, दोन किंवा अधिक विभागांसाठी आयुक्त म्हणून एकाच अधिकाऱ्याची नेमणूक करण्यास प्रतिबंध होणार नाही.

जिल्ह्यातील महसूल अधिकारी.

**७.** (१) राज्य शासन [२] [प्रत्येक जिल्ह्याकरिता (मुंबई शहर धरून) ] एक जिल्हाधिकारी नियुक्त करील व त्याच्याकडे त्या जिल्ह्याच्या महसुली कारभाराचे काम असेल; आणि प्रत्येक तालुक्याकरिता एक तहसीलदार नियुक्त करील, आणि तो तालुक्याच्या स्थानिक महसुली कारभाराचे काम सोपवण्यात आलेला मुख्य अधिकारी असेल.

---

[१] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये " तीनशेपेक्षा " या शब्दाऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ५ द्वारे " मुंबई शहराकरिता आणि प्रत्येक जिल्ह्याकरिता " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

(२) राज्य शासनाला, [१] [प्रत्येक जिल्ह्यात (मुंबई शहर धरून)] एक किंवा अधिक अपर जिल्हाधिकारी आणि त्यात इष्ट वाटतील इतके सहायक जिल्हाधिकारी आणि उप-जिल्हाधिकारी (सहायकांच्या नेमणुकीसंबंधीच्या आदेशात स्पष्ट केले असेल त्याप्रमाणे " प्रथम ", " द्वितीय ", " अधिसंख्य " इत्यादी सहायक यासारख्या पदनामांनी संबोधण्यात येईल). तालुक्यात एक किंवा अधिक नायब-तहसीलदार आणि त्यामध्ये एक किंवा अधिक अपर तहसीलदार किंवा नायब तहसीलदार आणि महसूल अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी त्यास इष्ट वाटतील (अशी पदनामे असलेले) अशा इतर व्यक्ती नियुक्त करता येतील.

(३) राज्य शासनाच्या सर्वसाधारण आदेशास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यांस जिल्ह्याच्या एका किंवा अधिक उप-विभागांचा कारभार सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविता येईल, किंवा त्याचा कारभार स्वतःकडे ठेवता येईल. अशा सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्यास, उप विभागीय अधिकारी या नावाने देखील संबोधता येईल.

(४) जिल्हाधिकाऱ्यास प्रत्येक जिल्ह्यामध्ये मंडलाचे काम पाहण्यासाठी मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक म्हणून, त्यास योग्य वाटतील इतक्या व्यक्ती नियुक्त करता येतील, आणि त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे साझ्याकरिता एक किंवा अधिक तलाठी आणि प्रत्येक गावाकरिता किंवा गावांच्या गटाकरिता एक किंवा अधिक कोतवाल किंवा इतर ग्रामसेवक नियुक्त करता येतील.

**८.** प्रकरणे पाच, सहा, आठ, नऊ व दहा यांच्या प्रयोजनांसाठी राज्य शासनाला, वेळोवेळी आवश्यक वाटतील असे अधिकारी नियुक्त करता येतील. अशा अधिकाऱ्यांना " जमाबंदी आयुक्त ", " संचालक, भूमी अभिलेख ", " उप संचालक, भूमि-अभिलेख ", " अधीक्षक, भूमी-अभिलेख ", " जमाबंदी अधिकारी ", " जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख ", आणि " भू-मापन तहसीलदार ", किंवा आवश्यक वाटेल अशा इतर नावाने पदनिर्देशित करता येईल. भू-मापन अधिकारी.

**९.** जी व्यक्ती कायद्यानुसार अन्यता सक्षम असेल अशा एका आणि त्याच व्यक्तीस, राज्य शासनाने या प्रकरणात तरतूद केलेल्या पदांपेकी कोणत्याही दोन किंवा अधिक पदांवर नेमणे किंवा एकाच अभिधानाच्या अधिकाऱ्यास, विवक्षित स्थानिक हद्दीत किंवा अन्यथा, इष्ट वाटेल त्याप्रमाणे, कोणत्याही इतर अधिकाऱ्याची किंवा अधिकाऱ्यांचे सर्व किंवा कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये प्रदान करणे हे विधिसंमत असेल. पदांचे संयोजन.

[२] [ **९क.** राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, निर्देशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा महसुली किंवा भूमापन अधिकाऱ्यांच्या संबंधात, निर्दिष्ट करण्यात आलेल्या असतील अशा कोणत्याही शर्तीस अधीन राहून कलम ७, कलम ८ किंवा कलम ९ अन्वये नेमणुका करण्याच्या राज्य शासनाच्या अधिकारांचा वापर, निर्देशात निर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, यथास्थिति, जिल्हाधिकारी किंवा भूमि-अभिलेख अधीक्षक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याससुद्धा करता येईल.] अधिकारांचे प्रत्यायोजन.

**१०.** जर जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार आपली कर्तव्ये बजावण्यास असमर्थ झाला असेल किंवा कोणत्याही कारणामुळे त्याने आपले पद रिकामे केले असेल किंवा तो आपले अधिकार क्षेत्र सोडून गेला असेल किंवा तो मरण पावला असेल तर— तात्पुरत्या रिकाम्या जागा.

(क) अपर जिल्हाधिकारी आणि अपर जिल्हाधिकारी नसल्यास जिल्ह्यातील सर्वात उच्च दर्जाचा सहायक किंवा उप-जिल्हाधिकारी.

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ५ अन्वये " मुंबई शहराकरिता आणि प्रत्येक जिल्ह्याकरिता " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[२] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम २ द्वारे कलम ९-क समाविष्ट करण्यात आले.

(ख) अपर तहसीलदार आणि अपर तहसीलदार नसल्यास नायब तहसीलदार किंवा त्याच्या हाताखाली काम करणारा तालुक्यातील ज्येष्ठतम महसूल अधिकारी.

राज्याने शासनाने इतर तरतूद केली नसेल तर, तात्पुरत्या कालावधीकरिता जिल्हाधिकाऱ्याच्या, किंवा, यथास्थिती, तहसिलदारांच्या पदावर येतील आणि जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार आपल्या जिल्ह्याचा किंवा तालुक्याचा कार्यभार हाती घेईपर्यंत किंवा उत्तराधिकारी योग्यरित्या नेमण्यात येऊन आपल्या नेमणुकीच्या पदाचा कार्यभार घेईपर्यंत, ते या संहितेअन्वये, जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार असल्याचे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण**.—ज्या अधिकाऱ्याचे प्रमुख पद हे सहायक जिल्हाधिकाऱ्यांच्या पदापेक्षा वेगळे असेल, आणि जो केवळ विशेष प्रयोजनांसाठीच सहायक जिल्हाधिकारी म्हणून काम करीत असेल, असा अधिकारी, या कलमाच्या प्रयोजनांसाठी सहायक आहे असे मानण्यात येणार नाही.

**११.** (१) सर्व महसूल अधिकारी हे, राज्य शासनाचे दुय्यम अधिकारी असतील.

(२) राज्य शासनाने अन्यप्रकारे निदेश दिला नसेल तर, विभागातील सर्व महसूल अधिकारी हे आयुक्ताला दुय्यम अधिकारी असतील, आणि [१][जिल्ह्यातील (मुंबई शहर धरून)] सर्व महसूल अधिकारी हे जिल्हाधिकाऱ्याच्या हाताखालील अधिकारी असतील.

(३) राज्य शासनाने अन्यप्रकारे निदेश दिला नसेल तर, भू-मापन अधिकारी धरून इतर सर्व महसूल अधिकारी हे राज्य शासन निदेश देईल त्या क्रमाने एक दुसऱ्याला दुय्यम अधिकारी असतील.

येईल किंवा त्यांच्यावर लादलेली सर्व कर्तव्ये आणि कामे पार पाडता येतील आणि तहसीलदार देखील, राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे जिल्हाधिकारी त्याच्याकडे सोपवील अशा अधिकारांचा वापर करील.

[१] [ **स्पष्टीकरण**.—या परंतुकामध्ये ''तहसीलदार'' या संज्ञेत '' अपर तहसीलदाराचा '' समावेश होईल व तो तसा नेहमीच समाविष्ट असल्याचे मानण्यात येईल.]

(२) तसेच उपरोक्त महसूल अधिकारी, राज्य शासनाच्या नियंत्रणास व सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदी अमलात आणण्याच्याच केवळ प्रयोजनासाठी व त्याच्याशी सुसंगत असेल तेथवर, राज्य शासन लेखी आदेशाद्वारे त्यांस प्रदान करील अशा अधिकारांचा सुद्धा वापर करतील व त्यांच्यावर लादील अशी कर्तव्ये व कामे पार पाडतील.

(३) अपर आयुक्त व सहायक आयुक्त आणि अपर जिल्हाधिकारी व अपर तहसीलदार यापैकी प्रत्येक जण आपापल्या अधिकारक्षेत्रात किंवा त्याच्या भागात, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत निदेश होईल अशा या संहितेच्या तरतुदींन्वयेच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वयेच्या आयुक्ताच्या, जिल्हाधिकाऱ्यांच्या किंवा, यथास्थिती, तहसीलदाराच्या अधिकारांचा वापर करील आणि त्याची कर्तव्ये व काम पार पाडील.

[२] * * * *

(४) प्रकरण तेराच्या तरतुदींना अधीन राहून उप-विभागीय अधिकारी, त्याच्या ताब्यातील उप-विभागाच्या संबंधात, या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये जिल्हाधिकाऱ्यास प्रदान केलेली सर्व कर्तव्ये व कामे पार पाडील आणि सर्व अधिकारांचा वापर करील :

परंतु, जिल्हाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल तेव्हा तेव्हा, अशा कोणत्याही उप-विभागीय अधिकाऱ्यास विवक्षित कर्तव्ये पार न पाडण्याबद्दल किंवा विवक्षित अधिकारांचा वापर न करण्याबद्दल निदेश देता येईल आणि ती कर्तव्ये पार पाडणे किंवा त्या अधिकारांचा वापर करणे या गोष्टी स्वतःकडे राखून ठेवता येतील किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या हाताखालील कोणत्याही सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविता येतील :

परंतु, आणखी असे की, ज्याच्याकडे उप-विभागाचा कारभार सोपविण्यात आला नसेल अशा सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याकडे, जिल्हाधिकारी राज्य शासनाच्या सर्वसाधारण आदेशान्वये त्यास वेळोवेळी योग्य वाटतील अशी विशिष्ट कर्तव्ये आणि अधिकार सोपवील.

(५) राज्य शासनाच्या आणि आयुक्ताच्या आदेशांस अधीन राहून जिल्हाधिकाऱ्यास, त्यास वेळोवेळी योग्य वाटतील अशी तहसीलदाराची कर्तव्ये, कामे व अधिकार त्याच्या स्थानिक हद्दींमधील नायब-तहसीलदाराकडे सोपविता येतील.

(६) आयुक्त किंवा जिल्हाधिकारी वेळोवेळी देईल अशा सर्वसाधारण आदेशांस अधीन राहून तहसीलदारास किंवा नायब-तहसीलदारास त्याच्या हाताखालील व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तीस त्यांच्या लिपिकवर्गीय कर्तव्यांचा कोणताही भाग पार पाडण्यासाठी कामावर लावता येईल :

परंतु, अशा रीतीने कामावर लावलेल्या त्याच्या हाताखालील व्यक्तींनी केलेली सर्व कृत्ये व दिलेले सर्व आदेशही अशा तहसीलदाराकडून किंवा नायब-तहसीलदाराकडून फेरतपासणी होण्यास किंवा ते त्यांच्याकडून कायम केले जाण्यास पात्र असतील.

(७) ज्या बाबीसंबंधी कायद्यान्वये विशेष तरतूद केलेली नसेल अशा बाबतीत महसूल अधिकारी राज्य शासनाच्या आदेशानुसार वागतील.

---

[१] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ९ द्वारे हे स्पष्टीकरण नेहमीकरिता जादा दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ७ द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

भू-मापन अधिकारी. मंडल अधिकारी इत्यादींचे अधिकार व कर्तव्ये.

**१४.** (१) राज्य शासनाच्या आदेशांस अधीन राहून, भू-मापन जमाबंदी, अधिकार-अभिलेख यासंबधीच्या सर्व बाबींची दखल घेणे हे भू-मापन अधिकाऱ्यांच्या अधिकारात असेल आणि ते, या संहितेअन्वये किंवा त्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये तरतूद करण्यात येईल अशा सर्व अधिकारांचा वापर करतील व अशी सर्व कर्तव्ये पार पाडतील :

परंतु, भूमि-अभिलेख उप-संचालक, राज्य शासन किंवा भूमि-अभिलेख संचालक निदेश देईल अशा बाबतीत किंवा बाबींच्या वर्गामध्ये, या संहितेन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये भूमि-अभिलेख संचालकांकडून ज्या अधिकारांचा वापर करण्यात येत असेल किंवा जी कर्तव्ये व कामे पार पाडण्यात येत असतील अशा अधिकारांचा वापर करील आणि ती कर्तव्ये व कामे पार पाडील.

(२) मंडलाचा प्रभारी असलेला मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक त्याच्या मंडलामधील तलाठ्याच्या बाबतीत वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये व कामे पार पाडील.

(३) तलाठी जमीन महसूल व जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यायोग्य सर्व रकमा गोळा करण्यासाठी व अधिकार अभिलेख ठेवण्यासाठी जबाबदार असेल व तो या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा राज्य शासनाच्या आदेशान्वये यात यापुढे तरतूद केलेली सर्व कर्तव्ये व कामे पार पाडील.

(४) राज्य शासनाच्या व आयुक्ताच्या सर्वसाधारण आदेशांस अधीन राहून, तलाठ्याने कोणती नोंदणी पुस्तके, हिशेब आणि कोणते इतर अभिलेख ठेवले पाहिजेत हे जिल्हाधिकारी वेळोवेळी ठरवील.

(५) तालुक्याचा किंवा जिल्ह्याचा कोणताही वरिष्ठ महसूल अधिकारी किंवा पोलीस अधिकारी जेव्हा जेव्हा तसे करण्यास सांगेल तेव्हा तेव्हा, नोटिशी, मरणोत्तर चौकशींचे प्रतिवृत्त व फौजदारी प्रकरणातील जबान्या व तपासण्या यासारख्या गावाच्या कामासंबंधीची जी कागदपत्रे केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा लोकांच्या उपयोगासाठी आवश्यक असतील अशी सर्व कागदपत्रे तयार करणे हे देखील तलाठ्याचे कर्तव्ये असेल.

(६) इतर सर्व महसूल अधिकारी राज्य शासन निदेश देईल अशी कर्तव्ये व कामे पार पाडतील.

राज्य शासनाने महसूल अधिकाऱ्यांचे अधिकार इतर व्यक्तींना प्रदान करणे.

**१५.** राज्य शासनाला या संहितेअन्वये सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्यास किंवा तहसीलदारास प्रदान केलेले अधिकार विहित अर्हता धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस प्रदान करता येतील.

मुद्रा.

**१६.** कोणत्या महसूल अधिकाऱ्यांनी मुद्रा वापरावी आणि अशा अधिकाऱ्यांपैकी प्रत्येक अधिकाऱ्याने कोणत्या आकाराची आणि कोणत्या वर्णनाची मुद्रा वापरावी हे **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासन वेळोवेळी विहित करील.

## पैसा, कागदपत्रे किंवा इतर सरकारी मालमत्ता परत मिळविण्यासंबंधी तरतुदी

पैसा, कागदपत्रे वगैरे बाबतच्या मागण्या संबंधित व्यक्तींना लेखी कळविणे.

**१७.** (१) जिल्हाधिकारी किंवा भूमि-अभिलेख अधीक्षक किंवा या प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्याने किंवा अधीक्षकाने प्रतिनियुक्त केलेला कोणताही इतर अधिकारी, त्याच्या खात्यात किंवा जिल्ह्यात, पूर्वी नोकरीस असलेल्या महसूल अधिकाऱ्याकडे किंवा व्यक्तीकडे, सरकारी पैशासंबंधी किंवा कागदपत्रासंबंधी किंवा राज्य शासनाच्या इतर मालमत्तेसंबंधी त्यास मागणी करावयाची असेल तेव्हा अशा सर्व बाबतीत, आपल्या सहीने व जर ती मुद्रा वापरीत असेल तर त्या मुद्रेनिशी लेखी मागणी करून असा पैसा, किंवा अटकावून ठेवलेली कागदपत्रे किंवा मालमत्ता उक्त लिखाण घेऊन येणाऱ्या व्यक्तीस ताबडतोब देण्यास किंवा उक्त लिखाणात निर्दिष्ट करण्यात येईल अशा व्यक्तीस अशा दिनांकास आणि अशा ठिकाणी देण्यास फर्माविल.

(२) जर उपरोक्त अधिकाऱ्याने किंवा इतर व्यक्तीने, निदेश दिल्याप्रमाणे पैसे दिले नाहीत किंवा कागदपत्रे किंवा मालमत्ता स्वाधीन केली नाही तर जिल्हाधिकारी, अधीक्षक किंवा असा इतर अधिकारी यांना त्यास अटक करविता येईल आणि त्याच्याकडून मागणी केलेल्या रकमा तो देईपर्यंत किंवा कागदपत्रे किंवा मालमत्ता स्वाधीन करेपर्यंत, त्यास अनुसूची ‘ क ’ मधील नमुन्याप्रमाणे अधिपत्र पाठवून दिवाणी तुरुंगात बंदिस्त करता येईल :

परंतु, अशा कोणत्याही अधिपत्रान्वये एका कॅलेंडर महिन्याच्या मुदतीपेक्षा अधिक मुदतीपर्यंत कोणत्याही व्यक्तीस बंदिवासात अडकावून ठेवता येणार नाही.

सरकारी पैसासुद्धा महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल आणि कागदपत्रे किंवा मालमत्ता परत मिळविण्यासाठी झडतीचे अधिपत्र (वारंट) काढता येईल.

**१८.** (१) जर असा अधिकारी किंवा इतर व्यक्ती जिल्हाधिकाऱ्याच्या खात्यात व जिल्ह्यात नोकरीस असेल किंवा होती, तर जिल्हाधिकाऱ्यास स्वतः होऊन, आणि जर असा अधिकारी किंवा व्यक्ती त्यांच्या जिल्ह्यातील भू-मापन विभागात नोकरीस असेल किंवा होती तर, भुमि-अभिलेख अधीक्षकाने अर्ज केल्यावर, त्याच्याकडून येणे असलेला कोणताही सरकारी पैसा वसूल करण्यासंबंधी, कसूर करणाऱ्यांकडून जमीन महसुलाची थकबाकी वसूल करण्याकरिता या संहितेत जी रीत नमूद केली असेल त्याचरीतीने व जे नियम घालून दिलेले असतील त्याच नियमांना अधीन राहून, कारवाई करता येईल, आणि सरकारी कागदपत्रे किंवा इतर सरकारी मालमत्ता परत मिळविण्याच्या प्रयोजनांकरिता
१८९८ चा ५. झडतीचे अधिपत्र काढता येईल आणि *फौजदारी-प्रक्रिया संहिता, १८९८, प्रकरण सातच्या तरतुदींन्वये दंडाधिकाऱ्यास कायदेशीररीत्या जे अधिकार चालविता येतात ते सर्व अधिकार त्यासंबंधी चालविता येतील.

(२) असा सरकारी पैसा, कागदपत्रे किंवा इतर सरकारी मालमत्ता ज्या व्यक्तींच्या ताब्यात असेल अशा सर्व व्यक्तींनी ती ताबडतोब जिल्हाधिकाऱ्यांच्या हवाली करणे हे त्याचे कर्तव्य असेल, आणि अशी कोणतीही मालमत्ता कोठे लपविली आहे हे ज्या व्यक्तीस माहीत असेल अशा प्रत्येक व्यक्तीने त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यास माहिती देणे त्याच्यावर बंधनकारक असेल.

तुरुंगात असलेल्या अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस, तारण देऊन आपली सुटका करून घेता येईल.

**१९.** ज्याच्याकडून मागणी केली गेली आहे असा, कलम १७ मध्ये उल्लेखिलेला अधिकारी किंवा व्यक्ती अनुसूची ख मधील नमुन्याप्रमाणे पुरेसे तारण देईल तर, असा अधिकारी किंवा व्यक्ती अभिरक्षेत असल्यास जिल्हाधिकारी त्याची सुटका करवील आणि जप्त केलेल्या कोणत्याही मालमत्तेची विक्री बंद करून ती मालकास परत देईल.

---

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (सन १९७४ चा २) पहा.

## प्रकरण तीन

## जमिनींबाबत

इतरांची मालमत्ता नसलेल्या सर्व जमिनी, सार्वजनिक रस्ते इत्यादींमधील राज्याचा मालकी हक्क.

**२०.** (१) सर्व सार्वजनिक, रस्ते, गल्ल्या आणि मार्ग, पुल, खंदक, धरणे आणि त्यांच्यावरील किंवा त्यांच्या बाजूची कुंपणे आणि पूर्ण भरतीच्या पाण्याच्या खुणेच्या खालील समुद्राचा, बंदराचा व खाड्यांचा आणि नद्या, ओहोळ, नाले, सरोवर व तळी आणि सर्व कालवे व पाण्याचे पाट आणि सर्व साचलेले पाणी व वाहते पाणी, आणि ज्या मालमत्ता कायदेशीररीत्या धारण करू शकणाऱ्या व्यक्तींची मालमत्ता नसतील आणि त्यात किंवा त्यावर व्यक्तींचे कोणतेही हक्क जेथवर प्रस्थापित करण्यात येतील त्याव्यतिरिक्त आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये अन्यथा जी कोणतीही तरतूद करण्यात आली असेल ती खेरीज करून, अशा कोठेही असलेल्या सर्व जमिनी, त्यावरील किंवा त्यातील किंवा त्याच्याशी सबंध असलेल्या सर्व हक्कांसह, राज्य शासनाची मालमत्ता आहे व असल्याचे याद्वारे जाहीर करण्यात येत आहे ; आणि आयुक्ताच्या आदेशांना अधीन राहून जिल्हाधिकाऱ्याने राज्य शासन याबाबतीत विहित करील अशा रीतीने त्यांचा विनियोग करणे हे कायदेशीर असेल परंतु असा विनियोग जाण्यायेण्याच्या हक्कांना आणि लोकांच्या किंवा व्यक्तींच्या कायदेशीररीत्या अस्तित्वात असलेल्या सर्व हक्कांना अधीन राहील.

**स्पष्टीकरण**.—या कलमातील, " पूर्ण भरताची खूण " या संज्ञेचा अर्थ, वर्षाच्या कोणत्याही हंगामात, नेहमीच्या उधाणाच्या भरतीचे पाणी ज्या बिंदूपर्यंत चढते तो उच्चतम बिंदू असा समजावा.

(२) जेव्हा कोणत्याही मालमत्तेबाबत किंवा कोणत्याही मालमत्तेतील किंवा त्यावरील कोणत्याही हक्काबाबत शासनाने किंवा त्यांच्यावतीने किंवा शासनाविरुद्ध कोणत्याही व्यक्तीने दावा सांगितला असेल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्याने किंवा भू-मापन अधिकाऱ्याने त्यासंबंधी योग्य नोटीस देऊन रीतसर चौकशी केल्यानंतर, अशा दाव्याचा निर्णय करणारा आदेश देणे हे कायदेशीर असेल.

(३) जिल्हाधिकाऱ्याने किंवा भू-मापन अधिकाऱ्याने, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये दिलेला आदेश, या संहितेच्या तरतुदींनुसार एकदा अपील आणि फेरतपासणी होण्यास अधीन असेल.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही दिवाणी न्यायालयात दाखल केलेला कोणताही दावा किंवा अशा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील मुदतमर्यादेत करण्यात आले असेल असे अपील, अपील प्राधिकरणाने दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या दिनांकापासून, असा आदेश काढून टाकण्यासाठी दावा करण्यात आला असेल किंवा मागितलेला अनुतोष अशा आदेशाशी विसंगत असेल तर (मुदत मर्यादेसंबंधीचा बचाव मांडण्यात आला नसला तरीही), काढून टाकता येईल. मात्र, पोट-कलम (२) अन्वयेच्या आदेशाच्या बाबतीत, वादीस अशा आदेशाची वाजवी नोटीस देण्यात आली असली पाहिजे.

(५) कोणत्याही चौकशीबद्दल किंवा आदेशाबद्दल राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांनुसार नोटीस देण्यात आली असेल तर, कोणत्याही व्यक्तीस, या कलमान्वयेच्या अशा चौकशीची किंवा आदेशाची वाजवी नोटीस देण्यात आल्याचे मानण्यात येईल.

**२१.** (१) राज्य शासनाची मालमत्ता किंवा त्याचा भाग असलेला कोणताही सार्वजनिक रस्ता, गल्ली किंवा मार्ग (ज्याचा यापुढे या कलमात सरकारी रस्ता असा उल्लेख केलेला आहे) जनतेच्या वापराकरिता आवश्यक नाही असे जिल्हाधिकाऱ्यास जेव्हा जेव्हा वाटेल तेव्हा तेव्हा त्यास **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, तशा आशयाची घोषणा करता येईल आणि अशा घोषणेत, अशा सरकारी रस्त्यांमधील व रस्त्यावरील (शक्य तेथवर त्याचे स्थान व हद्दी निर्दिष्ट करण्यात येतील) लोकांचे हक्क, कोणतेही विद्यमान खाजगी हक्क असल्यास त्यास अधीन राहून, नष्ट करण्याचे योजिले आहे असे नमूद करता येईल.

जनतेच्या उपयोगासाठी आवश्यक नसलेला कोणताही सार्वजनिक रस्ता, गल्ली किंवा मार्ग यांतील किंवा यावरील लोकांचे हक्क नाहीसे होणे.

(२) अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्यावर जिल्हाधिकारी शक्य तितक्या लवकर अशा सरकारी रस्त्यावरील किंवा त्याच्या जवळपासच्या सोयीस्कर ठिकाणी अशा घोषणेची जाहीर नोटीस देण्याची व्यवस्था करील आणि उपरोक्त प्रस्तावासंबंधीच्या हरकती मागवील.

(३) अशा सरकारी रस्त्यात किंवा रस्त्यावर, सार्वजनिक महामार्गाच्या हक्काशिवाय आणखी कोणताही हितसंबंध किंवा हक्क असणाऱ्या, किंवा अशा प्रस्तावामुळे प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असणारा कोणताही हितसंबंध किंवा हक्क असणाऱ्या लोकांपैकी कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींस, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यानंतर नव्वद दिवसांच्या आत, जिल्हाधिकाऱ्यांकडे, अशा प्रस्तावाबाबतच्या आपल्या हरकती, अशा हितसंबंधाचे किंवा हक्काचे स्वरूप आणि ज्या रीतीने त्याच्यावर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल ती रीत, आणि अशा हितसंबंधाबद्दल किंवा हक्कांबद्दल नुकसानभरपाईच्या मागणीची रक्कम आणि तपशील लेखी सादर करता येईल.

परंतु, कोणतीही व्यक्ती पुरेशा कारणामुळे उपरोक्त नव्वद दिवसांच्या कालावधीत असे निवेदन सादर करू शकली नाही अशी जिल्हाधिकाऱ्याची खात्री झाल्यास, त्यास, अशा व्यक्तीस त्या कालावधीनंतर असे निवेदन सादर करण्याची परवानगी देता येईल.

(४) जिल्हाधिकारी, त्याच्याकडे निवेदन सादर केलेल्या प्रत्येक व्यक्तीस व्यक्तिशः किंवा विधिव्यवसायीमार्फत त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देईल आणि, अशा रीतीने सर्व व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीही चौकशी केल्यानंतर सरकारी रस्ता जनतेच्या वापराकरिता आवश्यक नाही अशी जर त्याची खात्री होईल तर, लोकांचे अशा सरकारी रस्त्यातील किंवा त्यावरील सर्व हक्क नष्ट करण्यात येत आहेत अशी घोषणा करून ती **राजपत्रात** प्रसिद्ध करील आणि त्यानंतर असे सर्व हक्क नष्ट होतील आणि असा सरकारी रस्ता, कोणत्याही विद्यमान खाजगी हक्कास अधिन राहून, अशा घोषणेच्या दिनांकापासून सरकारच्या ताब्यात जाईल. जिल्हाधिकारी, त्याने उपरोक्तप्रमाणे लोकांचे हक्क नष्ट करण्याच्या प्रस्तावामुळे होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही भरीव स्वरूपाच्या हानीच्या किंवा नुकसानीच्या संबंधात त्याच्या मते जी नुकसानभरपाईची रक्कम, कोणतीही असल्यास, दिली पाहिजे. ती रक्कम ठरवील. भूमि-संपादन अधिनियम, १८९४ याची कलमे ९,१०,११, १२, १३, १४ व १५ यांच्या तरतुदी शक्य असेल तेथवर, या पोट-कलमान्वये नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने चालविलेल्या कार्यवाहीस लागू होतील :

१८९४ चा १.

परंतु, अशा सरकारी रस्त्यावरील सार्वजनिक महामार्गाचा हक्क नष्ट किंवा कमी केल्याबद्दल कोणतीही नुकसानभरपाई देण्यात येणार नाही.

(५) लोकांचे सरकारी रस्त्यातील किंवा त्यावरील हक्क नष्ट करण्याच्याबाबतीत, नुकसानभरपाईच्या रकमेसंबंधी आणि ज्यास अशी नुकसानभरपाई, तशी असल्यास, द्यावयाची असेल त्या व्यक्तीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याने पोट-कलम (४) अन्वये दिलेला निर्णय, आयुक्ताने अपिलामध्ये दिलेल्या निर्णयास अधीन राहून, अंतिम असेल; आणि जिल्हाधिकारी अशा व्यक्तींना त्याप्रमाणे नुकसानभरपाईच्या रकमा देईल :

परंतु, अंतिम आदेश दिल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जर रक्कम देण्यात आली नाही तर जिल्हाधिकारी ती रक्कम अंतिम आदेश दिल्याच्या दिनांकापासून दरसाल दरशेकडा सहा टक्के या दराने व्याजासह देईल.

विशेष करणांसाठी जमिनीचे अभिहस्तांकन करता येईल आणि अभिहस्तांकन करण्यात आल्यानंतर जिल्हा-धिकाऱ्याच्या मंजुरीवाचून तिचा अन्यथा उपयोग करण्यात येणार नाही.

**२२**. राज्य शासनाच्या सर्वसाधारण आदेशांस अधीन राहून, या संहितेअन्वये भू-मापन चालू असेल तेव्हा भूमापन अधिकाऱ्याने, आणि इतर कोणत्याही वेळी जिल्हाधिकाऱ्याने (कोणत्याही व्यक्तीच्या कायदेशीररित्या भोगवट्यामध्ये नसलेल्या), गावातील भोगवट्यात नसलेल्या जमिनी किंवा त्यांचे भाग, वनासाठी किंवा राखीव जळणासाठी, गावातील गुराढोरांकरिता मोफत कुरणासाठी किंवा राखीव गवतासाठी किंवा वैरणीसाठी, दहनभूमीसाठी किंवा दफनभूमीसाठी, गावठाणासाठी, छावणीसाठी, मळणीसाठी, बाजारासाठी, कातडी कमविण्यासाठी, रस्ते, बोळ, उद्याने, गटारे, यांसारख्या किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक कारणासाठी, वेगळे ठेवणे हे कायदेशीर असेल ; आणि अभिहस्तांकित केलेल्या जमिनींचा जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीवाचून अन्यथा उपयोग करण्यात येणार नाही आणि कलम २० अन्वये जमिनींचा विनियोग करताना अशा सर्व विशेष अभिहस्तांकनांकडे योग्य लक्ष पुरवले जाईल.

कुरणाच्या वापराचे नियमन.

**२३**. मोफत कुरणात गुरे चारण्याचा हक्क हा, ज्या गावाच्या किंवा गावांच्या त्या जमिनी असतील किंवा ज्या गावाकडे किंवा गावांकडे त्या जमिनी अभिहस्तांकित केल्या असतील त्या गावाच्या किंवा गावांच्या गुरांपुरताच मर्यादित असेल आणि राज्य शासनाकडून याबाबतीत करण्यात येतील अशा नियमांद्वारे उक्त हक्कांचे नियमन होईल. गुरे चारण्याच्या उपरोक्त हक्कांच्या कोणत्याही बाबतींतील विवादासंबंधी जिल्हाधिकाऱ्याने दिलेला निर्णय संहितेच्या या तरतुदीनुसार केवळ एकच अपील करता येईल या गोष्टीस अधीन राहून, निर्णायक असेल.

विवक्षित जमिनींतून अनधिकृतपणे काढून नेलेल्या नैसर्गिक उत्पन्नाची किंमत वसूल करणे.

**२४**. जी कोणतीही व्यक्ती एखाद्या विशेष कारणासाठी वेगळ्या ठेवलेल्या कोणत्याही जमिनीतून किंवा सरकारची मालमत्ता असलेल्या कोणत्याही जमिनीतून कोणतेही नैसर्गिक उत्पन्न (झाडे सोडून) अनधिकृतपणे काढून नेईल ती व्यक्ती शासनाला त्याची किंमत देण्यास आणि त्याशिवाय अशा रीतीने काढून नेलेल्या नैसर्गिक उत्पन्नाच्या किंमतीच्या पाचपटीपेक्षा अधिक नसेल इतका दंड देण्यास पात्र असेल. अशी किंमत व दंड जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे तिच्याकडून वसूल करण्यात येईल.

धारण जमिनीतील झाडांवरील हक्क.

**२५**. (१) ही संहिता अंमलात आल्यापासून, भोगवट्यात असलेल्या कोणत्याही जमिनीवर असलेल्या किंवा वाढणाऱ्या सर्व झाडांवरील हक्क ती जमीन धारण करणाऱ्याकडे निहित होईल. परंतु जमिनीच्या धुपणीस प्रतिबंध करण्यासाठी विवक्षित झाडे कापण्यास प्रतिबंध करणे किंवा त्याचे नियमन करणे आवश्यक आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर त्यास नियमांद्वारे अशी झाडे कापण्यास प्रतिबंध करता येईल किंवा त्यांचे नियमन करता येईल.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही क्षेत्रात दिनांक १ ऑक्टोबर १९५५ रोजी भोगवटादाराच्या धारण जमिनीतील झाडासंबंधी कोणत्याही व्यक्तीच्या नावाने अस्तित्वात असलेल्या कोणत्याही हक्कास बाधा येणार नाही. परंतु भोगवटादारास अशा हक्काची किंमत ठरविण्यासाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल आणि जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तो हक्क खरेदी करता येईल.

(३) या कलमाच्या तरतुदींच्या आधारे अशी झाडे आपल्याकडे निहित होतील या अपेक्षेने या संहितेच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही व्यक्तीने केलेली झाडांची विक्री किंवा अशा विक्रीसाठी केलेला करार हा निरर्थक ठरेल आणि अशी विक्री किंवा करार यांसाठी देण्यात आलेला कोणताही मोबदला परत करण्यात येईल.

**२६.** कलम २२ अन्वये जंगलासाठी वेगळ्या राखून ठेवलेल्या जमिनीवर वाढणाऱ्या सर्व झाडांवरील, झुडपांवरील, जंगलांवरील किंवा इतर नैसर्गिक उत्पन्नावरील हक्क आणि ती मालमत्ता कायदेशीररित्या धारण करू शकणाऱ्या व्यक्तींची मालमत्ता नसेल तेथवर, अशा सर्व झाडांवरील, झुडपांवरील, जंगलावरील किंवा इतर नैसर्गिक उत्पन्नावरील हक्क, मग ती कोठेही वाढत असोत, राज्य शासनाकडे निहित होईल; आणि अशी झाडे, झुडपे, जंगले किंवा इतर नैसर्गिक उत्पन्न यांचे राज्य शासन वेळोवेळी याबाबतीत केलेल्या नियमांद्वारे विहित करील त्यारीतीने जतन करील किंवा त्यांचा विनियोग करील. शासनाकडे निहित असलेली झाडे व जंगले.

**२७.** जी कोणतीही व्यक्ती सरकारी मालमत्ता असलेले कोणतेही झाड किंवा त्याचा कोणताही भाग अनधिकृतपणे पाडील आणि ते विनियोजित करील, ती व्यक्ती त्याची किंमत देण्यास शासनाला जबाबदार राहील किंवा ती किंमत तिच्याकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल आणि त्याशिवाय तिने जमिनीचा भोगवटा केल्याबद्दल किंवा अन्यथा, या संहितेच्या तरतुदीन्वये ती ज्या कोणत्याही शास्तीस पात्र होईल; आणि तरीही सरकारी मालमत्तेचे उक्त विनियोजन केल्याबद्दल तिच्याविरुद्ध कोणतीही फौजदारी कारवाई दाखल करता येईल. अनधिकृतपणे विनियोजित केलेली झाडे वगैरे यांची किंमत वसूल करणे.

**२८.** (१) जेव्हा कोणत्याही राखीव जंगलाच्या बाहेर असलेल्या कोणत्याही पडीत जमिनीवर झाडे असतील तेव्हा, कोणताही कर न भरता परंतु राज्य शासनाने केलेल्या नियमास अधीन राहून सामान्यपणे गावकऱ्यांना सरपण घेता येईल ; आणि शेतकऱ्यांना शेतीच्या अवजारांसाठी आवश्यक असतील अशी लाकडे घेता येतील. लाकडे तोडण्याचे व त्यांच्या पुरवठ्याचे नियमन वगैरे.

(२) घरगुती किंवा इतर प्रयोजनांसाठी सरपण किंवा लाकूड तोडण्यासंबंधीच्या गावकऱ्यांच्या किंवा व्यक्तींच्या विवक्षित वर्गाच्या विशेषधिकारांना अधीन राहून, राखीव जंगलासाठी कलम २२ अन्वये जी जमीन वेगळी ठेवण्यात आली असेल त्या जमिनीत, आणि ज्या बाबतीत कोणत्याही दुमाला जमिनीच्या संबंधात असे विशेषाधिकार अस्तित्वात असतील अशा इतर सर्व बाबतीत, राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांद्वारे उक्त विशेषाधिकारांच्या वापराचे नियमन करण्यात येईल. अशा कोणत्याही विशेषाधिकारांचा वापर करण्याची पद्धती किंवा वेळ यासंबंधीच्या विवादाच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय या संहितेच्या तरतुदींनुसार केवळ एकच अपील करता येईल या गोष्टीस अधीन राहून, अंतिम असेल.

## जमीन देण्याबाबत

**२९.** (१) या संहितेअन्वये, राज्याकडून जमीन धारणा करणाऱ्या व्यक्तींचे पुढील वर्ग असतील. म्हणजे— जमीन धारण करणाऱ्या व्यक्तींचे वर्ग.

(क) भोगवटादार—वर्ग एक.

(ख) भोगवटादार—वर्ग दोन.

(ग) शासकीय पट्टेदार.

(२) भोगवटादार—वर्ग एकमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होईल—

(क) ज्या व्यक्ती, बिनदुमला जमीन कायमची व हस्तांतरण करण्याच्या हक्कावरील कोणत्याही निर्बंधावाचून धारण करीत असतील, अशा व्यक्ती ;

(ख) ज्या व्यक्ती, ही संहिता अंमलात येण्याच्या वेळी, ती अशा प्रकारे अंमलात येण्याच्या निकटपूर्वी, राज्याच्या कोणत्याही भागात जमीन महसुलाच्या संबंधात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींनुसार हस्तांतरण करण्याच्या हक्कांवरील कोणत्याही निर्बंधावाचून, संपूर्ण भोगवट्याच्या अधिकारान्वये किंवा भूमीस्वामी हक्कान्वये जमीन धारण करीत असतील अशा व्यक्ती; आणि

[१][ (ग) मध्य प्रदेश जमीन महसूल संहिता, १९५४ याच्या कलम १५० अन्वये कोणतीही अधिसूचना किंवा आदेश काढला असला तरीही, विदर्भातील कोणत्याही स्थानिक क्षेत्रात ज्या व्यक्ती, **भूमिधारी** हक्कान्वये जमीन धारण करीत असतील आणि ज्यांना राज्य शासनाने या बाबतीत केलेल्या नियमांस अधीन राहून, यापुढे (अशा जमिनीच्या संबंधात द्यावयाच्या आकारणीच्या तिपटीहून अधिक नसेल असे) पट्टामूल्य दिल्यानंतर, भोगवटादार— वर्ग एकमध्ये समाविष्ट करून घेण्यास परवानगी देण्यात आली आहे, अशा व्यक्ती.]

१९५५ चा मध्य प्रदेश २.

(३) भोगवटादार—वर्ग दोनमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होईल—

(क) ज्या व्यक्ती हस्तांतरण करण्याच्या हक्कावरील निर्बंधांना अधीन राहून, बिनदुमाला जमीन कायमची धारणा करीत असतील अशा व्यक्ती ;

(ख) ही संहिता अंमलात येण्याच्या निकटपूर्वी—

(एक) ज्या व्यक्ती विदर्भात, मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता, १९५४ अन्वये हस्तांतरण करण्याच्या हक्कावरील निर्बंधासह भूमिस्वामी हक्कान्वये, किंवा भूमिधारी हक्कान्वये जमीन धारण करीत असतील अशा व्यक्ती; आणि

(दोन) ज्या व्यक्ती, जमीन महसुलाच्या संबंधीच्या कोणत्याही इतर कायद्यान्वये, हस्तांतरण करण्याच्या हक्कावरील निर्बंधासह भोगवट्याच्या हक्कान्वये इतरत्र जमीन धारण करीत असतील अशा व्यक्ती; आणि

(ग) जमीन महसुलासंबंधीच्या व या संहितेच्या प्रारंभापूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखालील ज्या पट्ट्याखालील कायम स्वरूपात किंवा ठराविक खंड देऊन नवीकरण करण्याच्या विकल्पासह कमीतकमी पन्नास वर्षांच्या मुदतीसाठी जमीन धारण करण्याचा हक्क प्राप्त झाला असेल अशा पट्ट्यान्वये ज्यांना या संहितेच्या प्रारंभापूर्वी बिनदुमाला जमिनीतील हक्क देण्यात आले असतील अशा व्यक्ती; आणि भोगवटादार वर्ग दोन यांचे हक्क, दायित्वे व जबाबदाऱ्या या संबंधीच्या या संहितेतील सर्व तरतुदी जणू ते या संहितेअन्वये भोगवटादार वर्ग दोन आहेत असे समजून त्यांना लागू होतील.

संहितेच्या तरतुदींअन्वये मंजूर करण्यात आलेल्या बिनदुमाला जमिनीचा भोगवटा.

**३०**. अन्यसंक्रमित करण्यात आली नसेल अशी भोगवट्यात नसलेली जी कोणतीही जमीन या संहितेच्या कोणत्याही तरतुदींअन्वये कोणत्याही व्यक्तीस मंजूर करण्यात येईल त्याबाबतीत, अशा व्यक्तीस मंजुरीच्या अटींनुसार अशा, जमिनाचा भोगवटा करण्यास विनाविलंब फर्माविणे हे तहसीलदाराचे कर्तव्य असेल.

भोगवट्यात नसलेली जमीन शर्तीवर देता येईल.

**३१**. जिल्हाधिकाऱ्याने, राज्य शासन याबाबत वेळोवेळी जे नियम करील अशा नियमांना अधीन राहून, कलम ३० अन्वये जमिनीवर प्रवेश करण्यात येण्यापूर्वी बिनदुमाला जमिनीची किंमत देण्यास फर्माविणे, किंवा ती लिलावाने विकणे आणि ती देण्याबाबत अशा नियमांद्वारे विहित करण्यात येतील. अशा शर्ती जोडणे हे कायदेशीर असेल. अशा जमिनीबद्दल दिलेल्या किमतीत (तशी किंमत असल्यास) त्या जमिनीमधील सर्व झाडांवरील शासनाच्या हक्काच्या किमतीत समावेश होईल आणि ती किंमत जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यायोग्य असेल.

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २ द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (ग) दाखल करण्यात आला.

**३२**. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये राज्य शासनाकडे निहित असलेली कोणतीही जलोढ जमीन सार्वजनिक महसूलाच्या हितसंबधांकडे योग्य लक्ष पुरवून निकालात काढण्यात यावी असे जिल्हाधिकाऱ्यास वाटेल तेव्हा त्यास राज्य शासन याबाबतीत करील अशा नियमांना अधीन राहून, अशी जलोढ जमीन ज्या काठावर किंवा किनाऱ्यावर तयार झाली असेल त्या काठाच्या किंवा किनाऱ्याच्या भोगवटादारास (तसा भोगवटादार असल्यास) देता येईल. अशा रीतीने देऊ केलेल्या जमिनीच्या किंमत तिच्यावरील वार्षिक आकारणीच्या तिपटीहून अधिक असणार नाही. शासनाकडे निहित असलेली जलोढ जमीन देणे.

(२) भोगवटादाराने जमिनीचा स्वीकार करण्याचे नाकारले, तर जिल्हाधिकाऱ्यास त्या जमिनीच्या किमतीबाबत कोणतेही निर्बंध न घालता तिचा विनियोग करता येईल.

**स्पष्टीकरण**.—कलम २, खंड (२४) मध्ये काहीही असले तरी, या कलमाच्या प्रयोजनाकरिता, काठ किंवा किनारा हा जर कब्जासह गहाण ठेवण्यात आला असेल तर, गहाण ठेवणारा हा त्याचा भोगवटादार आहे असे मानण्यात येईल.

**३३.** कोणत्याही काटावर किंवा किनाऱ्यावर जलोढ जमीन तयार होईल तेव्हा, अशा काठाचा किंवा किनाऱ्याचा कोणताही भोगवटादार असल्यास त्यास, अशा जमिनीचे क्षेत्रफळ एक एकराहून अधिक नसेल तर किंवा तोपर्यंत तिचा तात्पुरता उपयोग करण्याचा हक्क असेल. जलोढ जमिनीचे क्षेत्रफळ एक एकरापेक्षा अधिक होईल तेव्हा ती कलम ३२च्या तरतुदींना अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन राहील. लहान जलोढ जमिनींबाबत तात्पुरता हक्क.

**३४.** (१) जर एखादा भोगवटादार मृत्यूपत्र न करता मरण पावला असेल आणि त्याचे वारसदार माहीत नसतील तर जिल्हाधिकारी त्याच्या वहिवाटीचा कब्जा घेईल आणि ती वहिवाट त्याला एका वेळी एका वर्षाच्या मुदतीकरिता पट्ट्याने देता येईल. मृत्यूपत्ररहित वहिवाटींचा विनियोग.

(२) जिल्हाधिकाऱ्यानं ज्या दिनांकास वहिवाटीचा कब्जा घेतला असेल त्या दिनांकापासून तीन वर्षांच्या आत, वहिवाट आपणास परत देण्यात यावी म्हणून कोणत्याही हक्कदाराने अर्ज केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर वहिवाटीचा कब्जा हक्कदारास देता येईल किंवा त्याचा हक्क नाकारता येईल.

(३) जिल्हाधिकाऱ्याने पोट-कलम (२) अन्वये दिलेला आदेश हा अपिलास किंवा फेरतपासणीस अधीन असणार नाही परंतु पोट-कलम (२) अन्वये जिचा हक्क नाकारण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश तिला ज्या दिनांकास कळविण्यात आला असेल त्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत, आपला हक्क शाबीत करण्यासाठी दावा दाखल करता येईल, आणि जर असा दावा दाखल करण्यात आला तर अशा दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत जिल्हाधिकारी पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ती जमीन पट्ट्याने देणे चालू ठेवील.

(४) जिल्हाधिकाऱ्याने ज्या दिनांकास वहिवाटीचा कब्जा घेतला असेल त्या दिनांकापासून तीन वर्षांच्या आत कोणता हक्कदार उपस्थित झाला नाही तर किंवा पोट-कलम (२) अन्वये ज्याचा हक्क नाकारण्यात आला आहे अशा हक्कदाराने जर पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे एक वर्षाच्या आत दावा दाखल केला नाही तर जिल्हाधिकाऱ्यास, मरण पावलेल्या भोगवटादाराचा वहिवाटीमधील हक्क लिलावाने विकता येईल.

(५) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या कलमांच्या तरतुदींनुसार ज्या वहिवाटीची व्यवस्था लावण्यात आली असेल त्या वहिवाटीसंबंधी ज्या हक्कदाराने आपला हक्क प्रस्थापित केला असेल अशा हक्कदारास पोट-कलम (१) अन्वये द्यावयाचा खंड आणि पोट-कलम (४) अन्वये वसूल झालेली विक्रीची रक्कम यातून जमीन महसूल आणि व्यवस्थेचा व विक्रीचा खर्च म्हणून अशा वहिवाटीवरील येणे असलेल्या सर्व रकमा वजा करून फक्त शिल्लक राहणारी बाकी मिळण्याचा हक्क असेल.

सोडून दिलेल्या किंवा जप्त केलेल्या पोट-विभागाचा विनियोग.

**३५.** (१) जर भू-मापन क्रमांकाचा कोणताही पोट-विभाग कलम ५५ अन्वये सोडून देण्यात आला असेल तर भू-मापन क्रमांकाचा असा पोट-विभाग हा, सरकारी पडीत जमीन आहे असे समजण्यात येईल आणि जिल्हाधिकारी, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने त्याचा विनियोग करील.

(२) मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व ते एकत्रित करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या तरतुदींना अधीन राहून, जिल्हाधिकारी असा पोट-विभाग, त्याच भू-मापन क्रमांकाच्या इतर पोट-विभागाच्या भोगवटादारांना, त्यास त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार योग्य वाटेल त्या क्रमानुसार, त्यास योग्य वाटेल त्या किंमतीत परंतु त्यांच्या आकारणीच्या चोवीस पटींपेक्षा अधिक नसेल अशा किंमतीस देईल; तथापि, ज्यास जमीन दिलेली असेल त्या व्यक्तीने धारण केलेली एकूण जमीन ही राज्यामध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये त्याबाबतीत निश्चित केलेल्या जमीनधारणेच्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक होणार नाही. असा सर्व भोगवटादारांनी असा पोट-विभाग घेण्याचे नाकारल्यास राज्य शासनाने त्याबाबतीत केलेल्या नियमांना अधीन राहून जिल्हाधिकारी त्या पोट-विभागाचा कलम ३१ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने विनियोग करील.

१९४७ चा मुंबई ६२.

(३) जमीन महसूल देण्यात कसूर केल्याबद्दल जर भू-मापन क्रमांकाचा कोणताही पोट-विभाग जप्त करण्यात येईल तर जिल्हाधिकारी पोट-विभागाचा कब्जा घेईल आणि त्यास, उक्त पोट-विभागाच्या पूर्वीच्या भोगवटादारास किंवा त्याचा भू-मापन क्रमांकाच्या इतर पोट-विभागांच्या भोगवटादारास किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस एकावेळी एका वर्षासाठी, असा पोट-विभाग पट्ट्याने देता येईल; तथापि, अशा धारकाने धारण केलेली एकूण जमीन पोट-कलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या जमीन धारणेच्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक होणार नाही.

(४) पोट-कलम (३) अन्वये जिल्हाधिकारी ज्या दिनांकास पोट-विभागाचा कब्जा घेईल त्या दिनांकापासून तीन वर्षांच्या आत, उक्त पोट-विभागाच्या पूर्वीच्या भोगवटादाराने त्या पोट-विभागाच्या वहिवाटीचे अधिकार परत मिळण्यासाठी अर्ज केला तर, जिल्हाधिकाऱ्यास भोगवटादाराने जमीन महसुलाची थकबाकी आणि आकारणीच्या तिपटीइतकी रक्कम शास्ती म्हणून दिल्यानंतर उक्त पोट-विभाग भोगवटादारास परत देता येईल. जर भोगवटादाराने उपरोक्त मुदतीत उक्त पोट-विभागाच्या वहिवाटीचा अधिकार स्वतःकडे परत मिळविण्यात कसूर केली तर जिल्हाधिकाऱ्याकडून उक्त पोट-विभागाचा पोट-कलम (२) अन्वये तरतूद केलेल्या रीतीने विनियोग करण्यात येईल.

**स्पष्टीकरण**.—— कलम २, खंड (२३) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या कलमाच्या प्रयोजनांकरिता, कोणतेही इतर पोट-विभाग हे जर कब्जासह गहाण ठेवण्यात आले असतील तर गहाण ठेवणारे हे त्यांचे भोगवटादार आहेत असे मानण्यात येईल.

विवक्षित निर्बंधांना अधीन राहून वहिवाट हस्तांतरणीय व वंशपरंपरागत असणे.

**३६.** (१) कलम ७२ मधील तरतुदींना आणि भूधारणा पद्धतीस कायदेशीररीत्या लागू असलेल्या कोणत्याही शर्तींना अधीन राहून, आणि कायद्यान्वये अन्यथा जी कोणतीही तरतूद करण्यात आली असेल ती खेरीज करून, वहिवाट वंशपरंपरागत आणि हस्तांतरणीय मालमत्ता आहे असे मानण्यात येईल.

[१][(२) पूर्वगामी पोट-कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूचित जमातीतील व्यक्तींच्या (यात यापुढे ‘‘ जमातीतील व्यक्ती ’’ असा ज्यांचा निर्देश करण्यात आला आहे) (राज्यात जेथे जेथे असतील त्या) वहिवाटी जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरी खेरीज हस्तांतरित केल्या जाणार नाहीत :

परंतु, या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि कुळवहिवाट कायदा (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभी किंवा प्रारंभानंतर जमातीतील व्यक्ती व्यतिरिक्त इतर व्यक्तींच्या (यात यापुढे ‘‘ जमातेतर व्यक्ती ’’ असा ज्यांचा निर्देश केला आहे) नावे केलेल्या वहिवाटींच्या हस्तांतरणास लागू होणार नाही.]

१९७४ चा महा. ३५.

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) एखाद्या अनुसूचित जमातीच्या भोगवटादाराने पोट-कलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करून त्या वहिवाटीचा कब्जा हस्तांतरित केला असेल तेव्हा हस्तांतरण करणाऱ्या व्यक्तीस किंवा जवळचा वारस नसताना भोगवटादार मरण पावला तर त्या जमिनीचा वारसा मिळणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, आपणास कब्जा मिळावा म्हणून कब्जांच्या अशा हस्तांतरणापासून [१] [तीस वर्षांच्या आत] जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. [२] [आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, जिल्हाधिकारी] राज्य शासनाने या बाबतीत केलेल्या नियमांनुसार ठरवील अशी जमीन महसुलाच्या थकबाकीची दायित्वे किंवा अशा धारण जमिनीवरील ऋणभार असणाऱ्या कोणत्याही येणे असलेल्या इतर रकमा देण्याची जबाबदारी अर्जदाराने स्वीकारण्याच्या अधीन असा अर्ज असेल आणि विहित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार जिल्हाधिकारी असा अर्ज निकालात काढील :

[३] [परंतु, जमीतीतील एखाद्या व्यक्तीने, पोट-कलम (२) चे किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करून, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता या कूळवहिवाट कायदा
१९७४ चा महा. ३५. (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही वेळी आपल्या वहिवाटीचा कब्जा जमातेतर व्यक्तीकडे हस्तांतरित केला असेल आणि अशी वहिवाट अशा जमातेतर व्यक्तीच्या किंवा तिच्या हितसंबंधी उत्तराधिकाऱ्याच्या कब्जात असेल आणि अशा प्रारंभापूर्वी ती कोणत्याही कृषीतर वापराखाली आणली नसेल तर जिल्हाधिकारी त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही वेळी स्वतः होऊन किंवा जमातीतील व्यक्तीने (किंवा तिच्या हितसंबंधी उत्तराधिकाऱ्याने) अशा प्रारंभापासून [४] [तीस वर्षांच्या आत] कोणत्याही वेळी अर्ज केल्यानंतर, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर वहिवाटीचे हस्तांतरण विधिअग्राह्य म्हणून घोषित करील आणि असा निर्देश देईल की, जमातेतर व्यक्तीच्या किंवा तिच्या हितसंबंधी उत्तराधिकाऱ्याच्या कब्जातून वहिवाट काढून घेतली जावी व ती जमातीतील व्यक्तीकडे किंवा तिच्या हितसंबंधी उत्तराधिकाऱ्याकडे परत देण्यात यावी.]

[५] [*   *   *]

[६] [परंतु, आणखी असे की,] उक्त अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी जमीतीतील व्यक्तीच्या वहिवाटीचे हस्तांतरण सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात आल्यामुळे जी भूमिहीन झाली असेल अशा जमातेतर व्यक्तीच्या नावे झालेले असेल तर हस्तांतरणात अंतर्भूत असलेली केवळ निम्मीच जमीन जमातीतील व्यक्तीस परत करण्यात येईल.

---

[१] सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम २(अ)(एक) अन्वये ‘ दोन वर्षाच्या आत ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (अ)(दोन) अन्वये ‘ आणि जिल्हाधिकारी ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २(२) अन्वये या परंतुकांची भर घालण्यात आली.

[४] सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम २ (ब) अन्वये ‘ तीन वर्षांच्या आत ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, याचे कलम ३, दुसरी अनुसूची याअन्वये स्पष्टीकरण वगळण्यात आले.

[६] वरील अधिनियमाचे कलम ३, दुसरी अनुसूची याअन्वये ‘‘ परंतु ’’ या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][(**३क**) पोट-कलम (३) च्या पहिल्या परंतुकान्वये जमातीतील ज्या कोणत्याही व्यक्तीस वहिवाटीचा कब्जा परत करण्याचा निर्देश देण्यात आला असेल ती व्यक्ती (किंवा तिचा हितसंबंधी उत्तराधिकारी तो स्वीकरण्याची तयारी नसल्याचे स्पष्ट करील त्याबाबतीत जिल्हाधिकारी त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे असे जाहीर करील की ती वहिवाट त्या जमिनीवर उभी असलेली काही पिके, असल्यास त्यासह, आदेशाच्या दिनांकापासून आणखी कोणत्याही हस्तांतरणाशिवाय राज्य शासनाने संपादित केल्याचे मानण्यात येईल व ती राज्य शासनाकडे निहित होतील.

(**३ख**) पोट-कलम (३क) अन्वये वहिवाट निहित झाल्यानंतर जमातेतर व्यक्तीस पोट-कलम (३ग) च्या तरतुदीना अधीन राहून, राज्य शासनाकडून करण्यात येणाऱ्या जमिनीच्या आकारणीच्या ४८ पटींइतकी रक्कम अधिक जमातेतर व्यक्तीने त्यात सुधारणा केल्या असल्यास त्या सुधारणांचे जिल्हाधिकाऱ्याने विहित रीतीने ठरवावयाचे मूल्य मिळण्याचा हक्क असेल.

**स्पष्टीकरण**.—या पोट-कलमान्वये कोणत्याही सुधारणांचे मूल्य ठरवताना जिल्हाधिकारी पुढील गोष्टी विचारात घेईल.—

(एक) सुधारणांवर केलेले श्रम किंवा खर्च केलेले भांडवल ;

(दोन) सुधारणांची सध्याची स्थिती ;

(तीन) असे निर्धारण ज्यावर्षी करण्यात येईल त्या वर्षानंतरच्या लगतच्या दहा वर्षात त्या जमिनीला त्या सुधारणांचा ज्या मर्यादेपर्यंत लाभ होण्याची शक्यता असेल ती मर्यादा ;

(चार) विहित करण्यात येतील अशा इतर बाबी.

(**३ग**) जमिनीवर भार असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्ती असतील त्याबाबतीत, जिल्हाधिकारी, पोट-कलम (३ख) अन्वये ठरवलेल्या रकमेचे विभाजन जमातेतर व्यक्ती आणि असा भार असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्ती यांच्यामध्ये पुढील रीतीने करील—

(एक) पोट-कलम (३ख) अन्वये ठरवलेल्या रकमेपेक्षा जमिनीवरील भाराचे एकूण मूल्य कमी असेल तर भारांचे पूर्ण मूल्य त्यांच्या धारकांना देण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (३ख) अन्वये ठरवलेल्या रकमेपेक्षा जमिनींवरील भारांचे एकूण मूल्य जास्त असेल तर भारांच्या धारकांमध्ये प्राथम्यक्रमानुसार रकमेचे वितरण करण्यात येईल :

परंतु, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टींचा, कोणत्याही भारांच्या धारकांच्या, इतर कोणत्याही रीतीने किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये जमातेतर व्यक्तीविरुद्ध आपला अधिकार जारी करण्यासाठी कार्यवाही करण्याच्या अधिकारावर परिणाम होणार नाही.

(**३घ**) राज्य शासनाकडे पोट-कलम (३क) अन्वये निहित झालेली जमीन, राज्य शासनाच्या त्याबाबतीतील कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांना अधीन, जिल्हाधिकाऱ्याकडून, ती जमीन ज्या गावात असेल त्या गावात किंवा त्या गावापासून पाच किलोमीटरच्या आत राहणाऱ्या व या संहितेच्या आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या व आदेशांच्या तरतुदींनुसार, वहिवाट स्वीकारण्यास व जमीन जातीने कसण्याची हमी देण्यास तयार असलेल्या जमातीतील इतर कोणत्याही व्यक्तीला देण्यात येईल. तथापि, अशा जमातीतील व्यक्तीने मालक म्हणून किंवा कूळ म्हणून धारण केलेली एकूण जमीन ही कलम ३६क पोट-कलम (६) च्या अर्थानुसार निर्वाहक क्षेत्रापेक्षा अधिक होणार नाही.]

---

[1]सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम २ अन्वये पोट-कलमे (३क) ते (३घ) ही नेहमीकरताच समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (१) मध्ये किंवा या संहितेच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये किंवा त्या त्या वेळी
अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, भोगवटादार—वर्ग
१८८३ दोन याने, भूमि सुधारणा कर्ज अधिनियम, १८८३, शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १८८४
चा किंवा मुंबईचा बिगर शेतकऱ्यांना कर्ज देण्याबाबत अधिनियम, १९२८ या अन्वये राज्य शासनाने त्यास
१९. १८८४ दिलेल्या कर्जाबद्दल राज्य शासनाच्या नावाने किंवा सहकारी संस्थेने [1][किंवा भारतीय स्टेट बँकेबाबत
चा अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ अन्वये प्रस्थापित केलेल्या भारतीय स्टेट बँकेने किंवा बँकांचा
१२. व्यवहार करणाऱ्या कंपन्यांबाबत (उपक्रम संपादन करणे आणि हस्तांतरण) अधिनियम, १९७०, याचे
१९२८ चा कलम २, खंड (घ) च्या अर्थानुसार, तत्सम नवीन बँकेने किंवा संबंधित कायद्यान्वये प्रस्थापित केलेल्या
मुंबई महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने] त्यास दिलेल्या कर्जाबद्दल उक्त सहकारी संस्थेच्या नावाने,
३. [2][भारतीय स्टेट बँक, तत्सम नवीन बँक किंवा यथास्थिति, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ याच्या
१९५५ चा नावाने] आपली मालमत्ता गहाण ठेवणे हे कायदेशीर असेल आणि असे कर्ज ज्या अटीवर देण्यात
२३. आले असेल त्या अटीनुसार अशी कर्जाची परतफेड करण्यात अशा भोगवटादाराने कसूर केल्यास,
१९७० राज्य शासनास किंवा [3][सहकारी संस्थेस, भारतीय स्टेट बँकेस, तत्सम नवीन बँकेस किंवा, यथास्थिति,
चा ५. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळास] जी इतर कोणतीही उपाययोजना करता येईल त्यास बाध न
आणता राज्य शासनाने किंवा [3][यथास्थिति, सहकारी संस्थेने, भारतीय स्टेट बँकेने, तत्सम नवीन
बँकेने किंवी महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने] वहिवाट जप्त करवून तिची विक्री करविणे आणि
त्यापासून मिळणारे उत्पन्न अशा कर्जाच्या फेडीसाठी वापरणे हे कायदेशीर असेल.

जिल्हाधिकाऱ्यास, [4][सहकारी संस्था, भारतीय स्टेट बँक, तत्सम नवीन बँक किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांच्या अर्जावरून] आणि राज्य शासनाने याबाबतीत विहित केलेले पट्टामूल्य (प्रीमियम) देण्यात आल्यावर, लेखी आदेशाद्वारे, भोगवटादाराचे, भोगवटादार वर्ग एक म्हणून पुन्हा वर्गीकरण करता येईल. आणि अशा रीतीने पुन्हा वर्गीकरण करण्यात आल्यावर भोगवटादार, या संहितेखालील हस्तांतरणानुसार, कोणत्याही निर्बंधरहित अशा जमिनीची वहिवाट धारण करील.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनांकरिता " अनुसूचित जमाती " म्हणजे भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येतात अशा जमाती किंवा वन्य जमाती किंवा अशा जमातींचे किंवा वन्य जमातींचे भाग, किंवा त्यामधील गट [5][आणि जमातीची किंवा वन्य जमातीची किंवा उक्त अनुच्छेद ३४२ [6][अन्वये केलेल्या] आदेशाच्या अनुसूचीच्या भाग सात-क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमातीच्या किंवा वन्य जमातीच्या भागाची किंवा त्यामधील गटाची परंतु, त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या वस्त्यांमध्ये न राहणारी तरीही या कलमाच्या आणि कलम ३६-क च्या संरक्षणाची जिला गरज आहे (आणि त्यांना अशा संरक्षणाची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे) अशा व्यक्तींशी, त्या कलमाच्या प्रयोजनांसाठी अनुसूचित जमातीच्या व्यक्तीशी ज्या रीतीने व्यवहार करण्यात येतो त्याच रीतीने व्यवहार करण्यात येईल.]

[1] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, याच्या कलम २(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २(क) अन्वये "यथास्थिति सहकारी संस्थेस" आणि " यथास्थिति सहकारी संस्थेने " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, याच्या कलम २(ड) अन्वये " संस्थेच्या अर्जावरून " या ऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २(३) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, याच्या कलम ३, दुसरी अनुसूची या अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

जमातीतील व्यक्तींकडून करण्यात येणाऱ्या वहिवाटाच्या हस्तांतरणावर निर्बंध.

[१] [**३६ क.** (१) कलम ३६, पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी जमातीतील व्यक्तींची कोणतीही वहिवाट, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि कुळवहिवाट कायदा (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभानंतर, अशा जमातेतर व्यक्तीच्या अर्जावरून असेल त्याखेरीज आणि विक्री करून (दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याची किंवा कोणत्याही न्यायाधिकरणाच्या निवाड्याची किंवा प्राधिकरणाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी केलेली विक्री धरून), देणगी देऊन, अदलाबदल करून, गहाण ठेवून, पट्ट्याने देऊन किंवा अन्य प्रकारे कोणत्याही जमातेतर व्यक्तींच्या नावाने हस्तांतरित केली जाणार नाही— १९७४ चा महा. ३५.

(क) ५ वर्षांपेक्षा अधिक नसणाऱ्या कालावधीसाठी पट्ट्याने किंवा गहाण दिल्याच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांच्या ; आणि

(ख) इतर सर्व बाबतीत, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने असेल त्याशिवाय :

परंतु, ज्या गावात वहिवाट असेल त्या गावात किंवा त्या गावाच्या पाच किलोमीटर अंतरात निवास करीत असेल अशी कोणतीही जमातीतील व्यक्ती, पट्ट्यावर, गहाणाच्या स्वरुपात किंवा विक्रीद्वारे किंवा अन्य रीतीने मालकाकडून वहिवाट घेण्यास तयार नाही याबद्दल जिल्हाधिकाऱ्याची खात्री झाली नाही तर, त्याजकडून अशी कोणतीही मंजुरी देण्यात येणार नाही.

(२) जिल्हाधिकाऱ्याची पूर्वमंजुरी विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत आणि अशा शर्तीस अधीन राहून देता येईल.

(३) पट्ट्याचा किंवा यथास्थिति गहाणखताचा कालावधी संपल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात, कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही हुकूमनाम्यात किंवा आदेशात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणाच्या निवाड्यात किंवा प्राधिकरणाच्या आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी स्वाधिकारे किंवा जमातीतील व्यक्तीने त्याबाबतीत अर्ज केल्यानंतर वहिवाटीचा कब्जा जमातीतील व्यक्तीस परत देता येईल.

(४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि कुळवहिवाट कायदा (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभाच्या वेळी किंवा तदनंतर, पोट-कलम (१) चे उल्लंघन करून कोणतीही वहिवाट हस्तांतरित करण्यात आल्याचे दिसून येईल त्याबाबतीत [२] [त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, जिल्हाधिकारी, एक तर स्वाधिकारे किंवा अशा वहिवाटीमध्ये हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने वहिवाटीचे हस्तांतरण झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या आत अर्ज केल्यावरून ] विहित रीतीने चौकशी करून त्या बाबीचा निर्णय करील. १९७४ चा महा. ३५.

(५) पोट-कलम (१) चे उल्लंघन करून वहिवाटीचे कोणतेही हस्तांतरण करण्यात आलेले आहे असा निर्णय जिल्हाधिकारी देईल त्याबाबतीत, तो उक्त हस्तांतरण विधिअग्राह्य असल्याचे जाहीर करील आणि त्यानंतर वहिवाट, वहिवाटीखालील जमिनीवरील उभ्या पिकासह, तसे पीक असल्यास, सर्व भारापासून मुक्त राज्य शासनाकडे निहित होईल आणि राज्य शासन, वेळोवेळी निदेश देईल अशा रीतीने तिचा विनियोग करण्यात येईल.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, याच्या कलम ३ अन्वये कलमे ३६-क, ३६-ख व ३६-ग ही समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ३ अन्वये " जिल्हाधिकारी " या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि " तीन वर्षांच्या आत अर्ज केल्यानंतर" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(६) पोट-कलम (५) अन्वये राज्य शासनाकडे निहित असलेल्या कोणत्याही वहिवाटीचा विनियोग करावयाचा असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकारी अनुसूचित जमातीतील हस्तांतरकास लेखी नोटीस देईल आणि तीद्वारे, तो ती जमीन खरेदी करण्यास तयार आहे किंवा नाही याबद्दल अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत कळविण्यास त्यास भाग पाडील. असा अनुसूचित जमातीतील हस्तांतरक, वहिवाट खरेदी करण्यास तयार होईल आणि जर तो विहित खरेदी किंमत देण्यास तयार होईल आणि जमिनीची व्यक्तिशः लागवड करण्याची हमी देईल तर वहिवाट त्यास मंजूर करता येईल. तथापि, अशा अनुसूचित जमातीतील हस्तांतरकाने—मालक म्हणून किंवा कूळ म्हणून—धारण केलेली एकूण जमीन शक्य तेथवर निर्वाहक क्षेत्रापेक्षा अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनासाठी " निर्वाहक क्षेत्र " या शब्दप्रयोगाचा अर्थ ६.४८ हेक्टर (१६ एकर) जिरायती जमीन, किंवा ३.२४ हेक्टर (८ एकर) हंगामी ओलिताची किंवा साळीची किंवा भाताची जमीन किंवा १.६२ हेक्टर (४ एकर) बारमाही ओलिताची जमीन, असा होतो आणि कोणत्याही व्यक्तीने धारण केलेली जमीन, दोन किंवा अधिक प्रकारच्या जमिनींची मिळून झालेली असेल त्याबाबतीत २ हेक्टर हंगामी ओलिताची किंवा साळीची किंवा भाताची जमीन किंवा ४ हेक्टर जिरायती जमीन बरोबर एक हेक्टर बारमाही ओलिताची जमीन या तत्त्वावर निर्वाहक क्षेत्र ठरविण्यात येईल.]

विवक्षित प्रकरणांमध्ये वहिवाटीचा वापर आणि भोगवटा केल्याबद्दल नुकसानभरपाई.

**३६ख.** कलम ३६, पोट-कलम (३) च्या [१] [दोन्ही पैकी कोणत्याही परंतुकान्वये] वहिवाट परत देण्याबद्दल आदेश दिल्यानंतर, किंवा [२] [कलम ३६ च्या पोट-कलम (**३क**) अन्वये किंवा] कलम ३६-क च्या पोट-कलम (५) अन्वये वहिवाट राज्य शासनाकडे निहित केल्यानंतर जी जमातेतर व्यक्ती, वहिवाट कब्जात ठेवण्याचे चालू ठेवील, ती व्यक्ती पहिल्या बाबतीत जमातीतील व्यक्तीस आणि नंतरच्या बाबतीत राज्य शासनास (ज्या वर्षामध्ये भोगवट्याचा अधिकार जमातीतल व्यक्तीस परत करावयाचा असेल किंवा परत करण्याबद्दल आदेश देण्यात आला असेल किंवा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे राज्य शासनाकडे निहित झाला असेल त्या वर्षाच्या नंतरच्या वर्षापासून) जमातीतील व्यक्तीस किंवा राज्य शासनास वहिवाटीचा कब्जा देण्यास येईपर्यंतच्या मुदतीसाठी, जिल्हाधिकारी विहित रीतीने निश्चित करील अशी रक्कम वहिवाटीचा वापर आणि भोगवटा केल्याबद्दल देईल.

प्लीडर, इ. ना हजर राहण्यापासून वगळलेले असणे.

[३] [**३६ खख.** या अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलमे ३६, ३६-क किंवा ३६-ख खाली जिल्हाधिकारी, आयुक्त किंवा राज्य शासन यांच्यासमोर चाललेल्या कोणत्याही कार्यवाहीत, कोणत्याही पक्षाच्या वतीने हजर होण्याचा कोणत्याही प्लीडरास हक्क असणार नाही :

परंतु, एखादा पक्षकार अज्ञान किंवा वेडा असल्यास त्याच्या पालकास व इतर कोणतीही व्यक्ती विकलांग असेल अशा प्रकरणात तिच्या प्राधिकृत एजंटास अशा कार्यवाहीत हजर राहता येईल.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनासाठी " प्लीडर " या संज्ञेत अधिवक्ता, वकील किंवा इतर कोणताही विधिव्यवसायी यांचा समावेश होतो.]

---

[१] सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ४ अन्वये "परंतुकान्वये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ३ अन्वये नेहमीच हा मजकूर समाविष्ट करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २ अन्वये, कलम ३६-खख समाविष्ट करण्यात आले.

दिवाणी न्यायालयाच्या किंवा प्राधिकरणाच्या अधिकारितेस रोध.

**३६ग.** (१) कलम ३६, **३६-क** किंवा **३६-ख** याद्वारे किंवा तदन्वये ज्या प्रश्नाची जिल्हाधिकाऱ्याने मिटवणूक करणे त्यावर निर्णय देणे किंवा त्यावर कार्यवाही करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही प्रश्नाची मिटवणूक करण्याची, त्यावर निर्णय देण्याची किंवा त्यावर कार्यवाही करण्याची अधिकारिता कोणत्याही दिवाणी न्यायालयास असणार नाही.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनासाठी, दिवाणी न्यायालयामध्ये मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ खालील मामलेदाराच्या न्यायालयाचा समावेश होईल. १९०६ चा मुंबई २.

(२) अपीलकाराने किंवा अर्जदाराने, न्यायालयाच्या किंवा प्राधिकरणाच्या मते पर्याप्त असेल असे तारण दिल्याशिवाय कलमे ३६, **३६-क** किंवा **३६-ख** खालील जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अपील किंवा अर्ज कोणतेही दिवाणी न्यायालय किंवा प्राधिकरण दाखल करून घेणार नाही.

भोगवटादाराचे अधिकार शर्तीस अधीन असतील.

**३७.** भोगवटादारास त्याच्या जमिनीचा उपयोग आणि भोगवटा करण्याचा हक्क कायमच्या मुदतीकरिता असेल, परंतु या संहितेच्या तरतुदींनुसार, किंवा या संहितेअन्वये केलेल्या कोणत्याही नियमांनुसार किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यानुसार जमीन महसुलाची देणे असलेली रक्कम देण्यात आल्यानंतरच आणि त्याच्या सत्ताप्रकारास कायदेशीररित्या लागू असलेल्या कोणत्याही इतर अटी किंवा शर्ती पूर्ण करण्यात आल्यानंतरच अशा जमिनीचा उपयोग व भोगवटा कायमच्या मुदतीकरिता करता येईल.

पट्ट्याने देण्याचा अधिकार.

**३८.** जिल्हाधिकाऱ्याने, तो ठरवील अशा मुदतीसाठी व अशा प्रयोजनाकरिता आणि अशा शर्तीवर, कोणत्याही वेळी कोणत्याही व्यक्तीस अनुदानपत्रान्वये किंवा संविदेअन्वये राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांना अधीन राहून भोगवट्यात नसलेली कोणतीही बिनदुमाला जमीन पट्ट्याने देणे हे कायदेशीर असेल, आणि अशा कोणत्याही बाबतीत अशी जमीन, मग तिला भू-मापन व्यवस्था लागू केलेली असो किंवा नसो, अशा रितीने ठरवण्यात आलेल्या मुदतीकरिताच व प्रयोजनाकरिताच आणि शर्तींना अधीन राहूनच धारण करता येईल. अशा रितीने देण्यात आलेल्या जमिनीच्या बाबतीत, ज्यास जमीन देण्यात आली असेल त्यास शासकीय पट्टेदार असे संबोधण्यात येईल.

भोगवटादाराने ठरविण्यात आलेला जमीन महसूल देणे आणि शासकीय पट्टेदाराने ठरविण्यात आलेला खंड देणे.

**३९.** प्रत्येक भोगवटादार या संहितेच्या तरतुदींन्वये आणि तद्न्वये केलेल्या नियमांन्वये निश्चित केलेली आकारणी जमीन महसूल म्हणून देईल : आणि प्रत्येक शासकीय पट्टेदार पट्ट्याच्या शर्तीअन्वये निश्चित केलेली पट्ट्याची रक्कम महसूल म्हणून देईल.

शासनाचे अधिकार राखून ठवणे.

**४०.** या संहितेच्या कोणत्याही तरतुदीतील कोणत्याही मजकुरामुळे शासनाची मालमत्ता म्हणून कोणत्याही जमिनीचा राज्य शासनाला योग्य वाटेल अशा अटींवर व शर्तींवर विनियोग करण्याच्या राज्य शासनाच्या अधिकारात कमीपणा येणार नाही.

**जमिनीच्या उपयोगाबाबत**

शेतीच्या प्रयोजनांसाठी जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीस कोणत्या कारणासाठी आपल्या जमिनीचा उपयोग करता येईल.

**४१.** [१][(१)] [२][ या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून,] शेतीच्या प्रयोजनांसाठी आकारणी केलेल्या किंवा धारण केलेल्या [२][ कोणत्याही जमिनीच्या धारकास] स्वतः किंवा त्यांचे नोकर, कुळे, अभिकर्ते किंवा इतर कायदेशीर प्रतिनिधी यांच्याकडून शेतीवरील [३][इमारत] उभारण्याचा, विहिरी किंवा तळी बांधण्याचा किंवा जमिनीची अधिक चांगली मशागत करण्यासाठी, किंवा उपरोक्त प्रयोजनांसाठी अधिक सोयीस्कर रीतीने तिचा उपयोग करण्यासाठी तिच्यात कोणत्याही इतर सुधारणा करण्याचा हक्क असेल.

१९८६ चा महा. ३२.

[४][(२) '' महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, १९८६ '' च्या प्रारंभाच्या दिनांकापासून (जिचा यापुढे या कलमात ''असा प्रारंभाचा दिनांक '' असा उल्लेख केलेला आहे) अशा प्रारंभाच्या दिनांकापूर्वी खालीलपैकी कोणत्याही ठिकाणी असलेल्या जमिनीवर, शेतात कोणतीही इमारत उभारण्यापूर्वी किंवा अशा शेतातील इमारतीचे नवीकरण करणे, तिची पुनर्बांधणी करणे, तीत फेरफार करणे किंवा तीत भर घालणे इत्यादी कामे पार पाडण्यापूर्वी, किंवा उभारलेल्या कोणत्याही इमारतीच्या बाबतीत,—

(क) (एक) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सीमांमधील जमीन;

(दोन) पुणे शहर महानगरपालिकेच्या सीमांमधील जमीन ;

(तीन) नागपूर शहर महानगरपालिकेच्या सीमांमधील जमीन.

आणि या प्रत्येक महानगरपालिकेच्या सीमेपासून आठ किलोमीटरपर्यंतच्या परिघातील क्षेत्र ;

(ख) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली, स्थापन करण्यात आलेल्या इतर कोणत्याही महानगरपालिकेच्या सीमांमधील जमीन आणि अशा प्रत्येक महानगरपालिकेच्या सीमेपासून पाच किलोमीटरपर्यंतच्या परिघातील क्षेत्र ;

(ग) 'क' वर्ग नगरपरिषदांच्या सीमांमधील जमीन व अशा प्रत्येक नगरपालिकेच्या सीमांपासून तीन किलोमीटरपर्यंतच्या परिघातील क्षेत्र ;

(घ) 'ख' वर्ग आणि 'ग' वर्ग नगरपरिषदांच्या सीमांमधील जमीन ; किंवा

(ङ) प्रादेशिक योजना, नगररचना परियोजना किंवा जमीन (अधिसूचीत क्षेत्रातील) विकासाचे प्रस्ताव किंवा नवीन नगराचे ठिकाण (म्हणून संबोधण्यात आलेले क्षेत्र) याच्या कक्षेत येणारे क्षेत्र; मग ते महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ या खाली मसुद्याच्या स्वरूपात किंवा अंतिम स्वरूपात तयार केलेले, मंजूर केलेले, किंवा संमत केलेले असो वा नसो ;

१९६६ चा महाराष्ट्र ३७.

यासंबंधात, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला यथास्थिती, कोणताही धारक किंवा इतर कोणतीही व्यक्ती, कलम २, खंड (१४) चे उप-खंड (घ) आणि (ङ) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशी शेतातील कोणतीही इमारत उभारण्यासाठी किंवा पूर्वोक्तप्रमाणे तिचे नवीकरण, पुनर्बांधणी, फेरफार करणे किंवा तीत भर घालणे अशा प्रकारची कोणतीही कामे पार पाडण्यासाठी परवानगी मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करील.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये कलम ४१ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (अ) (एक) अन्वये ''कोणत्याही जमिनीच्या धारकास '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(अ) (दोन) अन्वये ''इमारती '' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २(ब) अन्वये पोट-कलमे (२) ते (६) जादा दाखल करण्यात आली.

(३) जिल्हाधिकाऱ्याला पोट-कलम (४) च्या तरतुदींच्या आणि विहित करण्यात येतील अशा शर्तीना व अटींना अधीन राहून खाली विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असणार नाही असे जोते क्षेत्र असलेल्या एक किंवा अधिक शेतातील इमारती उभारण्यासाठी अशी परवानगी देता येईल—

(एक) ज्या धारण शेतजमिनीवर एक किंवा त्याहून अधिक शेतातील इमारती उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल. त्या जमिनीचे क्षेत्र ०.४ हेक्टरपेक्षा अधिक असेल परंतु ०.६ हेक्टरपेक्षा अधिक नसेल त्या बाबतीत असा सर्व इमारतींचे जोते क्षेत्र १५० चौरस मीटर्सपेक्षा अधिक असणार नाही ; आणि

(दोन) ज्या धारण शेतजमिनीवर एक किंवा त्याहून अधिक शेतातील इमारती उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल त्या जमिनीचे क्षेत्र ०.६ हेक्टरपेक्षा अधिक असेल त्या बाबतीत अशा सर्व इमारतींचे जोते क्षेत्र त्या जमिनीच्या एक-चाळीसांश क्षेत्र किंवा ४०० चौरस मीटर क्षेत्र यापैकी जे कमी असेल, त्याहून अधिक असणार नाही :

परंतु, उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आलेली एक किंवा त्याहून अधिक शेतातील इमारती पूर्णपणे किंवा अंशतः जमीनधारकांच्या कुटुंबातील व्यक्तींनी, नोकरांनी किंवा कुळांनी निवासस्थानांसाठी वापरावयाच्या असतील त्या बाबतीत, निवासस्थानासाठी वापरण्यात यावयाच्या असा एका किंवा अधिक इमारतींचे जोते क्षेत्र ज्या धारण शेतजमिनीवर अशा एक किंवा त्याहून अधिक इमारती उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल तिचे क्षेत्र ०.६ हेक्टरपेक्षा अधिक असले तरीही— १५० चौरस मीटरपेक्षा अधिक असणार नाही.

(४) (क) (एक) ज्या धारण शेतजमिनीवर अशी इमारत उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल तिचे क्षेत्र ०.४ हेक्टरपेक्षा कमी असेल.

(दोन) अशा इमारतीची जोत्याच्या पातळीपासूनची उंची ५ मीटरपेक्षा अधिक असेल व तीमध्ये एका म्हणजे तळमजल्याखेरीज अधिक मजल्याचे बांधकाम करण्यात आले असेल ;

(तीन) कलम दोनच्या खंड (९) निर्देशिलेल्या प्रत्येक प्रयोजनाकरिता एकाहून अधिक शेतावरील इमारती उभारावयाच्या असतील ;

(ख) इमारत उभारण्याच्या कोणत्याही अशा कामामध्ये, शेतावरील विद्यमान इमारतीची नवीकरण, तिची पुनर्बांधणी किंवा तिच्यामध्ये फेरफार करण्याचे किंवा भर घालण्याचे काम अंतर्भूत असेल व असे काम पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जोते क्षेत्राच्या कमाल मर्यादेपेक्षा किंवा जोते पातळीपासून ५ मीटरच्या उंचीच्या मर्यादेपेक्षा तळमजल्यापेक्षा अधिक होत असेल तर ;

त्या बाबतीत जिल्हाधिकारी अशी परवानगी देणार नाही.

**स्पष्टीकरण.—** पोट-कलमे (३) व (४) च्या प्रयोजनांकरिता धारण शेतमिनीवर फक्त एकच शेतातील इमारत उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल तर, " जोते क्षेत्र " म्हणजे त्या इमारतीचे जोते क्षेत्र, व एखाद्या धारण शेतजमिनीवर एकाहून अधिक, शेतातील इमारती बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले असेल त्या बाबतीत, " जोते क्षेत्र " म्हणजे, अशा सर्व इमारतींचे जोते क्षेत्र मिळून बनलेले क्षेत्र.

(५) धारण शेतजमीन ही, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली रचना करण्यातआलेल्या कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा नगरपरिषदेच्या सीमेमध्ये येत असेल त्या बाबतीत, या कलमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून एरव्ही अशा कायद्याच्या किंवा त्या खाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा उपविधींच्या किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींखाली तयार करण्यात आलेल्या विकास नियंत्रण नियमांच्या किंवा राष्ट्रीय किंवा राज्य महामार्ग किंवा प्रमुख अथवा इतर जिल्हा मार्ग किंवा ग्राम यांचे निरनिराळे भागांश यांचे बांधकाम व नियंत्रण रेषा यांचे विनियमन करण्याच्या संबंधात राज्य किंवा केंद्र शासनाने केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदीस, त्या अशा कायद्यान्वये किंवा त्याखाली किंवा

१९६६ चा महा- राष्ट्र ३७.

विकास नियंत्रण नियमान्वये किंवा त्याखाली किंवा महामार्ग किंवा इतर रस्ते यांचे बांधकाम व नियंत्रण रेषा याचे विनियमन करण्याच्या संबंधातील नियमान्वये किंवा त्याखाली देण्यात व विनियमित करण्यात आलेल्या बांधकामाच्या परवानगीस ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे त्या जमिनीवर उभारण्यात यावयाच्या एक किंवा अधिक शेतातील इमारतींना किंवा त्या शेतजमिनीतील विद्यमान एक किंवा अधिक शेतातील इमारतींच्या संबंधात त्यांच्या नवीकरणाच्या पुनर्बांधणीच्या किंवा फेरफाराच्या किंवा त्यामध्ये भर घालण्याच्या कोणत्याही कामास लागू होतील.

(६) या कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतीही जमीन, तीवर शेतातील इमारत उभारण्याकरिता वापरण्यात येत असेल किंवा पूर्वोक्तानुसार एखाद्या शेतातील इमारतीमध्ये नवीकरणाचे, पुनर्बांधणीचे, त्यामध्ये फेरफार करण्याचे किंवा त्यामध्ये भर घालण्याचे कोणतेही काम पार पाडण्यात येत असेल त्या बाबतीत, अशी जमीन बिगर शेतीच्या प्रयोजनाकरिता वापरण्यात येत असल्याचे मानण्यात येईल आणि जमीनधारक किंवा यथास्थिति त्या जमिनीचा असा वापर करणारी पोट-कलम (१) मध्ये निर्देशित करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, यथास्थिति, कलम ४३ किंवा ४४ किंवा ४५ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या शास्तीच्या किंवा नुकसानभरपाईच्या शिक्षेस पात्र असेल.]

**४२.** [१][१] जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय शेतीसाठी उपयोग करण्यात येणाऱ्या कोणत्याही जमिनीच्या कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी उपयोग करण्यात येणार नाही आणि एका अकृषिक प्रयोजनासाठी आकारणी केलेल्या कोणत्याही जमिनीच्या कोणत्याही इतर अकृषिक प्रयोजनासाठी किंवा त्याच अकृषिक प्रयोजनांसाठी परंतु अकृषिक प्रयोजनांसाठी जमीन किंवा परवानगी देतेवेळी लादलेल्या शर्तींपैकी कोणतीही शर्त शिथिल करून उपयोग करण्यात येणार नाही.

अकृषिक उपयोगासाठी परवानगी.

[२][२] पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, खालील क्षेत्र वगळता, नगरेतर क्षेत्रातील शेतीसाठी उपयोग करण्यात येणाऱ्या कोणत्याही जमिनीचे वैयक्तिक खऱ्याखुऱ्या निवासी प्रयोजनात रूपांतर करण्यासाठी अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही,—

(क) कलम ४७क च्या स्पष्टीकरणामधील खंड (२) मध्ये, महानगरपालिकेचे किंवा नगरपरिषदेचे परिसर क्षेत्र म्हणून निर्देशित करण्यात आलेले क्षेत्र ;

(ख) राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा रस्ते किंवा गाव रस्ते यांच्या नियंत्रण रेषेच्या आत असलेली क्षेत्रे ;

(ग) भारत सरकारकडून पर्यावरण संवेदनशील क्षेत्रे (ECO-Sensitive Zone) म्हणून अधिसूचित केलेले क्षेत्र.]

**४३.** जमीन महसूल देण्यास पात्र असलेल्या जमिनीचा सार्वजनिक प्रयोजनासाठी नेमून दिलेल्या भूमापन क्रमांकातील पडीत जमिनीची लागवड, शेतासाठी असलेल्या जमिनीतून मीठ काढणे, फक्त कृषी प्रयोजनासाठी आकारणी केलेल्या जमिनीमधून माती , दगड, कंकर, मुरुम किंवा इतर कोणताही असा माल काढून नेणे की ज्यायोगे ती जमीन लागवडीसाठी उपयुक्त ठरणार नाही किंवा बरीच रिकामी ठरेल, इमारतीची जागा म्हणून आकारणी केलेल्या जमिनीतून माती दगड (पृष्ठभागावरील सुटे दगड), कंकर, मुरुम, किंवा इतर कोणताही माल काढूण नेणे, गावठाणातील जमिनीचे उत्खनन करणे आणि विहित करण्यात येतील अशा इतर प्रयोजनासाठी करावयाच्या वापराचे, राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांना अधीन राहून जिल्हाधिकाऱ्यास किंवा भू-मापन अधिकाऱ्यास नियमन करता येईल आणि त्यास प्रतिबंध करता येईल ; आणि त्यास अशा प्रतिबंध केलेल्या प्रयोजनासाठी जी व्यक्ती त्या जमिनीचा वापर करील किंवा वापर करण्याचा प्रयत्न करील अशा कोणत्याही व्यक्तीस संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकता येईल.

उपयोगांवर निर्बंध.

[१] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, याच्या कलम २ द्वारे कलम ४२ ला पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे पोट-कलम (२) दाखल करण्यात आला.

जमिनीच्या वापराचे एका प्रयोजनातून दुसऱ्या प्रयोजनात रूपांतर करण्याकरिता कार्यपद्धती.

**४४.** (१) (क) [१][ कलम ४२ च्या पोट-कलम (२) च्या तरतूदींना अधीन राहून, जर बिनदुमाला जमिनीच्या एखाद्या भोगवटादाराची किंवा दुमाला जमिनीच्या वरिष्ठ धारकाची किंवा अशा जमिनीच्या कुळाची,—

(अ) ज्या जमिनीची आकारणी करण्यात आली असेल किंवा जी शेतीच्या प्रयोजनासाठी धारण केलेली असेल तिचा अकृषिक प्रयोजनासाठी उपयोग करण्याची इच्छा असेल तर, किंवा.]

(ख) जर विशिष्ट अकृषिक प्रयोजनासाठी जमिनीची आकारणी करण्यात आली असेल किंवा जी त्यासाठी धारण केलेली असेल आणि इतर अकृषिक प्रयोजनासाठी तिचा उपयोग करण्याची त्याची इच्छा असेल तर, किवा

(ग) ज्या अकृषिक प्रयोजनाकरिता तिची आकारणी करण्यात आली असेल त्याच अकृषिक प्रयोजनासाठी परंतु जमीन देतेवेळी किंवा अकृषिक प्रयोजनाकरिता परवानगी देतेवेळी लादलेल्या शर्तींपैकी कोणतीही शर्त शिथिल करून, तिचा उपयोग करण्याची त्याची इच्छा असेल तर,

असा भोगवटादार किंवा वरिष्ठ धारक किंवा कुळ, कुळाची किंवा यथास्थिति, भोगवटादाराची किंवा वरिष्ठ धारकाची संमती घेऊन विहित केलेल्या नमुन्यानुसार परवानगीसाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करील.

(२) जिल्हाधिकाऱ्यांस, अर्ज मिळाल्यानंतर,—

(क) तो असा अर्जाची सात दिवसांच्या आत पोच देईल ;

(ख) जिल्हाधिकाऱ्याने अन्यथा निदेश दिला नसेल तर त्यास जर असा अर्ज भोगवटादाराने, किंवा वरिष्ठ धारकाने किंवा, यथास्थिति, कुळाने केला नसेल किंवा कुळाची किंवा, यथास्थिति, भोगवटादाराची किंवा वरिष्ठ धारकांची संमती मिळविली नसेल तर, किंवा तो विहित केलेल्या नमुन्यानुसार केलेला नसेल तर, तो परत पाठवून देता येईल ;

(ग) त्यास, योग्य चौकशी केल्यानंतर, राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून तो निर्दिष्ट करील अशा शर्तीवर व अटींवर परवानगी देत येईल ; किंवा सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता आणि सोयी यांच्या दृष्टीने किंवा असा उपयोग त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये एखाद्या गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या योजनाबद्ध विकासासाठी अंमलात असलेल्या कोणत्याही योजनेविरुद्ध असल्यास आणि इमारतींच्या जागा म्हणून उपयोगात आणावयाच्या जमिनीच्या बाबतीत, त्याशिवाय अशा जागांची लांबी-रुंदी, व्यवस्था व येण्याजाण्याची सोय, त्यांचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तींच्या आरोग्याच्या व सोयीच्या दृष्टीने त्या पुरेशा आहेत किंवा लोकवस्तीस सुयोग्य आहेत अशी खात्री करून घेण्याच्या दृष्टीने, अशी परवानगी नाकारता येईल ; असा अर्ज फेटाळण्यात आला असेल त्याबाबतीत जिल्हाधिकारी त्याबाबतची कारणे लेखी नमूद करील.

(३) अर्जाची पोच दिल्याच्या दिनांकापासून किंवा अर्जाची पोच दिलेली नसेल तर-अर्ज मिळाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत किंवा जमिनीच्या वापरात तात्पुरता बदल करण्याबाबत केलेला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत किंवा पोट-कलम (२) च्या खंड (ख) मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी एखादा अर्ज परत करण्यात आला असेल त्याबाबतीत तो त्याचे योग्यरित्या अनुपालन करून परत सादर केला असेल त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, [२][ किंवा, यथास्थिति, पंधरा दिवसांच्या आत] जिल्हाधिकाऱ्याने आपला निर्णय अर्जदारास कळविण्यात कसूर केली तर ज्या परवानगीसाठी अर्ज करण्यात आला असेल ती परवानगी, राज्य शासनाने अशा वापरासंबंधी केलेल्या नियमांच्या विहित केलेल्या कोणत्याही शर्तींना अधीन राहून देण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(४) या कलमान्वये ज्या व्यक्तीस परवानगी देण्यात आली असेल किंवा देण्यात आली आहे असे मानण्यात आले असेल अशी व्यक्ती, ज्या दिनांकास जमिनीच्या वापरातील बदलास सुरुवात झाली असेल अशा दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, तो दिनांक ग्राम अधिकाऱ्यामार्फत तहसीलदारास लेखी कळवील.

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

(५) पोट-कलम (४) अन्वये निर्दिष्ट केलेल्या कालावधीत जर अशी व्यक्ती तहसीलदारास तसे कळविण्यात कसूर करील तर, ती अकृषिक आकारणी देण्यास व त्याशिवाय, जिल्हाधिकारी यासंबंधी करण्यात आलेल्या नियमांना अधीन राहून निदेश देईल त्याप्रमाणे पाचशे रुपयांहून अधिक नसेल असा दंड देण्यास पात्र होईल.

(६) जेव्हा अकृषिक प्रयोजनासाठी जमीन वापरण्यास परवानगी देण्यात येईल तेव्हा नियमांन्वये विहित केलेल्या नमुन्यात धारकास त्याबाबतची सनद देण्यात येईल.

जिल्हाधिकाऱ्याने स्वतः होऊन किंवा चुकीमुळे नुकसान पोचलेल्या व्यक्तीने अर्ज केल्यानंतर सनदेमध्ये कोणत्याही आकस्मिक नजरचुकीमुळे किंवा वगळण्यामुळे उद्‌भवलेल्या लेखनदोष किंवा हिशेबातील अशी चूक दुरुस्त करण्याचा निदेश देणे कायदेशीर असेल.

[१][ **४४क.** (१) कलम ४२ किंवा ४४ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असेल तरी— जमिनीच्या खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी परवानगीची आवश्यकता असणार नाही.

१९६६ चा महाराष्ट्र ३७. (एक) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ या अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये तयार करण्यात आलेल्या, यथास्थिति, प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेच्या अथवा प्रारुप, अंतरिम किंवा अंतिम विकास योजनेच्या अथवा प्रारुप किंवा अंतिम नगररचना परियोजनेच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये किंवा अशा कोणत्याही योजनांच्या अथवा परियोजनांच्या शेतकी क्षेत्रामध्ये, स्थित असेल आणि अशा अधिनियमान्वये किंवा अशा कोणत्याही कायद्यान्वये तयार केलेले विकास नियंत्रण विनियम किंवा नियम याअन्वये जमिनीच्या औद्योगिक वापरास परवानगी असेल अशा ; किंवा

(दोन) जेथे अशी पूर्वोक्त योजना किंवा परियोजना अस्तित्वात नाही अशा क्षेत्रामध्ये स्थित असेल अशा,

[२] [कोणत्याही जमिनीचे खऱ्याखुऱ्या वापरासाठी किंवा (तीन) खाजगी विकासकाने हाती घेतलेल्या क्षेत्रात असलेल्या कोणत्याही जमिनीचे विशेष वसाहत प्रकल्पासाठी ] रुपांतर करण्याची एखाद्या व्यक्तीची इच्छा असेल त्या बाबतीत, जमिनीच्या वापराच्या अशा रूपांतरणासाठी, पुढील शर्तींना अधीन राहून कोणत्याही परवानगीची गरज भासणार नाही, त्या शर्ती म्हणजे,—

(क) जमिनीचा असा वापर करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीचा उक्त जमिनीवर निर्वेध हक्क व योग्य प्रवेश आहे ;

(ख) अशी कोणतीही जमीन किंवा तिचा भाग हा विकास योजनेनुसार (जेथे अशी योजना अस्तित्वात असेल त्या बाबतीत), कोणत्याही अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी राखून ठेवलेला नाही आणि प्रस्तावित खराखुरा औद्योगिक वापर [३][किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्प,] उक्त विकास योजनेच्या एकंदर योजनेशी विसंगत नाही याबद्दल अशा व्यक्तीने स्वतःची खात्री करून घेतली आहे ;

१८९४ चा १. १९६२ चा महाराष्ट्र ३. (ग) अशी कोणतीही जमीन किंवा तिचा भाग, भूमि संपादन अधिनियम, १८९४ किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अन्वये संपादन करण्यासाठी अधिसूचित केलेला नाही किंवा १९८१-२००१ च्या रस्ता योजनेमध्ये किंवा राज्य शासनाने तयार केलेल्या कोणत्याही नंतरच्या रस्ता योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही रस्त्याच्या रचनेचा त्यात समावेश होत नाही ;

(घ) प्रस्तावित उद्योग [४][किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्प,] कोणत्याही रेल्वे मार्गापासून तीस मीटर अंतराच्या आत येत नाही किंवा उच्च व्होल्टता पारेषण तारमार्गापासून पंधरा मीटर अंतराच्या आत येत नाही याबद्दल अशा व्यक्तीने खात्री करून घेतलेली आहे ;

(ङ) राज्य किंवा केंद्र सरकारकडून अथवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून, सांविधिक प्राधिकरणाकडून केंद्र किंवा राज्य शासनाचे नियंत्रण असलेल्या कोणत्याही महामंडळाकडून अथवा सागरी विनियमन क्षेत्राच्या व्यवस्थापनाशी संबंधित असलेल्या कोणत्याही शासकीय कंपनीकडून करण्यात आलेला कोणताही कायदा अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये करण्यात आलेले किंवा काढण्यात आलेले कोणतेही नियम, विनियम किंवा आदेश यांच्या तरतुदींचे, किंवा ओळीची बांधणीविषयक नियम, इमारत विनियम किंवा पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रांच्या संबंधातील, त्याचप्रमाणे जे पर्यावरणाशी, सार्वजनिक आरोग्याशी, शांततेशी किंवा सुरक्षिततेशी संबंधित असतील अशा कोणत्याही नियमांचे किंवा तरतुदींचे कोणतेही उल्लंघन होणार नाही.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ अन्वये कलम ४४क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ अन्वये हा मजकूर दाखल केला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल केला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल केला.

[१] [परंतु, भारत सरकारकडून पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र म्हणून अधिसूचित केल्यास क्षेत्रास या पोट-कलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.]

(२) खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी [२] [किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्पासाठी ] जमिनीचा अशा प्रकारे वापर करणारी व्यक्ती, ज्या दिवसापासून जमिनीच्या वापरामध्ये बदल करण्यास सुरुवात झालेली असेल त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत अशा दिनांकाबद्दल गाव अधिकाऱ्यांमार्फत तहसिलदारास सूचना देईल आणि विहित नमुन्यात इतर माहिती पाठवील व तसेच त्याची एक प्रत जिल्हाधिकाऱ्यांसह पृष्ठांकित करील :

परंतु, असा नमुना विहित करणारे नियम **राजपत्रात** अंतिमरित्या प्रसिद्ध होण्यापूर्वी जमिनीच्या वापरामधील असा बदल सुरू झाला असेल त्या बाबतीत अशी सूचना व माहिती, असे नियम अशाप्रकारे प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत पाठविण्यात येईल.

(३) (क) त्या व्यक्तीने पूर्वोक्ताप्रमाणे तहसीलदारास व जिल्हाधिकाऱ्यास, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये माहिती दिली नाही किंवा तिने विहित नमुन्यामध्ये दिलेल्या माहितीची पडताळणी केल्यानंतर असे आढळून आले की, जमिनीचा वापर हा पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीपैकी एखाद्या शर्तीचे उल्लंघन करणारा आहे तर तो पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा दोन्ही शास्तींना पात्र ठरेल :—

(एक) या संहितेच्या तरतुदींद्वारे किंवा तद्न्वये बसविण्यायोग्य असेल अशा अकृषिक आकारणीबरोबरच, जिल्हाधिकारी, यासंबंधात राज्य शासनाने कोणतेही नियम केलेले असल्यास, त्या नियमांना अधीन राहून निदेश देईल त्याप्रमाणे दहा हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही अशी शास्ती भरणे :

परंतु, अशा प्रकारे बसवलेली शास्ती अशा जमिनीच्या अकृषिक आकारणीच्या वीस पटींपेक्षा कमी नसेल, मग ती दहा हजार रुपयांपेक्षा अधिक, असो किंवा नसो ;

(दोन) जमीन तिच्या मूळच्या वापरात आणणे.

(ख) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन झालेले असेल त्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने लेखी नोटिशीद्वारे फर्माविल्यानंतर अशा व्यक्तीने अशा नोटिशीद्वारे दिलेल्या निदेशानुसार आणि अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत असे उल्लंघन थांबवण्यासाठी कोणतीही गोष्ट करणे आवश्यक असेल; आणि अशा नोटिशीद्वारे, अशा व्यक्तीने, ती जमीन तिच्या मूळ प्रयोजनाकरिता वापरता यावी यासाठी किंवा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत त्या शर्ती पूर्ण करता याव्यात यासाठी कोणतीही संरचना हलवणे, उत्खनन केलेली कोणतीही जागा भरून काढणे किंवा आवश्यक असतील अशा इतर उपाययोजना करणेदेखील आवश्यक करता येईल.

(४) (क) कोणत्याही व्यक्तीने पूर्वोक्तानुसार नोटिशीतील निदेशांचे अनुपालन करण्यात किंवा नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात कसूर केल्यास जिल्हाधिकाऱ्याला, अशा उल्लंघनाकरिता अशा व्यक्तीवर पाच हजार रुपयांपेक्षा जास्त नसेल इतकी आणखी शास्ती आणि उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाकरिता शंभर रुपयांपेक्षा जास्त नसेल इतकी दैनिक शास्ती बसवता येईल.

(ख) जिल्हाधिकाऱ्याने आवश्यक असतील अशा उपाययोजना स्वतः करणे किंवा त्या करण्याची व्यवस्था करणे विधिसंमत असेल; आणि, असे करताना झालेला कोणताही खर्च हा, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अशा व्यक्तीकडून वसूल करता येईल.

(५) पोट-कलम (२) अन्वये, जमिनीच्या खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासंबंधीची [३] [किंवा, यथास्थिती, विशेष वसाहत प्रकल्पासंबंधीची ] सूचना मिळाल्यानंतर आणि पडताळणी केल्यावर, त्या जमिनीचा धारक पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व शर्ती पूर्ण करत असल्याचे आढळून आल्यानंतर त्या जमिनीच्या धारकास विहित नमुन्यात सनद देण्यात येईल.

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
[२] वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[३] वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

कोणतीही अभावित चूक किंवा वगळणूक यामुळे सनदेमध्ये कोणतीही लेखनविषयक अथवा अंकगणितीय चूक असेल त्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याने स्वतः होऊन किंवा चुकीमुळे नुकसान पोचलेल्या व्यक्तीने अर्ज केल्यावरून कोणत्याही वेळी, अशी कोणतीही चूक दुरुस्त करण्याचा निदेश देणे विधिसंमत असेल.

**स्पष्टीकरण** [1][(एक)].— या कलमाच्या प्रयोजनांकरिता " खराखुरा औद्योगिक वापर " म्हणजे, कोणत्याही व्यक्तीकडून केले जाणारे, मालाची निर्मिती, त्याचे जतन किंवा त्यावरील प्रक्रिया यासंबंधीचे कार्य किंवा कोणताही हस्तव्यवसाय किंवा औद्योगिक व्यवसाय किंवा उपक्रम [2][किंवा पर्यटनस्थळ किंवा मिरीस्थान म्हणून राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील पर्यटनाचा उपक्रम] असा असून त्यात निर्मितिप्रक्रिया किंवा प्रयोजन किंवा वीज प्रकल्प यांसाठी आणि संबंधित उद्योगाचे संशोधन व विकास, गोदाम, उपहारगृह, कार्यालय इमारत यांसारख्या सहाय्यभूत औद्योगिक वापरासाठी असलेल्या, किंवा संबंधित उद्योगातील कामगारांसाठी राहण्याच्या जागेची तरतूद करण्यासाठी असलेल्या, औद्योगिक इमारतींच्या बांधकामाचा किंवा सहकारी औद्योगिक वसाहत, संधारण उद्योग, कुटीर उद्योग, ग्रामोद्योग युनिट किंवा ग्रामोद्योग वसाहती यांच्यासह औद्योगिक वसाहतीच्या स्थापनेचा समावेश होईल.]

[3][**स्पष्टीकरण**-दोन— या कलमाच्या प्रयोजनासाठी, " विशेष वसाहत प्रकल्प " याचा अर्थ, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींखाली शासनाने विशेष वसाहतीच्या विकासासाठी तयार केलेल्या विनियमांखालील एक किंवा अनेक विशेष वसाहत प्रकल्प, असा आहे]

परवानगी शिवाय अशा रीतीने जमिनीचा उपयोग करण्याबद्दल शास्ती.

**४५.** (१) एका प्रयोजनाकरिता धारण केलेल्या किंवा आकारणी केलेल्या जमिनीचा—

(क) कलम ४४ अन्वये जिल्हाधिकाऱ्याची परवानगी न मिळविता किंवा त्या कलमान्वये ज्या मुदतीनंतर वापरातील बदलास परवानगी देण्यात आल्याचे समजण्यात येईल ती मुदत संपण्यापूर्वी, किंवा ज्या अटींस व शर्तीस अधीन राहून अशी परवानगी देण्यात आली असेल अशा कोणत्याही, अटींचे व शर्तींचे उल्लंघन करून ; किंवा

(ख) ज्या शर्तींना अधीन राहून अशा जमिनीच्या संबंधात जमीन महसूल देण्याबाबत कोणतीही सूट किंवा सवलत दिलेली असेल अशा शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून,

दुसऱ्या प्रयोजनाकरिता उपयोग करण्यात आला असेल तर अशा जमिनीचा धारक, किंवा, यथास्थिती, त्यांच्यामार्फत, किंवा त्याच्यावतीने हक्क सांगणारी कोणतीही व्यक्ती पुढील शास्तींपैकी एक किंवा अधिक शास्तींना पात्र होईल—

(एक) बदल केलेल्या वापराच्या संबंधात जमिनीवरील अकृषिक आकारणी देणे ;

(दोन) या संहितेच्या तरतुदींअन्वये किंवा त्याद्वारे आकारणी केलेल्या अकृषिक आकारणी-व्यतिरिक्त जिल्हाधिकारी, राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांना अधीन राहून निदेश देईल असा दंड देणे ;

(तीन) जिल्हाधिकारी लेखी नोटिशीद्वारे निदेश देईल अशा वाजवी कालावधीत अशी जमीन तिच्या मूळ उपयोगात आणणे किंवा ज्या शर्तीवर परवानगी देण्यात आली असेल त्या शर्तीचे पालन करणे; आणि अशा नोटिशीद्वारे, अशा व्यक्तीस कोणतेही बांधकाम काढून टाकल्यास, कोणतीही खोदलेली जमीन भरून काढण्यास, किंवा तिचा मूळ प्रयोजनासाठी तिचा उपयोग व्हावा यासाठी किंवा शर्ती पुऱ्या व्हाव्या यासाठी आवश्यक असतील अशा इतर उपाययोजना करण्यास भाग पाडता येईल.

(२) जर कोणत्याही व्यक्ती उपरोक्त नोटिशीमध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीत, जिल्हाधिकाऱ्याने ज्या उपाययोजना करण्यास फर्माविले असेल त्या उपाययोजना करण्यात कसूर करील तर जिल्हाधिकाऱ्यास,

---

[1] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ अन्वये अद्ययावत स्पष्टीकरणास क्रमांक १ असा देण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये नवीन स्पष्टीकरण दोन दाखल करण्यात आले.

अशा व्यक्तींवर अशा उल्लंघनाबद्दल तीनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी शास्तीसुद्धा लादता येईल. आणि ज्या मुदतीत असे उल्लंघन करणे चालू राहील, अशा मुदतीतील प्रत्येक दिवसास तीस रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी आणखी शास्ती लादता येईल. जिल्हाधिकाऱ्यास त्या उपाययोजना, स्वतः करता येतील किंवा करवून घेता येतील ; आणि असे करण्याच्या बाबतीत झालेला कोणताही खर्च हा, जणू काही ती जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अशा व्यक्तीकडून वसूल करता येईल.

**स्पष्टीकरण**.—इतर कोणत्याही प्रयोजनाच्या अनुरोधाने जमिनीवर आकारणी करण्यात आली असेल व अशा जमिनीचा उपयोग शेतीच्या प्रयोजनासाठी करण्यात आला तर, तिच्या वापरात बदल करण्यात आला असल्याचे समजण्यात येणार नाही.

गैरवापर केल्याबद्दल कुळाची किंवा इतर व्यक्तीची जबाबदारी.

**४६.** जर कोणत्याही धारकाचे कूळ किंवा त्यांच्यामार्फत किंवा त्याच्यावतीने हक्क सांगणारी कोणतीही व्यक्ती, धारकाच्या संमतीवाचून कलमे ४२, ४३ किंवा ४४ च्या तरतुदींचे उल्लंघन करून एखाद्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करील व त्यामुळे धारकाला कलमे ४३, ४४ किंवा ४५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शास्तीस पात्र करील तर, असे कूळ किंवा यथास्थिति, अशी व्यक्ती नुकसानीबद्दल धारकास जबाबदार राहील.

[१][कलमे ४१, ४२], ४४, ४५ किंवा ४६ यांच्या तरतुदींच्या कक्षेतून जमिनींना सूट देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**४७.** [१][कलमे ४१, ४२], ४४, ४५ किंवा ४६ मधील कोणत्याही मजकुरामुळे—

(क) राज्य शासनाच्या मते या संहितेचे कोणतेही उद्देश पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी लोकहिताच्या दृष्टीने कोणत्याही जमिनीला किंवा जमिनीच्या वर्गाला त्या कलमांच्या कोणत्याही तरतुदींच्या कक्षेतून सूट देणे आवश्यक असेल तर अशा कोणत्याही जमिनीला किंवा जमिनीच्या वर्गाला त्या कलमांच्या कोणत्याही तरतुदींच्या कक्षेतून सूट देण्यास राज्य शासनाला प्रतिबंध होणार नाही ; आणि

(ख) राज्य शासनाने यासंबंधी केलेल्या नियमांना अधीन राहून जिल्हाधिकारी विहित करील अशा अटींवर व शर्तीवर कोणत्याही जमिनीच्या अकृषिक वापरास नियमात बसविण्यास जिल्हाधिकाऱ्यास प्रतिबंध होणार नाही.

जमिनीच्या वापरातील बदलादाखल रूपांतरण कर देण्यासंबंधातील जमीन धारकाचे दायित्व.

[२][**४७क.** (१) जमिनीच्या वापरातील बदलादाखल रूपांतरण कर या नावाचा अतिरिक्त जमीन महसूल बसवण्यात व ती वसूल करण्यात येईल.

(२) जर शेतीच्या प्रयोजनासाठी आकारणी झालेली किंवा धारण करण्यात आलेली कोणतीही जमीन [३][मुंबई महानगरपालिका क्षेत्र, मुंबई शहर जिल्हा क्षेत्र वगळता किंवा इतर कोणतेही महानगरपालिका क्षेत्र अथवा "अ" वर्ग किंवा "ब" वर्ग नगरपालिका क्षेत्र अथवा त्यापैकी कोणाचेही परिसर क्षेत्र यांच्या हद्दीत असेल] आणि—

(क) इतर कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी तिचा वापर करण्यास, कलम ४४, पोट-कलम (३) अन्वये परवानगी देण्यात आली असेल किंवा परवानगी देण्यात आल्याचे मानण्यात आले असेल [४]* * * *

(ख) जिल्हाधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय, किंवा कलम ४४, पोट-कलम (३) मध्ये निर्देशिलेली मुदत संपण्यापूर्वी, तिचा इतर कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्यात येत असेल आणि तो, कलम ४७, खंड (ख) अन्वये नियमात बसविण्यात [५][आला असेल; किंवा]

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ अन्वये "कलम ४२" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये कलम ४७ क समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम २(१)(क) द्वारे " मुंबई शहर" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि हद्दीत असेल या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ३(अ) (एक) द्वारे " किंवा" हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३(अ)(दोन) द्वारे "आला असेल तर—" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[१][(ग) कलम ४४क मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तिचा खराखुरा औद्योगिक वापर करण्यात येत असेल, तर—]

अशा जमिनीचा धारक, याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून राज्य शासनास रूपांतरण कर देण्यास पात्र असेल; असा कर हा, अशा जमिनीचा वापर ज्या प्रयोजनासाठी करण्यात आला असेल किंवा अशा रीतीने वापर करण्यास परवानगी दिली असेल त्या प्रयोजनानुसार अशा जमिनीवर बसवण्यायोग्य असलेल्या अकृषिक आकारणीच्या [२][पाचपटी इतका] असेल.

(३) कोणत्याही अकृषिक प्रयोजनांसाठी आकारणी झालेली किंवा धारण केलेली कोणतीही जमीन, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांपैकी कोणत्याही क्षेत्रात असेल, आणि—

(क) इतर कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी तिचा वापर करण्यास, कलम ४४, पोट-कलम (३) अन्वये परवानगी देण्यात आली असेल किंवा परवानगी देण्यात आल्याचे मानण्यात आले असेल; [३]****

(ख) जिल्हाधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय, किंवा कलम ४४, पोट-कलम (३) मध्ये निर्देशिलेली मुदत संपण्यापूर्वी तिचा इतर कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्यात येत असेल, आणि तो, कलम ४७, खंड (ख) अन्वये नियमात बसविण्यात [४][आला असेल; किंवा]

[५][(ग) कलम ४४क मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तिचा खराखुरा औद्योगिक वापर करण्यात येत असेल, तर—]

अशा जमिनीचा धारक, याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून राज्य शासनास रूपांतरण कर देण्यास पात्र असेल; असा कर हा, अशा जमिनीचा वापर ज्या प्रयोजनासाठी करण्यात आला असेल किंवा अशा रीतीने वापर करण्यास परवानगी दिली असेल त्या प्रयोजनानुसार अशा जमिनीवर बसवण्यायोग्य असलेल्या अकृषिक आकारणीच्या [६][पाचपटी इतका] असेल.

**स्पष्टीकरण**.— या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

१८८८ चा मुंबई ३. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

(१) [७][(क) '' मुंबई महानगरपालिका '' म्हणजे, मुंबई महानगरपालिका अधिनियमाअन्वये, रचना करण्यात आलेली मुंबई महानगरपालिका;

(ख) ''अन्य कोणत्याही महानगरपालिका'' म्हणजे, यथास्थिती, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये रचना करण्यात आलेल्या सर्व अन्य विद्यमान महानगरपालिका;]

(ग) ''अ'' आणि ''ब'' वर्ग नगरपालिका क्षेत्र ''म्हणजे [८][महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५] अन्वये ''अ'' वर्ग किंवा, यथास्थिती, ''ब'' वर्ग असे वर्गीकरण करण्यात आलेले कोणतेही नगरपालिका क्षेत्र ; १९६५ चा महा.४०.

(२) ''परिसर क्षेत्र'' याचा अर्थ—

१९४९ चा मुंबई ५९.

[९][(क) मुंबई महानगरपालिका क्षेत्र (मुंबई शहर जिल्हा क्षेत्र वगळून) आणि नागपूर व पुणे महानगरपालिकांमधील महानगरपालिका क्षेत्रे म्हणजे, त्यांच्या परिघापासून (Periphery) आठ किलोमीटरमधील क्षेत्र ;आणि

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम ३ (अ) (तीन) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम २(१)(ख) द्वारे '' तिप्पटी इतका '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ३(ब)(एक) द्वारे '' किंवा '' हा मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३(ब)(दोन) द्वारे ''आला असेल; तर—'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखले केला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब)(तीन) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम २(२) द्वारे '' तिप्पटी इतका '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २(३)(क)(एक) द्वारे मूळ उपखंड (अ) व (ब) ऐवजी हे उपखंड दाखल करण्यात आले.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २(३)(क)(दोन) द्वारे ''महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम २(३) द्वारे उपखंड (अ), (ब) आणि (क) ऐवजी पुढील उपखंड दाखल करण्यात आले.

(ख) अन्य सर्व महानगरपालिका क्षेत्रे म्हणजे, त्यांच्या परिघापासून (Periphery) पाच किलोमीटरमधील क्षेत्र;]

(घ) कोणत्याही ''अ'' वर्ग आणि ''ब'' वर्ग नगरपालिका क्षेत्राच्या संबंधात अशा प्रत्येक ''अ'' वर्ग आणि ''ब'' वर्ग नगरपालिका क्षेत्राच्या परिघापासून एक किलोमीटरमधील क्षेत्र ]

खाणी व खनिजे यांवरील शासनाचा हक्क.

**४८.** (१) सोडून दिलेल्या किंवा चालू असलेल्या सर्व खाणी आणि दगडाच्या खाणी, जुने ढिगारे, खड्डे, शेते, बांध, नाले, खाड्या, नदीची पात्रे आणि अशा इतर जागा धरून, जमिनीवर किंवा जमिनीखाली असलेल्या, कोणत्याही ठिकाणी सापडणाऱ्या [१][सर्व खनिजांवरील हक्क] शासनाकडे स्पष्टपणे राखून ठेवण्यात आला आहे आणि तो स्पष्टपणे राखून ठेवण्यात आला असल्याचे याद्वारे जाहीर करण्यात येत आहे आणि तो शासनाकडे निहित होईल व अशा हक्कांचा योग्य तो उपभोग घेण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार शासनाला असतील.

[२]* * * *

(२) खाणी व दगडाच्या खाणी यावरील हक्कात खाणी आणि इतर दगडाच्या खाणी चालू करण्यासाठी त्या जमिनीवर जाण्याच्या हक्काचा आणि तद्नुषंगिक कारणाकरिता जी अन्य जमीन आवश्यक असेल ती कब्जात घेण्याच्या हक्काचा समावेश होतो. तसेच या आनुषंगिक कारणात कार्यालय व मजुरांची घरे उभारणे आणि यंत्र बसविणे, खनिजांच्या राशी लावणे आणि निरुपयोगी वस्तूंचा ढीग करून ठेवणे, रस्ते, रेल्वे व ट्राम बांधणे आणि खाणी व खनिजे यांना आनुषंगिक म्हणून राज्य शासन घोषित करील अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी आवश्यक अशी जमीन कब्जात घेण्याच्या हक्काचाही समावेश होतो.

(३) कोणतीही खनिजे, खाणी किंवा दगडाच्या खाणी यावरील आपल्या हक्कांचे राज्य शासनाने जर कोणत्याही व्यक्तीकडे अभिहस्तांकन केले असेल आणि अशा हक्कांचा योग्य उपभोग घेण्यासाठी पोट-कलमे (१) व (२) यात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करणे आवश्यक असेल तर, जिल्हाधिकाऱ्यास लेखी आदेशाद्वारे, ती विनिर्दिष्ट करील अशा शर्तीना न निर्बंधांना अधीन राहून, ज्यास असा हक्क अभिहस्तांकित करून दिला असेल त्या व्यक्तीकडे ते अधिकार सोपविता येतील :

परंतु, परिणाम होणाऱ्या जमिनीवर ज्यांचे हक्क असतील अशा सर्व व्यक्तींवर रीतसर नोटीस बजावून त्यांच्या हरकती ऐकून घेऊन त्यावर विचार करण्यात येईपर्यंत असा कोणताही अधिकार सोपवता येणार नाही.

(४) वर उल्लेखिलेले हक्क कोणत्याही जमिनींवर वापरीत असताना त्या जमिनीच्या पृष्ठभागावर कब्जा केल्यामुळे किंवा तो बिघडल्यामुळे जर कोणत्याही व्यक्तीच्या हक्कांचे उल्लंघन होत असेल तर शासन किंवा त्यांचा अभिहस्तांकिती अशा उल्लंघनाबद्दल त्या व्यक्तींना नुकसान भरपाई देईल आणि एकवाक्यता न झाल्यास अशा नुकसानभरपाईची रक्कम जिल्हाधिकारी ठरवील किंवा त्याचा निवाडा मान्य न झाल्यास भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या तरतुदींस अनुसरून दिवाणी न्यायालय ती ठरवील. १८९४ चा १.

(५) ज्यांच्या हक्कांचे उल्लंघन होते त्या व्यक्तींना द्यावयाची नुकसानभारपाई ठरवून ती त्यांना देण्यात येत नाही तोपर्यंत राज्य शासनाचा कोणताही अभिहस्तांकिती, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय कोणत्याही जमिनीच्या पृष्ठभागावर प्रवेश करणार नाही, किंवा त्याचा भोगवटा करणार नाही :

परंतु, ज्या प्रकरणात पोट-कलम (४) अन्वये नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्याचा प्रश्न दिवाणी न्यायालयाकडे निर्णयार्थ पाठविण्यात आला असेल अशा प्रकरणात अशा न्यायालयाकडून निवाडा देण्यात येईपर्यंत जिल्हाधिकाऱ्याने अंतरिम परवानगी देणे हे कायदेशीर असेल.

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम १४(अ) अन्वये ''राज्य शासनाने दिलेल्या अनुदानाच्या शर्तीस अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली नसेल तर '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] वरील अधिनियमाच्या कलम १४(ब) अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

(६) राज्य शासनाचा अभिहस्तांकिती पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्यात कसूर करील तर जिल्हाधिकाऱ्यास, नुकसानभरपाई मिळविण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीच्या वतीने अशी नुकसानभरपाई जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे त्याच्याकडून वसूल करता येईल.

(७) जर कोणतीही व्यक्ती कायदेशीर प्राधिकारावाचून, ज्यावरील हक्क राज्य शासनामध्ये निहित झाला आहे व राज्य शासनाने त्याचे अभिहस्तांकन केलेले नाही अशा चालू असलेल्या किंवा सोडून दिलेल्या खाणी, दगडाच्या खाणी, जुने ढिगारे, शेते, बांध (शेतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती किंवा बांधकाम करण्याच्या सबबीवरून किंवा इतर कोणत्याही सबबीवरून), नाले, खाड्या, नदीची पात्रे किंवा अशा इतर कोणत्याही जागा यामधून कोणतेही खनिज काढील. काढून नेईल, गोळा करील, पुनःस्थापित करील. उचलून घेईल किंवा त्याचा विनियोग करील तर त्याच्याविरुद्ध अन्य पद्धतीने जी कोणतीही कारवाई करण्यात येईल त्यास बाध न येता, ती अशाप्रकारे, यथास्थिति, काढलेल्या, काढून नेलेल्या, गोळा केलेल्या, पुनःस्थापित केलेल्या, उचलून घेतलेल्या किंवा विनियोग केलेल्या खनिजाच्या बाजारमुल्याच्या तिप्पटीहून जास्त नसेल अशी ठरविण्यात येईल इतकी रक्कम जिल्हाधिकाऱ्याने लेखी आदेश दिल्यावर देण्यास पात्र असेल :

परंतु, अशा रितीने ठरवलेली रक्कम एक हजार रुपयांहून कमी असेल तर, शास्ती ही, जिल्हाधिकाऱ्यास लादता येईल अशी, एक हजार रुपयांहून अधिक नसेल अशी तीपेक्षा कोणतीही मोठी रक्कम असेल.

(८) पोट-कलम (७) च्या तरतुदीस बाध येऊ न देता, ज्यावरील हक्क राज्य शासनाकडे निहित आहे व राज्य शासनाने ज्याचे अभिहस्तांकन केलेले नाही अशा कोणत्याही खाणीतून, दगडाच्या खाणीतून किंवा पोट-कलम (७) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही जागेतून काढलेले, काढून नेलेले, गोळा केलेले, पुनःस्थापित केलेले, उचलून घेतलेले किंवा विनियोग केलेले कोणतेही खनिज जिल्हाधिकाऱ्यास ताब्यात घेता येईल व सरकारजमा करता येईल.

(९) गाव, नगर किंवा शहर यातील रहिवाश्यांना त्यांच्या घरगुती, शेतीच्या किंवा धंद्याच्या वापरासाठी आवश्यक असलेली गौण खनिजे नियमात निर्दिष्ट करण्यात येईल अशी जी देऊन किंवा विनामूल्य काढण्याबाबतचे किंवा काढून नेण्याबाबतचे नियमन करण्यासाठी राज्य शासनाला नियम करता येतील.

१९५७ चा ६७. **स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनांसाठी " गौण खनिजे " म्हणजे खाणी व खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७ याच्या कलम १५ अन्वये राज्य शासनाला ज्या गौण खनिजासंबंधी नियम करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे ती गौण खनिजे.

इतर व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीतून पाण्याचे पाट बांधणे.

**४९.** (१) पाण्याच्या एखाद्या साधनातून (ज्यामधून पाणी घेण्यास परवानगी देण्यात आली आहे असे शासनाच्या मालकीचे असलेले कोणतेही पाण्याचे साधन धरून) पाणी घेण्याचा ज्यास हक्क आहे अशा कोणत्याही व्यक्तीची (यात यापुढे ज्यांचा अर्जदार असा निर्देश करण्यात आला आहे) उक्त साधनातून शेतीच्या कारणाकरिता, आपल्या जमिनीस पाणीपुरवठा करण्यासाठी, पाण्याचा पाट बांधण्याची इच्छा असेल परंतु असा पाण्याचा पाट दुसऱ्या व्यक्तीच्या (यात यापुढे ज्याचा शेजारचा जमीनधारक असा निर्देश करण्यात आला आहे) मालकीच्या किंवा कब्जात असलेल्या जमिनीमधून बांधावयाचा असेल आणि अशा बांधकामाबद्दल अर्जदार व शेजारचा जमीनधारक यामध्ये कोणताही करार झाला नसेल तर पाण्याचा पाट बांधण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीस विहित केलेल्या नमुन्यात तहसीलदाराकडे अर्ज करता येईल.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनासाठी, शेजारची जमीन धारण करणारी व्यक्ती या संज्ञेत जिच्या मालकीची जमीन असेल त्या व्यक्तीच्या व तिच्यामार्फत किंवा तिच्यावतीने ती धारण करणाऱ्या सर्व व्यक्तींचा समावेश होतो.

(२) असा अर्ज मिळाल्यानंतर आणि चौकशी केल्यानंतर व शेजारची जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीस व जमिनीत हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तीस अर्जासंबंधी जी कोणतीही हरकत असेल ती नमूद करण्याची संधी दिल्यानंतर अर्जदाराच्या मालकीच्या जमिनीचा शेतीसाठी पूर्णतः व कार्यक्षम रीतीने उपयोग होण्यासाठी पाण्याचे पाट बांधणे आवश्यक आहे अशी तहसीलदाराची खात्री झाली तर, त्यास लेखी आदेशाद्वारे, पुढील शर्तीवर पाण्याचे पाट बांधण्याची अर्जदारास परवानगी देण्याविषयी शेजारची जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीस निदेश देता येईल :—

(एक) उभय पक्षांना परस्पर संमत होईल अशा दिशेस व अशा रीतीने किंवा अशी एकवाक्यता न झाल्यास ज्या जमिनीतून उक्त पाट बांधण्यात येतील त्या जमिनीचे ज्यामुळे कमीत कमी नुकसान होईल अशा रीतीने, तहसीलदारांकडून निर्देशित करण्यात आल्याप्रमाणे अशा जमिनीतून पाण्याचे पाट बांधण्यात येतील.

(दोन) असे पाण्याचे पाट जमिनीखालील किंवा जमिनीवरील नळाच्या स्वरुपातील असतील त्या बाबतीत शेजारची जमीन धारणा करणाऱ्या व्यक्तीच्या जमिनीची सर्व परिस्थिती विचारात घेऊन, असा नळ अशा जमिनीमधून शक्यतोवर कमीत कमी अंतरावर टाकण्यात येईल. जेव्हा असे पाण्याचे पाट जमिनीखालील नळाच्या स्वरुपातील असतील त्याबाबतीत, असे नळ जमिनीच्या पृष्ठभागापासून अर्ध्या मीटरहून कमी नसेल इतक्या खोलीवर टाकण्यात येतील.

(तीन) असा पाण्याचा पाट जलखाचेच्या स्वरुपातील असेल त्याबाबतीत, अशा जलखाचेची रुंदी, पाणी वाहून नेण्यासाठी पूर्णतः आवश्यक असेल अशा रुंदीपेक्षा जास्त असणार नाही आणि कोणत्याही बाबतीत ती दीड मीटरपेक्षा अधिक असणार नाही.

(चार) अर्जदार शेजारच्या जमीनधारकास—

(क) अशा जमिनीवर क्षतिकारक रीतीने परिणाम करणारे पाण्याचे पाट बांधल्यामुळे अशा जमिनीचे जे कोणतेही नुकसान झाले असेल त्याबद्दल नुकसानभरपाई देईल ; आणि

(ख) पाण्याचे पाट हे जलखाचेच्या व जमिनीवर घालण्यात आलेल्या नळाच्या स्वरुपातील असतील त्याबाबतीत तहसीलदार या प्रकरणात वाजवी म्हणून ठरवील असे वार्षिक भाडे ; आणि असा प्रवाह जमिनीखालील नळाच्या स्वरुपातील असेल त्या बाबतीत, ज्या जमिनीखालून नळ घालण्यात आला असेल त्या जमिनीच्या एकूण लांबीबद्दल प्रत्येक दहा मीटरला किंवा त्याच्या भागासाठी २५ पैसे या दराने भाडे देईल.

(पाच) अर्जदार, पाण्याचे पाट योग्य अशा दुरुस्त स्थितीत ठेवील ;

(सहा) पाण्याचे पाट हा जमिनीखालून टाकलेल्या नळाच्या स्वरुपाचा असेल त्याबाबतीत अर्जदार,—

(क) शक्यतो कमीत कमी वेळात जमिनीखालून असा नळ टाकण्याची व्यवस्था करील ;

(ख) जमिनीखालून नळ टाकण्याचा प्रयोजनासाठी वाजवीरित्या आवश्यक तेवढ्या जमिनीहून अधिक नसेल इतकी जमीन खोदील आणि अशा रीतीने खोदलेली कोणतीही जमीन शेजारची जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीच्या उपयोगासाठी अर्जदार स्वखर्चाने भरून काढील, पूर्ववत करील आणि व्यवस्थित करून देईल.

(सात) जेव्हा नळ टाकण्याची, तो दुरुस्त करण्याची किंवा त्याचे नवीकरण करण्याची अर्जदाराची इच्छा असेल तेव्हा तो आपला तसे करण्याचा इरादा आहे यासंबंधी शेजारची जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीस वाजवी नोटीस दिल्यानंतर तसे करील आणि तसे करताना त्या जमिनीस किंवा त्यावरील कोणत्याही उभ्या पिकांना शक्यतो कमीत कमी नुकसान पोचेल याची दक्षता घेईल.

(आठ) तहसीलदारास ज्या शर्ती घालणे योग्य वाटेल अशा इतर शर्ती.

(३) पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या आदेशात शेजारची जमीन धारणा करणाऱ्या व अशा जमिनीत हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्ती, यांच्यामध्ये नुकसानभरपाईची रक्कम कशी विभागून द्यावयाची हे निर्दिष्ट करण्यात येईल.

(४) पोट-नियम (२) अन्वये दिलेला कोणताही आदेश अंतिम असेल आणि अशा आदेशावरून त्याला किंवा त्याच्या कोणत्याही एजंटला किंवा त्या कारणाकरिता त्याने कामावर लावलेल्या इतर व्यक्तीला मदतनीस किवा कामगार घेऊन आदेशात निर्दिष्ट केलेल्या जमिनीवर प्रवेश करण्यासाठी आणि पाण्याचा पाट बांधण्याकरिता व त्याचे नवीकरण करण्याकरिता किंवा तो दुरुस्त करण्याकरिता आवश्यक असे सर्व काम करण्यासाठी संपूर्ण अधिकार मिळेल.

(५) पोट-कलम (२) अन्वये ज्याच्या बाजूने आदेश देण्यात आला असेल असा अर्जदार जर—

(क) नुकसानभरपाईची रक्कम देण्यात किंवा खंडाची रक्कम देण्यात कसूर करील तर, अशी रक्कम मिळण्याचा जिला हक्क असेल अशा व्यक्तीने तहसीलदाराकडे अर्ज केल्यावर, ती जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल ;

(ख) पाण्याचा पाट योग्य व दुरुस्त स्थितीत ठेवण्यात कसूर करील तर, ती व्यक्ती, अशा कसुरीमुळे जे कोणतेही नुकसान होईल त्याबद्दल तहसीलदाराकडून ठरविण्यात येईल अशी नुकसानभरपाई देण्यास पात्र होईल.

(६) एखाद्या व्यक्तीस या कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार बांधलेला पाण्याचा पाट काढून टाकण्याचा किंवा बंद करण्याचा तिचा इरादा असेल तर तिला, तहसीलदारास व शेजारची जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीस नोटीस दिल्यानंतर तसे करता येईल.

असा पाण्याचा पाट काढून टाकल्यास किंवा बंद केल्यास, त्यातून पाणी घेणारी व्यक्ती शक्यतो कमीत कमी वेळात स्वखर्चाने जमीन भरून काढील व पूर्ववत करील. ती तसे करण्यात कसूर करील, तर शेजारची जमीन दारण करणाऱ्या व्यक्तीस तहसीलदाराकडे अर्ज करता येईल व तहसीलदार अशा व्यक्तीस जमीन भरून ती पूर्ववत करण्यास भाग पाडील.

(७) शेजारची जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीस किंवा तिच्यावतीने कोणत्याही व्यक्तीस, उभय पक्षांमध्ये परस्पर संमतीने ठरविण्यात येतील असे दर देऊन व अशी एकवाक्यता न झाल्यास तहसीलदार ठरवील असे दर देऊन, पाण्याच्या वाटातील जादा पाण्याचा उपयोग करण्याचा हक्क असेल. पाण्याच्या पाटात जादा पाणी आहे किंवा नाही याविषयी विवाद उद्‌भवल्यास त्याचा निर्णय तहसीलदार करील व तहसिलदाराचा निर्णय अंतिम असेल.

(८) तहसीलदाराने या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध अपील करता येणार नाही. परंतु जिल्हाधिकाऱ्यास, कोणत्याही प्रकरणासंबंधीचे कागदपत्र मागविता येतील व त्यांची तपासणी करता येईल आणि तहसीलदाराने दिलेला आदेश हा बेकायदेशीर किंवा अयोग्य आहे असे त्यास वाटत असेल तर, उभय पक्षांना नोटीस दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

(९) तहसीलदाराने किंवा जिल्हाधिकाऱ्याने या कलमान्वये दिलेल्या आदेशांविरुद्ध कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही.

(१०) जिल्हाधिकारी किंवा भू-मापन अधिकारी, तहसीलदार किंवा नायब-तहसीलदार यांच्या पुढील संक्षिप्त चौकशीनंतर ज्या केणत्याही व्यक्तीने, ह्या कलमान्वये योग्यरित्या बांधलेल्या किंवा टाकलेल्या कोणत्याही पाण्याच्या पाटास हेतुपुरसपर क्षति किंवा नुकसान पोहोचविल्याचे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत, ती अशा रीतीने क्षति किंवा नुकसान पोहोचविल्याबद्दल प्रत्येक वेळी शंभर रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडास पात्र होईल.

## जमिनींवरील अतिक्रमाणासंबंधी

शासनाकडे निहित असलेल्या जमिनीवरील अतिक्रमणे दूर करणे; शास्ती व इतर आनुषंगिक बाबी यासाठी तरतूद.

**५०.** (१) राज्य शासनाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर (मग तो कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रभाराखाली असो किंवा नसो) अतिक्रमण करण्यात आले असेल त्या बाबतीत किंवा सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय, अशा जमिनीवर वस्तू फेरीने विकण्याच्या किंवा विक्री करण्याच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या कोणत्याही जमिनीवर करण्यात आलेल्या अतिक्रमणाच्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने संक्षिप्तरित्या चौकशी करून असे कोणतेही अतिक्रमण बंद करणे किंवा दूर करणे किंवा फेरीने विकण्यात येणारी किंवा विक्रीसाठी ठेवलेली वस्तू घेऊन जाणे हे कायदेशीर असेल ; आणि त्यासाठी आलेला खर्च ज्या जमिनीवर उपरोक्तप्रमाणे अतिक्रमण करण्यात आले असेल ती जमीन भोगवाट्यात असलेल्या किंवा वापरणाऱ्या व्यक्तीकडून वसूल करण्यात येईल.

(२) ज्या व्यक्तीने असे अतिक्रमण केले असेल किंवा जी व्यक्ती अशा अतिक्रमण केलेल्या जमिनीचा अनधिकृत भोगवाटा करीत असेल त्या व्यक्तीने, जर अतिक्रमण केलेली जमीन ही आकारणी केलेल्या भू-मापणक्रमांकाचा भाग असेल तर, अतिक्रमणाच्या कालावधीसाठी त्या संपूर्ण भू-मापन क्रमांकाची आकारणी देईल आणि अशा जमिनीवर आकारणी करण्यात आली नसेल तर, त्याच गावातील तशाच प्रकारच्या तितक्याच आणि त्याच कारणासाठी उपयोग करण्यात येत असलेल्या जमिनीवर उक्त कालावधीसाठी आकारणीची जी रक्कम आकारता आली असती अशी रक्कम देईल. जर ती जमीन शेतीच्या कारणासाठी वापरली जात असेल तर, पाच रुपयांहून कमी नसेल, परंतु एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतका दंड व शेती व्यतिरिक्त अन्य कारणासाठी उपयोगात आणली जात असेल तर, दोन हजार रुपयांहून अधिक नसेल असा दंड त्याशिवाय आणखी अशी व्यक्ती देईल. वस्तू फेरीने विकत असताना किंवा विक्री करीत असताना पकडली गेलेली व्यक्ती ही, जिल्हाधिकारी ठरवील त्याप्रमाणे जास्तीत जास्त पन्नास रुपयांपर्यंतची दंडाची रक्कम देण्यास पात्र असेल.

(३) जिल्हाधिकारी, या संहितेच्या तरतुदींन्वये योग्य रीताने नोटीस बजावून असा कोणत्याही जमिनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करू शकेल किंवा ते बंद करण्यास किंवा दूर करण्यास सांगू शकेल ; आणि तो अशा नोटिशीत, ती देण्यात आल्यानंतर वाजवी मुदत देऊन, ती नोटीस ज्या दिनांकास अमलात येईल तो दिनांक ठरवील.

(४) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (३) अन्वये काढलेल्या नोटिशीत उल्लेखिलेल्या कोणत्याही जमिनीवर कोणतेही अतिक्रमण, करील, करवील, करण्यास परवानगी देईल किंवा करणे चालू ठेवील ती, पोट-कलम (२) मध्ये निर्विष्ट केलेल्या दंडाशिवाय, नोटीस अमलात येण्यासाठी ठरविलेल्या दिनांकानंतर ज्या ज्या दिवशी असे अतिक्रमण चालू ठेवण्यात आले असेल त्या प्रत्येक दिवसास, जिल्हाधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार, शेतीच्या प्रयोजनासाठी अतिक्रमण करण्यात आले असेल त्या बाबतीत जास्तीत जास्त पंचवीस रुपयांइतका आणि इतर बाबतीत जास्तीत जास्त पन्नास रुपयांइतका देड देण्यास पात्र होईल.

(५) जिल्हाधिकाऱ्याने या कलमान्वये दिलेल्या आदेशाविरुद्ध या संहितेच्या तरतुदींनुसार अपील आणि पुनरीक्षण होऊ शकेल.

(६) पोट-कलमे (१) ते (४) मधील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही व्यक्तीस या संहितेनुसार दिलेल्या अंतिम आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत दिवाणी न्यायालयात त्याचा हक्क प्रस्थापित करण्यास प्रतिबंध होणार नाही.

अतिक्रमणे नियमात बसविणे.

**५१.** कलम ५० मधील कोणत्याही गोष्टीमुळे, जिल्हाधिकाऱ्यास जर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीशी तशी इच्छा असेल तर, असे अतिक्रमण करण्यात आलेल्या जमिनीच्या किंमतीच्या पाच पटीहून अधिक नसेल अशी रक्कम उक्त व्यक्तींवर आकारण्यास आणि त्या जमिनीवरील सर्वसाधारण वार्षिक जमीन महसुलाच्या पाच पटीहून अधिक नसेल इतकी आकारणी निश्चित करण्यास आणि या बाबतीत केलेल्या नियमांना अधीन राहून जिल्हाधिकारी लादील अशा अटींवर व शर्तीवर, अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीस जमीन देण्यास आणि त्यानंतर उक्त जमिनीची नोंद भूमि अभिलेखामध्ये उक्त व्यक्तीच्या नावे करण्याची व्यवस्था करण्यास प्रतिबंध होणार नाही ;

परंतु, जिल्हाधिकाऱ्याने, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने जमीन देण्याबद्दलचा आपला उद्देश असल्याची जाहिर नोटीस दिल्याखेरीज आणि उपरोक्तप्रमाणे जमीन देण्यापूर्वी त्याच्याकडे येतील अशा हरकतींवर व सूचनांवर विचार केल्याखेरीज वर उल्लेखिलेल्याप्रमाणे कोणतीही जमीन देण्यात येणार नाही. अशी जाहीर नोटीस देण्यासाठी आलेला खर्च अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीकडून देण्यात येईल आणि मागणी करण्यात आल्यानंतर वाजवी मुदतीत खर्च देण्यात ती कसूर करील तर जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे तो तिच्याकडून वसूल करण्यात येईल.

किंमत व जमीन महसूल कसा मोजावा.

**५२.** (१) कलमे ५० व ५१ च्या प्रयोजनांसाठी ज्या जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले असेल त्या जमिनीची किंमत जिल्हाधिकारी अशा मूल्यांकनाच्या वेळी शेजारच्या तशाच प्रकारच्या जमिनीची जी बाजार किंमत असेल त्या किंमतीनुसार ठरवील ; आणि अशा जमिनीचा वार्षिक महसूल, आसपासच्या तशाच प्रकारच्या जमिनीचा महसूल ज्या दराने आकारण्यात येतो त्याच दराने आकारण्यात येईल.

(२) अतिक्रमण केलेल्या जमिनीच्या बाबतीत द्यावयाची जमिनीची किंमत आणि जमीन महसुलाची किंवा आकारणीची रक्कम याबाबतीतील जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय निर्णायक असेल आणि जमीन महसुलाची रक्कम ठरविताना, वर्षाच्या कोणत्याही भागासाठी जमिनीचा भोगवटा केला असेल तर अशी मुदत संपूर्ण वर्ष असल्याप्रमाणे मोजण्यात येईल.

शासनाकडे निहित असलेल्या जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करणाऱ्या व्यक्तीस

**५३.** (१) जिल्हाधिकाऱ्याच्या मते, एखादी व्यक्ती शासनाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनीचा किंवा किनाऱ्यावरील प्रदेशाचा अनधिकृतपणे भोगवटा करीत असेल किंवा ती जमीन किंवा तो प्रदेश तिच्या गैरकब्जात असेल किंवा पट्ट्याची किंवा कुळवहिवाटीची मुदत संपल्याच्या किंवा पट्टा किंवा कुळवहिवाट समाप्त केल्याच्या किंवा सत्ता प्रकारासंबंधी घालण्यात आलेल्या शर्तीचे उल्लंघन केल्याच्या कारणावरून अशा जमिनीचा किंवा किनाऱ्यावरील प्रदेशाचा उपयोग, भोगवटा किंवा, कब्जा करण्याचे चालू ठेवण्याचा तिला हक्क नसेल किंवा चालू ठेवण्याचा हक्क असण्याचे बंद झाले असेल तर, जिल्हाधिकाऱ्याने अशा व्यक्तीस [१]***** निष्कासित करणे हे कायदेशीर असेल.

संक्षिप्तरित्या चौकशी करून निष्कासित करणे.

[२] [(१-क) अशा व्यक्तीला काढून लावण्यापूर्वी जिल्हाधिकारी, उक्त व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल आणि आवश्यक वाटल्यास तो संक्षिप्त चौकशी करील. पोट-कलम (१) अन्वये अपले मत बनविण्यासंबंधीची कारणे जिल्हाधिकारी थोडक्यात अभिलिखित करील.]

(२) [३] [जिल्हाधिकारी वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे आपल्या निष्कर्षाच्या आधारे] अशा व्यक्तीवर तिला नोटीस मिळाल्यानंतर वाजवी मुदतीत, यथास्थिति, जमीन किंवा किनाऱ्यालगतचा प्रदेश रिकामा करण्यास फर्मावणारी नोटीस बजावील आणि अशा नोटिशीचे पालन करण्यात न आल्यास, जिल्हाधिकाऱ्यास, अशा जमिनीवरून किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावरून अशा व्यक्तीस काढून टाकता येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणाच्या आदारे एखाद्या व्यक्तीचा, जमिनीचा उपयोग, भोगवटा किंवा कब्जा चालू ठेवण्याचा हक्क असण्याचे बंद झाल्यानंतर जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करीत असलेल्या किंवा ती जमीन बेकायदेशीररीत्या ताब्यात असलेली व्यक्ती (जमिनीच्या), अशा अनधिकृत उपयोगाच्या किंवा भोगवट्याच्या कालावधीकरिता, जिल्हाधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशा जमिनीच्या कर अकारणीच्या किंवा भाड्याच्या दुपटीपेक्षा अधिक होणार नाही इतकी रक्कम भरण्यास पात्र असेल.

---

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, याच्या कलम ३(अ) अन्वये ''संक्षिप्तरित्या '' व ''पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने '' हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३(क) अन्वये ''जिल्हाधिकाऱ्याने'' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

संक्षिप्तरीत्या चौकशी करून निष्कासित केल्यानंतर उरलेली मालमत्ता सरकारजमा करणे आणि ती काढून टाकणे.

**५४.** (१) कलम ५३ अन्वये संक्षिप्त चौकशी करून कोणत्याही व्यक्तीस काढून टाकल्यानंतर अशा जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर उभारलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकामे, किंवा उक्त जमिनीत काढलेले कोणतेही पीक, जिल्हाधिकाऱ्यास वाजवी वाटेल अशा लेखी नोटिशीनंतर अशा व्यक्तीने काढून नेले नसेल तर, ते सरकारजमा केले जाण्यास किंवा संक्षिप्त रीतीने चौकशी करून काढून टाकले जाण्यास पात्र होईल.

(२) या कलमान्वये सरकारजमा करण्याबाबचा न्यायनिर्णय जिल्हाधिकाऱ्याकडून देण्यात येईल आणि अशाप्रकारे सरकारजमा केलेल्या कोणत्याही मालमत्तेचे विनियोग जिल्हाधिकारी निदेश देईल त्या रीतीने करण्यात येईल. आणि या कलमान्वये कोणतीही मालमत्ता काढून नेण्यासाठी आलेला खर्च जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

* **५४-क.** [दिनांक १ डिसेंबर १९७८ पासून हे कलम अंमलात असणे बंद झाले आहे.]

---

* १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले ते ३० नोव्हेंबर १९७८ पर्यंत अंमलात राहिले.

" उक्त कलम ५४-क. पुढीलप्रमाणे वाचावे :—

लायसन समाप्त करण्यासाठी आणि कोणत्याही जमिनीवरील किंवा किनाऱ्या लगतच्या प्रदेशातील जी कोणतीही इमारत किंवा बांधकाम जप्त केले असेल ती इमारत किंवा बांधकाम काढून टाकण्यासाठी आणि बेदखलीनंतर जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर पुन्हा प्रवेश करणाऱ्या किंवा राहणाऱ्या व्यक्तींना काढून टाकण्यासाठी तात्पुरते अतिरिक्त अधिकार.

" **५४-क.** (क) कलम ५३ अन्वये कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही जमिनीवरून किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशातून निष्कासित करण्यात आले असेल ;

(ख) कोणत्याही जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशात उभारलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकाम कलम ५४ अन्वये जप्त करण्यात आले असेल ;

(ग) जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशात अनधिकृतपणे प्रवेश केलेल्या कोणत्याही व्यक्तीस जमिनीसाठी किंवा तिच्यावरील बांधाकामासाठी किंवा दोन्हीसाठी लायसन फी दिल्यावर त्यानंतर राहण्यास परवानगी देण्यात आली असेल,—

त्याबाबतीत, अशा कोणत्याही व्यक्तीविरूद्ध किंवा उपरोक्तप्रमाणे लायसन दिलेल्या बांधकामाच्या संबंधात करता येईल अशा कोणत्याही इतर कार्यवाहीस बाध न आणता,—

(१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही संविदेत किंवा, करारात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जिल्हाधिकाऱ्यास किंवा जिल्हाधिकाऱ्याकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कोणत्याही वेळी आदेशाद्वारे अशा कोणत्याही व्यक्तीस देण्यात आलेले लायसन किंवा परवानगी (तशी परवानगी दिली असल्यास) ताबडतोब समाप्त करण्यात आल्याचे मानण्यात येईल असा निदेश देता येईल ;

(२) जिल्हाधिकाऱ्यास चोवीस तासांपेक्षा कमी कालावधीची नसेल अशा लेखी नोटिशीद्वारे जप्त केलेल्या बांधकामाचा त्यावेळी ताबा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, जप्त केलेली इमारत किंवा इतर बांधकाम का पाडण्यात येऊ नये किंवा काढून टाकण्यात येऊ नये याबद्दल, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल असा दिवशी वा वेळी किंवा तत्पूर्वी, पुरेसे कारण दाखवल्यास, फर्मावीता येईल, आणि जर अशी व्यक्ती, विनिर्दिष्ट दिवशी व वेळी किंवा तत्पूर्वी, जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल असे कारण दाखविण्यास कसूर करील तर, जिल्हाधिकाऱ्यास, यथास्थिति, अशी इमारत किंवा असे बांधकाम पाडून किंवा काढून टाकता येईल ; आणि

(३) कोणतीही व्यक्ती (निष्कासित केलेली व्यक्ती धरून) जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय, अशा कोणत्याही जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर-प्रवेश करणार नाही त्यावर किंवा त्यात असणार नाही किंवा त्यावरून जाणार नाही ; आणि जर कोणतीही व्यक्ती या कलमाचे उल्लंघन करून जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर प्रवेश करील किंवा त्यावर किंवा त्यात राहील किंवा तिच्यावरून जाईल तर, त्या व्यक्तीस जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडून तेथून काढून टाकता येईल आणि जिल्हाधिकाऱ्यास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास त्या प्रयोजनाकरिता आवश्यक असेल असे सर्व सहाय्य देता येईल."

## जमीन सोडून देण्यासंबंधी

**५५.** शासन किंवा भोगवटादार यांच्या खेरीज कोणत्याही व्यक्तीच्या नावे कायदेशिररीत्या जे कोणतेही हक्क, धारणाधिकार, भार किंवा समन्याय अस्तित्वात असतील त्यांना अधीन राहून भोगवटादारास कृषि वर्षाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी कमीत कमी तीस दिवस आधी तहसीलदारास लेखी नोटीस देऊन त्याची जमीन सोडून देता येईल, म्हणजेच ती राज्य शासनाच्या नावे करून देता येईल व त्यानंतर अशा दिनांकानंतर येणाऱ्या कृषि वर्षापासून तो भोगवटादार राहणार नाही : जमीन सोडून देणे.

परंतु, ज्या जमिनीच्या भागाचे क्षेत्र संपूर्ण भू-मापन क्रमांकापेक्षा किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोटविभागापेक्षा कमी आहे, तो भाग सोडून देता येणार नाही.

**५६.** कलम ३५ आणि कलम ५५ च्या तरतुदी या शक्य असेल तेथवर दुमाला जमिनीच्या धारकांना लागू असतील. दुमाला जमीन सोडून देणे.

**५७.** एखाद्या व्यक्तीने सोडून दिलेल्या जमिनीत जाण्याचा मार्ग तिच्या ताब्यात असलेल्या इतर जमिनीतून जात असेल तर, असा ताब्यात असलेल्या जमिनीतून जाण्याचा अधिकार, सोडून दिलेल्या जमिनीच्या भावी धारकाकडे चालू राहील. सोडून दिलेल्या जमिनीत जाण्याचा अधिकार.

**५८.** ज्या कोणत्याही पट्ट्याने किंवा इतर स्पष्ट लेखान्वये राज्य शासनाकडून जमीन धारण केली असेल किंवा यापुढे धारण करण्यात येईल त्या पट्ट्याच्या किंवा इतर लेखांच्या अटींच्या किंवा शर्तींच्या कायदेशीरपणास कलम ५५ मधील कोणत्याही मजकुरामुळे बाध येणार नाही. विवक्षित प्रकरणात कलम ५५ च्या प्रवर्तनाची व्यावृत्ती.

**५९.** जी कोणतीही व्यक्ती,— अनधिकृतपणे जमिनीचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तीस संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकणे.

(क) कोणत्याही जमिनीचा उपयोग भोगवटा करण्याचा, तीस या संहितेच्या कोणत्याही तरतुदींन्वये हक्क नसतानाही किंवा असा हक्क असण्याचे बंद झाले असतानाही, किंवा

(ख) कलम ३६, पोट-कलम (२) अन्वये आगाऊ परवानगी घेतल्यावाचून किंवा कलम ३१, ३७ किंवा ४४ च्या तरतुदींन्वये जी कोणतीही शर्त, धारणाधिकारास कायदेशीररीत्या लागू असेल तिच्या आधारे जमिनीचे हस्तांतरण करणे योग्य नसतानाही ;

अशा कोणत्याही जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करीत असेल किंवा ती बेकायदेशीररीत्या कब्जात ठेवीत असेल, तर तीस, जिल्हाधिकारी संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकू शकेल.

**६०.** (१) राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी,— कलम ५५ ची अंमलबजावणी तहकूब करण्याचा राज्य सासनाचा अधिकार.

(क) कलम ५५ ची अंमलबजावणी कोणत्याही विहित केलेल्या स्थानिक क्षेत्रात, सामान्यपणे किंवा जमीन कसणाऱ्याच्या किंवा विशिष्ट वर्गाच्या किंवा वर्गांच्या भोगवटादारांच्या बाबतीत तहकूब ठेवणे, आणि

(ख) अशी कोणतीही अधिसूचना रद्द करणे,

हे कायदेशीर असेल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये जी कोणतीही अधिसूचना कोणत्याही स्थानिक क्षेत्रात अंमलात असेल त्या काळात, ज्या तरतुदींची अंमलबजावणी तहकूब केली असेल त्या तरतुदींऐवजी आयुक्त वेळोवेळी निदेश देईल असे आदेश अंमलात असतील.

## विवक्षित वहिवाटींचे न्यायालयीन कार्यवाहीपासून संरक्षण

वहिवाट ही दिवाणी न्यायालयाच्या आदेशिकेस केव्हा पात्र नसेल ; न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अंमलात आणणे.

**६१.** जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीवाचून वहिवाट हस्तांतरण योग्य नसेल आणि दिवाणी न्यायालयाने केलेल्या किंवा करण्याबद्दल आदेश दिलेल्या किंवा न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश ज्यावर आधारित असेल अशा हस्तांतरणास अशी मजुरी देण्यात आली नसेल अशा कोणत्याही बाबतीत,—

(क) अशी वहिवाट कोणत्याही न्यायालयात कार्यवाहीस पात्र असणार नाही आणि असे हस्तांतरण रद्दबातल होईल, आणि

(ख) अशी कोणतीही वहिवाट जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीवाचून हस्तांतरणयोग्य असणार नाही आणि अशी मंजुरी देण्यात आलेली नाही अशा अर्थाचे प्रमाणपत्र जिल्हाधिकाऱ्याच्या सहीशिक्क्यानिशी मिळाल्यानंतर, अशा वहिवाटीवरील कोणतीही जप्ती किंवा इतर कार्यवाही न्यायालयाकडून काढून टाकण्यात येईल किंवा त्या संबंधीची कोणतीही विक्री न्यायालयाकडून रद्द करण्यात येईल.

जप्ती किंवा विक्री यास मनाई.

**६२.** मध्यप्रदेश (संपदा, महाल, दुमाला जमिनी) स्वामित्त्वाधिकार नष्ट करण्याबाबत अधिनियम, १९५० या अन्वये निहित होण्याच्या दिनांकापूर्वी **शीर** म्हणून नोंदली गेली होती असी कोणतीही जमीन, त्या निहित होण्याच्या दिनांकापूर्वी काढलेल्या कोणत्याही कर्जाच्या वसुलीसाठी, जर अशा या कर्जासाठी या **शीर** जमिनीतील लागवडीचे हक्क कायदेशीरपणे गहाण ठेवून किंवा त्यावर भार निर्माण करून ते तारण दिलेले नसतील तर न्यायालयाच्या हुकूमनाम्याच्या किंवा आदेशांच्या अंमलबजावणीत जप्त होण्यास किंवा विकली जाण्यास पात्र राहणार नाही. १९५१ चा मध्यप्रदेश १.

भूमिधारकाचा गहाण सोडविण्याचा हक्क नष्ट करण्यास, तो जप्त करण्यास किंवा त्याची विक्री करण्यास मनाई.

**६३.** भूमिधारकाच्या जमिनीतील या संहितेच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी त्याने धारण केलेल्या कोणत्याही अधिकाराच्या विक्रीसाठी किंवा त्याचा गहाण सोडविण्याचा हक्क नष्ट करण्यासाठी मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता, १९५४ च्या तरतुदींनुसार भूमिधारक सत्ताप्रकाराच्या संबंधातील कोणताही हुकूमनामा किंवा आदेश देता येणार नाही, किंवा असा हक्क कोणत्याही हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या बजावणीत जप्त करता येणार नाही किंवा विकता येणार नाही किंवा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम ५१ अन्वये अशा धारण केलेल्या जमिनीची व्यवस्था करण्याकरिता प्रापक नेमता येणार नाही किंवा असा अधिकार प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० अन्वये न्यायालयात किंवा प्रापकाकडे निहित होणार नाही. १९५५ चा मध्यप्रदेश २. १९०८ चा ५. १९२० चा ५.

---

## प्रकरण चार

### जमीन महसुलासंबंधी

विशेषरीत्या सूट दिली असेल त्या व्यतिरिक्त सर्व जमिनी, जमीन महसूल देण्यास पात्र असणे.

**६४.** सर्व जमीन, मग ती शेतीच्या कामासाठी वापरलेली असो किंवा इतर कारणांसाठी वापरलेली असो, आणि कोठेही असो, या संहितेअन्वये किंवा तद्नुसार तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनास जमीन महसूल देण्यास पात्र असेल, परंतु राज्य शासनाशी केलेल्या कोणत्याही विशेष संविदेच्या तरतुदींअन्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा राज्य शासनाच्या विशेष मंजुरीने संपूर्ण सूट मिळालेल्या जमिनी जमीन महसूल देण्यास पात्र असणार नाहीत.

मात्र, जमिनी कोणत्याही हक्काने धारण केलेल्या असल्या तरी त्या सर्व जमिनींवर जेव्हा जेव्हा आणि जोपर्यंत राज्याच्या निकडीनुसार जमीन महसुलीची आकारणी करणे आवश्यक असेल तेव्हा तेव्हा आणि तोपर्यंत महसूल आकारण्यात यावा असा निदेश देण्याच्या राज्य विधानमंडळाच्या अधिकारास या संहितेतील कोणत्याही मजकुरामुळे वाध येतो असे मानण्यात येणार नाही.

**६५.** त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये, दुमाला जमिनीच्या कोणत्याही धारकाकडे निहित असलेल्या सर्व जलोढ जमिनी, नवीन बनलेली बेटे, किंवा नद्यांची सोडून दिलेली पात्रे ही दुमाला जमिनीच्या कोणत्याही धारकाकडे निहित असतील तर, जमीन महसूल देण्याच्या जबाबदारीच्या संबंधात, त्या सर्व जलोढ जमिनी, बेटे किंवा नद्यांची पात्रे ही ज्या मूळ जमिनी अन्वये तिच्या धारकास प्राप्त होतील, त्या मूळच्या धारण केलेल्या जमिनीस जे विशेषाधिकार किंवा शर्ती किंवा निर्बंध लागू असतील ते विशेषाधिकार किंवा शर्ती किंवा निर्बंध यांस त्या जलोढ जमिनी नवीन बनलेली बेटे किंवा नद्यांची सोडून दिलेली पात्रे पात्र असतील. परंतु उक्त प्रकारच्या कोणत्याही जलोढ जमिनींचे, बेटांचे किंवा नद्यांच्या पात्राचे क्षेत्रफळ एक एकरांहून अधिक होईपर्यंत किंवा अधिक नसेल तर, आणि तसेच उक्त मूळच्या धारण केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाच्या एक-दशांशाहून अधिक होईपर्यंत किंवा अधिक नसेल तर, अशा कोणत्याही जमिनी, बेटे किंवा नद्यांची पात्रे याबाबत कोणताही जमीन महसूल आकारण्यात येणार नाही. जलोढ जमिनी, जमीन महसूलास पात्र असणे.

**६६.** आपण धारण केलेल्या जमिनीबाबत महसूल देत असलेल्या जमीन दारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस, त्या जमिनीचा कमीत कमी अर्धा एकर भाग पाण्याने धुपून गेला असेल तर, राज्य शासनाकडून या बाबतीत करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून, असा जमिनीच्याबाबतीत आकारणी कमी करून घेण्याचा हक्क असेल, आणि जमिनदारक हा, त्याबाबतीत करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून, पाण्याने धूप झालेली, कमीत कमी अर्धा एकर जमीन पूर्ववत झाल्यानंतर जमीन महसूल देण्यास पात्र ठरेल. पाण्याने जमिनीची धूप झाली असेल तर जमीन महसुलाची आकारणी.

**६७.** (१) या संहितेच्या तरतुदींन्वये कोणत्याही जमिनीवर आकारण्याजोगा महसूल, त्या जमिनीचा उपयोग— आकारणीची रीत आणि आकारणीतील फेरफार

(क) शेतीच्या प्रयोजनासाठी,

(ख) निवासाच्या प्रयोजनासाठी,

(ग) उद्योगधंद्याच्या प्रयोजनासाठी,

(घ) व्यापाराच्या प्रयोजनासाठी,

(ङ) इतर कोणत्याही प्रयोजनासाठी.

करण्यात येईल त्याप्रमाणे, यथास्थिति, आकारण्यात येईल किंवा आकारण्यात आला आहे असे समजण्यात येईल.

(२) जेव्हा शेतीच्या प्रयोजनासाठी आकारणी केलेल्या जमिनीचा अकृषिक प्रयोजनासाठी किंवा अकृषिक प्रयोजनासाठी आकारणी केलेल्या जमिनीचा उपयोग त्याच्या उलट शेतीच्या कामासाठी करण्यात येत असेल किंवा एखाद्या अकृषिक प्रयोजनासाठी उपयोग करण्यासाठी तिच्यावर आकारणी केली असताना तिचा दुसऱ्या एखाद्या अकृषिक प्रयोजनासाठी उपयोग करण्यात येत असेल तेव्हा अशा जमिनीवर या संहितेच्या तरतुदींन्वये ठरविलेली आकारणी ही अशी आकारणी ज्या मुदतीकरिता ठरविण्यात आली असेल अशी मुदत संपलेली नसली तरीही, फेरफार केला जाण्यास पात्र असेल आणि ज्या प्रयोजनासाठी त्या जमिनीचा उपयोग करण्यात आला असेल किंवा उपयोग करण्यास परवानगी देण्यात आली असेल त्यानुसार या संहितेअन्वये तरतूद केलेल्या दराने आकारणी केली जाण्यास पात्र असेल.

(३) जेव्हा जमीन कोणत्याही एका प्रयोजनासाठी उपयोग करण्याच्या शर्तीवर महसूल माफीने धारण केलेली असेल तेव्हा त्या जमिनीचा कोणत्याही वेळी इतर कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोग करण्यात येईल तेव्हा, ती जमीन आकारणीस पात्र असेल.

(४) पोट-कलमे (२) आणि (३) खालील आकारणी त्याबाबत केलेल्या नियमांनुसार करण्यात येईल.

आकारणी कोणी निश्चित करावयाची.

**६८.** (१) जमीन महसूल देण्यापासून पूर्ण सूट न मिळालेल्या आणि या संहितेच्या तरतुदीन्वये करावयाची आकारणीच्या ज्या जमिनीबाबत निश्चित करण्यात आलेली नसेल किंवा निश्चित करण्यात आल्याचे समजण्यात आले नसेल असा सर्व जमिनीबद्दल जमीन महसूल म्हणून द्यावयाच्या आकारणीची रक्कम, याबाबत केलेल्या नियमांना अधीन राहून, जी मुदत विहित करण्याचा जिल्हाधिकाऱ्यास राज्य शासनाने त्याबाबतीत केलेल्या आपल्या सामान्य किंवा विशेष आदेशान्वये प्राधिकार दिलेला असेल तितक्या परंतु नव्याण्णव वर्षापेक्षा अधिक नसलेल्या मुदतीकरिता, जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल, आणि अशा आकारणीनुसार येणे असलेल्या रकमा अशा सर्व जमिनींवर आकारण्यात येतील :

परंतु, जमीन महसुलापासून अंशतः सूट असणाऱ्या, किंवा ज्याची जमीन महसूल देण्याची पात्रता विशेष शर्तीस किंवा निर्बंधास अधीन असेल त्या जमिनींबाबत, आकारणी निश्चित करताना आणि महसूल वसूल करताना कायदेशिररीत्या विद्यमान असणाऱ्या सर्व हक्कांकडे, उक्त हक्कांच्या स्वरुपानुसार, लक्ष देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जमीन महसूल देण्यापासून संपूर्णतः किंवा अंशतः सूट असलेल्या कोणत्याही जमिनीला अशी सूट मिळण्याचे बंद होईल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्याने, अशी जमीन सूट मिळण्याचे बंद होईल त्या दिनांकापासून किंवा त्यास योग्य वाटेल अशा त्यानंतरच्या कोणत्याही दिनांकापासून अशा जमिनींवर जमीन महसूल म्हणून द्यावयाच्या रकमेची आकारणी ठरविणे हे कायदेशीर असेल.

(२) कोणत्याही जमिनीची पोट-कलम (१) अन्वये निश्चित केलेली आकारणीची मुदत संपल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, राज्य शासनाने याबाबत केलेल्या नियमांनुसार तिची वेळोवेळी फेरतपासणी करता येईल. अशा रीतीने फेरतपासणी केलेली आकारणी ही प्रत्येक वेळी, राज्य शासन सामान्य किंवा विशेष आदेशान्वये निर्दिष्ट करील अशा नव्याण्णव वर्षापेक्षा जास्त नसलेल्या मुदतीकरिता, निश्चित करण्यात येईल.

(३) जमीन महसूल देण्यापासून संपूर्ण सूट असलेल्या जमिनींवर, अशी पूर्ण आकारणी निर्धारित करण्यास आणि तिची नोंदणी करण्यास, जिल्हाधिकाऱ्यास, या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे प्रतिबंध होतो असे समजण्यात येणार नाही. अशा रीतीने ठरविलेली आणि नोंदलेली आकारणी ही सूट मागे घेण्यात आल्यानंतर लगेच बसविण्यात येईल आणि या प्रयोजनसाठी या कलमान्वये ती निश्चित करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

धारकाबरोबर करावयाची आकारणी-संबंधीची जमाबंदी प्रत्यक्ष राज्य शासनातर्फे करणे.

**६९.** जमिनीच्या प्रत्येक भागाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या जमीन महसुलाच्या आकारणीबाबतची जमाबंदी, जी व्यक्ती राज्य शासनास महसूल देण्यास प्रथमतः जबाबदार असेल त्या व्यक्तीशी करण्यात येईल.

पाण्याच्या वापरासाठी दर.

**७०.** ज्या पाण्यावरील हक्क शासनाकडे निहीत असेल त्या पाण्याचा आणि ज्याबाबत राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या पाटबंधाऱ्यासंबंधीच्या कोणत्याही कायद्यान्वये दर आकारता येत नसेल अशा पाण्याचा उपयोग भूमिधारकांनी आणि इतर व्यक्तींनी करण्याबद्दल जे दर राज्य शासनास, वेळोवेळी मंजूर करणे योग्य वाटतील असे दर ठरविण्यास जिल्हाधिकाऱ्यास, किंवा भू-मापनाचा प्रभार असलेल्या अधिकाऱ्यास किंवा त्यास वाटेल अशा इतर अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल. राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील अशा काळानंतर राज्य शासनास अशा दरांत फेरफार करता येतील आणि ते जमीन महसूल म्हणून वसूल करता येतील :

परंतु, कृषिक प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा दर प्रत्येक धारकामागे दर वर्षास फक्त एक रुपया असेल.

**७१.** या संहितेच्या तरतुदींअन्वये आकारणी निश्चित करणे हे साधारण जमीन महसुलाच्या आकारणी पुरतेच केवळ मर्यादित असेल आणि शाळा, गावातील आणि जिल्ह्यातील रस्ते, पुल, तलाव, विहिरी, प्रवाशांसाठी राहण्याची जागा आणि तशीच दुसरी कामे यांसारख्या स्थानिक सुधारणेच्या प्रयोजनांसाठी, जो कोणताही उपकर त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये राज्य शासनाने बसविणे हे कायदेशीर असेल असा कोणताही उपकर बसविण्यास, किंवा पाण्याच्या उपयोगाबद्दल कलम ७० च्या किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या पाटबंधाऱ्यासंबंधीच्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये लादण्यात येत असेल अशी कोणतीही पट्टी बसविण्यास उक्त आकारणीमुळे कोणताही प्रतिबंध होणार नाही.

या संहितेअन्वये आकारणी निश्चित करणे हे साधारण जमीन महसुलापुरतेच मर्यादित असणे.

**७२.** (१) कोणत्याही भूमिधारकाकडून जमीन महसूल म्हणून येणे असलेली थकबाकी ही त्या धारण केलेल्या जमिनीवरील आणि तिच्या प्रत्येक भागावरील सर्वश्रेष्ठ भार असेल आणि ती देण्यात कसूर केल्यास, भोगवट्याने किंवा दुमाला म्हणून धारण केलेली जमीन आणि भोगवटादाराच्या किंवा धारकाच्या त्या जमिनीवरील सर्व झाडे, पिके, इमारती आणि जमिनीस जोडलेल्या सर्व वस्तू किंवा जमिनीस जोडलेल्या कोणत्याही गोष्टीस कायम बांधलेल्या वस्तू त्यांवरील सर्व हक्कांसह जप्त होण्यास पात्र असतील ; आणि त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास पोट-कलमे (२) आणि (३) च्या तरतुदींना अधीन राहून, भोगवट्याची किंवा दुमाला जमिनीची विक्री करून, थकबाकी म्हणून असलेल्या सर्व रकमा वसूल करता येतील, किंवा याबाबत केलेल्या नियमान्वये अशा भोगवट्याचा किंवा दुमाला जमिनीचा विनियोग करता येईल आणि अशा भोगवट्याचा किंवा दुमाला जमिनीचा विनियोग-मग तो उपरोक्तप्रमाणे विक्री करून आलेला असो, किंवा पोट-कलमे (२) आणि (३) मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त इतर रीतीने असो,— करण्यात येईल तेव्हा ती जमीन जिल्हाधिकारी अन्यथा निदेश देईल ते खेरीज करून अशा भोगवट्याच्या किंवा धारण केलेल्या जमिनीच्या संबंधात शासनाखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीच्या नावे केलेले सर्व धारणाधिकार, हक्क, भार आणि समन्याय भाग यापासून मुक्त झाली आहे, असे समजण्यात येईल.

जमीन महसूल हा जमिनीवरील सर्वश्रेष्ठ भार असेल.

(२) जेव्हा भोगवट्याची किंवा दुमाला म्हणून धारण केलेली जमीन पोट-कलम (१) च्या तरतुदींनुसार जप्त करण्यात आली असेल तेव्हा जिल्हाधिकारी अशी जमीन आपल्या ताब्यात घेईल आणि ती तिच्या पूर्वीच्या भोगवटादारास किंवा तिच्या वरिष्ठ जमिनधारकास किवा इतर कोणत्याही व्यक्तीस एकावेळी एका वर्षाकरिता भाडेपट्ट्याने देईल, मात्र यामुळे असा जमिनधारकाकडे किंवा, यथास्थिति, अशा व्यक्तीकडे असलेली एकूण जमीन, यासाठी त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार जमिनधारणेसाठी निश्चित केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक होता कामा नये.

(३) पोट-कलम (२) अनुसार जिल्हाधिकाऱ्याने भोगवट्याची किंवा दुमाला म्हणून धारण केलेली जमीन ताब्यात घेण्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या आत त्याच्या पूर्वीच्या भोगवटादाराने किंवा वरिष्ठधारकाने भोगवट्याची किंवा दुमाला जमीन परत मिळविण्यासाठी अर्ज केला असेल तर जिल्हाधिकाऱ्यास, उक्त वरिष्ठधारकाने किंवा भोगवटादाराने जमीन महसूल म्हणून त्याच्याकडून येणे असलेली रक्कम आणि आकारणीच्या तिप्पटीबरोबरची रक्कम शास्ती म्हणून दिल्यानंतर, यथास्थिति, भोगवटादारास किंवा वरिष्ठधारकास भोगवट्याची किंवा दुमाला जमीन परत ताब्यात देता येईल. जर भोगवटादार किंवा वरिष्ठधारक भोगवट्याची किंवा दुमाला जमीन उपरिनिर्दिष्ट मुदतीत स्वतःच्या ताब्यात घेण्यात कसूर करील तर उक्त भोगवट्याचा किंवा दुमाला जमिनीचा किंवा तिच्या भागाचा पोट-कलम (१) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने जिल्हाधिकाऱ्याकडून विनियोग करण्यात येईल.

जप्त केलेल्या जमिनीचा कब्जा घेता येईल आणि अन्यथा त्याचा विनियोग करता येईल.

**७३.** महसूल देण्यात कोणतीही कसूर केल्यामुळे किंवा इतर कसूर केल्यामुळे कलम ७२ अन्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये एखादी धारण केलेली जमीन जप्त केली असेल तेव्हा जिल्हाधिकाऱ्याने अशा जमिनीचा ताबडतोब कब्जा घेणे आणि ती खरेदीदाराच्या किंवा या संहितेच्या तरतुदींअन्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये ती धारण करण्याचा हक्क असणाऱ्या इतर व्यक्तींच्या कब्जात देऊन तिचा विनियोग करणे कायदेशीर असेल.

भोगवटा जप्त होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून भोगवटादाराखेरीज इतर विवक्षित व्यक्ती जमीन महसूल देऊ शकेल.

**७४.** वहिवाटीबद्दल देण असलेला जमीन महसूल देण्यास प्रथमतः जबाबदार असलेल्या भोगवटादाराने तो न दिल्यामुळे कलम ७२ च्या किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या तरतुदींअन्वये भोगवटा जप्त होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून, जमीन महसुलाबाबत देणे असलेल्या सर्व रकमा कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीने अशा भोगवटादाराच्या वतीने देणे कायदेशीर असेल आणि अशा रकमा योग्य रीतीने दिल्यावर जिल्हाधिकारी त्या स्वीकारतील :

परंतु, या कलमाच्या तरतुदींअन्वये प्राधिकार दिलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही कृतीमुळे, सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयातील अशा पक्षकारांमधील कोणत्याही दाव्यात सिद्ध झाले असतील अशा, हितसंबंधित पक्षकारांच्या हक्कांस बाध येणार नाही.

दुमाला जमिनीचा नोंदवही.

**७५.** त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये ज्या जमिनीचे अन्यसंक्रामण प्रस्थापित करण्यात आले असेल किंवा त्यास मान्यता देम्यात आली असेल अशा सर्व जमिनींची ; राज्य शासनाने विहित केलेल्या नमुन्यात जिल्हाधिकारी एक नोंदवही ठेवील ; आणि अशा कोणत्याही दुमाला करून दिलेल्या जमिनींच्या संबंधात दिलेली कोणतीही सनद कायमची हरवलेली आहे किंवा नष्ट झालेली आहे असे जिल्हाधिकाऱ्यांचे समाधान होईल अशा प्रकारे दाखवून दिले गेले असल्यास जिल्हाधिकाऱ्यास, अशी सनद मिळण्याचा त्याच्या मते जीस हक्क असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, राज्य शासनाने विहित केलेल्या नियमांना अधीन राहून आणि विहित केलेली फी दिल्यानंतर उक्त नोंदवहीतील प्रमाणित उतारा देता येईल आणि जी सनद हरविल्याचे किंवा नष्ट झाल्याचे सांगण्यात आले असेल अशा सनदेऐवजी तो उतारा देण्यात आला आहे अशा अर्थाचा शेरा जिल्हाधिकारी त्यावर लिहील, आणि असा उतारा उक्त सनदेइतकाच हक्कासंबंधीचा कायदेशीर पुरावा असल्याचे मानण्यात येईल.

पावत्या.

**७६.** (१) जमीन महसुलाची रक्कम स्वीकारणारा प्रत्येक महसूल अधिकारी आणि प्रत्येक तलाठी अशी रक्कम स्वीकारतेवेळी त्याबद्दल लेखी पावती देईल.

(२) ज्या वरिष्ठधारकास, खंडाची किंवा जमीन महसुलाची येणे असलेली कोणतीही रक्कम थेट कनिष्ठधारकाकडून वसूल करण्याचा हक्क असेल ती प्रत्येक वरिष्ठधारक अशी रक्कम तो स्वीकारील त्यावेळी, अशा कनिष्ठधारकास त्याबद्दल लेखी पावती देईल.

पावत्या देण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

**७७.** कोणत्याही व्यक्तीने कलम ७६, अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पावती देण्यात कसूर केली तर ती व्यक्ती, रक्कम देणाऱ्या व्यक्तीने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाद्वारे, भरलेल्या रकमेच्या दुप्पटीपेक्षा अधिक नसेल इतकी शास्ती देण्यास पात्र होईल.

जमीन महसूल कमी करणे, तो तहकूब करणे किंवा त्यापासून सूट देणे.

**७८.** या संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, पिके न आल्यामुळे, पुरामुळे किंवा इतर कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा कोणत्याही अन्य कारणामुळे, कोणत्याही भागात, कोणत्याही वर्षी, या बाबतीत केलेल्या नियमानुसार किंवा विशेष आदेशानुसार जमीन महसूल संपूर्णतः किंवा अंशतः कमी करता येईल, तो तहकूब करता येईल किंवा त्यापासून सूट देता येईल.

प्रकरण पाच

## महसुली मोजणी

**७९.** (१) राज्य शासनाने, जमीन महसुलाची आकारणी किंवा जबाबदारी करण्यासाठी, आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या हक्कांच्या नोंदणीसाठी व ते जतन करण्यासाठी, किंवा तशाच कोणत्याही इतर प्रयोजनासाठी ही संहिता राज्याच्या ज्या भागास लागू असेल अशा राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही जमिनीची मोजणी करण्यासाठी, जेव्हा जेव्हा त्यास इष्ट वाटेल तेव्हा निर्देश देणे हे कायदेशीर असेल आणि कोणत्याही अशा मोजणीस महसुली मोजणी असे म्हणण्यात येईल. अशी मोजणी सामान्यतः कोणत्याही गावाच्या, शहराच्या किंवा नगराच्या जमिनीस किंवा राज्य शासन निदेश देईल केवळ अशाच जमिनीस लागू होईल ;आणि राज्य शासनाच्या आदेशांना अधीन राहून, अशी कोणतीही मोजणी करणाऱ्या अधिकाऱ्याने, ज्या कोणत्याही जमिनीस असे भू-मापन लागू करणे इष्ट वाटत नसेल त्या जमिनीस अशा भू-मापनातून वगळणे हे कायदेशीर असेल.

राज्य शासनास राज्यातील कोणत्याही भागात महसुली मोजणी सुरू करता येईल.

(२) अशा प्रत्येक महसुली मोजणीवरील नियंत्रण हे राज्य शासनाकडे निहित असेल आणि राज्य शासन त्याचा वापर करील.

**८०.** कलम ८६ किंवा ८७ अन्वयेची मोजणी किंवा अशी कोणतीही मोजणी करण्यासाठी किंवा तीत भाग घेण्यासाठी प्रतिनियुक्त केलेल्या भू-मापन अधिकाऱ्याने, सामान्य नोटिशीद्वारे किंवा समन्सद्वारे, जमीन धारण करणाऱ्यास व त्यात हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींस जातीने, किंवा योग्यरीत्या सूचना देण्यात आल्या आहेत व महत्त्वाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे ज्यास देता येतील अशा कायदेशीररीत्या दिलेल्या अभिकर्त्यामार्फत हजर राहण्यास आणि तालुक्याच्या व गावाच्या ज्या अधिकाऱ्यास, आपापल्या पदाच्या नात्याने, आपापल्या ठाण्यात व पदावर कायदेशीररीत्या किंवा परिपाठाप्रमाणे सेवा करणे आवश्यक आहे अशा तालुका व ग्राम अधिकाऱ्यास हजर राहण्यास भाग पाडणे आणि अशा तऱ्हेने बोलवलेल्या व्यक्तींच्या दर्जास बाध येणार नाही अशा तऱ्हेने त्यांना मोजणीच्या कामात सहाय्य करण्यास आणि त्या कामाशी संबंधित अशा सेवा करण्यास भाग पाडणे हे कायदेशीर असेल.

भू-मापन अधिकाऱ्यास, सामान्य नोटिस किंवा समन्स याद्वारे जमीन वैगरे धारण करणाऱ्यास योग्य ती सेवा करण्याबाबत फर्माविता येईल.

**८१.** भू-मापन अधिकाऱ्याने, मागील कलमात उल्लेखिलेली भू-मापने करते वेळी भू-मापन ज्या जमिनीस लागू आहे अशा जमिनींच्या मोजणीच्या किंवा वर्गीकरणाच्या कामात, निशाण धारण करणाऱ्या व्यक्ती देऊन सहाय्य देण्यासाठी जमीन धारण करणाऱ्या सर्व व्यक्तींना व तीत हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना बोलाविण हे कायदेशीर असेल ; आणि या किंवा भू-मापन कार्याशी आनुषंगिक अशा इतर कारणांसाठी पैसे देऊन मजूर कामावर लावणे आवश्यक असेल तेव्हा महसूल मागणी म्हणून गोळा करण्यासाठी त्याबाबतच्या सर्व खर्चाची आकारणी जमिनीची मोजणी करण्यावर झालेल्या सर्व आकस्मिक खर्चाबरोबर करणे कायदेशीर असेल.

जमिनीची मोजणी किंवा वर्गीकरण करण्याच्या कामात जमिनधारक व इतर यांच्याकडून देण्यात येणारे सहाय्य.

भू-मापन क्रमांक हे विशिष्ट व्याप्तीपेक्षा कमी असणार नाहीत.

**८२.** (१) यात यानंतर जी तरतूद करण्यात आली आहे तिचा अपवाद करता, केवळ शेतीच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणलेली जमीन समाविष्ट असलेला कोणताही भू-मापन क्रमांक राज्य शासनाची मंजुरी घेऊन भूमि अभिलेख संचालकाने वेळोवेळी प्रत्येक जिल्ह्यामधील जमिनींच्या निरनिराळ्या वर्गासाठी जी कमीत कमी व्याप्ती ठरविली असेल त्यापेक्षा कमी व्याप्तीचा करण्यात येणार नाही, अशा रीतीने ठरविलेल्या कमीत कमी व्याप्तीसंबंधीची कागदपत्रे ही प्रत्येक तालुक्यातील तहसीलदाराच्या कार्यालयात ठेवण्यात येतील आणि ती सर्व वाजवी वेळी जनतेला निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात येतील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदी, अशा रीतीने निश्चित केलेल्या कमीत कमी व्याप्तीपेक्षा यापूर्वीच व्याप्ती कमी करण्यात आलेल्या किंवा याबाबतीत सामान्यतः किंवा कोणत्याही विशिष्ट प्रसंगी भूमि अभिलेख संचालकांच्या प्राधिकारान्वये तसे करण्यात येतील अशा भू-मापन क्रमांकांना लागू असणार नाहीत ; आणि भूमि अभिलेखांमध्ये ज्या भू-मापन क्रमांकांना स्वतंत्रपणे मान्यता दिलेली आहे असा कोणताही भू-मापन क्रमांक, त्याची व्याप्ती काहीही असली तरी, प्राधिकृतपणे ठरविण्यात आला आहे असे मानण्यात येईल.

नव्याने मोजणी करण्याविषयी आणि आकारणीची फेरतपासणी करण्याविषयी निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**८३.** नव्याने मोजणी करण्याविषयी किंवा त्यासंबंधातील दुय्यम असे कोणतेही काम करण्याविषयी राज्य शासनाने कोणत्याही वेळी निदेश देणे कायदेशीर असेल :

परंतु, जेव्हा कोणत्याही क्षेत्राच्या जमिनीचे, सामान्य वर्गीकरण दुसऱ्यांदा करण्यात आले असेल किंवा कोणत्याही क्षेत्राच्या जमिनीचे कोणतेही मूळचे वर्गीकरण राज्य शासनाने अखेरचे म्हणून मान्य केले असेल तेव्हा, अशा क्षेत्राच्या जमिनीच्या स्थितीत बदल झाल्यामुळे किंवा वर्गीकरणातील कोणत्याही चुकांमुळे असे पुनर्वर्गीकरण आवश्यक असे राज्य शासनास वाटेल तेवढ्या गोष्टीचा अपवाद करता, अशा क्षेत्राच्या आकारणीची फेरतपासणी करण्याच्या उद्देशाने असे कोणतेही वर्गीकरण पुन्हा करण्यात येणार नाही.

भू-मापन क्रमांक व उप-विभाग यांची अभिलेखात नोंद.

**८४.** भू-मापन क्रमांक व भू-मापन क्रमांकाचे उप-विभाग यांच्या क्षेत्रफळाची आणि आकारणीची नोंद, राज्य शासनाकडून या बाबतीत केलेल्या नियमांन्वये ठेवण्यात येतील अशा अभिलेखांमध्ये करण्यात येईल.

विभाजन.

**८५.** (१) दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यावरून किंवा सहधारकांनी अर्ज केल्यानंतर, मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या तरतुदींना अधीन राहून, धारण जमिनीचे विभाजन यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने करण्यात येतील.

सन १९४७ चा मुंबई ६२.

(२) कोणत्याही धारण जमिनीत एकाहून अधिक सहधारक असतील तर अशा कोणत्याही सहधारकांस, धारण जमिनीतील आपल्या हिश्श्याच्या विभाजनाकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल :

परंतु, स्वामित्व हक्काबाबत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास अशा प्रश्नांचा निर्णय दिवाणी न्यायालयाकडून येईतोपर्यंत असे विभाजन करण्यात येणार नाही.

(३) सहधारकांची बाजू ऐकून घेतल्यानंतर [1][जिल्हाधिकाऱ्यास] धारण जिमिनीचे विभाजन करता येईल व या संहितेअन्वये राज्य शासनाने केलेल्या नियमानुसार धारण जमिनीवरील आकारणीची वाटणी करता येईल.

[2][ * * * * *]

(५) राज्य शासनास महसूल देणाऱ्या धारण जमिनीचे विभाजन करताना योग्यरीतीने झालेला खर्च, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा प्रमाणात, ज्याच्या विनंतीवरून विभाजन करण्यात आले अशा सहधारकांकडून किंवा विभाजनात ज्यांचा हितसंबंध असेल अशा व्यक्तीच्या हिश्श्यामधून महसुलाची मागणी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

**८६.** जेव्हा लागवडीखाली आणता येण्याजोग्या जमिनीचा कोणताही भाग या संहितेच्या तरतुदींन्वये कोणत्याही बिगरशेतकीच्या कामासाठी उपयोगात आणण्यास परवानगी देण्यात आली असेल तेव्हा किंवा जमिनीचा कोणताही भाग कलम २२ अन्वये विशेषरीत्या अभिहस्तांकित केला असेल तेव्हा, किंवा कलम ६७, पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये जमिनीच्या कोणत्याही भागावरील कोणत्याही आकारणीत फेरफार केला असेल किंवा आकारणी बसविली असेल तेव्हा अशा भागाच्या, कलम ८२ मध्ये कोणतीही तरतूद केलेली असली तरीही, जिल्हाधिकाऱ्याची मंजुरी घेऊन कोणत्याही वेळी स्वतंत्र भू-मापन क्रमांक करता येईल. भू-मापन क्रमांकाची नवीन भू-मापन क्रमांकामध्ये विभागणी.

सन १९४७ चा मुबई ६२. **८७.** (१) मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ च्या तरतुदींना अधीन राहून— भू-मापन क्रमांकाची उप-विभागात विभागणी.

(क) भू-मापन क्रमांक हे, वेळोवेळी व कोणत्याही वेळी, जमिनीतील हक्क संपादन करण्याच्या दृष्टीने किंवा इतर कोणत्याही कारणासाठी आवश्यक असतील इतक्या उप-विभागांमध्ये विभागता येतील ;

(ख) भू-मापन क्रमांकाची पोट-विभागणी करण्याचे आणि भू-मापन क्रमांकाची आकारणी निश्चित करण्याचे व वेळोवेळी तिच्यात सुधारणा करण्याचे काम याबाबतीत राज्य शासनाकडून करण्यात येईल अशा नियमांनुसार पार पाडण्यात येईल.

परंतु, कोणत्याही भू-मापन क्रमांकाच्या किंवा उप-विभागाच्या आकारणीच्या एकूण रकमेत, कलम ६७ अन्वये अशी आकारणी फेरबदल केला जाण्यास पात्र नसेल तर, ज्या कालावधीसाठी या संहितेच्या तरतुदींन्वये आकारणी निश्चित करण्यात आली असेल त्या कालावधीत, वाढ करण्यात येणार नाही.

(ग) अशा पोट-विभागांचे क्षेत्र व आकारणी, याबाबतीत राज्य शासन विहित करील अशा जमिनीविषयीच्या अभिलेखात दाखल करण्यात येईल.

(२) राज्यातील कोणत्याही क्षेत्रातील धारण जमीन ही अनेक **खासरा** क्रमांक मिळून झाली असेल अशा बाबतीत जमाबंदी अधिकारी प्रत्येक **खासरा** क्रमांकासाठी देय असलेला जमीन महसूल आकारील आणि त्यांची स्वतंत्र भूमापन क्रमांक म्हणून नोंद करील.

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ३(अ) अन्वये ''पोट-कलम (४) च्या उपबंधास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास '' या मजकुराऐवजी ''जिल्हाधिकाऱ्यास '' हा मजकूर वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) अन्वये पोट-कलम (४) वगळण्यात आले.

हक्क-लेखाविषयीचा विशेषाधिकार.

**८८.** राज्य शासनाच्या प्राधिकरान्वये कोणत्याही जमिनीचे प्राथमिक भू-मापन एकदा पूर्ण, मान्य व कायम करण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीस या प्रकरणाच्या तरतुदींन्वये उक्त जमिनीचे त्यानंतर पुन्हा भू-मापन करण्याच्या प्रयोजनांसाठी अशा जमिनीसंबंधातील तिचे हक्कलेख दाखल करण्यास किंवा त्यातील मजकूर जाहीर करण्यास भाग पाडण्यात येणार नाही.

या संहितेच्या प्रारंभापूर्वी केलेल भू-मापन हे या प्रकरणान्वये केले असल्याचे मानणे.

**८९.** यापूर्वी केलेले आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा अन्यथा, सुरू करण्यात आलेले आणि या संहितेच्या प्रारंभाच्या दिनांकास चालू असलेले कोणतेही भू-मापन या प्रकरणाच्या तरतुदींन्वये करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण सहा

## शेत जमिनीच्या जमीन महसुलाची आकारणी व जमाबंदी

अर्थ लावणे.

**९०.** संदर्भावरून अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर, या प्रकरणात,—

(क) ‘‘ वर्गवारीची किंमत ’’ म्हणजे जमिनीचा प्रकार, तिचे स्थान, पाणी व इतर फायदे लक्षात घेऊन भू-मापन अभिलेखात नोंद केल्याप्रमाणे असलेली जमिनीची सापेक्ष किंमत आणि तीत नागपूर, चांदा, वर्धा, भंडारा या जिल्ह्यांतील आणि अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तालक्यातील घटक साधन प्रमाणाच्या आधारावर जमिनीच्या प्रकाराच्या स्वरुपात तिचे जे मूल्य दर्शविण्यात आले असेल त्या मूल्याचा समावेश होतो ;

(ख) ‘‘ जमिनीचा वर्ग ’’ म्हणजे जमिनीचा पुढीलपैकी कोणताही वर्ग उदा. वरकस ; कोरडवाहू भाताची जमीन किंवा बागायत जमीन ;

(ग) ‘‘ घटक साधन प्रमाण ’’ म्हणजे जमिनीच्या वर्गवारीच्या मंजूर योजनेत समाविष्ट केलेल्या जमिनीच्या प्रत्येक प्रकाराचे सापेक्ष मूल्य ;

(घ) ‘‘ गट ’’ म्हणजे जमीन महसुलाच्या आकारणीच्या प्रयोजनासाठी तेच प्रमाण दर लागू करण्यासाठी कलम ९४, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या गोष्टींच्या संबंधाने ज्या जमिनी राज्य शासनाच्या मते किंवा या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या मते पुरेशा एकजिनसी असतील अशा एखाद्या प्रदेशातील सर्व जमिनी ;

(ड) ‘‘जमाबंदी ’’ म्हणजे जमीन महसुलाची आकारणी ठरविण्यासाठी एखाद्या प्रदेशात चालविलेल्या कामकाजातून निष्पन्न झालेली कार्यवाही ;

(च) गटातील एखाद्या विशिष्ट जमिनीच्या वर्गाच्या बाबतीत ‘‘ प्रमाण दर ’’ म्हणजे त्या वर्गाच्या सोळा आणे किमतीच्या वर्गीकरणाच्या जमिनीवरील दर एकरी पिकांच्या सरासरी उत्पन्नांची (एक पंचविसांशापेक्षा अधिक होणार नाही अशी) किंमत.

**स्पष्टीकरण**.— ज्या क्षेत्रासाठी घटक साधन प्रमाण अस्तित्वात असेल अशा खंड (क) मध्ये उल्लेखिलेल्या क्षेत्रामध्ये ‘‘ सोळा आणे वर्गीकरणाची जमीन ’’ म्हणजे राज्य शासनाने विहित केल्याप्रमाणेच्या सोळा आणे वर्गीकरणानुसार असतील असे घटक साधन प्रमाणातील मृत एकक (Soil Units) असणारी जमीन.

(छ) ‘‘ जमाबंदीची मुदत ’’ म्हणजे राज्य शासनाने ज्या मुदतीसाठी जमाबंदी अमलात राहील असे जाहीर केले असेल ती मुदत ;

(ज) " प्रदेश " म्हणजे एक किंवा त्याहून अधिक जिल्ह्यांतील तालुक्यांचा किंवा तालुक्यांचा गट किंवा त्यांचे भाग बनलेला जो स्थानिक प्रदेश राज्य शासनाच्या किंवा या बाबतीत राज्य शासनाने प्राधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या मते,—

(एक) जमिनीचा बाह्य आकार,

(दोन) हवामान व पर्जन्यमान,

(तीन) सदरहू स्थानिक क्षेत्रात उत्पन्न करण्यात येणारी मुख्य पिके ; आणि

(चार) जमिनीची वैशिष्ट्ये.

यांच्या संबंधात संलग्न आणि एकजिनसी असेल असा प्रदेश.

**९१.** (१) कलम ९२ अन्वये कोणत्याही जमिनीच्या जमाबंदीसंबंधी किंवा नवीन जमाबंदीसंबंधी निदेश देण्यापूर्वी राज्य शासन या कारणासाठी देण्यात येतील त्या अनुदेशांनुसार जमाबंदीचे संभवनीय निष्कर्ष काय होतील याचा अंदाज तयार करण्याची व्यवस्था करील. जमाबंदीसंबंधी अंदाज.

(२) जमीन महसुलाचे निर्धारण किंवा पुनरीक्षण आणि ज्या कालावधीसाठी जमाबंदी करावयाची असेल तो कालावधी यासंबंधीच्या अंदाजावर आधारलेल्या योजनेसह जमाबंदी करण्याचा राज्य शासनाचा इरादा असल्याची नोटीस, हरकती मागविण्यासाठी राज्य शासन ठरवील असा रितीने प्रसिद्ध करण्यात येईल.

(३) असा अंदाज व योजना राज्य विधान मंडळाचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी एकवीस दिवसांहून कमी नसेल इतक्या मुदतीत त्या विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या प्रत्येक सदस्याकडे पाठविण्यात येतील.

(४) योजनांमध्ये फेरबदल करू इच्छिणारा राज्य विधान मंडळाचा कोणताही सदस्य याबाबतच्या प्रस्तावाची सूचना अधिवेशन सुरू होण्याच्या दिवसापर्यंत देईल आणि अशा प्रस्तावांवर प्रत्येक सभागृहात चर्चा करण्यासंबंधीची व्यवस्था राज्य शासन करील.

(५) जमाबंदीसंबंधीचे निदेश देण्यापूर्वी राज्य शासन उक्त अंदाजाशी आणि दोन्ही सभागृहांचे ज्यावर एकमत झाले असेल अशा योजनांशी संबंधित असा कोणताही ठराव स्वीकारील आणि संबंधित व्यक्तीकडून येतील अशा कोणत्याही हरकती विचारात घेईल.

**९२.** कलम ९१ च्या तरतुदींना अधीन राहून, राज्य शासनास कोणत्याही जमिनीच्या जमीन महसुलाची जमाबंदी (जिचा यात यापुढे " प्राथमिक जमाबंदी " म्हणून उल्लेख केला आहे) किंवा असा जमिनीची नव्याने जमाबंदी (जिचा यात यापुढे " सुधारित जमाबंदी " म्हणून उल्लेख केला आहे) करण्याबद्दल कोणत्याही वेळी निदेश देता येईल—मग त्या जमिनीचे कलम ७९ अन्वये महसुली भू-मापन करण्यात आलेले असो वा नसो : कोणत्याही जमिनीच्या जमीन महसुलाची प्राथमिक किंवा सुधारित जमाबंदी करण्याबद्दल निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

परंतु, त्या त्या वेळी अमलात असलेल्या जमाबंदीची मुदत संपण्यापूर्वी आकारणीत केलेली कोणतीही वाढ अमलात येणार नाही.

**९३.** जमाबंदी तीस वर्षे अमलात राहील आणि अशी मुदत संपल्यानंतर नव्या जमाबंदीची मुदत सुरू होईपर्यंत ही जमाबंदी अमलात असण्याचे चालू राहील. जमाबंदीची मुदत.

आकारणी कशी निर्धारित करतात.

**९४.** (१) ज्या जमिनीच्या संबंधात कलम ९२ अन्वये जमाबंदी करण्याबद्दल निदेश देण्यात आला आहे. आकारणी आणि ज्या जमिनींना महसूल देण्याबाबत संपूर्णतः सूट देण्यात आलेली नाही अशा सर्व जमिनींवरील जमीन महसुलाची आकारणी, कलम ६८, पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकामध्ये अंतर्भूत असलेल्या मर्यादांना अधीन राहून, ज्या जमिनीची जमाबंदी करावयाची आहे त्या जमिनीचे राज्य शासनाकडून याबाबतीत करण्यात येतील अशा नियमांनुसार गट पाडून आणि प्रत्येक गटासाठी प्रमाण दर ठरवून, निर्धारित करण्यात येईल.

(२) गट बनविताना या पोट-कलमाच्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या गोष्टी सामान्यत : विचारात घेण्यात येतील, परंतु आवश्यक असेल तेव्हा खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या गोष्टीही त्या प्रयोजनासाठी विचारात घेण्यात येतील :—

(क) (एक) जमिनीचा बाह्य आकार ;

(दोन) हवामान व पर्जन्यमान ;

(तीन) किंमती ; आणि

(चार) मुख्य पिकांचे उत्पन्न ;

(ख) (एक) बाजार ;

(दोन) दळणवळण ;

(तीन) मशागतींचा दर्जा ;

(चार) लोकसंख्या व मजुरांचा पुरवठा ;

(पाच) शेतीविषयक उत्पन्नाची साधने ;

(सहा) भोगवट्यात असलेल्या व लागवड केलेल्या जमिनींच्या क्षेत्रफळातील गेल्या तीस वर्षांतील फेरफार ;

(सात) मंजुरी ;

(आठ) जमिनींची लागवड करण्याकरिता वेतनाच्या स्वरूपात आलेला मजुरीचा खर्च धरून मुख्य पिकांच्या लागवडीसाठी येणारा साधारण खर्च.

(३) प्रत्येक भू-मापन क्रमांक व पोट-विभाग यावरील जमीन महसुलाची आकारणी जमाबंदी अधिकारी त्याच्या वर्गीकरणाच्या किंमतीवर विहित केलेल्या रितीने ठरवील.

धारकांच्या खर्चाने केलेल्या सुधारणांमुळे सरासरी उत्पन्नात झालेली वाढ विचारात न घेणे.

**९५.** कोणत्याही जमिनीत, ती धारण करणाराने, किंवा त्याच्या खर्चाने कोणत्याही सुधारणा केलेल्या असतील तर उक्त सुधारणांमुळे अशा जमिनींच्या पिकांच्या सरासरी उत्पन्नातील वाढ जमिनीची फेरआकारणी ठरविताना विचारात घेण्यात येणार नाही.

जमबांदी अधिकाऱ्याने जमाबंदीचे काम कसे सुरू करावे.

**९६.** जमाबंदी करताना, जमाबंदी अधिकारी पुढीलप्रमाणे काम चालवील :—

(१) तो जमाबंदी करावयाच्या जमिनींची कलम ९४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे गटांमध्ये विभागणी करील ;

(२) तो जमाबंदीच्या कारणांसाठी जमिनींच्या पिकांचे सरासरी उत्पन्न विहित केलेल्या रितीने निश्चित करील ;

(३) त्यानंतर तो कलम ९४ पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे संबंधित गोष्टींचा विचार करून, प्रत्येक गटातील जमिनीचा प्रत्येक वर्गासाठी प्रमाण दर ठरवील ;

(४) या सहितेअन्वये केलेल्या नियमांनी विहित केलेल्या रितीने तो या कलमाच्या प्रयोजनांकरिता चौकशी करील.

(५) तो, जमाबंदीबाबतच्या त्याच्या योजना असलेले प्रतिवृत (यात यापुढे ज्याचा " जमाबंदीचे प्रतिवृत असा निर्देश करण्यात आला आहे) विहित केलेल्या रितीने जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करील.

**९७.** (१) जमाबंदी प्रतिवृत्त सादर करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी असे प्रतिवृत्त विहित केलेल्या रितीने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील. जमाबंदी प्रतिवृत्त छापणे व प्रसिद्ध करणे.

(२) प्रत्येक गावात एक नोटीसही मराठी भाषेत करण्यात येईल व अशा नोटिशीत उक्त गावातील जमिनींच्या प्रत्येक वर्गासाठी चालू असलेला प्रमाण दर आणि जमाबंदी अधिकाऱ्याने त्यात सुचविलेली वाढ किंवा घट नमूद करण्यात येईल. तसेच उक्त नोटिशीत, कोणत्याही व्यक्तीस अशा नोटिशीच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत जमाबंदीच्या प्रविवृत्तात दिलेल्या योजनेसंबंधी असलेल्या त्याच्या हरकती जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी सादर करता येतील. असे नमूद करण्यात येईल.

**९८.** जिल्हाधिकाऱ्याकडे ज्या हरकती आल्या असतील त्या विचारात घेतल्यानंतर जिल्हाधिकारी, राज्य शासन निदेश देईल अशा अधिकाऱ्यामार्फत उक्त जमाबंदीने प्रतिवृत्त त्यावरील त्याच्या शेऱ्यासह राज्य शासनाकडे पाठवील. हरकती वगैरेच्या विवरणपत्रासहित व त्यावरील जिल्हाधिकाऱ्यांच्या अभिप्रायासह जमाबंदी प्रतिवृत्त शासनाला सादर करणे.

**९९.** जिल्हाधिकाऱ्याने कलम ९७ अन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रतिवृत्तामुळे व्यथित झालेल्या व्यक्तीस कलम ९७, पोट-कलम (२) अन्वयेच्या नोटिशीच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे निर्देश करण्यासाठी राज्य शासनाकडे अर्ज करता येईल. अशा व्यक्तीने विहित करण्यात येईल अशी खर्चाची रक्कम अनामत ठेवल्यानंतर राज्य शासन महसूल न्यायाधिकरणाकडे चौकशीसाठी प्रतिवृत्त पाठविण्यासंबंधी निदेश देईल. महसूल न्यायाधिकरण विहित केलेल्या रितीने चौकशी केल्यानंतर, उपस्थित केलेल्या हरकतींवर आणि राज्य शासन विचारार्थ पाठवील अशा इतर बाबींवर आपले स्वतःचे मत सादर करील. राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशा प्रकरणांमध्ये सर्व खर्च किंवा त्याचा कोणताही भाग परत करण्यासाठी नियम करता येतील. महसूल न्यायाधिकरण्याकडे निर्देश.

**१००.** (१) जमाबंदीच्या प्रतिवृत्तावर कोणत्याही हरकती आल्या असल्यास, त्या हरकतींसह अशा प्रतिवृत्तावर आणि कलम ९९ अन्वये महसूल न्यायाधिकरणाकडे केलेल्या निर्देशावर न्यायाधिकरणाचे कोणतेही मत असल्यास, त्यावर राज्य शासनाकडून विचार करण्यात येईल. राज्य शासनास अशा प्रतिवृत्तावर त्यास योग्य वाटेल असा आदेस देता येईल : जमाबंदी प्रतिवृत्तावरील आदेश.

परंतु, वाढीव दरांचा परिणाम ज्या गावावर होणार असेल अशा प्रत्येक गावात, कम ९७ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नवीन नोटीस लावल्याशिवाय आणि कोणत्याही हरकती आल्या असल्यास त्यावर राज्य शासनाकडून विचार करण्यात आल्याशिवाय राज्य शासन जमाबंदीच्या प्रतिवृत्तात सुवविलेल्या प्रमाण दरात कोणतीही वाढ करणार नाही. या कलमाच्या तरतुदी शक्य होईल तेथवर अशा वाढीच्या संबंधात देण्यात येतील अशा आदेशास लागू होतील.

(२) जमाबंदीच्या प्रतिवृत्तावर कोणत्याही हरकती आल्या असल्यास, त्या हरकतींसह असे प्रतिवृत्त आणि कलम ९९ अन्वये महसूल न्यायाधिकरणाकडे केलेल्या निर्देशावर न्यायाधिकरणाचे कोणतेही मत असल्यास ते मत आणि राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये दिलेले आदेश विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठवण्यात येतील.

(३) राज्य शासनाने दिलेले आदेश अंतिम असतील आणि कोणत्याही न्यायालयाकडून त्यावर हरकत घेण्यात येणार नाही.

पाण्याच्या फायद्याबद्दल आकारणी-पासून सूट देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**१०१.** (१) राज्य शासनास कलम १०० अन्वये आदेश देतेवेळी, पाण्यापासून होणाऱ्या कोणत्याही फायद्याबद्दल किंवा विनिर्दिष्ट प्रकारच्या फायद्याबद्दल, या प्रकरणाअन्वयेच्या आकारणीपासून कोणत्याही जमिनीस सूट देता येईल.

(२) राज्य शासनास, संबंधित गावामध्ये मराठी भाषेत नोटीस प्रसिद्ध केल्यानंतर, आमि अशी नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत संपल्यानंतर, जमावबंदीच्या मुदतीत कोणत्याही वेळी पोट-कलम (१) अन्वये त्याने मंजूर केलेली कोणतीही सूट काढून घेता येईल आणि अशा जमिनीवर अशा फायद्याबद्दल आकारणी बसविली पाहिजे असा निदेश देता येईल.

जमाबंदीची सुरुवात.

**१०२** (१) राज्य शासनाने कलम १०० अन्वये आदेश दिल्यानंतर आणि त्याबद्दलची नोटीस विहित केलेल्या रितीने दिल्यानंतर, जमाबंदीचे काम सुरू करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि अशा जमाबंदीनुसार असलेली जमीन महसूल राज्य शासन निदेश देईल त्या दिनांकापासून बसविण्यात येईल :

परंतु, या कलमान्वये ज्यावर्षी प्राथमिक जमाबंदी किंवा सुधारित जमाबंदी सुरू करण्यात येईल त्यावेळी ज्या जमिनीवरील नवीन आकारणी ही पूर्वीच्या आकारणीपेक्षा अधिक असेल असा सर्व जमिनींवरील जुन्या व नवीन आकारणीत जो फरक असेल त्याची सूट देण्यात येईल आणि फेरतपासणी केलेली आकारणी ही लगतपुढील वर्षापासून बसविण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, ज्यावर्षी कोणतीही प्राथमिक किंवा सुधारित जमाबंदी सुरू केली असेल अशा वर्षाच्या लगतपुढील वर्षी जो भोगवटदार त्याने धारण केलेल्या भू-मापन क्रमांकापैकी कोणत्याही भू-मापन क्रमांकावर किंवा त्याच्या पोट-विभागावर अशा नवीन आकारणीमुळे दरात झालेल्या वाढीमुळे असंतुष्ट असेल अशा भोगवटदारास त्याने कलम ५५ मध्ये तरतूद केलेल्या रितीने असा क्रमांक किंवा पोट-विभाग सोडून दिल्यावर, असा रितीने बसविलेल्या दरातील वाढीपासून सूट मिळेल.

महसूलमुक्त जमीन धारण करण्या-संबंधीच्या हक्क मागण्या.

**१०३.** (१) जी कोणतीही व्यक्ती, सर्वस्वी किंवा अंशतः जमीन महसूल माफ असलेली जमीन धारण करण्यासंबंधात राज्य शासनाविरूद्ध हक्क सांगत असेल ती आपला हक्क दमाबंदी अधिकाऱ्याचे समाधान होईल असा रितीने शाबित करील.

(२) ती व्यक्ती तशाप्रकारे आपला हक्क सिद्ध करील तर राज्य शासनाच्या आदेशाकरिता ते प्रकरण पाठविण्यात येईल.

जमीन महसूल देण्यापासून संपूर्णतः सूट दिलेल्या जमिनीवरील आकारणी.

**१०४.** (१) या प्रकरणातील कोणत्याही मजकुरामुळे जमाबंदी अधिकाऱ्यास जमीन महसुलापासून संपूर्णतः सूट असलेल्या जमिनीवर योग्य व पूर्ण आकारणी ठरविण्यास आणि त्याची नोंद करण्यास प्रतिबंध होतो असे मानण्यात येणार नाही.

(२) असा रितीने ठरविलेली व नोंद केलेली आकारणी, सूट काढून घेण्यात आल्यानंतर लगेच, आकारणीयोग्य होईल आणि या प्रयोजनाकरिता या प्रकरणाच्या तरतुदींनुसार ती निश्चित करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

**१०५.** (१) या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, कलम १०० अन्वये आदेश देतेवेळी ज्या जमिनीच्या बाबतीत या प्रकरणान्वये जमाबंदी करण्यात आली आहे अशी कोणतीही जमीन, राज्य शासनाने कलम ९२ अन्वये जमाबंदी करण्याचा निदेश दिल्यानंतर, पाटबंधाऱ्याच्या कामामुळे किंवा विद्यमान पाटबंधाऱ्याच्या कामातील सुधारणेमुळे व असे काम जमीन धारण करणाऱ्याने किंवा त्याच्या खर्चाने झाले नसेल तेव्हा, मिळणाऱ्या पाण्यापासून होणाऱ्या अधिक फायद्याबद्दल जमाबंदीच्या मुदतीत जादा जमीन महसुलीची आकारणी बसविली जाण्यास पात्र असेल असा निर्देश देता येईल. मात्र असा जमीन महसूल, जेव्हा अशा जादा फायद्याबद्दल राज्याच्या कोणत्याही भागात पाटबंधाऱ्यासंबंधात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये कोणताही दर बसविण्यात आला नसेल तेव्हाच बसविण्यात येईलः पाण्याच्या फायद्याबद्दल आकारणी बसविण्याबाबत निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

परंतु, राज्य शासन असे निर्देश देण्यापूर्वी संबंधित गावामध्ये याबाबतची एक नोटीस मराठी भाषेत प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत संपल्याशिवाय असा कोणताही निदेश देण्यात येणार नाही.

**१०६.** जिल्हाधिकाऱ्यास, दमाबंदीच्या मुदतीत कोणत्याही वेळी जमीनधारकास नोटीस देऊन त्याच्या धारण जमिनीचे क्षेत्रफळ किंवा तीवरील आकारणी यात, भू-मापनातील किंवा आकडेमोडीतील चुकींमुळे झालेली कोणतीही चूक दुरुस्त करता येईलः चुका दुरुस्त करण्याचा जिल्हा अधिकाऱ्याचा अधिकार.

परंतु, अशी दुरुस्ती करण्यात आल्यामुळे जमीन महसुलीची कोणतीही थकबाकी देण्याजोगी होणार नाही, परंतु जमीन महसुल म्हणून ज्यादा रक्कम दिली गेली असल्यास ती पुढे देय होईल असा जमीन महसुलाच्या रकमेशी समायोजित करण्यात येईल.

**१०७.** यापूर्वी करण्यात आलेल्या व या संहितेच्या प्रारंभाच्या दिनांकपासून अंमलात असलेल्या जमीन महसुलासंबंधीच्या सर्व जमाबंधी या प्रकरणाच्या तरतुदींस अनुसरून करण्यात आल्या आहेत व सुरू करण्यात आल्या आहेत असे मानण्यात येईल; आणि या संहितेच्या तरतुदीनुसार जमाबंदी सुरू करण्यात येईतोपर्यंत त्या अंमलात असल्याचे चालू राहील. या संहितेपूर्वी केलेली जमाबंदी ही या प्रकरणान्वये करावयाची असल्याचे मानणे.

## प्रकरण सात

### अकृषित प्रयोजनांकरिता वापरलेल्या जमिनींच्या जमीन महसुलीची आकारणी व जमाबंदी

**१०८.** संदर्भावरून अन्य अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या प्रकरणात कोणत्याही जमिनीच्या संबंधात "संपूर्ण बाजार मूल्य" या शब्दप्रयोगाचा अर्थ, उक्त जमिनीचे बाजार मूल्य अधिक त्या वेळी अंमलात असलेली भांडवलीकृत आकारणी दर्शवणारी रक्कम असा समजावा. [१][भांडवलीकृत आकारणीची रक्कम ही विहित करण्यात येईल असा रितीने निर्धारित करण्यात येईल]. अर्थ उकल.

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ३ अन्वये हा मजकूर जादा दाकळ करण्यात आला.

जमिनींचा अकृषिक उपयोग आणि नागरी व बिगर-नागरी क्षेत्र विचारात घेऊन जमिनीवरील अकृषिक आकारणी निर्धारित करणे.

**१०९.** कलम ६८ च्या पहिल्या परंतुकात असलेल्या कोणत्याही सुटीस आणि कोणत्याही मर्यादेस अधीन राहून, जमिनीची अकृषिक आकारणी, अकृषिक प्रयोजनांसाठी होत असलेला जमिनीचा उपयोग आणि ज्या क्षेत्रात जमिनी असतील ती नागरी आणि बिगर-नागरी क्षेत्रे विचारात घेऊन निर्धारित करण्यात येईल आणि ती या प्रकरणाच्या तरतुदींनुसार निर्धारित करण्यात व बसविण्यात येईल.

बिगर नागरी क्षेत्रातील कृषीतर जमिनींची अकृषिक आकारणी निर्धारित करताना अनुसरावयाची कार्यपद्धती.

**११०.** (१) आयुक्ताच्या मान्यतेस अधीन राहून व **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जिल्हाधिकारी, बिगर-नागरी क्षेत्रातील गावांची वर्ग एक आणि वर्ग दोन अशा दोन वर्गात विभागणी करील. व जमिनी जेथे असतील ती जागा, ज्या अकृषिक प्रयोजनासाठी तिचा उपयोग करण्यात येत असेल ती प्रयोजने, त्यामुळे मिळणारे फायदे व तोटे या गोष्टी विचारात घेऊन करण्यात आलेल्या जमिनींच्या बाजारमूल्यावर उक्त विभागणी आधारित असेल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ११० ची सुधारणा

[१][(१क) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कलम २ च्या खंड ४२ अन्वये " नागरी क्षेत्र " म्हणून अधिसूचित करण्यात आलेले गावाचे किंवा गावांच्या गटाचे कोणतेही क्षेत्र महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २००३ अंमलात येण्याच्या दिनांकास असे नागरीक्षेत्र असल्याचे बंद होईल आणि उक्त दिनांकापासून, ते या संहितेअन्वये करावयाच्या अशा गावाच्या अकृषिक आकारणीच्या प्रयोजनांसाठी वर्ग एकचे गाव असल्याचे मानले जाईल :

परंतु, पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबीमुळे करपात्र व्यक्तीच्या ज्याची आकारणी आणि उपार्जन उक्त दिनांपूर्वी निर्दारित करण्यात आले असले अशा, अधिसूचित नागरी क्षेत्राच्या संबंधातील कोणताही कर भरण्याच्या दायित्वास बाध येणार नाही :

परंतु, आणखी असे की, पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही असा अधिसूचित नागरी क्षेत्राच्या संबंधात उक्त दिनांकापूर्वी बसवलेला आणि भरणा केलेला कोणताही कर परत केला जाणार नाही.]

(२) राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून जिल्हाधिकारी, अकृषिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनीचे बाजारमूल्य लक्षात घेऊन, वर्ग एक खाली येणाऱ्या जमिनीवर ज्या अकृषिक कारणासाठी त्याचा उपयोग करण्यात येत असेल त्यानुसार, दरवर्षी दर चौरस मीटरला दोन पैशांहून अधिक नसेल इतक्या दराने व वर्ग दोन खाली येणाऱ्या जमिनीवर, दरवर्षी दर चौरस मीटरला एक पैशांहून अधिक नसेल इतक्या दराने आकारणी करील. तथापि, अशा रीतीने निश्चित केलेली आकारणी, अशा जमिनींवर लादता येण्याजोग्या कृषिक आकारणीपेक्षा कमी असणार नाही.

नागरी क्षेत्रातील अकृषिक आकारणी निर्धारित करताना अनुसरावयाची कार्यपद्धती.

**१११.** जमिनी जेथे असतील त्या जागा, ज्या अकृषिक प्रयोजनांसाठी जमिनींचा वापर करण्यात येत असेल ती प्रयोजने, आणि त्यामुळे होणारे फायदे व तोटे योग्यप्रकारे विचारात घेऊन, जिल्हाधिकारी जमिनींच्या बाजारमूल्याच्या आधारे नागरी क्षेत्रांची गटांमध्ये विभागणी करील.

अकृषिक आकारणी ही संपूर्ण बाजार मूल्याच्या तीन टक्क्यांपेक्षा अधिक नसावी.

**११२.** नागरी क्षेत्रातील प्रत्येक गटातील जमीन जेव्हा इमारतीची जागा म्हणून वापरण्यात येईल तेव्हा तिच्यावरील अकृषिक आकारणी तिच्या संपूर्ण बाजारमूल्याच्या तीन तीन टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

---

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३ अन्वये व पोट-कलम १ (क) दाखल करण्यात आला.

**११३.** (१) कलम ११२ च्या तरतुदींना अधीन राहून [१][राज्य शासन किंवा राज्य शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तसे प्राधिकृत करण्यात आल्यास, जिल्हाधिकारी] नागरी क्षेत्रातील प्रत्येक गटातील जमिनीच्या दर चौरस मीटर जमिनीवर, अशा जमिनींच्या संपूर्ण बाजारमूल्याच्या विहित करण्यात येईल. अशा टक्केवारीत अकृषिक आकारणीचा दर ( " अकृषिक आकारणीचा प्रमाण दर " म्हणून संबोधावयाचा) निश्चित करील. अकृषिक आकारणीचा प्रमाण दर ठरविण्याचा जिल्हा अधिकाऱ्याचा अधिकार.

१९५८ चा मुंबई ६०. [२][**स्पष्टीकरण**.— या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी ज्या वर्षामध्ये अकृषिक आकारणीचा प्रमाण दर निश्चित करावयाचा असेल त्या वर्षाच्या निकटपूर्वीच्या वर्षात मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ खाली तयार केलेल्या मुंबई मुद्रांक (मालमत्तेचे बाजारमूल्य ठरविणे) नियम, १९९५ अन्वये मुख्य महसूल नियंत्रण प्राधिकाऱ्याने निर्धारित केलेल्या व दरांच्या वार्षिक विवरणपत्राच्या स्वरूपात काढलेल्या जमिनीच्या दरांच्या आधारे, विहित करण्यात आलेल्या रीतीने, संपूर्ण बाजारमूल्याचा अंदाज करण्यात येईल.]

[३][(२) अकृषिक आकारणीचा प्रभाग [४][पाच वर्षांच्या] कालावधीसाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " हमीचा कालावधी " असा करण्यात आला आहे) अंमलात राहील आणि त्यानंतर त्यात या प्रकरणाच्या तरतुदींनुसार सुधारणा केली जाऊ शकेल :

[५][(परंतु, हमीच्या असा पहिल्या कालावधीची मुदत १ ऑगस्ट १९७९ पासून सुरू होईल आणि ती ३१ जुलै १९९१ रोजी समाप्त होईलः]

[६][(परंतु, आणखी असे की, राज्य शासनास, कोणत्याही नागरी क्षेत्रातील सर्व किंवा कोणत्याही गटाकरिता असा हमीचा कालावधी वाढविता येईल. तथापि, असा वाढविलेला कालावधी पाच वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.]

(२क) कोणत्याही नागरी क्षेत्रातील कोणत्याही गटातील अकृषिक आकारणीचा प्रमाण दर, १ ऑगस्ट १९७९ पूर्वी निश्चित करण्यात किंवा सुधारण्यात आला असेल त्याबाबतीत, असा प्रमाण दर [७][१ ऑगस्ट १९७९ रोजी व त्यानंतर कोणत्याही वेळी त्यात सुधारणा केली जाण्यास पात्र झाला असल्याचे मानण्यात येईल आणि प्रमाण दरामध्ये अशाप्रकारे सुधारणा करण्यात आली असेल तर असा प्रमाण दर १ ऑगस्ट १९७९ रोजी म्हणजे, हमीचा पहिला कालावधी सुरू झाला त्यादिवशी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल आणि तो ३१ जुलै १९९१ पर्यंत अंमलात राहील आणि त्यानंतर वेळोवेळी पोट-कलम (२ख) अन्वये त्या आणखी सुधारणा केली जाण्याच्या अधीन असेल.]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ३(१) (क) अन्वये "जिल्हाधिकारी राज्य शासनाची मान्यता घेऊन" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (१) (ख) अन्वये मूळ स्पष्टीकरणाऐवजी हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

[३] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ३ (ब) अन्वये मूळ पोट-कलम (२) ऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

[४] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम २५(१) (अ) अन्वये "दहा वर्षांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला व तो १ ऑगस्ट १९९१ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २५ (१) (ब) अन्वये हे परंतुक मूळ परंतुका ऐवजी दाखल करण्यात आले आणि ते ३१ मार्च १९७९ रोजी दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ३ (२) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २५ (२) अन्वये "त्या तारखेस" या मजकुराने सुरू होणारा व "मानण्यात येईल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला आणि तो ३१ मार्च १९७९ रोजी दाखल करण्यात आला असल्याचे मानम्यात येईल.

(२ख) अकृषिक आकारणीचा प्रमाण दर, हमीच्या कोणत्याही कालावधीसाठी निश्चित करण्यात किंवा त्यात सुधारणा करण्यात आली असेल त्याबाबतीत, हमीचा पुढील कालावधी सुरू झाल्यानंतर शक्य तेवढ्या लवकर त्या दरात सुधारणा करण्यात येईल आणि असा सुधारित दर हमीच्या पुढील कालावधीच्या सुरूवातीपासून अंमलात आल्याचे मानण्यात येईल.]

[१][(२ग) चा पोट-कलम (१) किंवा त्याखाली केलेले नियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, १ ऑगस्ट २००१ रोजी प्रारंभ होणाऱ्या पाच वर्षांच्या हमीच्या कालावधीकरिता अकृषिक आकारणीचे दर,–

(क) अकृषिक प्रयोजनांसाठी यापूर्वीच ज्याकरिता आकारणी निर्धारित केली आहे असा प्रकरणांसाठी, महानगरपालिका क्षेत्रामध्ये १९९१ च्या अकृषिक आकारणी दराच्या तिपटीपेक्षा आणि राज्याच्या उर्वरित क्षेत्रात अशा दराच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाहीत ; आणि

(ख) अकृषिक प्रयोजनांसाठी ज्यांची आकारणी निर्धारित करावयाची आहे, असा प्रकरणांसाठी, महानगरपालिका क्षेत्रामध्ये १९९१ अकृषिक आकारणी दराच्या सहा पटीपेक्षा आणि राज्याच्या उर्वरित क्षेत्रात अशा दराच्या चौपटीपेक्षा अधिक असणार नाहीत.]

---

[१] वरील अधिनिमाच्या कलम २५ (२) "त्या तारखेच" या मजकुराने सुरू होणारा व "मानवण्यात येईला" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल केला आणि तो ३१ मार्च १०७९ रोजी दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम २ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

(३) वर निर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे निश्चित करण्यात किंवा फेरफार करण्यात आलेले अकृषिक आकारणीचे प्रमाण दर अमलात आणण्यापूर्वी **राजपत्रात** आणि विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने प्रसिद्ध करण्यात येतील.

**११४.** (१) या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून, नागरी क्षेत्रातील जमिनींच्या बाबतीतील आकारणीचा दर पुढीलप्रमाणे असेल— अकृषिक प्रयोजनांसाठी उपयोगात आणलेल्या जमिनीवरील आकारणीचा दर.

(क) निवासी इमारतीच्या प्रयोजनांसाठी वापरण्यात आलेल्या जमिनीवरील आकारणीचा दर अकृषिक आकारणीच्या प्रमाण दराइतका असेल ;

(ख) औद्योगिक प्रयोजनांसाठी वापरण्यात आलेल्या जमिनीवरील आकारणीचा दर अकृषिक आकारणीच्या प्रमाण दराच्या दीडपटइतका असेल ;

[१][(ग) वाणिज्यिक प्रयोजनासाठी वापरण्यात येत असलेल्या जमिनीवरील आकारणीच दर मुंबई महानगरपालिक क्षेत्रातील मुंबई शहर जिल्हा क्षेत्र वगळून अन्य सर्व महानगरपालिका हद्दींमधील क्षेत्रामध्ये, अकृषिक आकारणीच्या प्रमाण दराच्या तिप्पट असेल आणि राज्याच्या उर्वरित नागरी क्षेत्रात, अकृषिक आकारणीच्या प्रमाण दराच्या दुप्पट असेल ;]

[२][**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनासाठी, ''अन्य महानगरपालिका''आणि ''मुंबई महानगरपालिका'' यांना, कलम ४७-क च्या स्पष्टीकरणात त्यांना नेमून देण्यात आलेले अर्थ असतील ;]

(घ) इतर कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी वापरण्यात आलेल्या जमिनीवरील आकारणीचा दर जिल्हाधिकारी ठरवील व तो अकृषिक आकारणीच्या प्रमाण दरापेक्षा कमी नसेल आणि उक्त प्रमाण दराच्या दीडपटींपेक्षा अधिक नसेल ; मात्र असा दर ठरविताना जमीन जेथे असेल ती जागा व अशा जमिनीशी संलग्न असलेले विशेष स्वरूपाचा फायदे व गैरफायदे विचारात घेण्यात येतील.

(२) कोणतीही जमीन कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी म्हणून सहा महिने किंवा त्याहून कमी असलेल्या काळासाठी वापरण्यात येत असेल त्याबाबतीत, अकृषिक आकारणी उक्त अकृषिक प्रयोजनासाठी वापरण्यात आलेल्या जमिनीसाठी जी आकारणी निश्चित करण्यात आली असेल त्या आकारणीच्या निम्मी असेल.

(३) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्यास गटातील कोणत्याही जमिनीच्या संबंधात, पोट-कलम (१) अन्वये निश्चित केलेल्या दराच्या पंचाहत्तर टक्क्यांपेक्षा अधिक नसेल अशा दराने, उक्त जमिनीसाठीची अकृषिक आकाराणी निश्चित करण्याचा अधिकार आहे ; मात्र अशा रीतीने आकारणी निश्चित करताना जेथे जमीन असेल ती जागा व अशा जमिनीशी संलग्न असलेले फायदे व गैरफायदे विचारात घेण्यात येतील.

**११५.** [३][सहकारी गृहनिर्माण संस्था व या राज्यात त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याअन्वये स्थापन केलेली गृहनिर्माण मंडळे यांच्या बाबतीत राज्य शासनाकडून अन्यथा निदेश देण्यात येईल त्याव्यतिरिक्त कोणत्याही जमिनीचा ज्या दिनांकापासून अकृषिक प्रयोजनासाठी] म्हणून प्रत्यक्ष वापर करण्यात येईल त्या दिनांकापासून अकृषिक आकारणी लादण्यात येईल. अकृषिक आकारणीच्या प्रारंभाचा दिनांक

---

१. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ४ अन्वये मूळ खंड (क) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ख) अन्वये मूळ स्पष्टीकरणाऐवजी हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

३. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ कलम ४ द्वारे " ज्या तारखेपासून कोणत्याही जमिनीचा अकृषिक करण्यासाठी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अकृषिक आकारणी देण्यापासून सूट मिळालेल्या जमिनी.

**११७.** पुढील प्रयोजनांसाठी वापरण्यात आलेल्या जमिनीस अकृषिक आकारणी देण्यापासून सूट देण्यात येईल, ती प्रयोजने अशी :—

(१) हातमागासाठी छपऱ्या उभारणे, कुक्कुटपालन व्यवसाय किंवा बागबगीचा तयार करणे यासारख्या शेतीस दुय्यम किंवा सहायक असलेल्या व्यवसायासाठी किंवा राज्य शासन त्यासंबंधात केलेल्या नियमात निर्दिष्ट करील अशा इतर व्यवसायांसाठी शेतकऱ्याकडून वापरण्यात येणाऱ्या जमिनी ;

(२) मृतांची व्यवस्था लावण्याशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनी ;

(३) सार्वजिक पूजेअर्चेसाठीच केवळ भोगवट्यात असलेल्या आणि वापरात येत असलेल्या आणि या संहितेच्या प्रारंभीपूर्वी रूढीने, मंजुरीने किंवा इतर कारणांमुळे जमीन महसूल देण्यापासून सूट असलेल्या जमिनी ;

(४) ज्या शैक्षणिक किंवा धर्मादाय प्रयोजनाचा लाभ धर्म, वंश, जात, जन्मस्थान किंवा यापैकी कोणत्याही गोष्टींचा आधार न घेता सर्व नागरिकांस मिळत असेल अशा, शैक्षणिक किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनी ;

(५) राज्य शासन या संहितेअन्वये केलेल्या नियमांन्वये त्यात निर्दिष्ट करण्यात आले असेल अशा मुदतीसाठी व अशा शर्तींना अधीन राहून, ज्या कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनींना जमीन महसुलापासून सूट देईल अशा इतर कोणत्याही सर्वजनिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनी ;

[१][(५क) कलम ४२ च्या पोट-कलम २ अन्वये नगरेतर क्षेत्रातील वैयक्तिक खऱ्याखुऱ्या निवासी प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या सेवाजमिनी]

(६) निवासी इमारतीच्या प्रयोजनांसाठी म्हणून नागरीतर क्षेत्रातील (गावठाण असल्यास त्याबाहेरील) ज्या शेतजमिनीचे अकृषक वापरात परिवर्तन करण्यात आले असेल. अशा राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट करील अशा शेतजमिनी ;

सूट रद्द करणे.

**११८.** कलम ११७ च्या तरतुदींअन्वये ज्या जमिनीस अकृषिक आकारणी देण्यापासून सूट देण्यात आली असेल त्या जमिनीस अशा रीतीने देण्यात आलेली सूट ज्या प्रयोजनासाठी तिला सूट देण्यात आली असेल ते प्रयोजन खेरीजकरून इतर कोणत्याही प्रयोजनासाठी तिचा वापर करण्यात येत असेल तर चालू असण्याचे बंद होईल असा राज्य शासनाने निदेश देणे कायदेशीर असेल ; आणि त्यानंतर उक्त जमीन या प्रकरणाच्या तरतुदींनुसार आकारणी देण्यास व त्याखेरीज, जिल्हाधिकारी राज्य शासनाच्या सामान्य आदेशांना अधीन राहून निदेश देईल असा दंड दिला जाण्यास पात्र ठरेल.

जमीन महसून देण्यापासून संपूर्ण सूट मिळालेल्या जमिनींची अकृषिक आकारणी.

**११९.** या प्रकरणातील कोणत्याही मजकुरामुळे जिल्हाधिकाऱ्यास अशी आकारणी देण्यापासून संपूर्ण सूट असलेल्या जमिनीवर योग्यरीतीने पूर्ण अकृषिक आकारणी निश्चित करण्यास व तिची नोंदणी करण्यास प्रतिबंध होतो असे मानण्यात येणार नाही.

संहितेच्या प्रारंभापूर्वी निश्चित केलेली अकृषिक आकारणी तिच्यात फेरफार करण्यात येईपर्यंत अंमलात राहील.

**१२०.** या संहितेच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी जमिनीवर निश्चित करण्यात आलेली आणि राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेली अकृषिक आकारणी, या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये निश्चित करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. आणि या प्रकणात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या मुदतीसाठी उक्त आकारणी निश्चित करण्यात आली असेल त्या संपूर्ण मुदतीसाठी आणि त्यानंतर या प्रकरणाच्या तरतुदींन्वये अशा आकारणी सुधारण्यात येईपर्यंत, ती अंमलात असण्याचे चालू राहील असे मानण्यात येईल.

---

[१] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, याच्या कलम ४ अन्वये (क) हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

## प्रकरण आठ

## गावांच्या, नगरांच्या आणि शहरांच्या जागांतील जमिनी

**१२१.** या प्रकरणाच्या तरतुदी गावांच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेत असलेल्या सर्व जमिनीस लागू होतील. प्रकरण लागू असणे.

**१२२.** राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशांन्वये काम करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याने किंवा भू-मापन अधिकाऱ्याने, जमीनधारकांचे सर्व विद्यमान हक्क विचारात घेऊन, कोणत्याही गावांच्या नगराच्या किंवा शहराच्या जागेत कोणत्या जमिनी समाविष्ट आहेत याबद्दल खात्री करून घेणे व त्या निश्चित करणे आणि वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या जागेच्या हद्दी ठरविणे व वेळोवेळी त्यात फेरफार करणे हे कायदेशीर असेल. गावांच्या नगरांच्या आणि शहरांच्या जागांच्या हद्दी कशा निश्चित कराव्या.

**१२३.** गावांच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेत असलेल्या आणि शेतीच्या प्रयोजनांसाठी वापरण्यात न येणाऱ्या, जमिनींवर पुढील बाबतीत जमीन महसूल आकारण्यात येणार नाही :— विवक्षित बाबतीत गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेतील जमिनीवर कोणताही जमीन महसूल न आकारणे.

(क) या संहितेच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी ज्या जमिनींना अशा प्रारंभापूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये आकारणी देण्यापासून सूट देण्यात आली असेल. किंवा ज्यांना कोणतीही रुढी, मंजुरी, सनद, आदेश किंवा करार यामुळे सूट देण्यात आली असेल अशा जमिनी ;

(ख) नागरीतर क्षेत्रं असतील अशा गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागांत असलेल्या निवासी इमारतींच्या जागा.

**१२४.** (१) निकटपूर्वीच्या कलमान्वये सूट मिळण्याबाबतच्या मागण्यांवर संक्षिप्तरीत्या चौकशी केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून निर्णय घेण्यात येईल आणि त्याचा निर्णय पोट-कलम (२) ला अधीन राहून, अंतिम असेल. जिल्हाधिकाऱ्याने सूट मिळण्यासंबंधीचा अधिकार निर्धारित करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वयेच्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला अशा आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या मुदतीत उक्त आदेशाच्या विधिग्राह्यतेसंबंधातील हरकतीसाठी दिवाणी दावा दाखल करता येईल.

**१२५.** एक-चतुर्थांश एकरापेक्षा अधिक नसेल अशी पार्डी जमीन, आणि शेतीच्या प्रयोजनासाठी किंवा शेतीस दुय्यम किंवा सहायक असलेल्या प्रयोजनासाठीच केवळ वापरण्यात येणारी वाडा जमीन यांस जमीन महसूल देण्यापासून सूट देण्यात येईल : पार्डी वा वाडा जमिनीस जमीन महसूल देण्यापासून सूट असणे.

परंतु, पार्डी जमिनीच्या बाबतीत, ती धारण करण्यात शेतीच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी म्हणून जमिनीच्या वापरात बदल केल्याबद्दल, यथास्थिति कलमे ४४, ४५ व ६७ अन्वये अकृषिक आकारणी आणि यथास्थिति, दंड देण्यास पात्र ठरेल.

**१२६.** कोणत्याही गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेतील ज्या जमिनींचा केवळ शेतीच्या प्रयोजनांसाठी सामान्यतः वापर करण्यात येत असेल अशा जमिनीखेरीज इतर जमिनीचे कलम ७९ च्या तरतुदींन्वये भू-मापन करण्याविषयी किंवा कलम ८३ च्या तरतुदींअन्वये त्यांचे नव्याने भू-मापन करण्याविषयी निदेश देणे इष्ट आहे असे राज्य शासनास कोणत्याही वेळी वाटल्यास असे भू-मापनाचे काम करण्यात येईल आणि त्या सर्व कामकाजाचे नियमन या संहितेची प्रकरणे पाच आणि नऊ यांच्या तरतुदींनुसार करण्यात येईल : गावाच्या जागांतील जमिनीचे भू-मापन कसे करावे.

परंतु, उक्त प्रकरणांची कलमे ८०, ८१ किंवा १३३ यांमधील कोणताही मजकूर दोन हजारांहून अधिक लोकसंख्या असेल अशा कोणत्याही नगरातील किंवा शहरातील अशा कोणत्याही भू-मापनास लागू असणार नाही.

विवक्षित बाबतीत भू-मापन फी आकारणे.

**१२७.** (१) दोन हजारांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या कोणत्याही गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेस कलम १२६ च्या तरतुदींन्वये भू-मापन लागू करण्यात येईल त्याबाबतीत, इमारतीची जागा धारण करणारी प्रत्येक व्यक्ती उक्त जागेचे क्षेत्र व पट्टीयोग्य मूल्य यावरून त्या जागेवर आकारणी करण्यात आलेली भू-मापन फी देण्यास पात्र ठरेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये द्यावयाच्या भू-मापनाच्या फी च्या रकमेचे या बाबतीत राज्य शासन करील अशा नियमांनुसार जिल्हाधिकाऱ्यांकडून नियम करण्यात येईल.

(३) गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेच्या किंवा त्याच्या एखाद्या भागाच्या (ज्याचा निर्देश नोटीशीत असेल) भू-मापनाचे काम पूर्ण झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याने याबाबतीत द्यावयाच्या जाहीर नोटिशीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत उक्त भूमापन फी द्यावी लागेल.

गावातील जागांचे नकाशे.

**१२८.** (१) कलम १२६ अन्वये चालविलेल्या कामांचे निष्कर्ष, राज्य शासन विहित करील अशा नकाशात व नोंदवहीत राज्य शासन विहित करील अशा रीतीने नमूद करण्यात येतील.

(२) जर कोणतीही ग्रामपंचायत, धारकांच्या भोगवट्यात असलेले तुकडे दर्शविणारा गावातील एखाद्या जागेचा नकाशा तयार करण्यात यावा आणि असे नकाशे तयार करण्यासाठी लागण्यास खर्च विहित करण्यात येईल अशा प्रमाणात देण्याची तिची तयारी आहे असा ठराव संमत करील तर राज्य शासनास असे नकाशे तयार करण्याचे काम हाती घेता येईल.

कोणत्याही अधिक आकाराशिवाय सनद देणे.

**१२९.** वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे एखाद्या इमारतीची जागा धारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस आणि नव्याने तयार करण्यात आलेली किंवा प्रथमतः अशाप्रकारे उपयोगात आणली जाणारी इमारतीची जागा धारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस कलम १२६ अन्वये करण्यात येणारे भू-मापन पूर्ण झाल्यावर, त्यासाठी तरतूद करण्यात आलेली भू-मापन फी, धारण करणाऱ्या व्यक्तीने देणे आवश्यक असेल त्याबाबतीत अनुसूची 'ग' मधील किंवा तशाच प्रकारच्या नमुन्यात आणि त्याने धारण केलेल्या जमिनीचा विस्तार व स्थिती, नकाशाने व वर्णनाने निर्दिष्ट करणारी एक किंवा अधिक सनदा जिल्हाधिकाऱ्याकडून कोणत्याही अधिक आकाराशिवाय मिळण्याचा हक्क असेल, आणि करणाऱ्या व्यक्तीने कोणतीही भू-मापन फी देणे आवश्यक नसेल त्याबाबतीत, त्यास प्रत्येक सनदीदाखल एक रुपया फी दिल्यानंतर अशी सनद किंवा सनदा मिळण्याचा हक्क असेल. अशी प्रत्येक सनद राज्यपालाच्या वतीने, तो निर्दिष्ट किंवा प्राधिकृत करील अशा व्यक्तीकडून करून देण्यात येईल :

परंतु, जर अशा धारण करणाऱ्या व्यक्तीने भू-मापन फी देण्याचे वेळी किंवा त्यानंतर कलम १२७ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने काढलेल्या सार्वजनिक नोटिशीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत, अशी सनद किंवा सनदा मिळण्यासाठी अर्ज केला नाही तर, तिला प्रत्येक सनदेसाठी एक रुपयापेक्षा अधिक नसेल एवढी फी देण्याबद्दल जिल्हाधिकारी फर्मावू शकेल.

धारण जमिनीतील फेरफारानंतर सनद देणे

**१३०.** कलम १२६ अन्वये भू-मापन करण्यात आल्यावर व कलम १२९ अन्वये सनदा देण्यात आल्यावर, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे इमारतीच्या जागा धारण करणाऱ्या ज्या व्यक्तीने धारण केलेल्या जमिनीत वाढ करून, ती कमी करून, तिचे पोट-विभाग पाडून, तिच्या भू-सत्ता प्रकरांत फेरफार करून किंवा अन्यथा फेरफार करण्यात आला असेल त्या व्यक्तीस, आयुक्ताच्या मंजुरीने जिल्हाधिकाऱ्याने प्रत्येक गाव, शहर किंवा नगर यांसाठी केलेल्या विनियमांनुसार ठरवून दिलेली दुरुस्ती फी दिल्यानंतर, अनुसूची 'ग' मधील किंवा तशाच प्रकारच्या नमुन्यातील आणि त्याने धारण केलेल्या व फेरफार करण्यात आलेल्या जमिनीचा विस्तार व स्थिती नकाशाने व वर्णनाने निर्दिष्ट करणारी एक नवीन सनद जिल्हाधिकाऱ्याकडून मिळण्याचा किंवा, यथास्थिति, त्यास कलम १२९ अन्वये आधीच देण्यात आलेली सनद जिल्हाधिकाऱ्याकडून सुधारित करून मिळण्याचा हक्क असेल.

**१३१.** जर एखादा धारक त्याला देण्यात आलेली सनद चुकून हरवली आहे किंवा नष्ट झाली आहे असे जिल्हाधिकाऱ्यास कळवील तर कलम १२९ अन्वये त्यास देण्यात आलेल्या सनदेची एक प्रत, विहित करण्यात येईल असा आकार किंवा फी, असल्यास, तशी फी दिल्यानंतर त्यास देण्यात येईल.

*सनदेची दुसरी प्रत देता येईल.*

प्रकरण नऊ

## सीमा व सिमाचिन्हे

**१३२.** राज्यातील सर्व गावांच्या आणि त्यातील गावांमधील सर्व भू-मापन क्रमांकाच्या सीमा निश्चित करण्यात येतील आणि त्या सीमाचिन्हाद्वारे आखण्यात येतील :

*सीमा निश्चित करणे व त्या आखणे*

परंतु, नागपूर, चांदा, वर्धा आणि भंडारा या जिल्ह्यांतील आणि अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तालुक्यातील गावांमध्ये, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निदेश देईल अशा दिनांकापासून भू-मापन क्रमांकांच्या सीमा निश्चित करण्यात येतील आणि त्या सीमाचिन्हाद्वारे आखण्यात येतील.

**१३३.** भू-मापन अधिकारी किंवा राज्य शासनाकडून त्या प्रयोजनांसाठी नेमले जातील असे इतर अधिकारी गावांच्या सीमा निश्चित करतील व रीतसर चौकशी करून त्यासंबंधातील सर्व वादांचा निर्णय करतील. अशा चौकशीच्या वेळी ग्राम अधिकाऱ्यांना व सर्व हितसंबंधित व्यक्तींना हजर राहण्याची व पुरावा सादर करण्याची संधी मिळेल.

*गावांच्या सीमा निश्चित करणे.*

**१३४.** जर भू-मापनाचे वेळी, शेताच्या किंवा धारण केलेल्या जमिनीच्या सीमांबाबत कोणताही वाद नसेल आणि त्यावेळी हजर असलेल्या ग्राम अधिकाऱ्यांनी त्याच्या अचूकपणाबद्दल ग्वाही दिली असेल तर, जमीन धारण करणाऱ्याने किंवा भोगवटा करणाऱ्या व्यक्तीने दाखविल्याप्रमाणे सीमा निश्चिंत करण्यात येतील, आणि त्याबाबत वाद असेल किंवा उक्त जमीन धारण करणारी किंवा भोगवटा करणारी व्यक्ती हजर नसेल तर, भूमापन अधिकारी जमिनीबाबतच्या अभिलेखांप्रमाणे आणि ग्राम अधिकारी आणि शेजारची जमीन धारण करणारी व्यक्ती यांजकडून भोगवट्याबद्दल खात्रीपूर्वक माहिती मिळेल त्याप्रमाणे किंवा भू-मापन अधिकारी जो इतर पुरावा किंवा माहिती मिळवू शकेल त्या पुराव्याप्रमाणे किंवा माहितीप्रमाणे ती निश्चित करण्यात येईल.

*शेताच्या सीमा निश्चित करणे.*

**१३५.** ज्याचे भू-मापन करण्यात आलेले नाही अशा एखादा गावाच्या किंवा शेताच्या किंवा धारण केलेल्या जमिनीच्या सीमांबाबत कोणताही वाद उत्पन्न झाला असेल किंवा भू-मापन पूर्ण झाल्यानंतर, कोणत्याही वेळी कोणत्याही गावाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या किंवा एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागाच्या सीमेबाबत वाद उत्पन्न झाला असेल तर, जिल्हाधिकाऱ्यांकडून रीतसर चौकशी करून तो वाद निकालात काढण्यात येईल आणि अशा चौकशीच्या वेळी ग्राम अधिकारी व सर्व हितसंबंधित व्यक्तींना हजर राहण्याची व पुरावा सादर करण्याची संधी मिळेल.

*गावे, भू-मापन क्रमांक आणि पोट-विभाग यांमधील सीमांबाबत वाद.*

**१३६.** (१) हितसंबंध असलेल्या एखाद्या पक्षकाराने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागांच्या सीमांची आखणी करता येईल व त्यावर सीमांची चिन्हे उभारता येतील.

*भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागाच्या सीमांची आखणी.*

(२) भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागाच्या सीमांची आखणी करताना जिल्हाधिकाऱ्याने अनुसरावयाच्या कार्यरीतीचे नियमन करण्यासाठी, उपयोगात आणावयाच्या सीमांची चिन्हे कोणत्या प्रकारची असावीत हे विहित करण्यासाठी आणि आखणी करण्यात आलेल्या एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागाच्या जमीनधारकाकडून फी वसूल करण्याकरिता प्राधिकार देण्यासाठी राज्य शासनाला नियम करता येतील.

(३) या कलमाच्या तरतुदींअन्वये आखणी करण्यात आलेले भू-मापन क्रमांक आणि पोट-विभाग कलमे १३२, १३९ आणि १४० यांच्या प्रयोजनांकरिता भू-मापन क्रमांक आहेत, असे मानण्यात येईल.

वेड्यावाकड्या सीमा सरळ करणे.

**१३७.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीला (या कलमात जिचा अर्जदार असा उल्लेख करण्यात आला आहे) गावातील तिच्या शेतापैकी कोणत्याही शेताच्या किंवा तिने धारण केलेल्या जमिनीच्या सीमांचे नियमन करण्याची किंवा त्या सरळ करण्याची इच्छा असेल तेव्हा तिला याबाबतीत भू-मापन अधिकाऱ्यांकडे अर्ज करता येईल.

अर्जासोबत, तिच्या शेताच्या किंवा तिने धारण केलेल्या जमिनीच्या सीमा दर्शविणारा नकाशा व त्याच्या शेजारच्या जमीनधारकांची नावे देण्यात येतील.

(२) अर्ज मिळाल्यानंतर, अर्जदाराच्या इच्छेनुसार जमिनीच्या अधिक चांगल्या लागवडीच्या आणि सीमेची चिन्हे सुस्थितीत ठेवण्याच्या दृष्टीने कोणत्याही शेताच्या किंवा धारण जमिनिंच्या सीमेचे नियमन करणे व त्या सरळ करणे इष्ट आहे असे भू-मापन अधिकाऱ्यास वाटेल तर, त्यास मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या तरतुदींना अधिन राहून अशा शेताच्या किंवा धारण केलेल्या जमिनींच्या सीमेच्या फेरआखणीसाठी व अशा फेरआखणीमुळे ज्यांचा जमिनीच्या बाबतीत तोटा झाला असेल त्यांना अर्जदाराने नुकसानभरपाई देण्यासाठी एक योजना तयार करता येईल आणि अशी योजना नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने गावात प्रसिद्ध करण्यात येईल. सीमेची फेरआखणी करताना राज्य शासन या बाबतीत जे नियम करील त्या नियमांचे मार्गदर्शन भू-मापन अधिकारी घेईल. शक्य असेल तेथवर भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या कलम २३ च्या तरतुदींनुसार त्यांच्याकडून नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यात येईल.

(३) भू-मापन अधिकाऱ्याने तयार केलेल्या योजनेस अर्जदाराने व जमीन गेल्यामुळे नुकसान झालेल्या व्यक्तींनी संमती दिली असेल तर, भू-मापन अधिकारी, त्याच्या संमतीची नोंद करील आणि सीमांची फेरआखणी करून त्यानुसार त्या निश्चित करील. अशी संमती अर्जदारावर व अशा व्यक्तींवर बंधनकारक राहील आणि तद्न्वये कोणत्याही व्यक्तीने द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे तिच्याकडून वसूल करता येईल.

(४) (क) आपसमेळ न झाल्यास योजनेनुसार प्रत्येक संबंधित व्यक्तीने द्यावयाच्या किंवा तिच्याकडून वसूल करावयाच्या नुकसानभरपाईच्या रकमेसंबंधीचा प्रश्न भू-मापन अधिकारी–

(एक) नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशी संख्या असलेल्या व विहित करण्यात येईल अशा रीतीने, अर्जदाराने व जमीन गेल्यामुळे नुकसान झालेल्या व्यक्तींनी निवडलेल्या ग्रामसमितीकडे ;

(दोन) अशी ग्रामसमिती निवडता न आल्यास, अधीक्षक, भूमि अभिलेख, यांच्या मान्यतेने जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा भू-मापन अधिकाऱ्याने नामनिर्दिष्ट केलेल्या तीन व्यक्तींची मिळून होणाऱ्या एखाद्या समितीकडे ;

निर्णयार्थ पाठवील.

(ख) ग्राम समितीच्या किंवा, यथास्थिति, जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्या दर्जाच्या भू-मापन अधिकाऱ्याने नामनिर्दिष्ट केलेल्या समितीचा निर्णय अंतीम असेल व तो सर्व संबंधीत पक्षकारांवर बंधनकारक राहील. तद्न्वये अर्जदाराने द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे त्याच्याकडून वसूल करता येईल असा निर्णय दिल्यानंतर भू-मापन अधिकाऱ्याने तयार केलेली योजना जेथवर ती सीमेच्या फेरतपासणीशी संबंधित असेल तेथवर अंतिम स्वरुपाची होईल व सीमा तदनुसार निश्चित करण्यात आल्या आहेत असे मानण्यात येईल.

(५) या कलमान्वये अशा रीतीने सीमा निश्चित करण्यात आली असेल तेव्हा ती कलम १३८ च्या प्रयोजनांसाठी सीमा निश्चित करण्यात आली आहे असे माण्यात येईल.

**१३८.** (१) या प्रकरणाच्या उपरिनिर्दिष्ट तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींन्वये ठरवण्यात आलेली सीमा ही पुढील गोष्टींच्या संबंधात निर्णायक असल्याचे मानण्यात येईल.— सिमा निश्चितीचे परिणाम.

(क) सीमा रेषांची किंवा सीमा चिन्हांची खरी जागा, आणि

(ख) निश्चित केलेल्या सीमेच्या दोहोबाजूंवरील जमीन धारण करणाऱ्यांनी धारण केलेल्या जमिनिशी संबंध आहे किंवा नाही असा ज्या जमिनीबाबत निर्णय केला असेल त्या जमिनीबद्दलचे त्यांचे हक्क.

(२) पूर्वोक्त प्रमाणे सीमा निश्चित करण्यात आली असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास सीमा निश्चित ठरवताना जमीनधारकांच्या धारण जमिनीशी किंवा जिच्यामार्फत किंवा जिच्याकडून तो मागणी करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तींच्या धारण जमिनीशी संबंध नाही असा निर्णय देण्यात आला असेल अशी कोणतीही जमीन बेकायदेशीररीत्या कब्जात असणाऱ्या कोणत्याही जमीनधारकास संक्षिप्तरीत्या चौकशी करून कोणत्याही वेळी काढून टाकता येईल.

(३) पोट-कलमे (४) आणि (५) यांच्या तरतुदींना अधीन राहून, पोट-कलम (२) अन्वये, (जमिनीतून) काढून टाकण्याबाबत दिलेला आदेश या संहितेच्या तरतुदींनुसार केलेल्या अपिलास किंवा फेरतपासणीस अधीन असेल.

(४) जर कोणत्याही व्यक्तीला पोट-कलम (२) च्या तरतुदींअन्वये कोणत्याही जमिनीतून काढून टाकण्यात आले असेल किंवा काढण्यात येत असेल तर काढून टाकण्यात आल्याच्या दिनांकापासून किंवा सीमा निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मुदतीत, त्या जमिनीवर आपला मालकी हक्क प्रस्थापित करण्यासाठी तिला दिवाणी दावा दाखल करता येईल :

परंतु, राज्य शासनास किंवा जिल्हाधिकाऱ्यास किंवा कोणत्याही महसूल अथवा भू-मापन अधिकाऱ्यास त्या दाव्यातील पक्षकार बनविता येणार नाही.

(५) जमिनीतून काढून टाकण्याच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध पोट-कलम (४) अन्वये दिवाणी दावा दाखल केला असेल तेव्हा, असा आदेश अपिलास किंवा फेरतपासणीस अधीन असणार नाही.

(६) अपिलाच्या फेरतपासणीच्या किंवा, यथास्थिति, दाव्याच्या निर्णयावरून जमीन महसुलाची फेरआकारणी करण्यात यावी असे जिल्हाधिकाऱ्यास वाटत असेल तर त्यास फेरआकारणी करण्याबाबत आदेश देता येईल व अशी फेरआकारणी त्या आदेशाच्या दिनांकानंतर येणाऱ्या महसुली वर्षाच्या सुरुवातीपासून अंमलात येईल.

**१३९.** (१) ज्याला भूमि अभिलेख अधीक्षकाने किंवा जमाबंदी अधिकाऱ्याने प्राधिकृत केले असेल अशा कोणत्याही भू-मापन अधिकाऱ्याने गावांच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागांच्या—मग ते लागवडीखाली असोत किंवा नसोत—सिमाचिन्हे विनिर्दिष्ट करणे किंवा तयार करण्याची, लावण्याची, त्या सुस्थितीत ठेवण्याची किंवा त्यांची दुरुस्ती करण्याची व्यवस्था करणे आणि त्यामुळे झालेला सर्व खर्च जमीन धारण करणाऱ्यांवर किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींवर आकारणे हे कायदेशीर असेल. भू-मापन क्रमांक आणि गावे इत्यादींच्या सीमांची चिन्हे लावणे व ती दुरुस्त करणे.

(२) अशा अधिकाऱ्यास, लेखी नोटिशीद्वारे, जमीन धारण करणारास त्याच्या संबंधित भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागांची सीमा चिन्हे, किंवा भू-मापन चिन्हे, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत तयार करण्यास लावण्यास, त्या सुस्थितीत ठेवण्यास किंवा त्यांची दुरुस्ती करण्यास फर्माविण्याचा अधिकार आहे ; आणि असे करण्यात त्यांनी कसूर केल्यास भू-मापन अधिकारी त्या लावील, त्यांची मांडणी करील किंवा त्या दुरुस्त करील आणि त्यामुळे आलेला सर्व खर्चाची यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे आकारणी करील.

(३) राज्य शासनाने याबाबत केलेल्या नियमांना अधीन राहून जमीन, हवामान व सामानाचा टिकाऊपणा व किंमत यासंबंधीच्या आवश्यकतेनुसार, भूमि अभिलेख अधीक्षकाकडून ठरविण्यात येईल असा वर्णनाची सीमा चिन्हे व भू-मापन चिन्हे असतील व त्याच्याकडून ठरविण्यात येईल अशा रीतीने त्या तयार करण्यात, लावण्यात, किंवा त्या सुस्थितीत ठेवण्यात किंवा दुरुस्त करण्यात येतील आणि ती त्याच्याकडून ठरविण्यात येईल अशा आकाराच्या व सामग्रीच्या असतील.

सीमा चिन्हे व भूमापन चिन्हे सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी.

**१४०.** प्रत्येक जमीनधारक त्याने धारण केलेल्या जमिनीच्या सीमांची चिन्हे व भू-मापनाची चिन्हे सुस्थितीत ठेवण्यास, त्यांची चांगल्या रीतीने दुरुस्ती करण्यास, आणि त्यांच्यात फेरफार केल्यामुळे, त्या काढून टाकल्यामुळे किंवा ती दुरुस्त अवस्थेत न ठेवल्यामुळे महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याने त्याबाबत जो कोणताही वाजवी खर्च केला असेल तो देण्यास जबाबदार राहील. गावाच्या सीमांच्या चिन्हांच्या किंवा भू-मापन चिन्हांचा नाश होऊ न देणे किंवा त्यात अनधिकृतपणे फेरफार करण्यास प्रतिबंध करणे हे ग्राम अधिकारी व ग्राम सेवक यांचे कर्तव्य असेल.

भू-मापन चालू केल्यानंतर सीमा चिन्हे व भू-मापन चिन्हे जिल्हाधिकाऱ्याच्या स्वाधीन असणे.

**१४१.** जेव्हा एखाद्या जिल्ह्यामध्ये भू-मापन सुरू करण्यात येईल तेव्हा, सीमा चिन्हांचे आणि भू-मापन चिन्हांचे काम जिल्हाधिकाऱ्याच्या स्वाधीन असेल आणि ती लावणे, त्यांची मांडणी करणे, ती सुस्थितीत ठेवणे आणि त्यांची दुरुस्ती करणे याबाबत उपाययोजना करणे हे त्यांचे कर्तव्य असेल आणि या प्रयोजनासाठी कलम १३९ अन्वये भू-मापन अधिकाऱ्यांना जे अधिकार प्रदान करण्यात आले असतील ते जिल्हाधिकाऱ्याकडे निहित होतील.

धारण केलेली जमीन व ग्रामरस्ता यांच्यामधील सीमा चिन्हांची आखणी व ती सुस्थितीत ठेवणे.

**१४२.** (१) या प्रकरणाच्या कोणत्याही पूर्ववर्ती तरतुदींन्वये त्याच्या जमिनीच्या सीमा आखण्यात किंवा ठरविण्यात आल्या नसतील, तर, ग्रामरस्त्याला लागून असलेल्या जमिनीचा प्रत्येक धारक त्याच्या स्वतःच्या खर्चाने आणि विहित करण्यात आलेल्या रीतीने—

(क) त्याची जमीन व तिला लागून असलेला ग्रामरस्ता यामधील सीमा, सीमाचिन्हांनी आखील ; आणि

(ख) वेळोवेळी अशा सीमाचिन्हांची दुरुस्ती व त्यांची नवीकरण करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे जमीनधारकाने सीमांची आखणी किंवा सीमाचिन्हांची दुरुस्ती व त्यांचे नवीकरण करण्यात कसूर केल्यास, जिल्हाधिकारी, त्यास योग्य वाटेल अशी नोटीस दिल्यानंतर, ती सीमा आखण्याचे काम करवून घेईल किंवा सीमाचिन्हांची दुरुस्ती किंवा त्यांचे नवीकरण करवून घेईल आणि त्याकरिता करण्यात आलेला खर्च जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करील ;

(३) सीमा आखणीच्या संबंधात किंवा सीमाचिन्हे योग्य प्रकारे दुरुस्त ठेवण्याबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास त्या बाबीचा निर्णय जिल्हाधिकारी करील व त्याचा निर्णय अंतिम असेल.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनांसाठी ग्रामरस्ता म्हणजे नागपूर,चांदा, वर्धा आणि भंडारा या जिल्ह्यांत आणि अमरावती जिल्ह्याच्या मेळघाट तालुक्यात निर्देशक खसरा क्रमांक असलेला रस्ता असा समजावा ; आणि राज्याच्या उर्वरित भागात त्याचा अर्थ अधिकाराभिलेख किंवा गावांच्या नकाशात नोंद केलेला रस्ता असा समजावा.

**१४३.** (१) एखाद्या भू-मापन क्रमांकात जमीन धारण करणाऱ्या व्यक्ती इतर भू-मापन क्रमांकाच्या सीमांवरून रस्त्याबाबतच्या हक्काची मागणी करीत असतील तर तहसीलदारास त्यांची चौकशी करता येईल आणि त्यांचा निर्णय करता येईल.

सीमांवरून रस्त्याचा अधिकार.

(२) अशा मागण्यांचा निर्णय करताना शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी योग्य मार्गाची किती जरुरी आहे याकडे तहसीलदार लक्ष देईल.

(३) या कलमान्वये तहसीलदाराने दिलेला निर्णय हा पोट-कलमे (४) आणि (५) यांच्या तरतुदींना अधीन राहून, या संहितेच्या तरतुदींनुसार अपिलास किंवा फेरतपासणीस अधीन असेल.

(४) या कलमान्वये तहसीलदाराने दिलेल्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला तो निर्णय रद्द केला जाण्यासाठी किंवा त्यात सुधारणा केली जाण्यासाठी अशा निर्णयाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मुदतीत दिवाणी दावा दाखल करता येईल.

(५) जेव्हा पोट-कलम (४) अन्वये तहसीलदाराच्या निर्णयाविरूद्ध दिवाणी दावा दाखल करण्यात आला असेल तेव्हा असा निर्णय अपिलास किंवा फेरतपासणीस अधीन असणार नाही.

**१४४.** राज्यात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये कोणत्याही क्षेत्रात एखादी अंतिम नगररचना योजना किंवा सुधार योजना किंवा धारण जमिनीच्या एकत्रीकरणाची योजना अंमलात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, या प्रकरणाच्या तरतुदींन्वये निश्चित करण्यात आणि आखण्यात आलेल्या सीमांमध्ये, अशा योजनेअन्वये पुनर्रचना केलेल्या व आखलेल्या किंवा एकत्रित केलेल्या तुकड्यांशी सुसंगत होईल अशा प्रकारे फेरबदल करणे हे जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्ये असेल ; आणि त्या प्रयोजनासाठी अशा तुकड्याची सीमाचिन्हे उभी करण्याची, बांधण्याची आणि, आखण्याची तो व्यवस्था करील आणि त्यानंतर खर्चाच्या वसुलीसंबंधीचे या प्रकरणाच्या तरतुदी ज्याप्रमाणे सीमाचिन्हे बांधण्याच्या, त्या सुस्थितीत ठेवण्याच्या आणि त्यांच्या दुरुस्तीच्या संबंधात लागू होतात त्याप्रमाणे ते प्रत्येक तुकड्याच्या संबंधात लागू होतील.

नगररचना योजनेखालील किंवा सुधार योजनांखालील किंवा एकत्री-करण योजने-खालील क्षेत्रात सीमांची आखणी करणे.

**१४५.** जिल्हाधिकारी किंवा भू-मापन अधिकारी, तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांच्या समोरील संक्षिप्त चौकशीत ज्या कोणत्याही व्यक्तीने सीमा चिन्ह किंवा भू-मापन चिन्ह जाणूनबुजून नाहीशी केल्याचे, ती काढल्याचे किंवा तिला नुकसान पोहचविल्याचे सिद्ध झाले असेल अशी व्यक्ती अशा रीतीने नाहीशी केलेल्या, काढून टाकलेल्या किंवा नुकसान पोहचविलेल्या प्रत्येक चिन्हादाखल शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

सीमा चिन्हांचे नुकसान केल्याबद्दल शास्ती.

**१४६.** या प्रकरणाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी कोणत्याही गावास किंवा गावांच्या वर्गास लागू होणार नाहीत असे **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासनास जाहीर करता येईल.

या प्रकरणाच्या अंमलबजावणीतून सूट देण्याचा अधिकार.

प्रकरण दहा

## भूमि अभिलेख

### क—अधिकार अभिलेख

**१४७.** राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कलमे १४८ ते १५९ (दोन्ही धरून) यांच्या किंवा त्यांच्या कोणत्याही भागाच्या तरतुदी विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रात किंवा कोणत्याही जमिनींच्या किंवा गावांच्या किंवा जमिनींच्या कोणत्याही वर्गाच्या संबंधात, किंवा सर्वसामान्यपणे अंमलात असणार नाहीत, असा निदेश देता येईल.

या प्रकरणाचा तरतुदींपासून सूट.

अधिकार अभिलेख.

**१४८.** प्रत्येक गावामध्ये अधिकार अभिलेख ठेवण्यात येतील व अशा अधिकार अभिलेखात पुढील तपशील असेल :—

(क) (कुळांहून अन्य अशा) ज्या व्यक्ती जमीन धारण करणाऱ्या, भोगवटा करणाऱ्या, मालक किंवा जमीन गहाण घेणाऱ्या किंवा तिचे भाडे किंवा महसूल आपल्या नावे करून घेणाऱ्या असतील अशा सर्व व्यक्तींची नावे ;

(ख) शासकीय पट्टेदार म्हणून किंवा संबंधित कुळकायद्याच्या अर्थकक्षेतील कुळे धरून, कुळे म्हणून ज्या व्यक्ती जमीन धारण करीत असतील अशा सर्व व्यक्तींची नावे ;

(ग) अशा व्यक्तींच्या परस्पर हितसंबंधाचे स्वरूप, त्याची मर्यादा आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या अटी किंवा दायित्वे असल्यास त्या अटी किंवा दायित्वे ;

(घ) अशा व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तींनी द्यावयाचा किंवा त्यांना देण्याजोगा खंड किंवा महसूल, कोणताही असल्यास, तो खंड किंवा महसूल ;

(ङ) राज्य शासन, याबाबतीत केलेल्या नियमान्वये सर्वसामान्यपणे किंवा त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या प्रयोजनांसाठी विहित करील असे इतर तपशील.

[१][**१४८क.** कलम १४८ अन्वये ठेवण्यात आलेले अधिकार अभिलेख आणि या प्रकरणाच्या अन्य तरतुदीन्वये ठेवण्यात आलेले भूमि अभिलेख हे योग्य ते साठवणूकीचे यंत्र वापरून देखील ठेवता येतील.]

अधिकार संपादन केल्याचे प्रतिवृत्त देणे.

**१४९.** राज्यातील कोणत्याही क्षेत्रामध्ये असलेली जमीन, धारण करणारा, भोगवटा करणारा, मालक, जमीन गहाण ठेवून घेणारा, जमीनमालक, शासकीय पट्टेदार किंवा कूळ म्हणून किंवा तिच्या खंडाचा किंवा महसुलाचा अभिहस्तांकिती म्हणून कोणताही अधिकार उत्तराधिकाराने अनुजीविताधिकाराने, वारसाहक्काने, विभागणीने, खरेदीने, गहाणाने, देणगीने, पट्ट्याने किंवा अन्य रीतीने संपादन करणारी कोणतीही व्यक्ती, असा अधिकार तिने संपादन केल्याबद्दल, असा अधिकार संपादन केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत तलाठ्यास तोंडी अथवा लेखी कळवील आणि उक्त तलाठी, कळविणाऱ्या व्यक्तीला असे प्रतिवृत्त मिळाल्याची लेखी पोच तात्काळ देईल :

परंतु, असा अधिकार संपादन करणारी व्यक्ती अज्ञान असेल किंवा अन्यथा अपात्र असेल तेव्हा असे प्रतिवृत्त तिचा पालक किंवा तिची मालमत्ता जिच्या ताब्यात असेल अशी इतर व्यक्ती तलाठ्यास देईल :

परंतु आणखी असे की, जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीनुसार किंवा नोंदलेल्या दस्तऐवजांच्या आधारे अधिकार संपादन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, तलाठ्यास प्रतिवृत्त देण्याबाबतच्या जबाबदारीतून सूट देण्यात येईल :

परंतु तसेच, जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीने अधिकार संपादन केला असल्याचा एखाद्या व्यक्तीचा दावा असेल त्याबाबतीत या संहितेच्या किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये अशी परवानगी आवश्यक असेल त्याबाबतीत, अशी व्यक्ती तलाठ्याने तिस, तसे करण्यास फर्माविले तर या संहितेअन्वये करण्यात आलेल्या नियमान्वये आवश्यक असेल त्याप्रमाणे अशी परवानगी ज्या आदेशाद्वारे देण्यात आली असेल त्या आदेशाबाबतचा पुरावा सादर करील.

---

१. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ कलम ३ अन्वये १४८क जादा दाखल करण्यात आले.

**स्पष्टीकरण एक.—**वर निर्दिष्ट केलेल्या अधिकारांमध्ये कब्जा नसलेल्या गहाणाचा समावेश होतो परंतु त्यामध्ये एखाद्या वहिवाटीच्या अधिकाराचा किंवा जो भार, संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ यांच्या कलम १०० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारचे गहाण म्हणून ठरत नसेल अशा भाराचा समावेश होत नाही. १८८२ चा ४.

**स्पष्टीकरण दोन.—**ज्या व्यक्तीच्या वतीन गहाणाची फेड करण्यात येईल किंवा ते नष्ट करण्यात येईल. किंवा त्याचा पट्टा ठरविण्यात आला असेल अशी व्यक्ती या कलमाच्या अर्थानुसार अधिकार संपादन करीत आहे असे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण तीन.—**या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ ' तलाठी ' या संज्ञेमध्ये या प्रकरणान्वये तलाठ्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.

फेरफार नोंदवही व विवादग्रस्त प्रकरणांची नोंदवही.

**१५०.** (१) तलाठी कलम १४९ अन्वये त्याच्याकडे दिलेल्या प्रत्येक प्रतिवृत्ताची किंवा कलम १५४ अन्वये किंवा कोणत्याही जिल्हाधिकाऱ्याकडून मिळालेली संपादनाची किंवा हस्तांतरणाची नोंद फेरफार नोंदवहीत करील.

(२) जेव्हा एखादा तलाठी, फेरफार, नोंदवहीत एखादी नोंद करील तेव्हा तो अशा नोंदीची संपूर्ण प्रत चावडीतील ठळक जागी त्याच वेळी लावील आणि फेरफारामध्ये ज्याचा हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरून किंवा फेरफार नोंदवहीवरून त्यास दिसून येईल अशा सर्व व्यक्तींना आणि त्यात ज्या व्यक्तींचा हितसंबंध आहे असे त्यास सकारण वाटत असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तींना लेखी कळवील.

(३) पोट-कलम (१) अन्वये फेरफार नोंदवहीत केलेल्या कोणत्याही नोंदीच्या संबंधात तलाठ्याकडे तोंडी किंवा लेखी आक्षेप घेण्यात आले असतील तर वादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीत त्या आक्षेपांच्या तपशीलाची नोंद करणे हे तलाठ्याचे कर्तव्य असेल. विहित नमुन्यात आक्षेप सादर करणाऱ्या व्यक्तींना तलाठी त्याबाबत तात्काळ लेखी पोच देईल.

(४) वादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीत दाखल केलेली वादग्रस्त प्रकरणे अव्वल कारकुनाच्या हुद्यापेक्षा कमी हुद्दा नसेल असा महसुली किंवा भू-मापन अधिकारी एक वर्षाच्या आत शक्यतोवर निकालात काढील आणि अशा नोंदवहीत नोंद करण्यात आलेले आक्षेप ज्या आदेशान्वये निकालात काढण्यात आले असतील अशा आदेशांची असा अधिकारी याबाबत राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने फेरफार नोंदवहीत नोंद करील.

(५) याबाबतीत राज्य शासन जे नियम करील त्यास अधीन राहून फेरफार नोंदवहीतील नोंदी अधिकार अभिलेखात दाखल करण्यात येतील :

परंतु, फेरफार नोंदवहीतील नोंद, योग्यरीतीने प्रमाणित आल्याखेरीज, अधिकाराभिलेखात दाखल करण्यात येणार नाही.

(६) फेरफार नोंदवहीतील नोंदी तपासण्यात येतील आणि अशा नोंदी बरोबर असल्याचे आढळून आले तर किंवा, यथास्थिति, त्यात दुरुस्ती केल्यानंतर, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्या अव्वल कारकुनाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा महसूल अधिकारी किंवा भू-मापन अधिकारी प्रमाणित करील :

[१][परंतु, ज्या नोंदीसंबंधी कोणताही वाद नसेल त्या नोंदी मंडळ निरीक्षकास तपासता येतील व प्रमाणित करता येतील :]

---

१. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, याच्या कलम ५(अ) द्वारे हे परंतूक समाविष्ट करण्यात आले.

[१][परंतु, आणखी असे की,] संबंधित पक्षकारांवर त्याबाबतीत नोटीस बजाविण्यात आल्याशिवाय, अशा कोणत्याही नोंदी प्रमाणित करण्यात येणार नाहीत.

(७) राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कार्यपद्धतीनुसार कुळवहिवाटीची नोंदवही ठेवण्यात येईल असा निदेश राज्य शासन देऊ शकेल.

[२][(८) आयुक्तास कलम १४८क अन्वये ठेवावयाच्या सर्व नोंदवह्या आणि दस्तऐवज तयार करण्यासाठी आणि त्यांचे परिरक्षण व अद्ययावतीकरण करण्यासाठी, वेळोवेळी साठवणूकीचे यंत्र, विनिर्दिष्ट करता येईल.]

माहिती पुरविण्याचे बंधन, जमीन-धारकास किंवा कुळास, अधिकार अभिलेखातील नोंदी, इ. पुस्तिकेच्या रूपाने पुरविण्याचे बंधन आणि पुस्तिका वगैरे ठेवणे.

**१५१.** (१) या प्रकरणान्वये जिचे हक्क, हितसंबंध किंवा दायित्वे कोणत्याही अभिलेखात किंवा नोंदवहीत दाखल करणे आवश्यक असेल किंवा दाखल केली असतील अशा कोणत्याही व्यक्तीने, असा अभिलेख किंवा नोंदवही तयार करण्याचे किंवा त्याची सुधारणा करण्याचे काम करीत असलेल्या कोणत्याही महसूल अधिकाऱ्याने किंवा तलाठ्याने मागणी केल्यानंतर, अशी मागणी केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, त्यांच्या तपासणीसाठी अशा अभिलेख किंवा नोंदवही अचूक तयार करण्यासाठी किंवा सुधारणा करण्यासाठी जरूर असेल अशी, व त्यास माहीत असेल किंवा त्यांच्या ताब्यात किंवा अधिकारात असेल अशी सर्व माहिती किंवा दस्तऐवज पुरविणे किंवा सादर करणे हे तिच्यावर बंधनकारक असेल.

(२) पोट-कलम (१) खालील मागणीनुसार ज्याला कोणतीही माहिती पुरविण्यात आली असेल, किंवा ज्यांच्याकडे कोणताही दस्तऐवज सादर करण्यात आला असेल, असा महसूल अधिकारी किंवा तलाठी ती माहिती पुरविणाऱ्या किंवा दस्तऐवज सादर करणाऱ्या व्यक्तीला त्याबद्दल तात्काळ लेखी पोच देईल आणि अशा कोणत्याही दस्तऐवजावर, तो दाखल करण्यात आल्याची माहिती आणि ती दिल्याचा दिनांक नमूद करणारी एक टिप्पणी त्याच्या सहीनिशी लिहील आणि त्याची एक प्रत, आवश्यक असल्यास ठेवून घेऊन, उक्त दस्तऐवज तात्काळ परत करील.

(३) शेतजमिनीच्या प्रत्येक धारकास (जर कूळ त्याबद्दल जमीन महसूल देण्यास प्रथमतः जबाबदार असेल तर कूळ धरून) त्याबाबतीत लेखी अर्ज केल्यावर, अशा जमिनीसंबंधातील अधिकाराभिलेखाची एक प्रत असलेली पुस्तिका तलाठ्याकडून पुरविण्यात येईल.

(४) जमीनधारकाने किंवा, यथास्थिति, कुळाने जमिनीबाबतचा जमीन महसूल व इतर सरकारी देणी देण्यासंबंधातील माहिती तसेच त्याच्या जमिनीच्या लागवडी संबंधातील माहिती आणि गाव लेख्यांत दाखविल्याप्रमाणे उक्त जमिनीत पेरणी केलेल्या पिकांची क्षेत्रे आणि विहित करण्यात येईल अशा इतर बाबी अशा पुस्तिकेत देण्यात येतील.

(५) अशी प्रत्येक पुस्तिका राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांनुसार तयार करण्यात, देण्यात व ठेवण्यात येईल. अशा नियमांत, पुस्तिका तयार करणे, देणे व ठेवणे यासाठी आकारावयाच्या फीची तरतूद करण्यात येईल. [३][अशा प्रकारे आकारण्यात आलेली फी, राज्य शासनाचे कोणतेही आदेश असल्यास त्यास अधीन राहून, पुस्तिका तयार करणाऱ्या, देणाऱ्या व ती ठेवणाऱ्या महसूल अधिकाऱ्यास ठेवून घेता येईल.]

---

१. वरील अधिनियमाच्या कलम ५(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ४ अन्वये पोट-कलम ८ दाखल करण्यात आले.

३. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, याच्या कलम २(अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(६) हा अधिनियम अमलात येण्याच्या लगतपूर्वी कोणतीही पुस्तिका तयार करण्यात, देण्यात किंवा ठेवण्यात येईल त्याबाबतीत, राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांन्वये कोणत्याही इतर नमुन्यात किंवा इतर रीतीने, पुस्तिका तयार करण्यासाठी, ती देण्यासाठी व ठेवण्यासाठी, तरतूद करण्यात येईतोपर्यंत, अशी पुस्तिका, या अधिनियमाच्या व त्याअन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार तयार करण्यात, देण्यात व ठेवण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[१][(७) या संहितेच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींन्वये तयार करण्यात, देण्यात किंवा ठेवण्यात आलेल्या किंवा तयार केल्याचे, दिल्याचे किंवा ठेवण्यात आल्याचे मानण्यात येणाऱ्या पुस्तिकेत समाविष्ट असलेली प्रत्येक माहिती ही तिचा अधिकार अभिलेखाशी संबंध असेल तेथवर, एतद्‌विरूद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत किंवा या संहितेअन्वये अशी माहिती यथोचितरित्या सुधारण्यात येईपर्यंत खरी असल्याचे गृहीत धरण्यात येईल.]

**१५२.** जी कोणतीही व्यक्ती त्या कलमामध्ये विहित केलेल्या मुदतीत, कलम १४९ अन्वये आवश्यक असलेले प्रतिवृत्त देण्यात किंवा कलम १५१ अन्वये आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात किंवा दस्तऐवज सादर करण्यात हयगय करील अशी व्यक्ती जिल्हाधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार, पाच रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी दंडाची रक्कम आकारली जाण्यास पात्र असेल व अशी फी जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल. माहिती देण्यात हयगय केल्याबद्दल दंड.

**१५३.** याबाबतीत राज्य शासनाने केलेल्या नियमांस अधीन राहून—

(क) कोणत्याही महसूल अधिकाऱ्यास किंवा तलाठ्यास या प्रकरणान्वये कोणत्याही अभिलेखासाठी किंवा नोंदवहीसाठी किंवा त्यांच्या संबंधात कोणताही नकाशा किंवा योजना तयार करण्याच्या किंवा त्यांची सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी कलमे ८० व ८१ अन्वये भू-मापन अधिकाऱ्यास जे अधिकार असतील त्यांपैकी कोणतेही अधिकार वापरता येतील, परंतु त्यांना भाडोत्री मजुरांचा खर्च आकारण्याचा कलम ८१ अन्वये अधिकाराचा वापर करता येणार नाही, आणि नकाशे तयार करण्याच्या कामी सहाय्याची मागणी.

(ख) सहायक किंवा उप-जिल्हाधिकारी किंवा भू-मापन अधिकारी यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही महसूल अधिकाऱ्यास असा नकाशा किंवा अशी योजना तयार करण्याच्या किंवा त्याची सुधारणा करण्याच्या खर्चाची आणि लिपिकीय कामाचा आणि पर्यवेक्षणाचा खर्च धरून सर्व आकस्मिक खर्चाची आकारणी, ज्या जमिनीच्या संबंधात असे नकाशे किंवा योजना असतील त्या जमिनीवर करता येईल, आणि असा खर्च महसुलाच्या मागणीप्रमाणे वसूल करता येईल.

१९०८ चा १६. **१५४.** शेतकीच्या प्रयोजनार्थ उपयोगात आणलेल्या किंवा जिच्या संबंधात अधिकार अभिलेख तयार करण्यात आले आहेत अशा जमिनीवरील कोणताही मालकी हक्क किंवा भार निर्माण करणारा, त्याचे अभिहस्तांकन करणारा किंवा तो नष्ट करणारा म्हणून अभिप्रेत असलेला कोणताही दस्तऐवज भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये नोंदविण्यात आला असेल तेव्हा अशा दस्तऐवजाची नोंदणी करणारा अधिकारी ज्या गावामध्ये ती जमीन असेल त्या गावाच्या तलाठ्यास किंवा त्या तालुक्याच्या तहसीलदारास या संहितेअन्वये करण्यात आलेल्या नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि विहित करण्यात येईल अशा वेळी, त्याबाबत कळवील. नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी हस्तांतरणाबाबत माहिती कळविणे.

१. वरील अधिनियमाच्या कलम २(ब) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

लेखन प्रमादांची दुरुस्ती.

**१५५.** कोणतेही लेखन प्रमाद किंवा अधिकार अभिलेखात किंवा या प्रकरणान्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत ज्या चुका झाल्या असल्याचे हितसंबंधित पक्षकारांनी कबूल केले असेल किंवा ज्या चुका एखाद्या महसूल अधिकाऱ्यास, तो निरीक्षण करीत असताना आढळतील अशा कोणत्याही चुका जिल्हाधिकाऱ्यास कोणत्याही वेळी दुरुस्त करता येतील किंवा दुरुस्त करवून घेता येतील.

परंतु, जेव्हा एखाद्या महसूल अधिकाऱ्यास, तो निरीक्षण करीत असताना, कोणतीही चूक आढळून आली असेल, तेव्हा पक्षकारांना नोटीस देण्यात आल्याशिवाय व वादग्रस्त नोंदींसंबंधीच्या कार्यपद्धतीनुसार कोणत्याही हरकती असल्यास त्या हरकती अंतिमरित्या निकालात काढल्याशिवाय अशी कोणतीही चूक दुरुस्त करता येणार नाही.

भूमि अभिलेख.

**१५६.** नकाशे, नोंदवही आणि अधिकार अभिलेख याशिवाय विहित करण्यात येईल असे इतर भूमि अभिलेख प्रत्येक गावासाठी तयार करण्यात येतील.

अधिकार अभिलेख व फेरफार नोंदवही यांमधील नोंदी बरोबर असल्याचे गृहीत धरणे.

**१५७.** अधिकार अभिलेखातील नोंद आणि फेरफार नोंदवहीतील प्रमाणित नोंद ही, एतद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत किंवा त्याबद्दल नवीन नोंद कायदेशीररीत्या दाखल करण्यात येईपर्यंत, खरी असल्याचे गृहीत धरण्यात येईल.

दाव्यास प्रतिबंध [1][*]

**१५८.** या प्रकरणान्वये ठेवलेल्या कोणत्याही अभिलेखात किंवा नोंदवहीत एखादी नोंद करविण्याबाबतच्या किंवा अशी कोणतीही नोंद काढून टाकण्याबाबतच्या किंवा तीत सुधारणा करविण्याबाबतच्या कोणत्याही हक्काच्या संबंधाने राज्य शासनाविरुद्ध किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा दाखल करण्यात येणार नाही.

संहितेच्या प्रारंभाच्या वेळेचे अधिकार अभिलेख.

**१५९.** राज्यातील कोणत्याही क्षेत्रासाठी या प्रकरणाच्या तरतुदींनुसार अधिकार अभिलेख तयार करण्यात येईपर्यंत त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये त्या क्षेत्रात अमलात असलेले विद्यमान अधिकार अभिलेख हे (मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ याच्या कलम १५५ अन्वये तयार करण्यात आलेले अधिकार अभिलेख धरून) या प्रकरणान्वये तयार करण्यात आलेले अधिकार अभिलेख आहेत असे मानण्यात येईल. १९५५ चा म.प्र. २.

## ख—भोगवट्यात नसलेल्या जमिनीबाबतचे अधिकार

कलमे १६१ ते १६७ यांच्या तरतुदी लागू करणे.

**१६०.** या संहितेच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी राज्यातील ज्या क्षेत्रास कलमे १६१ ते १६७ यांच्या तरतुदींशी अनुरूप असलेल्या तरतुदी लागू होत्या त्या क्षेत्रास या कलमाच्या तरतुदी लागू होतील ; परंतु राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्यात निर्दिष्ट करण्यात येतील अशा राज्यातील इतर क्षेत्रांना उपरोक्त कलमे लागू करील.

निस्तरपत्रक.

**१६१.** (१) या संहितेच्या आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असेल असे, एखाद्या गावातील भोगवट्यात नसलेल्या सर्व जमिनीच्या आणि तिच्याशी आनुषंगिक असतील अशा सर्व बाबींच्या, आणि विशेषकरून कलम १६२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींच्या व्यवस्थेसंबंधीची योजना अंतर्भूत असलेले एक निस्तारपत्रक जिल्हाधिकारी तयार करील.

(२) निस्तारपत्रकाचा मसुदा त्या गावामध्ये प्रसिद्ध करण्यात येईल आणि जिल्हाधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या रीतीने गावातील रहिवाशांची मते अजमाविल्यानंतर जिल्हाधिकारी त्यास अंतिम स्वरूप देईल.

---

१. सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, याच्या कलम ४ द्वारे " आणि प्रकरण १३ वगळणे " हा मजकूर वगळण्यात आला.

(३) ग्रामपंचायतीने विनंती केल्यानंतर, किंवा एखाद्या गावात ग्रामपंचायत नसल्यास अशा गावातील प्रौढ रहिवाशांपैकी कमीतकमी एक-चतुर्थांश रहिवाशांनी अर्ज केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, कोणत्याही वेळी, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर निस्तारपत्रकातील कोणत्याही नोंदीत सुधारणा करता येईल.

निस्तारपत्रकात तरतूद करावयाच्या बाबी.

**१६२.** निस्तारपत्रकात पुढील बाबींची तरतूद करण्यात येईल,—

(क) गावातील गुरे चारण्यास ज्या अटींवर आणि शर्तींवर परवानगी देण्यात येईल त्या अटी व शर्ती ;

(ख) गावातील कोणाही रहिवाशास ज्या अटींवर आणि शर्तींवर आणि त्या मर्यादेपर्यंत—

(एक) लाकूड, इमारती लाकूड, सरपण किंवा जंगलातील इतर कोणतेही उत्पन्न ;

(दोन) मुरुम, कंकर, वाळू, माती, चिकणमाती, दगड किंवा कोणतेही इतर दुय्यम खनिज, मिळेल त्या अटी, शर्ती व मर्यादा ;

(ग) गुरे चारण्याबाबत आणि परिच्छेद (ख) मध्ये नमूद केलेल्या वस्तू नेण्याबाबत सामान्यतः नियमन करणाऱ्या सूचना ;

(घ) या संहितेअन्वये किंवा तद्नुसार निस्तारपत्रकात नोंद करणे आवश्यक असेल अशी कोणतीही इतर बाब.

विवक्षित बाबींची निस्तारपत्रकात तरतूद करणे.

**१६३.** निस्तारपत्रक तयार करताना जिल्हाधिकारी, शक्य असेल तेथवर, खालील गोष्टींची तरतूद करील :—

(क) शेतीसाठी उपयोग केला जाणाऱ्या गुरांना मोफत चराई ;

(ख) गावातील रहिवाशांना आपल्या खरोखरच्या घरगुती उपयोगासाठी खालील वस्तू मोफत नेता येणे :—

(एक) जंगलातील उत्पन्न ;

(दोन) दुय्यम खनिज ;

(ग) खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तू गावातील कारागिरांना त्यांच्या धंद्याकरिता घेऊन जाण्यासाठी द्यावयाच्या सवलती.

दुसऱ्या गावातील पडीत जमिनीवरील अधिकार.

**१६४.** (१) कोणत्याही गावातील पडीत जमीन अपुरी आहे आणि लोकहिताच्या दृष्टीने या कलमान्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा, त्यास योग्य वाटेल ती चौकशी केल्यानंतर असा आदेश देता येईल की, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत त्या गावच्या रहिवाशांना शेजारच्या गावात, यथास्थिति, **निस्ताराचा** किंवा गुरे चारण्याचा अधिकार राहील.

(२) पोट-कलम (१) अन्वये शेजारच्या गावात किंवा सरकारी जंगलात गुरे चारण्याचा अधिकार असलेल्या एखाद्या गावातील रहिवाशांना असा अधिकार बजावता यावा यासाठी जाण्या-येण्याच्या आपल्या अधिकाराची नोंद करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये केलेल्या अर्जाची चौकशी केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास असे आढळून आले की, कोणत्याही दुसऱ्या गावात किंवा सरकारी जंगलात गुरे चारण्याचा आपला अधिकार बजावणे शक्य व्हावे म्हणून अशा रहिवाशांना जाण्या-येण्याचा अधिकार असणे वाजवीरीत्या आवश्यक आहे, तेव्हा तो जाण्या-येण्याचा असा अधिकार आहे असे जाहीर करणारा आदेश देईल आणि ज्या शर्तीवर तो अधिकार बजावण्यात येईल त्या शर्ती नमूद करील.

(४) त्यानंतर जिल्हाधिकारी भोगवट्यात नसलेल्या जमिनीमधून जाण्या-येण्याचा मार्ग ठरवील आणि तो मार्ग ज्या गावातून जातो त्या गावाच्या रहिवाशांना कमीतकमी गैरसोयीचा होईल अशा रीतीने त्यावर निर्बंध घालील.

(५) जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटल्यास त्या मार्गाच्या सीमेची आखणी करता येईल.

(६) या कलमान्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेले आदेश **निस्तारपत्रकात** नोंदविण्यात येतील.

(७) पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेली गावे निरनिराळ्या जिल्ह्यांत असतील तर पुढील तरतुदी लागू होतील :—

(क) **निस्तारविषयक** अधिकार किंवा गुरे चारण्याचा अधिकार दर्शविणारे आदेश ज्या गावासंबंधात असा अधिकार मागण्यात आला असेल ते गाव ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी देईल ;

(ख) जाण्या-येण्याच्या मार्गासंबंधीचे कोणतेही आदेश ज्या क्षेत्रातून असा मार्ग जात असेल त्या क्षेत्रावर ज्याचा संबंधित क्षेत्राधिकार असेल असा जिल्हाधिकारी देईल ;

(ग) खंड (क) आणि (ख) अनुसार आदेश देणारा जिल्हाधिकारी संबंधित अशा इतर जिल्हाधिकाऱ्यांशी लेखी विचारविनिमय करील ;

**वाजिब-उल-अर्ज.**

**१६५.** (१) ही संहिता अमलात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर जिल्हाधिकारी, राज्य शासनाने त्या संबंधात दिलेल्या कोणत्याही सामान्य किंवा विशेष आदेशानुसार, जी कोणतीही जमीन किंवा जे पाणी राज्य शासनाच्या किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीचे नसेल किंवा त्याच्याकडून ज्याचे नियंत्रण किंवा व्यवस्था केली जात नसेल अशा जमिनीतील किंवा पाण्यासंबंधातील—

(क) पाटबंधाऱ्यांबाबतचा हक्क किंवा जाण्या-येण्याचा हक्क किंवा अन्य वहिवाटी.

(ख) मच्छीमारीबाबतचे हक्क,

या संबंधीचे प्रत्येक गावातील रिवाज ठरवील आणि त्यांची नोंद करील आणि अशा प्रकारच्या अभिलेखास त्या गावचा **वाजिब-उल-अर्ज** म्हणून संबोधण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये तयार केलेला अभिलेख, जिल्हाधिकारी त्यास योग्य वाटेल अशा रितीने प्रसिद्ध करील आणि असा अभिलेख पोट-कलम (३) अन्वये दाखल केलेल्या दिवाणी दाव्यात दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयास अधीन राहून, अंतिम व निर्णायक असेल.

(३) अशा अभिलेखात केलेल्या कोणत्याही नोंदीमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला पोट-कलम (२) अन्वये असा अभिलेख प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत, ती नोंद रद्द करण्याकरिता किंवा तीत फेरबदल करण्याकरता दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येईल.

(४) त्यामध्ये हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अर्जावरून किंवा जिल्हाधिकाऱ्यास आपण होऊन पुढीलपैकी कोणत्याही कारणांवरून **वाजिब-उल-अर्ज** मधील कोणत्याही नोंदीत फेरबदल करता येईल किंवा तीत नवीन नोंद दाखल करता येईल :

(क) अशा नोंदीमध्ये हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींची त्या नोंदीत फेरबदल करण्यात यावा अशी इच्छा आहे ; किंवा

(ख) दिवाणी दाव्यातील हुकूमनाम्याद्वारे ती नोंद चुकीची आहे असे जाहीर करण्यात आले असेल ; किंवा

(ग) ती नोंद दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर किंवा एखाद्या महसूल अधिकाऱ्याच्या आदेशावर आधारलेली असली तरी ती, त्या हुकूमनाम्याप्रमाणे किंवा आदेशाप्रमाणे नाही ; किंवा

(घ) ती नोंद अशा हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर आधारलेली असली तरी त्यानंतर अपील, फेरतपासणी किंवा पुनर्विलोकन करण्यात आल्यावर असा हुकूमनामा किंवा आदेश यात नंतर फेरबदल करण्यात आलेला आहे ; किंवा

(ङ) अशा गावात चालू असलेला कोणताही रिवाज दिवाणी न्यायालयाने हुकूमनाम्याद्वारे निश्चित केलेला आहे.

मच्छिमारी [१][ * * * ] इत्यादींचे नियमन.

**१६६.** (१) राज्य शासनाला पुढील गोष्टींचे नियमन करण्यासाठी नियम करता येतील,—

(क) शासकीय तलावातील मच्छिमारी ;

(ख) राज्य शासनाच्या मालकीच्या जमिनीतून कोणतीही सामग्री नेणे.

(२) परवाने देणे, अशा परवान्यांबाबत शर्ती ठरविणे आणि त्याकरिता फी लादणे व तद्नुषंगिक अन्य गोष्टींची अशा नियमात तरतूद करता येईल.

तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा.

**१६७.** (१) या संहितेत अन्यथा जी तरतूद केली असेल त्याखेरीज, जी कोणतीही व्यक्ती कलमे १६१ ते १६६ यांच्या किंवा कलम १६६ अन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतेही कृत्य करील किंवा कोणत्याही नियमांचे किंवा **वाजिब-उल-अर्ज**मध्ये दाखल केलेल्या रिवाजांचे उल्लंघन करील किंवा त्यांचे पालन करण्यात कसूर करील किंवा **निस्तारपत्रका**मध्ये दाखल केलेल्या कोणत्याही नोंदीचा भंग करील अशी व्यक्ती तिला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त एक हजार रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होण्यास पात्र होईल; आणि त्या व्यक्तीने उपयोगात आणले असेल असे कोणतेही उत्पन्न किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या जमिनीतून त्याने नेले असेल असे कोणतेही इतर उत्पन्न सरकारजमा करण्यासाठी जिल्हाधिकारी आणखी आदेश देईल.

(२) जिल्हाधिकारी, या कलमान्वये शास्ती लादणारा आदेश देईल तेव्हा त्यास असा निदेश देता येईल की अशा उल्लंघनामुळे, असा भंग केल्यामुळे किंवा पालन न केल्यामुळे लोकांना पोचणारी हानी किंवा इजा यांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजनांचा खर्च भागविण्यासाठी ती शास्ती किंवा तिचा कोणताही भाग, वापरण्यात यावा.

१. सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, याच्या कलम ५ द्वारे '' शिकार '' हा शब्द वगळण्यात आला.

प्रकरण अकरा

## जमीन महसुलाची आणि इतर महसूलविषयक मागण्यांची वसुली

जमीन महसुलाचे दायित्व.

**१६८.** (१) (क) बिनदुमला जमिनीच्या बाबतीत, भोगवटादार किंवा राज्य शासनाचा पट्टेदार,

(ख) दुमाला जमिनीच्या बाबतीत, वरिष्ठ धारक, आणि

(ग) कुळाच्या भोगवट्यातील जमिनीच्या बाबतीत, जर संबंधित कुळविहवाट कायद्यान्वये त्याबाबत जमीन महसूल देण्यास असे कूळ जबाबदार असेल तर ते कूळ,

जमीन महसुलाची सर्व थकबाकी धरून, त्या जमिनीच्या बाबतीत देय असलेला जमीन महसूल देण्यासाठी राज्य शासनास प्रथमतः जबाबदार असेल. या कलमान्वये प्रथमतः जबाबदार असणारे संयुक्त भोगवटादार आणि संयुक्त धारक हे संयुक्तपणे आणि पृथकपणे जबाबदार असतील.

(२) या कलमान्वये प्रथमतः जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीने कसूर केल्यास ती जमीन ताब्यात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून वर निर्दिष्ट केलेली थकबाकी धरून जमीन महसूल वसूल करण्यात येईल :

परंतु, अशी व्यक्ती कूळ असेल तर तिच्याकडून वसूल करावयाची रक्कम, ज्या वर्षात वसुली केली जात असेल त्या वर्षाच्या मागणीपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, जेव्हा या कलमान्वये जमीन महसूल देण्यास जी व्यक्ती प्रथमतः जबाबदार नसेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून जमीन महसूल वसूल करण्यात आला असेल तेव्हा तिला, जी व्यक्ती प्रथमतः जबाबदार असेल अशा व्यक्तीस तिने योग्य रीतीने जी कोणतीही रक्कम दिली असती अशी रक्कम म्हणून अशा व्यक्तीच्या खाती जमेस दाखवण्यात येईल आणि जी व्यक्ती प्रथमतः जबाबदार असेल अशा व्यक्तीशी तिचा जो हिशेब असेल त्यामध्ये तिच्याकडून वसूल करण्यात आलेली ही जमेच्या बाजूस दाखविली जाण्याचा तिला हक्क असेल.

राज्य शासनाला येणे असलेल्या रकमांना इतर सर्व मागण्यांवर प्राधान्य देणे.

**१६९.** (१) जमिनीच्या संबंधात देय झालेल्या जमीन महसुलाची थकबाकी त्या जमिनीवरील आणि तिच्या प्रत्येक भागावरील सर्वश्रेष्ठ भार राहील आणि कोणत्याही जमिनीच्या किंवा तिच्या धारकाच्या कोणत्याही इतर कर्जावर, मागणीवर किंवा कोणत्याही मागणी हक्कावर—मग ते गहाण न्यायालयीन हुकूमनामा अंमलबजावणी किंवा जप्ती यांच्या संबंधातील असोत वा अन्यथा इतर कोणत्याही प्रकारचे असोत—त्यास प्राधान्य मिळेल.

(२) जमीन महसुलाच्या थकबाकीखेरीज इतर, परंतु या प्रकरणाच्या तरतुदींन्वये महसुली मागणी म्हणून वसूल करता येईल अशा कोणत्याही पैशासंबंधीच्या राज्य शासनाच्या मागणीस, कोणत्याही जमिनीच्या किंवा तिच्या धारकाच्या सर्व असंरक्षित मागण्यांवर अग्रक्रम देण्यात येईल.

ज्या दिनांकाला जमीन महसूल देय होतो आणि द्यावयास पाहिजे ते दिनांक.

**१७०.** (१) महसुली वर्षासाठी देण्याजोगा असेल असा जमीन महसूल त्या वर्षाच्या पहिल्या दिवशी देय होईल ; परंतु कलम १७१ च्या तरतुदींअन्वये एखाद्या गावाची किंवा गावाच्या भागाची तात्पुरती जप्ती व व्यवस्था करणे आवश्यक वाटत असेल त्या खेरीज, पोट-कलम (२) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे जे दिनांक ठरविण्यात येतील अशा दिनांकालाच पैसे भरणे आवश्यक असेल.

(२) जमीन महसूल हप्त्यांनी आणि महसुली वर्षाच्या पहिल्या दिवसानंतरच्या दिनांकाला (यात यापुढे ज्यांचा "विहित केलेले दिनांक" असा उल्लेख करण्यात आला आहे) देण्याबाबत तरतूद करणारे नियम राज्य शासनाला करता येतील, आणि अशा नियमांद्वारे असे हप्ते ज्या व्यक्तींना आणि ज्या ठिकाणी देण्यात येतील त्या व्यक्ती व ती ठिकाणे विहित करता येतील.

(३) जमीन महसूल पोट-कलम (२) अन्वये विहित केलेल्या व्यक्तींकडे रोख पैशाच्या स्वरूपात किंवा पैसे पाठविणाऱ्या व्यक्तीच्या खर्चाने मनिऑर्डरद्वारे भरता येईल.

(४) महसुली वर्षाचा पहिला दिवस आणि जमीन महसूल देण्यासाठी अशा नियमांन्वये ठरविण्यात आलेला कोणताही दिनांक यांमधील कोणतीही मुदत सवलतीची मुदत असल्याचे मानण्यात येईल, आणि त्यामुळे पोट-कलम (१) च्या तरतुदींस बाध येणार नाही.

**१७१.** (१) संपूर्ण गावाचा किंवा गावाच्या हिश्श्याचा समावेश होणाऱ्या कोणत्याही धारण जमिनीच्या बाबतीतील जमीन महसूल ज्यावेळी देय होईल त्यावेळी तो, हिस्सेदारांत वाद असल्यामुळे किंवा इतर कारणामुळे देण्यात येणार नाही असे जिल्हाधिकाऱ्यास सकारण वाटत असेल तर त्यास असे गाव किंवा गावाचा हिस्सा यावर जप्ती आणण्याची व्यवस्था करता येईल आणि तो आपल्या स्वतःच्या व्यवस्थेखाली किंवा उक्त कारणासाठी तो ज्याला नियुक्त करील अशा कोणत्याही अभिकर्त्याच्या व्यवस्थेखाली घेता येईल.

तात्पुरती जप्ती आणि गाव किंवा गावाचा हिस्सा यांची व्यवस्था.

(२) कलम १८६ च्या तरतुदी अशारीतीने जप्त केलेल्या कोणत्याही गावास किंवा गावाच्या हिश्श्यास लागू असतील, आणि जो जमीन महसूल देय असेल तो व जर कलम १८७ च्या तरतुदींन्वये महसुली मोजणीची सुरुवात केली असेल तर महसुली मोजणी सुरू केल्यामुळे झालेला खर्च यांचा समावेश करून अशी जप्ती आणि व्यवस्थापन याबद्दलचा खर्च वजा जाता जप्त केलेल्या जमिनीचा सर्व शिल्लक राहिलेला फायदा, तो मिळण्याचा ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना हक्क असेल तिच्या किंवा त्यांच्या परिणामरूप फायद्यासाठी ठेवण्यात येईल किंवा जिल्हाधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे उक्त व्यक्तीस किंवा व्यक्तींना वेळोवेळी देण्यात येईल.

**१७२.** एखाद्या गावाची किंवा गावाच्या हिश्श्याची कलम १७१ अन्वये केलेली तात्पुरती जप्ती व व्यवस्था महसूल देण्यासाठी जी व्यक्ती प्रथमतः जबाबदार असेल अशी व्यक्ती किंवा प्रथमतः जबाबदार असणाऱ्या व्यक्तीने कसूर केल्यास असा महसूल देण्यासाठी जी व्यक्ती जबाबदार राहील अशी कोणतीही व्यक्ती, अशी जप्ती व व्यवस्था सोडून देण्यात येईपर्यंत जिल्हाधिकाऱ्याने कायदेशीररीत्या केलेला कोणताही खर्च, असल्यास तो देईल तर आणि यानंतर समाविष्ट केलेल्या तरतुदींन्वये ज्यावेळी महसूल देय होईल त्यावेळी किंवा तो जर हप्त्यांनी द्यावयाचा असेल तर ज्या हप्त्यांनी तो द्यावयाचा असेल त्या हप्त्यांनी तो दिला जाईल याबद्दल जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल असे तारण देईल तर, सोडून देण्यात येतील.

तारण देण्यात आल्यानंतर गावाची किंवा गावाच्या हिश्श्याची तात्पुरती जप्ती किंवा व्यवस्था सोडून देणे (काढून घेणे.)

**१७३.** देय झालेला आणि विहित केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी न दिलेला कोणताही जमीन महसूल, त्या दिनांकापासून थकबाकी होईल आणि कलम १६८ च्या तरतुदींन्वये किंवा अन्यथा तो देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्ती कसूर करणाऱ्या व्यक्ती ठरतील.

‘ थकबाकी ’ विषयी ‘ कसूर करणारी व्यक्ती ’.

**१७४.** विहित केलेल्या दिनांकानंतर एक महिन्याच्या आत, जमीन महसुलाचा कोणताही हप्ता किंवा त्याचा कोणताही भाग भरलेला नसेल तर, जिल्हाधिकाऱ्यास, हेतपुरस्सर कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत अशारीतीने न भरलेल्या रकमेच्या पंचवीस टक्क्यांहून अधिक नसेल इतकी शास्ती लादता येईल :

जमीन महसूल भरण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

परंतु, ज्या मुदतीत भरणा तहकूब केला गेला होता अशा मुदतीत (ज्याचा भरणा राज्य शासनाच्या आदेशाद्वारे तहकूब केला गेला होता) असा कोणताही हप्ता न भरल्याबद्दल अशाप्रकारची कोणतीही शास्ती लादण्यात येणार नाही.

प्रमाणित केलेले हिशेब हे थकबाकी विषयीचा पुरावा असणे.

**१७५.** (१) जिल्हाधिकाऱ्याने किंवा सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याने किंवा तहसीलदाराने प्रमाणित केलेले लेख्याचे विवरणपत्र या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी देय असलेल्या जमीन महसुलाच्या रकमेची थकबाकी असल्याबद्दलचा आणि जिने कसूर केली असेल अशा व्यक्तीसंबंधीचा निर्णायक पुरावा असेल.

(२) लेख्याचे असे प्रमाणित विवरणपत्र मिळाल्यानंतर, एखाद्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने किंवा सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याने किंवा तहसीलदाराने इतर कोणत्याही जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या मागण्या जणू काही त्या मागण्या त्याच्या स्वतःच्या जिल्हामध्ये उत्पन्न झाल्या असल्याप्रमाणे या प्रकरणाच्या तरतुदींन्वये त्या वसूल करण्यासाठी कार्यवाही करणे कायदेशीर असेल.

(३) मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या अशाच लेख्याच्या विवरणपत्रावरून, जणू काही ते एखाद्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने या संहितेअन्वये प्रमाणित केले असल्याप्रमाणे, कार्यवाही करता येईल.

थकबाकीच्या वसुलीची कार्यपद्धती.

**१७६.** जमीन महसुलाची थकबाकी पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक कार्यपद्धतीनुसार वसूल करता येईल :—

(क) कसूर करणाऱ्या व्यक्तीवर कलम १७८ अन्वये मागणीची लेखी नोटीस बजावून ;

(ख) ज्या भोगवट्याच्या किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीच्या संबंधाने थकबाकी येणे असेल त्या भोगवट्याचे किंवा त्या धारण केलेल्या दुमाला जमिनीचे कलम १७९ अन्वये समपहरण करून ;

(ग) कसूर करणाऱ्या व्यक्तीची जंगम मालमत्ता कलम १८० अन्वये अटकावून आणि तिची विक्री करून ;

(घ) कसूर करणाऱ्या व्यक्तीची स्थावर मालमत्ता कलम १८१ अन्वये जप्त करून आणि तिची विक्री करून ;

(ङ) कसूर करणाऱ्या व्यक्तीची स्थावर मालमत्ता कलम १८२ अन्वये जप्त करून ;

(च) कसूर करणाऱ्या व्यक्तीस कलम १८३ आणि १८४ अन्वये अटक करून व तिला कैदेत ठेवून ;

(छ) धारण केलेल्या दुमाला जमिनी, संपूर्ण गावे किंवा गावांचे हिस्से मिळून झालेल्या असतील त्या बाबतीत, कलमे १८५ ते १९० (दोन्ही धरून) अन्वये उक्त गावे किंवा गावांचे हिस्से जप्त करून.

परंतु, खंड (ग), (घ) आणि (ङ) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार पुढील गोष्टींची जप्ती आणि विक्री करता येणार नाही :—

(एक) कसूर करणाऱ्या व्यक्तीचे, तिच्या पत्नीचे व मुलांचे जरूरीचे वापरण्याचे कपडे-लत्ते, स्वयंपाकाची भांडी आणि अंथरूण-पांघरूण आणि खाटा आणि धार्मिक रुढीप्रमाण कोणत्याही स्त्रीने अंगावर काढू नयेत असे तिचे वैयक्तिक दागिने ;

(दोन) कारागिरांची हत्यारे, आणि कसूर करणारी व्यक्ती जर शेतकरी असेल तर यांत्रिक शक्तीने चालणाऱ्या अवजाराव्यतिरिक्त, शेती करण्याची त्याची अवजारे आणि जिल्हाधिकाऱ्याच्या मते शेतकरी म्हणून आपला चरितार्थ चालावा यासाठी त्यास आवश्यक असतील अशी गुरे व बी-बीयाणे, आणि पुढील हंगामापर्यंत जमिनींची यथोचित मशागत करण्यासाठी आणि दारकाच्या व त्याच्या कुटुंबाच्या निर्वाहासाठी तरतूद करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याच्या मते शेतीच्या उत्पन्नाचा जो भाग असेल असा भाग ;

(तीन) फक्त धार्मिक देणग्यांच्या उपयोगासाठी राखून ठेवलेल्या वस्तू ;

(चार) शेतकऱ्यांच्या मालकीची आणि त्यांच्या भोगवट्यात असलेली घरे आणि इतर इमारती (त्यांचे सामान व त्यांची जागा आणि त्यांना लागून असलेली व त्यांच्या उपभोगात आवश्यक असलेली जमीन, यांसह).

**१७७.** मागील वर्षांच्या, तसेच चालू वर्षाच्या थकबाकीच्या वसुलीसाठी उक्त कार्यपद्धती अमलात आणता येईल.

मागील वर्षांच्या महसुली मागण्या कशा वसूल करावयाच्या.

**१७८.** (१) मागणीची नोटीस, ज्या दिनांकास थकबाकी देणे होईल त्या दिनांकाच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतरच्या दिवशी देता येईल.

मागणीची नोटीस केव्हा देता येईल.

(२) आयुक्तास अशा नोटिसा देण्यासाठी वेळोवेळी आदेश देता येतील, आणि तो, राज्य शासनाच्या मंजुरीने, कसूर करणाऱ्या व्यक्तीकडून महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करावयाचा खर्च ठरविल आणि अशा नोटिसा कोणत्या अधिकाऱ्यांनी दिल्या पाहिजेत याबाबत निदेश देईल.

**१७९.** जिल्हाधिकाऱ्यास, ज्या वहिवाटीबाबत किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीबाबत जमीन महसुलाची थकबाकी येणे असेल अशा वहिवाटी किंवा धारण केलेली दुमाला जमीन सरकारजमा केल्याचे जाहीर करता येईल आणि या बाबतीत केलेल्या नियमांना अधीन राहून, त्या वहिवाटींची किंवा जमिनीची कलम ७२ किंवा ७३ याच्या तरतुदींअन्वये विक्री करता येईल किंवा अन्यथा त्यांचा विनियोग करता येईल आणि त्याचे उत्पन्न आल्यास ते उत्पन्न कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या खाती जमा करता येईल :

ज्या वहिवाटींबाबत किंवा धारण केलेल्या दुमाला-जमीनींबाबत थकबाकी येणे असेल त्या वहिवाटी किंवा धारण केलेली दुमालाजमीन जप्त करता येईल.

---

१. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

परंतु, जिल्हाधिकारी अशी कोणतीही वहिवाटीची किंवा धारण केलेली दुमाला जमीन—

(क) सरकारजमा करण्यापूर्वी, स्थावर मालमत्तेच्या विक्रीसंबंधी कलमे १९२ व १९३ या अन्वये तरतूद केलेल्या रीतीने त्याने उद्घोषणा केल्याशिवाय आणि घोषणेच्या इराद्याच्या लेखी नोटिसा काढल्याशिवाय ;

(ख) कलम १९३ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे उक्त नोटिसांपैकी कोणतीही नोटीस उशिरात उशिरा ज्या दिनांकास चिकटविण्यास आली असेल त्या दिनांकापासून निदान पंधरा दिवसांची मुदत संपेपर्यंत ;

त्या वहिवाटी व धारण केलेली दुमाला जमीन सरकारजमा केल्याचे जाहीर करणार नाही.

कसूर करणाऱ्या व्यक्तींची जंगम मालमत्ता अटकावणे व तिची विक्री.

**१८०.** (१) जिल्हाधिकाऱ्यास, कसूर करणाऱ्या व्यक्तींची जंगम मालमत्ता अटकाविण्याची व तिची विक्री करण्याची व्यवस्था करता येईल.

(२) राज्य शासनाच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी वेळोवेळी निदेश देईल अशा अधिकाऱ्यांकडून किंवा अधिकाऱ्यांच्या वर्गाकडून अशी मालमत्ता अटकावण्यात येईल.

कसूर करणाऱ्या व्यक्तींच्या स्थावर मालमत्तेची विक्री.

**१८१.** ज्या जमिनीबाबत थकबाकी येणे असेल अशा जमिनीखेरीज इतर कोणत्याही स्थावर मालमत्तेतील, कसूर करणाऱ्या व्यक्तींचा [१][(अनुसूचित जमातीची नसलेली व्यक्ती)] हक्क, मालकी हक्क व हितसंबंध यांची जप्ती व विक्रीसुद्धा जिल्हाधिकाऱ्यास करविता येईल.

**१८२.** (१) थकबाकीच्या वसुलीसंबंधीच्या पूर्ववर्ती तरतुदींमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतींपैकी कोणत्याही कार्यपद्धती स्वीकारणे इष्ट आहे असे जिल्हाधिकाऱ्यास वाटत असेल तर, [१][तो, स्थावर मालमत्ता अनुसूचित जमातीमधील व्यक्तीच्या मालकीची असेल त्या बाबतीत, कसूर करणाऱ्या व्यक्तींची स्थावर मालमत्ता जप्त करायला लावील आणि ती त्याच्या स्वतःच्या किंवा त्या प्रयोजनासाठी त्यास नियुक्त करता येईल अशा कोणत्याही अभिकर्त्याच्या व्यवस्थेखाली आणून घेईल आणि इतर कोणत्याही बाबतीत त्यास तसे करवून घेता येईल.] कसूर करणाऱ्या व्यक्तींची स्थावर मालमत्ता जप्त करण्याचा आणि तो व्यवस्थेखाली आणण्याचा अधिकार.

(२) जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा रीतीने नियुक्त केलेल्या अभिकर्त्यास, जप्त केलेल्या जमिनींची व्यवस्था पाहण्याचा आणि जिल्हाधिकारी कसूर करणाऱ्या व्यक्तीकडे त्या जमिनीची व्यवस्था परत देईपर्यंत त्या जमीनींपासून मिळणारा सर्व खंड किंवा नफा स्वीकारण्याचा हक्क असेल.

(३) जप्त केलेल्या जमिनीच्या उत्पन्नातून चालू महसूलाची रक्कम धरून अशा जप्तीचा आणि व्यवस्थेचा खर्च वजा जाता शिल्लक राहिलेल्या सर्व नफ्यांचा विनियोग अशा जमिनींच्या संबंधात येणे असलेलल्या थकबाकीची रक्कम फेडण्याकडे करण्यात येईल.

(४) अशा रीतीने जप्त करण्यात आलेली जमीन जप्तीतून मुक्त करण्यासाठी व कसूर करणाऱ्या व्यक्तीकडे परत करण्यासाठी अशा जप्तीच्या दिनांकापासून बारा वर्षांच्या आत कोणत्याही वेळी, कसूर करणाऱ्या व्यक्तीने जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज केल्यानंतर—

(क) ज्यावेळी असा अर्ज केला असेल त्यावेळी थकबाकीची फेड करण्यात आली आहे असे आढळून आले असेल ; किंवा

(ख) तिच्याकडून अद्याप येणे असलेली बाकी असल्यास, जर कसूर करणारी व्यक्ती ती देण्यास तयार असेल आणि जिल्हाधिकारी त्या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत ती रक्कम ती देईल तर ; अशा रीतीने जप्त केलेली जमीन, जप्तीतून मुक्त करण्यात येईल व ती कसूर करणाऱ्या व्यक्तीस परत देण्यात येईल.

(५) अशी जमीन परत मिळविण्यासाठी बारा वर्षांच्या आत अर्ज करण्यात आला नसेल किंवा असा अर्ज करण्यात आल्यानंतर, कसूर करणाऱ्या व्यक्तीने तिच्याकडून अद्याप येणे असलेली बाकी असल्यास, अशी बाकी याबाबतीत जिल्हाधिकारी विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत देण्यात कसूर केली असेल तर, जिल्हाधिकाऱ्यास अशी जमीन जप्त करण्यापूर्वी निर्माण केलेल्या भारांनी बाध न आणता, कसूर करणाऱ्या व्यक्तीचे त्या जमिनीतील अधिकार, हक्क आणि हितसंबंध विकता येतील ; आणि जिल्हाधिकारी, विक्रीच्या उत्पन्नातून राज्य शासनास येणे असलेली व विक्रीबाबतच्या खर्चाची वजा करून ते कसूर करणाऱ्या व्यक्तीकडे सुपूर्द करील.

**१८३.** (१) कोणतीही थकबाकी देय झाल्यानंतर कोणत्याही वेळी, (ज्याच्याकडून त्याचा भोगवाट्याच्या संबंधात अशी थकबाकी येणे असेल असा शेतकरी नसेल अशा) कसूर करणाऱ्या व्यक्तीस अटक करता येईल किंवा तिला जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा तहसिलदाराच्या कार्यालयातील अभिरक्षेत तिने शास्तीची रक्कम किंवा व्याजाची रक्कम धरून देणे असलेला महसूल आणि तिला अटक करण्याचा आणि मागणीची नोटीस बजावण्याचा खर्च आणि स्थानबद्धतेच्या मुदतीत तिच्या निर्वाहासाठी झालेला खर्च लवकरात लवकर देईपर्यंत, दहा दिवसापर्यंत स्थानबद्ध ठेवता येईल : कसूर करणाऱ्या व्यक्तीस अटक करणे आणि स्थानबद्ध करणे.

परंतु, कसूर हेतुपुरस्सर करण्यात आली असल्याशिवाय आणि कसूर करणाऱ्या व्यक्तीस तिच्या अटकेविरूद्ध कारण दाखविण्याची संधी दिल्याशिवाय अशी कोणतीही अटक करण्यात येणार नाही.

---

[१]सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, याच्या कलम ५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) दहा दिवसांची मुदत संपल्यानंतर कसूर करणाऱ्या व्यक्तीने जी रक्कम देणे असेल ती रक्कम तीने दिली नाही तर, किंवा दहा दिवसांच्या आत कोणत्याही दिवशी जर जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल तर, अनुसूची "क" मधील नमुन्यातील अधिपत्राद्वारे जिल्ह्याच्या दिवाणी तुरुंगात तिला कैदेत ठेवण्यासाठी पाठविता येईल :

परंतु कोणत्याही कसूर करणाऱ्या व्यक्तीस तिच्याकडून येणे असलेल्या महसुलाच्या थकबाकीच्या रकमेइतक्या कर्जाबद्दल दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्याच्या अंमलबजवणीच्या बाबतीत कायद्यान्वये जी मुदत मर्यादीत करण्यात आली असेल त्या मुदतीपेक्षा अधिक मुदतीपर्यंत कैदेमध्ये अटकावून ठेवण्यात येणार नाही.

अटक करण्याच्या अधिकाराचा वापर कोणी करावयाचा.

**१८४.** कलम १८३ अन्वये प्रदान केलेल्या अटक करण्याच्या अधिकाराचा, कोणत्या अधिकाऱ्यांनी किंवा कोणत्या वर्गाच्या अधिकाऱ्यांनी वापर करावयाचा हे, राज्य शासनास, वेळोवेळी जाहीर करता येईल आणि तसेच त्यास, अटकेबाबतचा खर्च आणि स्थानबद्ध केलेल्या किंवा कैद केलेल्या कोणत्याही कसूर करणाऱ्या व्यक्तीस राज्य शासनाने द्यावयाची निर्वाहाची रक्कम ठरविता येईल.

कसूर करणाऱ्या व्यक्तींचे गाव जप्त करण्याचा आणि व्यवस्थेखाली आणण्याचा अधिकार.

**१८५.** धारण केलेल्या ज्या जमिनीच्या बाबतीत थकबाकी येणे असेल, अशी जमीन, संपूर्ण दुमाला गाव किंवा दुमाला गावाचा एखादा भाग असेल, आणि पूर्वी विनिर्दिष्ट केलेल्या इतर कार्यपद्धतीपैकी कोणतीही कार्यपद्धती स्वीकारणे इष्ट वाटत नसेल तर, जिल्हाधिकाऱ्यास, आयुक्ताच्या पूर्वमंजुरीने असे गाव किंवा गावाचा भाग जप्त करता येईल आणि ते गाव किंवा त्याचा भाग त्याच्या स्वतःच्या किंवा त्या कारणासाठी त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही अभिकर्त्याच्या व्यवस्थेखाली घेता येईल.

अशा गावाच्या जमिनी भारांपासून मुक्त अवस्थेत परत मिळणे.

**१८६.** अशा रीतीने जप्त केलेल्या कोणत्याही गावाच्या किंवा गावांच्या हिश्श्यांच्या जमिनी, वरिष्ठ धारकाच्या किंवा हिस्सेदारांपैकी कोणत्याही हिस्सेदारांच्या कृत्यांचा किंवा अशा जमिनीवर किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या वरिष्ठ धारकावर किंवा हिस्सेधारांवर जे कोणतेही बोजे किंवा दायित्वे असतील अशा बोजांचा किंवा दायित्वांचा, सरकारी महसुलाशी संबंध येत असेल तेथवर, परंतु, इतर बाबतीत व्यक्तींच्या अधिकारास बाध येऊ न देता, राज्य शासनाकडे परत घेण्यात येतील ; आणि जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा रीतीने नियुक्त केलेल्या अभिकर्त्यास, उक्त वरिष्ठ धारकाकडे जप्त केलेल्या जमिनींची व्यवस्था जिल्हाधिकाऱ्यांकडून परत देण्यात येईपर्यंत, जप्त केलेल्या जमिनींची व्यवस्था पाहण्याचा आणि वरिष्ठ धारक किंवा तिच्या हिस्सेदारांपैकी कोणत्याही हिस्सेदारास वगळून, त्या जमिनीपासून मिळणारा सर्व खंड व नफा मिळण्याचा हक्क असेल.

शासनाच्या मालकीची नसलेली परंतु राज्य शासनाच्या तात्पुरत्या व्यवस्थेखाली असलेली गावे किंवा संपदा यांची महसूल व्यवस्था.

**१८७.** कोणतेही दुमाला गाव किंवा संपदा राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांच्या तात्पुरत्या व्यवस्थापनाखाली आली असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्यांने भू-मापन व्यवस्थेवरून ठरविलेल्या दरांनी किंवा जे दर त्यास वाजवी वाटतील अशा इतर निश्चित केलेल्या दरांनी त्यातील जमिनी भाड्याने देणे आणि त्यातील भोगवाट्यात नसलेल्या जमिनी पट्ट्याने देणे आणि दुमाला नसलेल्या जमिनींच्या व्यवस्थापनासंबंधीच्या नियमांन्वये, ते जेथवर लागू असतील तेथवर, आणि उक्त गाव किंवा संपदा जोपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांच्या व्यवस्थेखाली असेल तोपर्यंत, त्यांच्या महसुलाची व्यवस्था अन्य रीतीने करणे हे कायदेशीर असेल ; परंतु, अशा गावाच्या किंवा संपदेच्या वरिष्ठ धारकाने जमिनिसंबंधी केलेल्या कोणत्याही लेखी करारावर, अशा जमिनीवरील राज्य शासनाच्या कायदेशीर हक्कास ज्या मर्यादेपर्यंत नुकसान पोहचणार नाही त्या मर्यादेपर्यंत, या कलमान्वयेच्या कोणत्याही कार्यवाहीमुळे परिणाम होणार नाही.

**१८८.** जप्त केलेल्या जमिनीच्या उत्पन्नातून चालू महसुलाचा भरणा आणि जर कलम १८७ च्या तरतुदींअन्वये महसुली मोजणी सुरू करण्यात आली असेल तर ती सुरू करण्याचा खर्च धरून अशी जप्ती व व्यवस्था याबद्दलचा खर्च वजा जाता शिल्लक राहिलेल्या सर्व नफ्यांचा विनियोग उक्त थकबाकीची रक्कम फेडण्यासाठी करण्यात येईल. शिल्लक राहिलेल्या नफ्याचा विनियोग.

**१८९.** (१) अशी रीतीने जप्त केलेले गाव किंवा गावाचा हिस्सा जप्तीमधून मुक्त करण्यासाठी आणि, वरिष्ठ धारकाकडे त्याची व्यवस्था परत करण्यासाठी, अशा जप्तीनंतर लगतच्या कृषी वर्षाच्या सुरूवातीपासून बारा वर्षाच्या आत कोणत्याही वेळी उक्त वरिष्ठ धारकाने जिल्हाधिकार्याकडे अर्ज केल्यास,– अशा रीतीने जप्त केलेले गाव परत देणे.

(क) ज्यावेळी असा अर्ज केला असेल त्यावेळी थकबाकी देण्यात आली आहे असे आढळून आले; किंवा

(ख) उक्त वरिष्ठ धारकाकडून अद्याप बाकी येणे असल्यास अशी बाकी देण्यास तो तयार असेल आणि जिल्हाधिकारी त्याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत ती रक्कम तो देईल तर,

अशा रीतीने जप्त केलेले गाव किंवा गावाचा हिस्सा जप्तीमधून मुक्त करण्यात येईल व वरीष्ठ धारकाकडे त्यांची व्यवस्था परत करण्यात येईल.

(२) गाव किंवा गावाचा भाग परत मिळण्यासाठी ज्या वर्षामध्ये त्याने अर्ज केला असेल त्या वर्षात जमा झालेल्या रकमांतून सर्व थकबाकी व खर्च वजा करून जर कोणत्याही शिलकी जमा रकमा असतील तर त्या जिल्हाधिकारी वरिष्ठ धारकास देईल; परंतु मागील वर्षातील अशा शिलकी जमा रकमा असल्यास त्या राज्य शासनाच्या स्वाधीन राहतील.

**१९०.** अशा रीतीने जप्त केलेले गाव किंवा गावाचा भाग परत मिळविण्यासाठीचा अर्ज उक्त बारा वर्षाच्या मुदतीत करण्यात आला नसेल किंवा असा अर्ज करण्यात आल्यानंतर, वरिष्ठ धारकाने त्याच्याकडून अद्याप येणे असलेली बाकी असल्यास, ती बाकी याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने विहित केलेल्या मुदतीत देण्यात कसूर केली असेल तर, उक्त गाव किंवा गावाचा भाग हा, त्यानंतर, वरिष्ठ धारक किंवा हिस्सेदारापैकी कोणताही हिस्सेदार यांनी किंवा त्याच्या अथवा त्यांच्या हक्क पूर्वाधिकाऱ्यापैकी कोणत्याही हक्क पूर्वधिकाऱ्याने निर्माण केलेले सर्व भार, किंवा अशा वरिष्ठ धारकावर किंवा हिस्सेदारापैकी कोणत्याही हिस्सेदारावर कोणत्याही रीतीने असलेले भार यापासून मुक्त होऊन राज्य शासनाकडे निहित होईल; परंतु त्यामुळे जमीन ज्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष कब्जात असेल अशा व्यक्तीच्या हक्कांस बाध येणार नाही. गाव वगैरे बारा वर्षात विमोचित करण्यात आले नाही तर ते राज्य शासनाकडे निहित होणे.

**१९१.** (१) अभिरक्षेत किंवा कैदेत ठेवलेल्या कोणत्याही कसूर करणाऱ्या व्यक्तींनी जिल्हाधिकाऱ्यापुढे किंवा उक्त कारणासाठी जिल्हाधिकाऱ्याने नामनिर्देशित केलेल्या इतर व्यक्तीपुढे किंवा कसूर करणारी व्यक्ती जर तुरूंगात असेल तर अशा तुरूंगाच्या प्रभारी अधिकाऱ्यापुढे, जिल्हाधिकाऱ्याचे किंवा अशा इतर व्यक्तीचे किंवा अधिकाऱ्याचे समाधान होईल असे अनुसुची-ख मधील नमुन्यातील तारण दिल्यास अशा कसूर करणाऱ्या व्यक्तीस ताबोडतोब सोडून देण्यात येईल आणि वसुलीच्या सर्व कार्यवाह्या कोणत्याही वेळी थोपविण्यात येतील. परंतु तारण दिल्यानंतर सर्व कार्यवाह्या थोपविणे.

(२) प्रकरणान्वये जिच्या विरूद्ध कार्यवाही करण्यात आली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस मागणी केलेली रक्कम निषेध व्यक्त करून अशी कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यास देता येईल आणि अशा प्रकारे रक्कम दिल्यानंतर त्या कार्यवाह्या थोपविण्यात येतील.

**१९२.** (१) या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये जंगम किंवा स्थावर मालमत्तेच्या विक्रीबाबत आदेश देण्यात आला असेल तेव्हा, जिल्हाधिकारी, विक्रीची वेळ व जागा विनिर्दिष्ट करणारी आणि जंगम मालमत्तेच्या बाबतीत, ती विक्री कायम करण्याच्या अधीन आहे किंवा नाही याविषयीची आणि राज्य शासनास महसूल देणारी जमीन विकावयाची असेल तेव्हा तीवर आकारलेला महसूल व त्यास आवश्यक वाटेल अशा इतर कोणताही तपशील देणारी विहित नमुन्यातील व मराठी भाषांतर सोबत असलेली उद्घोषणा करील. विक्री करण्याच्या वेळची कार्यपद्धती.

(२) जर विक्री स्थावर मालमत्तेची असेल तर अशी उद्‌घोषणा तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी आणि अशी स्थावर मालमत्ता ज्या गावात असेल त्या गावात दवंडी पिटवूण करण्यात येईल; आणि जर विक्री जंगम मालमत्तेची असेल तर अशी मालमत्ता ज्या गावात जप्त करण्यात आली असेल त्या गावात आणि जिल्हाधाकारी निदेश देईल अशा इतर ठिकाणी ती उद्‌घोषणा करण्यात येईल.

(३) या कलमान्वये केलेली उद्‌घोषणा ही कोणत्याही धारण जमिनीच्या विक्रीच्यासंबंधी असेल तेव्हा तिची एक प्रत, धारण जमीन ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी बँकेला किंवा भू-विकास बँकेला किंवा ज्या दोन्ही बँकांना पाठविण्यात येईल.

विक्रींची अधिसूचना.

**१९३.** (१) ज्या स्थावर मालमत्तेची विक्री करण्याचा इरादा असेल त्या मालमत्तेच्या विक्रीची आणि विक्रीची वेळ व जागा याबद्दलची, लेखी नोटीस पुढील प्रत्येक ठिकाणी लावण्यात येईल :—

(क) जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याचे कार्यालय ;

(ख) स्थावर मालमत्ता ज्या तालुक्यात असेल त्या तालुक्याच्या तहसीलदाराचे कार्यालय ;

(ग) ती ज्या गावात असेल त्या गावातील चावडी किंवा इतर कोणतीही सार्वजनिक इमारत; आणि

(घ) कसूर करणाऱ्या व्यक्तीचे राहण्याचे ठिकाण.

(२) जंगम मालमत्तेच्या बाबतीत अशी लेखी नोटीस तहसिलदाराच्या कार्यालयात आणि अशी मालमत्ता ज्या गावात जप्त करण्यात आली होती त्या गावातील चावडीत किंवा कोणत्याही इतर सार्वजनिक इमारतीत लावण्यात येईल.

(३) कोणत्याही विक्रीची नोटीस—मग ती जंगम अथवा स्थावर मालमत्तेची असो—जिल्हाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही रीतीने, प्रसिद्ध करता येईल.

(४) या कलमामध्ये उल्लेख करण्यात आलेली नोटीस विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल.

विक्री कोणी करावयाची; विक्रीची वेळ इत्यादी.

**१९४.** (१) जिल्हाधिकारी निदेश देईल अशा व्यक्ती लिलावाने विक्री करतील.

(२) अशी कोणतीही विक्री रविवारी किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या इतर सार्वत्रिक सुट्टीच्या दिवशी किंवा कलम १९३ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, उक्त नोटीसांपैकी कोणतीही नोटीस ज्या शेवटच्या दिवशी लावली असेल त्या दिवसापासून, स्थावर मालमत्तच्या बाबतीत कमीत कमी तीस दिवसांची मुदत किंवा जंगम मालमत्तेच्या बाबतीत सात दिवसांची मुदत संपेपर्यंत करण्यात येणार नाही.

विक्री तहकूब करणे.

**१९५.** कोणत्याही पुरेशा कारणास्तव विक्री वोळोवेळी तहकूब करता येईल.

परंतु तीस दिवसांपेक्षा अधिक मुदतीसाठी विक्री तहकूब करण्यात आली असेल तेव्हा, नवीन उद्‌घोषणा करण्यात येईल आणि नवीन नोटीस देण्यात येईल. मात्र कसूर करणाऱ्या व्यक्तीने संमती दिल्यास अशी नवीन उद्‌घोषणा करण्याची किंवा नवीन नोटीस देण्याची आवश्यकता नाही.

नाशवंत वस्तूंची विक्री.

**१९६.** कलमे १९२, १९३, १९४ आणि १९५ यांमधील कोणताही मजकूर नाश होणाऱ्या वस्तूंच्या विक्रीस लागू होणार नाही. अशा वस्तू या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याने सर्वसामान्यपणे किंवा विशेषरीत्या वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कोणताही विलंब न लावता लिलावाने विकण्यात येतील.

विक्री केव्हा तांबविता येईल.

**१९७.** कसूर करणारी व्यक्ती किंवा तिच्या वतीने कोणतीही वक्ती, ज्या थकबाकीच्या संबंधात मालमत्ता विकावयाची असेल ती थकबाकी आणि त्याने देणे असलेले सर्व कायदेशीर खर्च मालमत्तेची लिलावात विक्री हाण्यापूर्वी कोणत्याही वेळी, देणे असलेली जमीन महसुलाची रक्कम वसूल करण्यासाठी कलम १७० अन्वये विहित केलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा विक्रीचे काम चालविण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यास देईल किंवा कलम १९१ अन्वये तिने तारण दिले असेल तर, अशी विक्री थांबविण्यात येईल.

**१९८.** नाशवंत वस्तूंची विक्री करणारा अधिकारी अशी विक्री तात्काळ अंतिमरीत्या समाप्त करील. जंगम मालमत्तेची इतर सर्व विक्री, असे विक्रीचे काम चालविणारा अधिकारी याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने सर्वसामान्यपणे किंवा विशेषरीत्या दिलेल्या आदेशामध्ये निदेश दिल्याप्रमाणे अंतिमरीत्या समाप्त करील किंवा ती कायम केली जाण्यास पात्र असेल. कायम केली जाण्यास पात्र असलेल्या विक्रीच्या बाबतीत. अशी विक्री कोणी कायम करावी त्याबद्दल जिल्हाधिकारी निदेश देईल.

जंगम मालमत्तेची विक्री कायम केली जाण्यास केव्हा पात्र असेल.

**१९९.** विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याने अशी विक्री अंतिमरीत्या समाप्त केली असेल तेव्हा प्रत्येक ढिगाची किंमत, विक्रीच्या वेळी किंवा त्यानंतर उक्त अधिकारी निदेश देईल त्यावेळी देण्यात येईल, आणि अशी रक्कम देण्यात कसूर केल्यास मालमत्ता ताबडतोब पुन्हा विक्रीसाठी काढण्यात येईल व तिची विक्री करण्यात येईल. खरेदीचा पैसा देण्यात आल्यानंतर विक्री करणारा अधिकारी त्याबद्दल पावती देईल, [१][आणि कलम २०६ अन्वये कोणताही अर्ज करण्यात आला नसेल तर, विक्रीच्या दिनांकापासून सात दिवसांची मुदत संपल्यावर विक्री सर्व व्यक्तींच्या बाबतीत कायम होईल. पण असा अर्ज करण्यात आला असेल तर तो फेटाळण्यात आल्याच्या दिनांकापासून अशी विक्री कायम होईल.]

विक्री अंतिम रीत्या समाप्त करण्यात आली असेल तेव्हा जंगम मालमत्ते बद्दल रक्कम देण्याची रीत.

**२००.** (१) जेव्हा विक्री कायम केली जाण्यास पात्र असेल तेव्हा, खरेदीदार म्हणून जाहीर करण्यात आलेल्या पक्षकारास, त्याने बोली केलेल्या रकमेच्या पंचवीस टक्के रक्कम ताबोडतोब अनामत ठेवण्यास फर्माविण्यात येईल आणि अशी रक्कम अनामत ठेवण्यात कसूर केल्यास ती मालमत्ता ताबडतोब विक्रीसाठी पुन्हा काढण्यात येईल व तिची विक्री करण्यात येईल.

विक्री कायम केली जाण्यास पात्र असेल तेव्हा रक्कम देण्याची रीत.

(२) खरेदीदार खरेदीची पूर्ण रक्कम, त्यास विक्री कायम करण्यात आल्याचे कळविण्यात आल्यानंतर तिसऱ्या दिवसाच्या सूर्यास्तापूर्वी किंवा उक्त तिसरा दिवस रविवार किंवा इतर प्राधिकृत सुट्टीचा दिवस असेल तर अशा दिवसानंतरच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सूर्यास्तापूर्वी देईल. खरेदीच्या पैशाची अशी पूर्ण रक्कम देण्यात आल्यावर खरेदीदारास त्याबद्दल पावती देण्यात येईल. [२][आणि कलम २०६ अन्वये कोणताही अर्ज करण्यात आला नसेल तर ती विक्री, विक्रीच्या दिनांकापासून सात दिवसांनंतर सर्व व्यक्तींच्या बाबतीत कायम होईल. पण असा अर्ज करण्यात आला असेल तर तो फेटाळण्यात आल्याच्या दिनांकापासून अशी विक्री कायम होईल.]

**२०१.** स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या सर्व बाबतीत, खरेदीदार म्हणून जाहीर केलेल्या व्यक्तीस त्याने बोली केलेल्या रकमेच्या पंचवीस टक्के रक्कम तात्काळ अनामत ठेवण्यास फर्मावण्यात येईल, आणि अशी रक्कम अनामत ठेवण्यात कसूर केल्यास, उक्त मालमत्ता ताबडतोब पुन्हा विक्रीसाठी काढण्यात येईल व तिची विक्री करण्यात येईल.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या बाबतीत खरेदी दाराने रक्कम अनामत ठेवणे.

**२०२.** खरेदीदार खरेदीची संपूर्ण रक्कम स्थावर मालमत्तेची विक्री ज्या दिनांकास झाली असेल त्या दिनांकापासून दोन महिन्यांची मुदत संपण्यापूर्वी किंवा विक्री कायम केल्याची सूचना खरेदीदारास ज्या दिनांकास मिळाली असेल त्या दिनांकापासून पंधरा दिवसांची मुदत संपण्यापूर्वी, यांपैकी जी मुदत अगोदरची असेल त्या मुदतीपूर्वी देईल :

खरेदीची रक्कम केव्हा द्यावयाची.

परंतु, खरेदीची रक्कम ज्या दिवशी द्यावयाची असेल तो शेवटचा दिवस हा रविवार किंवा इतर प्राधिकृत सुट्टीचा दिवस असेल तर, अशा दिवसाच्या नंतरच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवसाच्या सूर्यास्तापूर्वी अशी रक्कम देण्यात येईल.

---

[१] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, याच्या कलम ६ द्वारे “आणि कलम २०६ अन्वये विक्री रद्द करण्यात आली नसेल तर ती विक्रीच्या तारखेपासून सात दिवसांनंतर सर्व इसमांच्या बाबतीत कायम होईल” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, याच्या कलम ७ द्वारे “आणि अशा विक्रीस कोणत्याही इसमास बाधा आणता येणार नाही” या मजकुराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

कसूर केल्याचा परिणाम.

**२०३.** खरेदीच्या पैशाची संपूर्ण रक्कम-मग ती जंगम मालमत्तेची असो वा स्थावर मालमत्तेची असो-विहित केलेल्या मुदतीत देण्यास कसूर केल्यास अनामत ठेवलेल्या रकमेतून विक्रीचा खर्च भागविण्यात आल्यानंतर शिल्लक अनामत रक्कम राज्य सरकारकडे जमा करण्यात येईल, आणि अशा मालमत्तेची पुन्हा विक्री करण्यात येईल आणि कसूर करणाऱ्या खरेदीदाराचे त्या मालमत्तेवरील सर्व हक्क किंवा ज्या रकमेस ती त्यानंतर विकली जाईल, त्या रकमेच्या कोणत्याही हिश्श्याबाबतचे सर्व हक्क नाहीसे होतील.

फेरविक्रीमुळे झालेल्या नुकसानीबद्दल खरेदीदाराची जबाबदारी.

**२०४.** अशा कसूर करणाऱ्या खरेदीदाराने बोली केलेल्या किंमतीपेक्षा शेवटी जी विक्री करण्यात आली असेल त्या विक्रीचे उत्पन्न कमी असेल तर, त्यात जो फरक येईल तितकी रक्कम जिल्हाधिकाऱ्यास जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे त्याच्याकडून वसूल करता येईल.

फेरविक्री करण्यापूर्वी अधिसूचना.

**२०५.** खरेदीचा पैसा देण्यात कसूर करण्यात आलेल्या मालमत्तेची प्रत्येक फेरविक्री ही, अशी फेरविक्री ताबडतोब करण्यात आली असेल त्याखेरीज, मूळ विक्रीसाठी विहित केलेल्या रीतीने नवीन नोटीस दिल्यानंतर करण्यात येईल.

जंगम मालमत्तेची विक्री रद्द करणे.

**२०६.** नाशवंत वस्तूंखेरीज इतर जंगम मालमत्तेच्या विक्रीसंबंधी प्रसिद्धी करताना किंवा ती विक्री पार पाडताना काही महत्त्वाची नियमबाह्यता किंवा चूक झाल्यामुळे एखाद्या व्यक्तीस बरेच नुकसान पोहोचले आहे असे त्या व्यक्तीने (विक्रीच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत केलेल्या अर्जावरून) जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने सिद्ध केले असेल तर, तर त्या कारणास्तव अशी विक्री रद्द करता येईल.

स्थावर मालमत्तेची विक्री रद्द करण्यासाठी अर्ज.

**२०७.** (१) स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत, कोणत्याही वेळी, अशा विक्रीसंबंधी प्रसिद्धी करताना किंवा ती पार पाडताना काही महत्त्वाची नियमबाह्यता किंवा चूक झाली आहे किंवा लबाडी करण्यात आली आहे या कारणावरून ती विक्री रद्द करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल; परंतु कलमे २०८, २०९ आणि २१० यांमध्ये अन्यथा जी तरतूद केली असेल त्या खेरीज अशा कोणत्याही नियमबाह्यतेमुळे किंवा चुकीमुळे त्याला बरेच नुकसान पोहोचले आहे असे अर्जदाराने, जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने सिद्ध केले नसेल तर अशा कोणत्याही नियमबाह्यतेच्या किंवा चूक झाली असल्याच्या कारणास्तव कोणतीही विक्री रद्द करण्यात येणार नाही :

[१][परंतु, अनुसूचित जमातीच्या कसूरदार व्यक्तीस किंवा तिच्या वतीने कोणत्याही व्यक्तीस अशा दिनांकापासून एकशेऐंशी दिवसांच्या आत असा अर्ज करता येईल.]

(२) असा अर्ज संमत झाला असेल तर, जिल्हाधिकारी विक्री रद्द करील आणि नवीन विक्रीबाबत निदेश देईल.

विक्री कायम करणारा किंवा ती रद्द करणारा आदेश.

**२०८.** विक्रीच्या दिनांकापासून तीस दिवसांची [२][किंवा, यथास्थिती, एकशेऐंशी दिवसांची] मुदत संपल्यानंतर, कलम २०७ मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे असा कोणताही अर्ज करण्यात आला नसेल किंवा असा अर्ज करण्यात आला असेल परंतु, तो फेटाळण्यात आला असेल तर, जिल्हाधिकारी विक्री कायम करणारा आदेश देईल :

परंतु, असा कोणताही अर्ज करण्यात आला नसला तरीही, किंवा जो अर्ज फेटाळण्यात आला असेल अशा कोणत्याही अर्जात दिलेल्या कारणांखेरीज इतर कारणांवरून अशी विक्री रद्द केलीच पाहिजे असे त्यास सकारण वाटत असेल तर त्याच्या कारणांची लेखी नोंद केल्यानंतर, त्यास विक्री रद्द करता येईल.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ६ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**२०९.** जी थकबाकी जमिनीवरील भार असेल अशा थकबाकीबद्दल जमीन विकण्यात आली असेल त्या खेरीज खरेदीदारास विकण्यात आलेल्या मालमत्तेत कसूर करणाऱ्या व्यक्तीचे विक्रीयोग्य हितसंबंध नव्हते या कारणावरून विक्री रद्द करण्यासाठी, विक्रीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या मुदतीत, कोणत्याही वेळी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल; आणि जिल्हाधिकारी योग्य ती चौकशी केल्यानंतर अशा अर्जावर त्यास योग्य वाटतील असे आदेश देईल. विशिष्ट परिस्थितीत खरेदीदारास विक्री रद्द करण्यासाठी अर्ज करता येईल.

**२१०.** (१) या संहितेअन्वये स्थावर मालमत्ता विकण्यात आली असेल तेव्हा, अशा विक्रीच्या पूर्वी संपादन केलेल्या मालकी हक्कामुळे अशा मालमत्तेची मालकी असलेल्या किंवा त्यात हितसंबंध धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा विक्रीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या मुदतीत कोणत्याही वेळी पुढीलप्रमाणे रक्कम अनामत ठेवल्यानंतर विक्री रद्द करण्यात यावी म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल :— मालमत्तेची मालकी असणाऱ्या किंवा त्यात हितसंबंध धारण करणाऱ्या व्यक्तीने विक्री रद्द करण्यासाठी करावयाचा अर्ज.

(क) खरेदीदारास देण्यासाठी खरेदीच्या किमतीच्या शेकडा पाच टक्क्यांइतकी रक्कम ;

(ख) ज्या रकमांच्या वसुलीसाठी विक्री करण्याचा आदेश देण्यात आला होता, अशा उद्घोषणेत विनिर्दिष्ट केलेल्या रकमांतून विक्रीच्या दिनांकापासून त्यासंबंधात देण्यात आली असेल अशी कोणतीही रक्कम वजा करून, थकबाकी देण्यासाठी रक्कम ; आणि

(ग) विक्रीच्या खर्चाची रक्कम :

[१][परंतु, अनुसूचित जमातीच्या अशा कोणत्याही व्यक्तीस विक्रीच्या दिनांकापासून एकशेऐंशी दिवसांच्या आत असा अर्ज करता येईल.]

(२) विक्रीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या [२][किंवा, यथास्थिति, एकशेऐंशी दिवसांच्या] मुदतीत अशी अनामत रक्कम ठेवण्यात आली असेल तर, जिल्हाधिकारी अशी विक्री रद्द करण्याचा आदेश देईल.

**२११.** जेव्हा कोणत्याही मालमत्तेची विक्री कायम करण्यात आली नसेल, किंवा ती रद्द करण्यात आली असेल तेव्हा खरेदीदारास त्याची अनामत रक्कम किंवा, यथास्थिति, त्याची खरेदीची रक्कम आणि कलम २१०, पोट-कलम (१) खंड (क) अन्वये अनामत ठेवलेल्या खरेदीच्या रकमेच्या पाच टक्क्यांइतकी रक्कम परत मिळण्याचा हक्क असेल. विक्री रद्द करण्यात आली असेल तेव्हा अनामत रक्कम किंवा खरेदीची रक्कम परत करणे.

**२१२.** कोणत्याही भोगवट्याच्या अधिकाराची किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीची विक्री उपरोक्त रीतीने कायम केल्यानंतर जिल्हाधिकारी खरेदीदार म्हणून जाहीर केलेल्या व्यक्तीस अशा जमिनीचा ताबा देईल आणि कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या नावाऐवजी, तिचे नाव भोगवटादार किंवा जमिनधारक म्हणून भूमि-अभिलेखात दाखल केले जाण्याची व्यवस्था करील आणि प्रमाणपत्रात निर्दिष्ट केलेली जमीन तिने खरेदी केली आहे अशा आशयाचे एक प्रमाणपत्र तिला देईल. विक्री कायम करण्यात आल्यावर खरेदीदारास ताबा देणे ; खरेदीचे प्रमाणपत्र.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ८ (१) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

प्रमाणित खरेदीदारावर दावा करण्यास मनाई.

**२१३.** विक्रीच्या वेळी प्रत्यक्ष खरेदीदार म्हणून जिला जाहीर करण्यात आले असेल त्या व्यक्तीचे नाव प्रमाणपत्रात नमूद करण्यात येईल; आणि कराराअन्वये प्रमाणित खरेदीदाराच्या नावाचा उपयोग केला असला तरी प्रमाणित खरेदीदाराऐवजी दुसऱ्या व्यक्तीच्या वतीने खरेदी झाली आहे या कारणास्तव प्रमाणित खरेदीदाराविरुद्ध दिवाणी न्यायालयात दाखल करण्यात आलेला कोणताही दावा फेटाळण्यात येईल.

विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग.

**२१४.** (१) या प्रकरणान्वये जंगम मालमत्तेची कोणतीही विक्री अबाधित झाली असेल, आणि स्थावर मालमत्तेची कोणतीही विक्री कायम करण्यात आली असेल तेव्हा, विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग विक्रीच्या खर्च भागविण्यासाठी आणि अशी विक्री कायम केल्याच्या दिनांकास कसूर करणाऱ्या व्यक्तीकडून येणे असेल अशी व जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याजोगी असेल अशी कोणतीही बाकी आणि जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, कसूर करणाऱ्या व्यक्तीकडून वसूल करण्याजोगी आणि अशी विक्री कायम करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यास कळविलेली इतर कोणतीही रक्कम भागविण्यासाठी करण्यात येईल, आणि शिल्लक रक्कम राहिल्यास ती जिची मालमत्ता विकण्यात आली असेल अशा व्यक्तीस देण्यात येईल.

(२) राज्य शासनाच्या आदेशान्वये आयुक्त वेळोवेळी जे दर मंजूर करील व आदेश देईल अशा दरांनी व त्या आदेशानुसार विक्रीच्या खर्चाचा अंदाज करण्यात येईल.

शिल्लक राहिलेली रक्कम न्यायालयाच्या आदेशाखेरीज धनकोस न देणे.

**२१५.** उक्त शिल्लक राहिलेली रक्कम दिवाणी न्यायालयाच्या आदेशाखेरीज ज्या व्यक्तीची मालमत्ता विकण्यात आली आहे अशा व्यक्तीच्या कोणत्याही धनकोस देय होणार नाही.

नंतर देय असलेल्या जमीन महसुलाबद्दल प्रमाणित खरेदीदारच केवळ जबाबदार असणे.

**२१६.** कलम १६८ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, मालकी हक्काच्या प्रमाणपत्रात, खरेदीदार म्हणून ज्या व्यक्तीचे नाव नमूद करण्यात आले असेल ती व्यक्ती, विक्रीच्या दिनांकापूर्वीच्या कोणत्याही मुदतीसाठी, उक्त जमिनीच्या संबंधात देणे असलेल्या जमीन महसुलाबाबत जबाबदार असणार नाही.

खरेदीदाराचा हक्क.

**२१७.** या प्रकरणाच्या तरतुदींन्वये स्थावर मालमत्ता विकण्यात आली असेल आणि अशी विक्री कायम करण्यात आली असेल त्याबाबतीत विक्री कायम करण्यात येईल त्या दिनांकास नव्हे तर मालमत्ता ज्या दिनांकास विकण्यात आली असेल त्या दिनांकास ती खरेदीदाराकडे निहित झाल्याचे मानण्यात येईल.

**२१८.** (१) या संहितेच्या तरतुदींन्वये जप्त केलेल्या किंवा कारवाई केलेल्या मालमत्तेवर, जर एखाद्या तिसऱ्या व्यक्तीने कोणताही दावा सांगितला असेल तर जिल्हाधिकारी वाजवी नोटीस दिल्यानंतर रीतसर चौकशी करून उक्त दावा मान्य करील किंवा तो नाकारील. जप्त केलेल्या मालमत्तेवर केलेले दावे कसे निकालात काढावे.

(२) पोट-कलम (१) अन्वये जिच्या विरुद्ध आदेश देण्यात आला असेल अशा व्यक्तीस, आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत, जप्त करण्यात आलेल्या किंवा कारवाई करण्यात आलेल्या ज्या मालमत्तेवर तो दावा सांगत असेल तो दावा प्रस्थापित करण्याकरिता वाद दाखल करण्यात येईल; परंतु असा कोणताही वाद असल्यास त्या वादाच्या निर्णयास अधीन राहून, असा आदेश अंतिम असेल.

**२१९.** कलम २२० मध्ये जी तरतूद केली असेल त्या खेरीज कोणत्याही विक्रीच्या संबंधात ज्यास कोणतेही कर्तव्य करावयाचे असेल असा कोणताही अधिकारी किंवा इतर व्यक्ती विकण्यात आलेल्या मालमत्तेसाठी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, बोली बोलणार नाही, तीमध्ये कोणताही हितसंबंध संपादन करणार नाही किंवा संपादन करण्याचा प्रयत्न करणार नाही. विक्रीच्या वेळी बोली वगैरे बोलण्यास महसूल अधिकाऱ्यास प्रतिबंध.

**२२०.** या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये केलेल्या कोणत्याही विक्रीमध्ये कोणीही बोली बोलणारी व्यक्ती नसेल किंवा करण्यात आलेली बोली अपुरी किंवा नाममात्र असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने, राज्य शासनाच्या वतीने अशी मालमत्ता त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्यास असा दुय्यम अधिकारी बोली करील अशा बोलीवर खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करणे कायदेशीर असेल : नाममात्र बोलीवर खरेदी करणे.

परंतु अशा रीतीने खरेदी करण्यात आलेली मालमत्ता ही त्यानंतर खरेदी केल्यापासून बारा वर्षांच्या आत राज्य शासनाकडून विकली गेली तर, विक्रीपासून मिळालेल्या उत्पन्नातून पुढील रकमा वसूल करण्यात येतील आणि त्यानंतर रक्कम शिल्लक राहिल्यास ती, ज्या व्यक्तीची मालमत्ता विकण्यात आली असेल त्या व्यक्तीस देण्यात येईल :—

(क) देणे असलेली रक्कम म्हणजेच व्याजासहित बाकी असलेली मुद्दलाची रक्कम ;

(ख) राज्य शासनाकडे जमीन असताना आणि कोणत्याही व्यक्तीने ती पट्ट्याने किंवा अन्यथा घेतली नसेल त्या कालावधीमध्ये राज्य शासनाचे महसूलविषयक कोणतेही नुकसान झाले असेल तर असे नुकसान ;

(ग) लिलावातील विक्रीमध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च ;

(घ) मुद्दलाच्या एक-चतुर्थांश रकमेइतकी शास्ती :

परंतु आणखी असे की, पूर्वोक्तप्रमाणे जर तद्नंतर मालमत्ता विकण्यात आली नसेल तर, उक्त मालमत्ता मागील परंतुकामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणेच्या रकमा कसूर करणाऱ्या व्यक्तीने दिल्यानंतर, राज्य शासनाच्या वतीने ती खरेदी करण्यात आल्याच्या दिनांकापासून बारा वर्षे मुदतीचे आत कोणत्याही वेळी, उक्त कसूर करणाऱ्या व्यक्तीस परत करण्यात येईल किंवा, यथास्थिती, शासनाने ती खरेदी करण्याच्या लगतपूर्वी तिने ज्या भूधारणापद्धतीवर ती धारण केली होती त्या भूधारणापद्धतीवर तिला देण्यात येईल.

**२२१.** (१) (क) या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या जमीन महसुलासंबंधीच्या कोणत्याही अधिनियमान्वये देण्याजोगा किंवा बसविता येण्याजोगा असेल असा जमीन महसूल, खंड, उक्ता खंड (क्विट रेंट), नजराणा, उत्तराधिकारी शुल्क, हस्तांतरण शुल्क आणि जप्ती, उपकर, जमिनीपासूनचे नफे, वित्तलब्धी, फी, भार, दंड, शास्ती, पाणीपट्टी, स्वामित्व धन, खर्च यांबद्दल देणे असलेल्या सर्व रकमा; या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये वसूल करता येईल अशी रक्कम.

(ख) कोणताही खर्च कर, शुल्क, उपकर किंवा फी किंवा महसुलाची कोणतीही इतर बाब यांच्या मक्त्याबाबत कोणत्याही कंत्राटदाराकडून येणे असलेला सर्व पैसा आणि असा कोणताही कंत्राटदार, त्याच्या कराराच्या अटीअन्वये ज्या आर्थिक स्वरूपाच्या शास्तीस पात्र होईल त्या सर्व विशिष्ट आर्थिक स्वरूपाच्या शास्ती ;

(ग) या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा शासनाबरोबर केलेल्या कोणत्याही कराराद्वारे किंवा संविदेद्वारे आकारणी म्हणून किंवा महसुली मागणी म्हणून किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून आकारणीयोग्य असल्याचे जाहीर केलेल्या सर्व रकमा या प्रकरणाच्या पूर्वीपूर्ती तरतुदींअन्वये आकारण्यात येतील आणि या प्रकरणाच्या सर्व तरतुदी या शक्य तेथवर त्यास लागू होतील.

(२) पोट-कलम (१), खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही शेत परत घेण्यात येईल त्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीला, तिने परत मिळण्याच्या अपेक्षेसह ज्या कोणत्याही रकमा कंत्राटदाराला दिल्या असतील त्या रकमांबद्दल कोणतीही रक्कम मिळण्याचा हक्क असणार नाही.

मोफत अनुदानांचा गैरवापर केल्यास, महसुलाच्या थकबाकीप्रमाणे ती वसूल करणे.

**२२२.** ज्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही शेतीच्या प्रयोजनाकरिता राज्य शासनाकडून, अनुदानाच्या शर्तीपैकी, कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात तिने कसूर केल्यास ती ते अनुदान परत करील या शर्तीला अधीन राहून, मोफत अनुदान मिळाले असेल त्या व्यक्तीने, अशा कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात आणि उक्त रक्कम राज्य शासनाला परत करण्यात कसूर केल्यास, ती या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये महसूल देण्यात कसूर करणाऱ्या व्यक्तीप्रमाणे तिच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास पात्र ठरेल आणि या प्रकरणाच्या सर्व पूर्वगामी तरतुदी शक्य असेल तेथवर अशा व्यक्तीस लागू असतील.

जामिनदाराकडून पैशाची वसुली करणे.

**२२३.** जी कोणतीही व्यक्ती या संहितेच्या किंवा इतर कोणत्याही अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये किंवा ज्या कोणत्याही मंजुरीअन्वये, पट्ट्यान्वये किंवा संविदेअन्वये जिच्याबद्दल जामीन दिला आहे अशी रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे मूळ देणेकऱ्याकडून वसूल करण्यासारखी असेल त्या मंजुरीअन्वये, पट्ट्यान्वये किंवा संविदेअन्वये, जामीन राहिले असेल अशी कलम २२१, पोट-कलम (१), खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेला कंत्राटदार धरून, प्रत्येक व्यक्ती तिच्या प्रतिभूति बंधपत्रातील शर्तीप्रमाणे जी रक्कम भरणा करण्यास पात्र झाली असेल ती रक्कम किंवा तिचा कोणताही भाग करण्यात कसूर करील तर, या संहितेच्या तरतुदींअन्वये, ती महसूल देण्यात कसूर करणाऱ्या व्यक्तीप्रमाणे, तिच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास पात्र ठरेल ; आणि अशा व्यक्तीला या प्रकरणाच्या सर्व पूर्वगामी तरतुदी, शक्य असेल तेथवर, लागू असतील.

## प्रकरण बारा

## महसूल अधिकाऱ्यांची कार्यपद्धती

महसूल अधिकाऱ्यांची दुय्यमता.

**२२४.** कार्यालयाची सर्व कामे करण्यात व कामकाज चालविण्यात महसूल अधिकारी कायद्यामध्ये किंवा त्या अन्वयेच्या कोणत्याही नियमात एतद्‌विरुद्ध कोणतीही स्पष्ट तरतूद केली नसेल तर, ज्या अधिकाऱ्याच्या हाताखाली तो काम करीत असेल अशा अधिकाऱ्याने काम करण्याचे ठिकाण, वेळ व कामे पार पाडण्याची रीत याबाबत त्याने दिलेल्या निदेशांस व नियंत्रणास अधीन असेल.

**२२५.** न्यायाच्या उद्देशांकरिता या कलमान्वये आदेश देणे इष्ट आहे असे जेव्हा राज्य शासनाला दिसून येईल तेव्हा त्यास कोणतेही विशिष्ट प्रकरण एका महसूल अधिकाऱ्याकडून काढून त्याच जिल्ह्यातील किंवा कोणत्याही अन्य जिल्ह्यातील त्याच दर्जाच्या किंवा वरिष्ठ दर्जाच्या महसूल अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्याबद्दल निदेश देता येईल. प्रकरण हस्तांतरित करण्याचा अधिकार.

**२२६.** (१) आयुक्त, जिल्हाधिकारी, उप-विभागीय अधिकारी किंवा तहसीलदार यास, या संहितेच्या तरतुदींअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमान्वये उद्‌भवणारे कोणतेही प्रकरण किंवा प्रकरणांचा वर्ग, आपल्या स्वतःच्या फाईलवरून काढून त्या प्रकरणावर अथवा प्रकरणांच्या वर्गावर निर्णय देण्यास सक्षम असेल अशा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही महसूल अधिकाऱ्याकडे निर्णयाकरिता पाठविता येईल किंवा अशा कोणत्याही महसूल अधिकाऱ्यापासून कोणतेही प्रकरण अथवा प्रकरणांचा वर्ग काढून घेता येईल आणि ते स्वतः हाताळता येईल किंवा त्यांच्यावर निर्णय देण्यास सक्षम असलेल्या अन्य कोणत्याही महसूल अधिकाऱ्याकडे असे प्रकरण किंवा प्रकरणांचा वर्ग, निर्णयाकरिता पाठविता येईल. दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून किंवा त्यांच्याकडे प्रकरण हस्तांतरित करण्याचा अधिकार.

(२) आयुक्त, जिल्हाधिकारी, उप-विभागीय अधिकारी किंवा तहसीलदार यास, या संहितेच्या तरतुदींअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमान्वये उद्‌भवणारे कोणतेही प्रकरण किंवा प्रकरणांचा वर्ग, आपल्या फाईलवरून काढून आपल्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही महसूल अधिकाऱ्याकडे चौकशी व प्रतिवेदनाकरिता हस्तांतरित करता येईल.

**२२७.** (१) आपल्या संबंधित विभागांमध्ये अव्वल कारकुनाच्या किंवा जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख याच्याहून कमी दर्जाचा नसलेल्या अशा त्या त्या विभागातील प्रत्येक महसूल अधिकाऱ्यास किंवा भूमापन अधिकाऱ्यास जी चौकशी करण्याचा त्यास कायदेशीर अधिकार आहे अशा कोणत्याही चौकशीत, पक्षकार म्हणून तपासणी करण्यासाठी किंवा साक्षीदार म्हणून पुरावा देण्यासाठी जी व्यक्ती हजर राहणे किंवा तिने दस्तऐवज सादर करणे त्यास आवश्यक वाटेल अशा व्यक्तीस समन्स काढून बोलविण्याचा अधिकार असेल ; दस्तऐवज सादर करण्यासाठी दिलेले समन्स विवक्षित विनिर्दिष्ट केलेले दस्तऐवज किंवा समन्स काढून बोलविण्यात आलेल्या व्यक्तींच्या ताब्यातील विशिष्ट प्रकारचे सर्व दस्तऐवज सादर करण्यासाठी म्हणून देता येईल. पुरावा देण्यासाठी व दस्तऐवज सादर करण्यासाठी व्यक्तींवर समन्स बजावण्याचा अधिकार.

(२) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ ची कलमे १३२ आणि १३३ यांच्या तरतुदींना अधीन राहून, अशा रीतीने समन्स काढून बोलविण्यात आलेल्या सर्व व्यक्तींनी असा अधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे जातीने किंवा प्राधिकृत अभिकर्त्यामार्फत हजर राहणे बंधनकारक असेल.

(३) अशा रीतीने ज्या व्यक्तींना समन्स काढून बोलविण्यात आले असेल अशा सर्व व्यक्तींनी त्यांची ज्या गोष्टीसंबंधाने तपासणी करण्यात येईल किंवा ज्या गोष्टीसंबंधात त्या निवेदने करतील अशा गोष्टींबाबत खरी माहिती व आवश्यक असतील असे दस्तऐवज व इतर वस्तू सादर करणे बंधनकारक असेल.

**२२८.** (१) प्रत्येक समन्स लेखी असेल व त्याची दुसरी प्रत ठेवण्यात येईल व ते ज्या प्रयोजनासाठी काढण्यात आले असेल ते प्रयोजन त्यात नमूद करण्यात येईल आणि ते जारी करणारा अधिकारी त्यावर सही करील आणि जर त्याची मुद्रा असेल तर ती त्यावर उमटविण्यात येईल. समन्से लेखी, सही केलेली व मुद्रा असलेली असणे ;

(२) ज्या व्यक्तीस बोलविण्यात आले असेल अशा व्यक्तीस समन्सची एक प्रत देऊन किंवा ती तिच्या स्वाधीन करून किंवा जर ती व्यक्ती सापडत नसेल तर, तिच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणच्या कोणत्याही ठळक स्थानी त्याची प्रत लावून ते बजाविण्यात येईल. समन्सांची बजावणी.

(३) जर तिचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण दुसऱ्या जिल्ह्यात असेल तर त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे समन्स पोस्टाने पाठविता येईल व तो पोट-कलम (२) च्या तरतुदींअनुसार ते बजाविण्याची व्यवस्था करील.

साक्षीदारास उपस्थित राहण्यास भाग पाडणे.

**२२९.** जिल्हा साक्षीदार म्हणून उपस्थित राहण्यास किंवा कोणताही दस्तऐवज सादर करण्यास बोलविण्यात आले असले अशी व्यक्ती त्या समन्सचे पालन करण्यात कसूर करील तर कलम २२७ अन्वये ज्याने समन्स काढले असेल अशा अधिकाऱ्यास,—

(क) अटकेचे जमानतयोग्य अधिपत्र (वारंट) काढता येईल ;

(ख) उपस्थित होण्याकरिता प्रतिभूति देण्याबद्दल त्या व्यक्तीस आदेश देता येईल ; किंवा

(ग) पन्नास रुपयांहून अधिक नसेल इतका त्या व्यक्तीस दंड करता येईल.

नोटीस बजाविण्याची रीत.

**२३०.** (१) या संहितेच्या आणि तद्न्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, या संहितेअन्वयेची प्रत्येक नोटीस, ती ज्या व्यक्तीवर बजावावयाची असेल अशा व्यक्तीस किंवा तिच्या प्राधिकृत अभिकर्त्यास तिची एक प्रत देऊन किंवा स्वाधीन करून किंवा अशी प्रत, डाकेने पाठवून, बजाविता येईल किंवा उपरिनिर्दिष्ट रीतीने ती बजाविता येत नसेल तर, त्या व्यक्तीच्या माहिती असलेल्या शेवटच्या राहण्याच्या जागी किंवा ठिकाणी किंवा नोटीस ज्या जमिनीसंबंधात असेल ती जमीन ज्या गावामध्ये असेल किंवा ज्या गावात उक्त जमिनीची लागवड करण्यात येत असेल त्या गावातील सार्वजनिक ठिकाणी, कोणत्याही जागी उक्त प्रत चिकटवून, ती बजाविता येईल.

(२) अशी कोणतीही नोटीस, त्यामध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या नावामध्ये किंवा पदनामामध्ये किंवा कोणत्याही जमिनीच्या वर्णनामध्ये कोणतीही चूक झाल्यामुळे, अशा चुकीमुळे वास्तविक अन्याय झाला नसेल तर, निरर्थक झाली आहे असे मानण्यात येणार नाही.

साक्षीदारांना हजर करण्याविषयीची कार्यपद्धती.

**२३१.** रीतसर किंवा संक्षिप्तरीत्या काम चालवून करण्यात आलेल्या कोणत्याही चौकशीत कोणत्याही पक्षकारास साक्षीदारांना हजर करण्याची इच्छा असेल तर, तो दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये साक्षीदार हजर राहण्यासाठी त्यांना समन्स पाठविण्याकरिता पक्षकारांनी अर्ज करण्याबद्दल जी कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे त्या कार्यपद्धतीचे अनुसरण करील. १९०८ चा ५.

पक्षकाराच्या अनुपस्थितीत सुनावणी करणे.

**२३२.** (१) कोणत्याही प्रकरणाच्या किंवा कार्यवाहीच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकास, जर महसूल अधिकाऱ्यास किंवा भू-मापन अधिकाऱ्यास असे दिसून येईल की, समन्स किंवा नोटीस बजावण्यासाठी आवश्यक असलेली आदेशिका-फी देण्यात विरुद्ध पक्षकाराने कसूर केल्यामुळे कोणत्याही पक्षकारावर समन्स किंवा नोटीस बजाविण्यात आलेली नाही, तर उक्त प्रकरण किंवा कार्यवाही, अशी आदेशिका-फी देण्यात कसूर केल्यामुळे काढून टाकता येईल.

(२) महसूल अधिकाऱ्यापुढील किंवा भू-मापन अधिकाऱ्यापुढील कोणत्याही प्रकरणातील किंवा कार्यवाहीतील कोणताही पक्षकार सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकास उपस्थित राहिला नाही तर त्याच्या अनुपस्थितीत त्या प्रकरणाची सुनावणी करता येईल आणि त्यावर निर्णय देता येईल किंवा कसूर झाल्यामुळे ते प्रकरण काढून टाकता येईल.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये ज्याच्याविरुद्ध कोणताही आदेश देण्यात आला असेल अशा पक्षकारास, कोणत्याही विरुद्ध पक्षकारावर समन्स किंवा नोटीस बजाविण्यासाठी आवश्यक असलेली आदेशीका-फी देण्यास किंवा सुनावणीच्या वेळी उपस्थित राहण्यास कोणत्याही पुरेशा करणामुळे त्यास प्रतिबंध झाला या कारणावरून असा आदेश रद्द करण्यासाठी म्हणून अशा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत अर्ज करता येईल आणि महसूल अधिकाऱ्यास किंवा भू-मापन अधिकाऱ्यास असा आदेश ज्या दिनांकास काढण्यात आला त्या दिनांकास उपस्थित असलेल्या विरुद्ध पक्षकारास नोटीस दिल्यानंतर व त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, काढण्यात आलेला असा आदेश रद्द करता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये दाखल करण्यात आलेला अर्ज नाकारण्यात आला तर आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या पक्षकारास, अशा अधिकाऱ्याने दिलेल्या मूळ आदेशाविरुद्ध ज्याचेकडे अपील करता येईल त्या प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(५) पोट-कलम (४) मध्ये तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त किंवा अशा कोणत्याही अधिकाऱ्यासमोरील कोणत्याही प्रकरणाचा किंवा कार्यवाहीचा निकाल गुणावगुणांवरून करण्यात आला असेल तर असे प्रकरण वगळता, या कलमान्वये दिलेल्या आदेशावर कोणतेही अपील करता येणार नाही.

**२३३.** (१) महसूल अधिकाऱ्यास किंवा भू-मापन अधिकाऱ्यास, वेळोवेळी आपल्या समोरील प्रकरणाची किंवा कार्यवाहीची सुनावणी लेखी नमूद करावयाच्या कारणावरून स्थगित करता येईल. सुनावणी स्थगित करणे.

(२) प्रकरणाची किंवा कार्यवाहीची सुनावणी स्थगिती करण्याचे वेळी उपस्थित असलेल्या पक्षकारांस व साक्षीदारांस स्थगित केलेल्या प्रकरणाच्या किंवा कार्यवाहीच्या सुनावणीचा दिनांक व जागा कळविण्यात येईल.

**२३४.** (१) तपासणी किंवा चौकशी करणारा अधिकारी रीतसर केलेल्या सर्व चौकशीमध्ये पुराव्यांची नोंद, संपूर्णपणे लेखी, मराठीमध्ये घेईल किंवा त्याच्या समक्ष सुनावणी करून आणि त्याच्या स्वतःच्या देखरेखीखाली व निदेशनाखाली करण्यात येईल व त्यावर तो सही करील. अधिकारी अशा रीतीने घेतलेला पुरावा साक्षीदारास वाचून दाखवील किंवा वाचून दाखवण्याची व्यवस्था करील व तो बिनचूक असल्याचे द्योतक म्हणून त्यावर त्याची सही घेईल. रीतसर चौकशीत पुरावा घेण्याची रीत.

(२) चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याने संपूर्ण पुरावा लेखी न घेतल्यास तो प्रत्येक साक्षीदाराच्या तपासणीचे काम चालू असताना, असा साक्षीदार जे सांगेल त्या मजकुराचे ज्ञापन तयार करील; आणि असे ज्ञापन असा अधिकारी त्याच्या स्वतःच्या हाताने लिहील व त्यावर सही करील आणि ते अभिलेखाचा भाग होईल.

(३) वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा अधिकाऱ्यास ज्ञापन तयार करण्यास प्रतिबंध करण्यात आला असेल तर तो तसे न करण्याबद्दलच्या आपल्या असमर्थतेबद्दलचे कारण नमूद करील.

(४) जेव्हा पुरावा इंग्रजी भाषेत दिला जाईल तेव्हा अशा अधिकाऱ्यास तो स्वतःच्या हाताने त्या भाषेत लिहून घेता येईल आणि त्याचा अधिप्रमाणित अनुवाद मराठीमध्ये तयार करण्यात येईल आणि तो अभिलेखाचा भाग होईल.

**२३५.** रीतसर चौकशीनेतरचा प्रत्येक निर्णय लेखी असेल व तो देणारा अधिकारी त्यावर सही करील आणि तो ज्या आधारावर देण्यात आला त्याचे संपूर्ण निवेदन त्यात असेल. निर्णय लिहिणे व त्यांचे स्पष्टीकरण.

**२३६** संक्षिप्त चौकशीमध्ये महसूल अधिकारी किंवा भू-मापन अधिकारी अशी कोणतीही चौकशी चालू असतानाच्या कामकाजाच्या कार्यवृत्तांची नोंद स्वतःच्या हाताने इंग्रजीमध्ये किंवा मराठीमध्ये घेईल व तीत, संबंध असणाऱ्या पक्षकारांनी ज्या मुद्याच्या गोष्टी सांगितल्या असतील त्या गोष्टी, पुराव्यातील मुख्य भाग, निर्णय व त्याबद्दलची कारणे देईल : संक्षिप्त चौकशी कशी करावी.

परंतु एखादी चौकशी संक्षिप्त चौकशी असावी असे या संहितेत फर्मविले असेल ती चौकशी रीतसर चौकशीस लागू असणाऱ्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही नियमान्वये चालविणे योग्य आहे असे उक्त अधिकाऱ्यास वाटेल तर त्याप्रमाणे त्याने ती कोणत्याही वेळी चालविणे हे कायदेशीर असेल.

१८६० चा ४५. **२३७.** (१) या संहितेअन्वयेची रीतसर केलेली किंवा संक्षिप्तरित्या केलेली चौकशी भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ च्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही म्हणून मानण्यात येईल व रीतसर किंवा संक्षिप्त चौकशी करणाऱ्या कोणत्याही प्राधिकाऱ्याचे कार्यालय अशा चोकशीच्या कारणांसाठी दिवाणी न्यायालय आहे असे मानण्यात येईल. रीतसर व संक्षिप्त चौकसी न्यायिक कार्यावाही समजणे.

(२) रीतसर किंवा संक्षिप्त चौकशीतील प्रत्येक सुनावणी व निर्णय, जाहीरपणे करण्यात येईल आणि समजणे किंवा त्याचे प्राधिकृत अभिकर्ते यांना हजर राहण्याबद्दल योग्य ती नोटीस देण्यात येईल.

सामान्य चौकशी कशी करावी.

**२३८.** या संहितेअन्वये जी चौकशी रीतसर किंवा संक्षिप्त रीतीने करणे आवश्यक नाही, किंवा कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यास त्याची कायदेशीर कर्तव्ये बजावण्यासाठी, कोणत्याही प्रसंगी करणे आवश्यक वाटेल ती चौकशी, राज्य शासनाने किंवा अशी चौकशी करणाऱ्या अधिकऱ्याच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्याने त्यासाठी लागू असणारे जे सामान्य किंवा विशेष नियम विहित केले असतील त्या नियमांनुसार करण्यात येईल व अशा नियमांन्वये ज्या मर्यादेपर्यंत नियंत्रण ठेवण्यात आले असेल त्या मर्यादेस अधीन राहून, आवश्यक त्या वस्तुस्थितीची खात्री करून घेण्यासाठी व सार्वजनिक हित वृद्धिंगत करण्यासाठी जी रीत अधिकाऱ्याच्या मते योग्य असेल त्या रीतीने चलविण्यात येईल.

प्रती व अनुवाद वगैरे कसे मिळवावे.

**२३९.** ज्या मध्ये रीतसर किंवा संक्षिप्त चौकशी करण्यात आली असेल अशा सर्व प्रकरणातील निर्णय, आदेश व त्याबाबतची कारणे त्यांच्या व सादर केलेल्या कागदपत्रांच्या व निशाण्यांच्या अधिकृत प्रती व अनुवाद पक्षकारांस देण्यात येतील आणि पुराव्यादाखल उपयोग केलेले मूळ दस्तऐवज सादर करणाऱ्या व्यक्तींना किंवा त्यांच्यासाठी ज्या व्यक्ती हक्क सांगतील अशा व्यक्तींना त्यांनी त्याबद्दल अर्ज केल्यानंतर, परत देण्यात येतील; परंतु प्रती काढणे, शोधणे, तपासणी करणे व तत्सम इतर बाबी याबद्दल राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे खर्च आकारण्यात येईल.

कसूर करणाऱ्यास अधिपत्र (वारंट) काढून अटक करणे.

**२४०.** जेव्हा जेव्हा या संहितेअन्वये कसूर करणाऱ्यास किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस अटक करण्याबद्दल तरतूद करण्यात आली असेल तेव्हा, अशा व्यक्तीस अटक करण्याबद्दल निदेश देण्यास जो अधिकारी सक्षम असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याने काढलेल्या अधिपत्रावरून अशी अटक करण्यात येईल.

जमिनीवर प्रवेश करण्याचा व भू-मापन करण्याचा अधिकार.

**२४१.** सर्व महसूल आणि भू-संपादन अधिकारी, आणि त्यांच्या देखरेखीखालील व नियंत्रणाखालील त्यांचे नोकर व कामगार यांना तसा निदेश दिला असल्यास जमिनीवर प्रवेश करता येईल व भू-मापन करता येईल आणि सीमा आखता येतील व या संहितेअन्वये किंवा जमीन महसुलाच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमान्वये त्यांच्या पदाशी संबंधित असेलली इतर कामे करता येतील आणि असे करताना त्यांनी आपली कर्तव्ये योग्य रीतीने बजावण्यासाठी जरूर असेल त्यापेक्षा अधिक नुकसान ते होऊ देणार नाहीत;

परंतु, कोणतीही व्यक्ती कोणत्याही इमारतीमध्ये किंवा राहत्या घरात संलग्न अशा कुंपण घातलेल्या आवारत किंवा बागेत, तेथे राहाणाऱ्यांची संमती घेतल्याशिवाय व सदरहू राहणाऱ्यास कमीत कमी चोवीस तासांची पूर्वसूचना दिल्याशिवाय, प्रवेश करणार नाही. आणि अशा रीतीने प्रवेश करताना तेथे राहणाऱ्यांच्या सामाजिक व धार्मिक भावनांना योग्य तो मान देण्यात येईल.

बेकायदेशीर रीत्या जमीन कब्जात ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस निष्कासित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने कशी कार्यवाही करावी.

**२४२.** जेव्हा जेव्हा या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये जिल्हाधिकाऱ्यास अन्याय्य रीतीने जमीन कब्जात ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस निष्कासित करता येईल किंवा तो तसे करील अशी तरतूद करण्यात आली असेल तेव्हा असे निष्कासन पुढील रीतीने करण्यात येईल :—

(क) जमीन कब्जात असणाऱ्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना (उक्त नोटीस मिळाल्यानंतर वाजवी वाटेल अशा मुदतीत) जमीन सोडण्याबाबत फर्मावणारी नोटीस त्यांच्यावर बजावून, आणि

(ख) जर अशा नोटिशीचे पालन करण्यात आले नाही तर, ती जमीन सोडण्यास नकार देण्याऱ्या व्यक्तीस काढून टाकून किंवा त्या व्यक्तीला काढून टाकण्यासाठी हाताखालील व्यक्तीस प्रतिनियुक्त करून, आणि

(ग) जर अशा कोणत्याही व्यक्तीला काढून टाकणाऱ्या अधिकाऱ्यास कोणत्याही व्यक्तीने विरोध किंवा अडथळा केला तर जिल्हाधिकारी त्या प्रकरणातील वस्तुस्थितीची संक्षिप्त चौकशी करील आणि असा विरोध किंवा अडथळा कोणत्याही न्याय्य कारणावाचून करण्यात आला आणि असा विरोध

किंवा अडथळा चालूच आहे अशी त्याचा खात्री झाल्यास जिल्हाधिकाऱ्याला, असा विरोध किंवा अडथळा केल्याबद्दल त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये अशी व्यक्ती ज्या कार्यवाहीस पात्र होईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाध न येऊ देता, उक्त व्यक्तीच्या अटकेसाठी अधिपत्र (वारंट) काढता येईल आणि ती हजर झाल्यावर असा अडथळा किंवा विरोध चालू राहण्यास प्रतिबंध करण्यास आवश्यक असेल अशा, तीस दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या, मुदतीसाठी, तिला जिल्हाधिकाऱ्यांच्या किंवा कोणत्याही तहसीलदारांच्या कार्यालयामध्ये अभिरक्षेत ठेवण्यासाठी किंवा अनुसूची "घ" मधील नमुन्यातील अधिपत्र (वारंट) देऊन तिला जिल्ह्याच्या दिवाणी तुरूंगात कारावासासाठी पाठविता येईल.

**२४३.** महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्यास या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये उद्‌भवलेल्या कोणत्याही प्रकरणात किंवा क्रायवाहीत झालेला खर्च त्यास योग्य वाटेल तितका आणि त्या रीतीने, मंजूर करता येईल आणि तो वाटून देता येईल. खर्च मंजूर करण्याचा आणि तो वाटून देण्याचा अधिकार.

परंतु अशा कोणत्याही प्रकरणात किंवा कार्यवाहीत विधिव्यवसायीचे शुल्क, प्रकरणाच्या किंवा कार्यवाहीच्या खर्चात धरावे असे सदरहू अधिकाऱ्याचे मत असल्याशिवाय आणि तसे मत होण्याचे कारण त्याने लेखी नमूद केल्याशिवाय, ते शुल्क खर्च म्हणून मंजूर करण्यात येणार नाही.

**२४४.** त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यासमोर या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये उपस्थित होणे, त्यास अर्ज करणे व त्याच्यासमोर काम चालविणे, या सर्व गोष्टी स्वतः पक्षकारास किंवा त्यांनी मान्यता दिलेल्या अभिकर्त्यांस अथवा कोणत्याही विधिव्यवसायीस करता येतील : महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यासमोर ज्यांना उपस्थित होता येईल आणि अर्ज करता येईल अशा व्यक्ती.

१९०८ चा ५. परंतु, महसूल किंवा भू-मापन अधिकारी, तसा निदेश देईल, तर दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ ची कलमे १३२ व १३३ यांच्या तरतुदींना अधीन राहून, पक्षाकार जातीने उपस्थित राहील.

[१][**२४५.** या प्रकरणात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट प्रकरण पंधरा अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढे असलेल्या कोणत्याही कार्यवाहीला लागू असणार नाही.] व्यावृत्ती.

## प्रकरण तेरा

### अपिले, पुनरीक्षण व पुनर्विलोकन

[२][**२४६.** प्रकरण पंधरा अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण पुढे असलेल्या कार्यवाहीला या प्रकरणाच्या तरतुदी लागू असणार नाहीत.] हे प्रकरण लागू असणे.

**२४७.** (१) या संहितेत किंवा त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये एतद्विरुद्ध कोणतीही स्पष्ट तरतूद नसेल तेव्हा, या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये, अनुसूची 'ङ' च्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध, त्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांकडे अपील करण्यात येईल—मग असा निर्णय किंवा आदेश उक्त अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलावर दिलेला असो किंवा नसो : अपील व अपील अधिकारी.

परंतु, कोणत्याही परिस्थितीमध्ये अपिलांची संख्या दोनपेक्षा जास्त होणार नाही.

(२) जेव्हा पदोन्नतीमुळे किंवा पदनामात बदल झाल्यामुळे, या कलमान्वये कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरूद्ध करावयाचे अपील हे, ज्याविरुद्ध अपील केले असेल, तो निर्णय किंवा आदेश ज्या अधिकाऱ्याने दिला असेल त्याच अधिकाऱ्याकडे करावे लागत असेल तेव्हा असे अपील या संहितेच्या तरतुदींन्वये ते ज्याच्याकडे हस्तांतरित करता येईल अशा, त्या अपिलाचा निर्णय करण्यास सक्षम असलेल्या इतर अधिकाऱ्याकडे करण्यात येईल.

---

[१] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, याच्या कलम ४ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

राज्य शासनाकडे अपील केव्हा करावे.

**२४८.** आयुक्ताने किंवा जमाबंदी आयुक्ताने किंवा भूमि अभिलेख संचालकाने किंवा भूमि अभिलेख संचालकाचे अधिकार निहित केलेल्या भूमि अभिलेख उपसंचालकाने [1][* * * *] दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील करता येईल; मात्र अशा अधिकाऱ्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याने अपिलात जो निर्णय किंवा आदेश नमूद केला असेल त्यावर अशा अधिकाऱ्याने जो कोणताही निर्णय किंवा आदेश दिला असेल त्याविरुद्ध अपील करता येणार नाही.

पुर्नविलोकन किंवा पुरीक्षण याविरुद्ध अपील.

**२४९.** (१) पुर्नविलोकनात, कोणताही आदेश बदलण्यासाठी किंवा फिरविण्यासाठी देण्यात आलेला आदेश हा, मूळ निर्णयाविरुद्ध ज्या किंवा आदेशाविरुद्ध रीतीने अपील करता येईल त्याच रीतीने अपील योग्य असेल.

(२) पुनरीक्षण करताना, कोणताही आदेश बदलण्यासाठी किंवा फिरविण्यासाठी देण्यात आलेला आदेश हा, जणू काही तो पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने अपिलात दिलेला आदेश असल्याप्रमाणे अपील योग्य असेल.

ज्या मुदतीत अपिल केली पाहिजेत ती मुदत.

**२५०.** ज्या निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध तक्रार असेल तो निर्णय किंवा आदेश, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा अधीक्षक, भूमि अभिलेख याच्या दर्जाहून कमी दर्जाच्या असलेल्या त्या त्या विभागातील अधिकाऱ्याने दिला असेल तर, साठ दिवसांची मुदत संपल्यानंतर त्याविरूद्ध अपील करता येणार नाही; किंवा इतर कोणत्याही बाबतीत नव्वद दिवसांची मुदत संपल्यानंतर अपील करता येणार नाही. अपील करणाऱ्या व्यक्तीस असा निर्णय किंवा आदेश ज्या दिनांकास मिळाला असेल त्या दिनांकापासून साठ दिवसांची व नव्वद दिवसांची मुदत मोजण्यात येईल.

वरील कालावधी मोजताना, ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल अशा निर्णयाची किंवा आदेशाची प्रत मिळण्यासाठी जो कालावधी लागला असेल तो वगळण्यात येईल.

मुदत संपल्यानंतर अपील दाखल करून घेणे.

**२५१.** जेव्हा अपील करणारी किंवा, यथास्थिती, अर्ज करणारी व्यक्ती, अपील किंवा, यथास्थिति, अर्ज करण्यासाठी जी मुदत विहित करण्यात आली असेल त्या मुदतीत अपील किंवा अर्ज न करण्यास तिच्याजवळ पुरेसे कारण होते अशी, ज्या अधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाकडे अपील किंवा अर्ज करील त्या अधिकाऱ्याची किंवा राज्य शासनाची खात्री पटवून देईल तेव्हा, या प्रकरणान्वये पुर्नविलोकनासाठी केलेले कोणतेही अपील किंवा अर्ज, त्यासाठी विहित केलेल्या मुदतीनंतर दाखल करून घेता येईल.

विवक्षित आदेशांच्या विरुद्ध अपील करता येणार नाही.

**२५२.** (क) कलम २५१ अन्वये केलेले अपील किंवा पुर्नविलोकनासाठी केलेला अर्ज दाखल करून घेणाऱ्या ;

(ख) पुनरीक्षणासाठी किंवा पुर्नविलोकनासाठी केलेला अर्ज नाकारणाऱ्या; किंवा

(ग) कार्यवाही स्थगित करण्यासाठी केलेला अर्ज मंजूर करणाऱ्या, किंवा नाकारणाऱ्या आदेशाविरुद्ध कोणतेही अपील करता येणार नाही.

---

[1]सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, याच्या कलम ८ द्वारे "किंवा मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याने" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "त्या सहायक किंवा उपजिल्हाधिकाऱ्याने" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

**२५३.** जेव्हा जेव्हा अपील किंवा पुनर्विलोकनासाठी अर्ज करण्यासाठी या प्रकरणात तरतूद केलेल्या कोणत्याही मुदतीचा शेवटचा दिवस रविवार किंवा राज्य शासनाने मान्य केलेल्या इतर सुट्टीचा दिवस असेल तेव्हा तेव्हा, ती सुट्टी संपल्यानंतर लगत पुढील दिवस अपील करण्यासाठी शेवटचा दिवस आहे असे समजण्यात येईल.

अपील करण्याचा शेवटचा दिवस रविवार किंवा सुट्टीचा दिवस असेल तर त्याबाबत तरतूद.

**२५४.** अपील, पुनर्विलोकन किंवा पुनरीक्षण याकरिता केलेल्या प्रत्येक विनंतीअर्जासोबत ज्या आदेशाविरूद्ध अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची प्रमाणित प्रत, अशी प्रत सादर करणे आवश्यक ठरविले नसेल अशी बाब वगळून, देण्यात येईल.

अपिलाच्या विनंती-अर्जासोबत आदेशाची प्रत देणे.

**२५५.** (१) अपील प्राधिकाऱ्यास अपील दाखल करून घेता येईल किंवा अभिलेख मागविल्यानंतर आणि अपील करणाऱ्या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर संक्षिप्तरीत्या ते फेटाळता येईल :

अपील प्राधिकाऱ्याचा अधिकार.

परंतु, ज्यावेळी अपील मुदतबाह्य झाले असेल किंवा ते दाखल करता येत नसेल त्याबाबतीत अपील प्राधिकाऱ्यास अभिलेख मागविणे बंधनकारक असणार नाही.

(२) जर अपील दाखल करण्यात आले असेल तर, त्याच्या सुनावणीचा दिनांक ठरविण्यात येईल व त्याबद्दलची नोटीस प्रतिवादीवर बजाविण्यात येईल.

(३) पक्षकार हजर राहिल्यास त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, अपील प्राधिकाऱ्यास, ज्या आदेशाविरूद्ध अपील केले असेल तो आदेश रद्द करता येईल, कायम करता येईल, बदलता येईल किंवा फिरविता येईल व त्यांची कारणे तो लेखी नमूद करील किंवा त्यास, आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करण्यासाठी किंवा असा आणखी पुरावा घेण्यासाठी निदेश देता येईल; किंवा स्वतः असा आणखी पुरावा घेता येईल; किंवा त्याला योग्य वाटेल असे निदेश देऊन ते प्रकरण निकालात काढण्यासाठी परत पाठविता येईल.

**२५६.** (१) ज्या महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याने कोणताही आदेश दिला असेल त्या अधिकाऱ्यास किंवा त्या पदावर येणाऱ्या उत्तराधिकाऱ्यास, अपिलासाठी विहित करण्यात आलेल्या मुदतीच्या आत कोणत्याही वेळी योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत, अशा आदेशाची अमलबजावणी स्थगित करण्याबद्दल निदेश देता येईल, मात्र उक्त आदेशांविरुद्ध कोणतेही अपील केलेले असता कामा नये.

आदेशांची अंमलबजावणी स्थगित करणे.

(२) अपील प्राधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत, ज्या विरुद्ध अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची अंमलबजावणी स्थगित करण्याबद्दल कोणत्याही वेळी निदेश देता येईल.

(३) पुनरीक्षण किंवा पुनर्विलोकन करण्याच्या अधिकारांचा वापर करणाऱ्या प्राधिकाऱ्यास, यथास्थिति पुनरीक्षण किंवा पुनर्विलोकन करण्यात येणाऱ्या आदेशांची अंमलबजावणी त्याला योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत स्थगित करण्याबद्दल निदेश देता येईल.

(४) अपील प्राधिकाऱ्यास किंवा पुनरीक्षणाच्या किंवा पुनर्विलोकनाच्या अधिकारांचा वापर करणाऱ्या प्राधिकाऱ्यास पोट-कलम (१) अन्वये दिलेला कोणताही निदेश रद्द करता येईल किंवा त्यात फेरफार करता येईल.

[१](५) कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी स्थगित करण्याबद्दल निदेश देणाऱ्या महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यास किंवा निदेश देणाऱ्या प्राधिकाऱ्यास योग्य वाटतील अशा शर्ती लादता येतील किंवा त्यास योग्य वाटेल असे तारण देण्याबाबत आदेश देता येईल.

(६) कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी स्थगित करण्याबद्दल निदेश देणारा कोणताही आदेश या कलमाच्या तरतुदीनुसार असेल त्या खेरीज अन्यथा, देण्यात येणार नाही.

राज्य शासन व विवक्षित महसूल आणि भू-मापन अधिकारी यांचा त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांचे अभिलेख व कार्यवाही मागविण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा अधिकार.

**२५७.** (१) राज्य शासनास आणि सहायक जिल्हाधिकारी किंवा उप-जिल्हाधिकारी यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाही अशा कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यास किंवा त्या त्या विभागातील अधीक्षक, भूमि-अभिलेख यास कोणत्याही दुय्यम महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाच्या किंवा आदेशाच्या कायदेशीरपणाबद्दल किंवा औचित्याबद्दल आणि अशा अधिकाऱ्याच्या कार्यवाहीच्या नियमानुसारितेबद्दल, शासनास स्वतःची किंवा यथास्थिति, अधिकाऱ्यास स्वतःची खात्री करून घेण्यासाठी, अशा अधिकाऱ्याने चालविलेल्या कोणत्याही चौकशीची किंवा कार्यवाहीची कागदपत्रे मागविता येतील व ती तपासता येतील.

(२) तहसीलदार, नायब तहसीलदार आणि जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख यांस, ज्या प्रकरणी रीतसर किंवा संक्षिप्त चौकशी करण्यात आली नाही अशा कोणत्याही प्रकरणामध्ये, त्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याने केलेली कार्यवाही सुद्धा त्याच रीतीने मागविता येईल व तपसता येईल.

(३) जर कोणत्याही बाबतीत राज्य शासनाला किंवा पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला असे आढळून येईल की, अशा रीतीने मागविलेला कोणताही निर्णय किंवा आदेश किंवा कार्यवाही यात फेरफार करणे, तो निर्णय किंवा ती कार्यवाही रद्द करणे किंवा फिरवणे आवश्यक आहे, तर राज्य शासनास किंवा अशा अधिकाऱ्यास योग्य वाटेल असा त्यावर आदेश देता येईल :

परंतु, राज्य शासन किंवा असा अधिकारी, खाजगी व्यक्तींच्या परस्परांमधील हक्काबाबतच्या कोणत्याही प्रश्नावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही आदेशात संबंधित पक्षकारांना उपस्थित राहण्याबद्दल आणि अशा आदेशाच्या समर्थनार्थ आपले म्हणणे मांडण्याबद्दल नोटीस दिल्याशिवाय फेरफार करणार नाही किंवा तो फिरविणार नाही :

परंतु, आणखी असे की, रीतसर चौकशी करण्यात आली असेल अशा कोणत्याही बाबतीत, सहायक किंवा उप-जिल्हाधिकारी, स्वतः होऊन असा आदेश देणार नाही. परंतु तो आपल्या अभिप्रायासह ती कागदपत्रे जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करील व जिल्हाधिकारी त्यावर त्यास योग्य वाटतील असे आदेश देईल.

आदेशाचे पुनर्विलोकन.

**२५८.** (१) राज्य शासन आणि प्रत्येक महसूल किंवा भू-मापन अधिकारी आपण होऊन किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून आपण दिलेल्या किंवा आपल्या कोणत्याही पूर्वाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन करील आणि त्यासंबंधात त्यास योग्य वाटेल असा आदेश देईल.

परंतु,—

(एक) आपण स्वतः न दिलेल्या अशा कोणत्याही आदेशाचे लेखन प्रमादाच्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणावरून पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकाऱ्यास किंवा जमाबंदी अधिकाऱ्यास वाटेल तर तो प्रथम आयुक्ताची किंवा, यथास्थिति, जमाबंदी आयुक्ताची मंजुरी घेईल आणि जर जिल्हाधिकाऱ्यास किंवा जमाबंदी अधिकाऱ्यास दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याने, लेखन प्रमादाच्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणावरून कोणत्याही आदेशाचे—मग असा आदेश त्याने स्वतः दिलेला असो किंवा त्याच्या पूर्वाधिकाऱ्याने दिलेला असो—पुनर्विलोकन करण्याचे ठरविले असेल तर, तो प्रथम ज्यास दुय्यम असेल अशा अधिकाऱ्याची मंजुरी घेईल.

(दोन) कोणत्याही आदेशात संबंधित पक्षकारास उपस्थित राहण्याबद्दल आणि त्या आदेशाच्या समर्थनार्थ आपले म्हणणे मांडण्याबद्दल नोटीस देण्यात आल्याशिवाय अशा कोणत्याही आदेशात बदल करण्यात येणार नाही किंवा तो फिरविण्यात येणार नाही ;

(तीन) ज्यावर अपील करण्यात आले असेल किंवा जो पुनरीक्षणाच्या कार्यवाहीचा विषय असेल अशा कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन असे अपील किंवा कार्यवाही अनिर्णीत असेपर्यंत करण्यात येणार नाही ;

(चार) खाजगी व्यक्तींच्या परस्परांमधील हक्काच्या कोणत्याही प्रश्नावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन, सदरहू कार्यवाहीतील. कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्याशिवाय करण्यात येणार नाही व अशा आदेशाचे पुनर्विलोकन करण्याबद्दलचा कोणताही अर्ज उक्त आदेश देण्यात आल्यापासून नव्वद दिवसांच्या आत करण्यात आला नसेल तर दाखल करून घेण्यात येणार नाही.

(२) पुढील कारणांखेरीज इतर कोणत्याही कारणावरून कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन करण्यात येणार नाही ; ती कारणे अशी :—

(एक) नवीन आणि महत्त्वाच्या बाबींचा किंवा पुराव्याचा शोध ;

(दोन) अभिलेख पाहताक्षणीच दिसून येणारी एखादी चूक किंवा दोष ; किंवा

(तीन) इतर कोणतेही पुरेसे कारण.

(३) या कलमाच्या प्रयोजनांकरिता जिल्हाधिकारी हा, जो महसूल किंवा भू-मापन अधिकारी जिल्हा सोडून गेला असेल किंवा ज्याचे महसूल किंवा भू-मापन अधिकारी या नात्याने अधिकार वापरणे बंद झाले असून त्या जिल्ह्यात ज्यांच्या जागेवर त्याच्यानंतर काम करणारा कोणी अधिकारी नसेल त्या महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याचा उत्तराधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

(४) अपिलात किंवा पुनरीक्षणात ज्यावर निर्णय झाला असेल त्या आदेशाचे पुनर्विलोकन, अपील किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्याला दुय्यम असलेला कोणताही महसूल किंवा भू-मापन अधिकारी करणार नाही.

(५) पुर्नविलोकन करताना दिलेल्या आदेशाचे कोणत्याही कारणावरून पुर्नविलोकन करण्यात येणार नाही.

जो निर्णय किंवा आदेश स्पष्टपणे अंतिम म्हणून जाहीर केले असतील त्याबाबत नियम.

**२५९.** या संहितेत जेव्हा एखादा निर्णय किंवा आदेश अंतिम किंवा निर्णायक असल्याबद्दल तरतूद करण्यात आली असेल तेव्हा अशा तरतुदीचा अर्थ, अशा निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरूद्ध कोणतेही अपील करता येणार नाही असा मानण्यात येईल ; परंतु केवळ राज्य शासनानेच, कलम २५७ च्या तरतुदींन्वये असा कोणताही निर्णय किंवा आदेश यात सुधारणा करणे, तो रद्द करणे किंवा फिरवणे हे कायदेशीर असेल.

## प्रकरण चौदा

### मुंबई शहरामध्ये जमीन महसुलाकरिता विशेष तरतुदी

या प्रकरणाची व्याप्ती.

**२६०.** या प्रकरणाच्या तरतुदी केवळ मुंबई शहरासच लागू असतील.

या प्रकरणाची व्याप्ती.

**२६१.** या प्रकरणात, संदर्भानुसार दुसरा अर्त अपेक्षित नसेल तर—

१९६९ चा महा. ४४.

**२६१.** [१][(१-क) शहर भू-धारणापद्धती नाहीशी करण्याबाबत अधिनियम " म्हणजे मुंबई शहर (इनामी व विशेष भू-धारणा पद्धती) नाहीशी करण्याबाबत अधिनियम म्हणजे मुंबई शहर (इनामी व विशेष भुधरणा पद्धती) नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६९ ;]

[१] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याचे कलम २०, दुसरी अनुसूची अन्वये खंड (१-क) समाविष्ट करण्यात आला.

(क) कोणत्याही जमिनीच्या संबंधात " धारक " याचा अर्थ, अशा जमिनीचा भोगवटा करणारी किंवा अशा जमिनीसाठी खंड देण्यात येत असेल त्याबाबतीत, जी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस खंड देत नसेल अशी, अशा जमिनीबद्दल खंड मिळणारी कोणतीही व्यक्ती असा आहे ;

**स्पष्टीकरण**.—या खंडामधील " खंड " या संज्ञेमध्ये, जेव्हा कुळवहिवाटीवर एक वर्षापेक्षा कमी मुदतीसाठी अशी जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीने असे पैसे दिले असतील ते सोडून शासनाला किंवा बृहन्मुंबईच्या महानगर पालिकेला किंवा मुंबई बंदराच्या विश्वस्तांना किंवा फाजेनदार यांना जमिनीकरिता दिलेल्या पैशाचा समावेश होणार नाही ;

[१][(क-क) " महसुली विभाग " म्हणजे राज्य शासनाच्या आदेशाच्या अधीन जिल्हाधिकारी **राजपत्रातील** आदेशाद्वारे एखाद्या महसुली विभागातील जमिनींच्या आकारणीचा प्रमाणभूत दर ठरविण्याच्या प्रयोजनाकरिता महसुली विभाग म्हणून बनवील असे मुंबई शहरातील स्थानिक क्षेत्र ;]

(ख) " वरिष्ठ दर्जाचा धारक " या शब्द प्रयोगाचा अर्थ, मुंबई शहरातील कोणत्याही जमिनीवर राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली सर्वोच्च मालकी हक्क असेली व्यक्ती असा समजावा ;

(ग) " भू-मापन " या संज्ञेमध्ये, सीमेच्या निशाण्या ठरवणे व भू-मापनाचे पूर्वी घडलेली किंवा भू-मापनाच्या संबंधातील असलेली इतर सर्व कामे यांचा समावेश होईल ;

(घ) " भू-मापन समितीची चिन्हे " या शब्दप्रयोगाचा अर्थ यात यापुढे वर्णन केल्याप्रमाणे मुंबई शहराच्या भू-मापनाचे काम केलेल्या अधिकाऱ्याने मुख्यत्त्वे लावलेली कोणतीही लोखंडाची किंवा इतर चिन्हे असा समजावा आणि यात, या प्रकरणाच्या तरतुदीनुसार जिल्हाधिकाऱ्याने किंवा त्याच्या आदेशान्वये त्यानंतर लावण्यात येईल अशा कोणत्याही नवीन चिन्हांचा समावेश होईल ;

[१][(ङ) या प्रकरणात वापरण्यात आलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांचे व शब्दप्रयोगांचे अर्थ, शहर भू-धारणापद्धती नाहीशी करण्याबाबत अधिनियमात त्या त्या शब्दांना व शब्दप्रयोगांना जे अर्थ दिले आहेत तेच असतील.]

### जमीन महसुलाची आकारणी व वसुली

जमीन महसुलाची आकारणी निश्चित करण्याचा व ती बसविण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

[२][**२६२.** (१) पोट-कलम (२) आणि पोट-कलम (३) यांच्या तरतुदींना अधीन राहून जमीन महसुलाची आकारणी निश्चित करणे व ती बसविणे हे जिल्हाधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल.

(२) राज्य शासनाचा आकारणी करण्याचा अधिकार मर्यादित करणारा कोणताही अधिकार वरिष्ठ दर्जाच्या धारकाला नसेल त्याबाबतीत, शहर भू-धारणपद्धती नाहीशी करण्याबाबत अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, या प्रकरणानुसार आकारणी निश्चित करण्यात येईल.

(३) कायम करण्यात व परिरक्षण करण्यात आलेल्या आणि शहर भू-धारणपद्धती नाहीशी करण्याबाबत अधिनियमान्वये नाहीशा न केलेल्या विनिर्दिष्ट मर्यादेचा परिणाम म्हणून राज्य शासनाचा आकारणी करण्याचा अधिकार मर्यादित करणारा अधिकार वरिष्ठ धारकाला असेल त्याबाबतीत आकारणी अशा विनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही.]

---

[१] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याचे कलम २० दुसरी अनुसूची अन्वये (क-क) हा खंड समाविष्ट करण्यात आला व (ङ) हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २० च्या दुसऱ्या अनुसूची अन्वये कलम २६२ दाखल करण्यात आले.

[१][**२६२क.** इनामी किंवा विशेष भू-धारणपद्धतीवर धारण केलेल्या जमिनींच्या प्रारंभिक आकारणीकरिता, शहर भू-धारणापद्धती नाहीशी करण्याबाबत अधिनियमात तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, प्रत्येक महसुली विभागातील अशा जमिनींच्या आकारणीचा दर, जेव्हा त्या बांधकाम न कलेले भूखंड म्हणून वापरण्यात आल्या असतील तेव्हा, भारताचा रिझर्व बँकेबाबत अधिनियम, १९३४ याच्या कलम ४९ अन्वये भारताच्या रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या, बँकेच्या व्याजाच्या दराच्या आधारे याबाबतीत राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा, त्यांच्या बाजारमूल्याच्या सरासरीच्या टक्केवारीपेक्षा अधिक असणार नाही. *आकारणीचा दर बाजारमुल्याच्या टक्केवारीपेक्षा अधिक असणार नाही.* *१९३४ चा २.*

**२६२ख.** (१) कलम २६२-क च्या तरतुदींना अधीन राहून, जिल्हाधिकारी राज्य शासनाच्या मान्यतेने प्रत्येक महसुली विभागातील दर चौरस मीटर जमिनीच्या आकारणीचा दर (त्यास " आकारणीचा प्रमाणभूत दर " म्हणून संबोधण्यात येईल) निश्चित करील आणि हा दर म्हणजे प्रत्येक विभागातील बांधकाम न केलेल्या भूखंडांच्या बाजारमूल्याच्या सरासरीच्या, कलम २६२-क अन्वये राज्य शासनाने निश्चित केलेल्या टक्केवारीइतकी रक्कम असेल. *आकारणीचा प्रमाभूत दर.*

(२) बाजारमूल्य पुढील गोष्टींच्या आधारावर विहित रीतीने अंदाजित करण्यात येईल—

(क) आकारणीचा प्रमाणभूत दर निश्चित करण्याकरिता ज्यावर्षी कार्यवाही सुरू करण्यात आली असेल त्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या पंधरा वर्षांच्या कालावधीतील महसुली विभागातील जमिनीची विक्री ;

(ख) पूर्वोक्त १५ वर्षांच्या कालावधीमध्ये त्या महसुली विभागातील भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये जमिनीच्या संपादनाची संबंधित निवाडे ; *१८९४ चा १.*

(ग) पूर्वोक्त कालावधीतील महसुली विभागातील जमिनीचे भाडेमूल्य ;

(३) प्रत्येक महसुली विभागातील एकेकट्या भूखंडाची प्रत्यक्ष आकारणी (यापुढे तिचा " पूर्ण आकारणी " असा उल्लेख करण्यात आला आहे.) दर चौरस मीटरचा आकारणीचा रुपयामधील प्रमाण दर व चौरस मीटरमध्ये भूखंडाचे क्षेत्रफळ यांच्या विहीत रीतीने पुर्णांक केलेल्या गुणाकाराइतक्या रकमेत जिल्हाधिकाऱ्यांकडून निश्चित करण्यात येईल ;

(४) कोणत्याही महसुली विभागातील जमिनींच्या आकारणीचा प्रमाण दर किंवा त्याचे बाजारमूल्य यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस [२][आयुक्तांकडे ]* अपील करता येईल :

[३]* * * * * *

(५) (मुदतमर्यादा आणि सुनावणी यांसाठी असलेली तरतूद धरून) अशी अपिले दाखल करण्यासाठी व निकालात काढण्यासाठी राज्य शासनास कलम ३०६ अन्वये नियम करता येतील.

[१]सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २०, दुसरी अनुसूची या अन्वये कलमे २६२-क ते २६२-ड समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ९(अ) अन्वये " राज्य शासनाकडे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९(ब) अन्वये परंतुक वगळण्यात आले.

[*] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १३ पुढीलप्रमाणे वाचावे :—

" १३. या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमात करण्यात आलेल्या सुधारणांचा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस, राज्य शासनाकडे किंवा कोकण विभाग आयुक्तांकडे फाईल केलेल्या आणि प्रलंबित असलेल्या मुंबई शहर किंवा मुंबई उपनगर जिल्हा या संबंधातील कोणत्याही अपिलावर किंवा इतर कामकाजावर परिणाम होणार नाही आणि त्या त्यांना लागू होणार नाहीत आणि अशी अपिले व कामकाज, हा अधिनियम जणू अधिनियमित करण्यात आला नसल्याप्रमाणे, राज्य शासनाकडे किंवा उक्त आयुक्तांकडे किंवा, यथास्थिति, त्याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांपुढे चालू ठेवण्यात येईल आणि ते त्यांच्यातर्फे निकालात काढण्यात येईल.".

आकारणीचे प्रमाणभूत दर प्रसिद्ध करणे.

**२६२ग.** या प्रकरणान्वये निश्चित केलेले किंवा सुधारलेले आकारणीचे प्रमाणभूत दर ते अंमलात आणण्यापूर्वी **राजपत्रात** आणि विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने प्रसिद्ध करण्यात येतील.

आकारणीचे प्रमाणभूत दर सुधारण्यात येईपर्यंत दहा वर्षांकरिता अंमलात असणे.

**२६२घ.** प्रत्येक विभागाकरिता निश्चित केलेला आकारणीचा प्रमाणभूत दर, ज्यावर्षी निश्चित करण्यात आला त्याच्या लगतनंतरच्या महसुली वर्षाच्या पहिल्या दिवसापासून अंमलात येईल ; आणि तो कलम २६२-क मध्ये उल्लेखिलेल्या बँकेच्या व्याजाच्या दरात अथवा जमिनीच्या सरासरी बाजारमूल्यात कोणताही फेरफार झाला असला तरीही दहा वर्षांच्या मुदतीकरिता अंमलात राहील ; आणि उक्त मुदत संपल्यानंतर या प्रकरणाच्या तरतुदीनुसार सुधारणा करण्यास पात्र होईल. त्याची अशा रीतीने सुधारणा करण्यात येईपर्यंत पूर्वोक्ताप्रमाणे निश्चित केलेला दर अंमलात असल्याचे मानले जाईल ;

हमीची मुदत.

**२६२ ङ.** (१) कलम २६२-क मध्ये उल्लेखिलेल्या बँकेच्या व्याजाच्या दरात कोणताही फेरफार झाला असला तरीही किंवा आकारणीच्या प्रमाणभूत दराची सुधारणा करण्यात आली असली तरीही, या प्रकरणान्वये कोणत्याही जमिनीसंबंधात निश्चित केलेली आकारणी, ती ज्या दिनांकास निश्चित केली असेल त्या दिनांकापासून पन्नास वर्षांच्या मुदतीकरिता (अशा मुदतीस " हमीची मुदत " म्हणता येईल) अंमलात राहील.

(२) हमीची मुदत संपल्यानंतर आकारणी सुधारणा केली जाण्यास पात्र होईल ; आणि या प्रकरणाच्या पूर्ववर्ती तरतुदी जेथवर शक्य असतील तेथवर अशा सुधारणेस लागू होतील.

(३) आकारणीची अशा रीतीने सुधारणा करण्यात येईपर्यंत, केलेली आकारणी, हमीची मुदत संपली असली तरीही, अंमलात राहील.]

आकारणी विषयक समझोता कोणाबरोबर करावा.

**२६३.** (१) जमिनीच्या प्रत्येक भागाच्या जमीन महसुलविषयक आकारणीबाबत समझोता तिच्या वरिष्ठ धारकांबरोबर करण्यात येईल.

(२) जर वरिष्ठ धारक गैरहजर असेल आणि मुंबईत त्याचा माहीत असलेला असा कोणताही प्राधिकृत अधिकर्ता नसेल किंवा जमिनींचा वरिष्ठ धारक म्हणून समजला जाण्याचा कोणाला हक्क आहे याबद्दल वाद असेल तर, जमिनीचा प्रत्यक्ष ताबा ज्या व्यक्तीकडे असेल त्या व्यक्तीबरोबर समझोता करता येईल आणि अशा रीतीने ठरविलेली कोणतीही आकारणी त्या जमिनीचा जो कायदेशीर वरिष्ठ धारक असेल त्याच्यावर बंधनकारक राहील.

(३) ताबा असणाऱ्या व्यक्तीने या संहितेच्या तरतुदीनुसार दिलेली कोणतीही रक्कम ही वरिष्ठ धारकाच्या वतीने दिलेली रक्कम आहे असे मानण्यात येईल.

(४) जेव्हा वरिष्ठ धारक किंवा ज्या व्यक्तीकडे ताबा असेल ती व्यक्ती सहजगत्या निश्चित ठरविता येत नसेल अशा बाबतीत. जिल्हाधिकारी, उक्त जमिनीत किंवा जमिनीवर वरिष्ठ धारक म्हणून हक्क सांगणाऱ्या किंवा उक्त जमिनीच्या कब्जाबाबत अधिकार सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात त्यांनी अशा हक्काविषयी कळवावे अशी नोटीस देईल.

(५) जर कोणत्याही व्यक्तीने, अशी नोटीस दिल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यास कळवून असा अधिकार प्रस्थापित केला नसेल तर, जिल्हाधिकाऱ्याला स्वेच्छा निर्णयानुसार अशा जमिनींची आकारणी करता येईल आणि वरिष्ठ धारक आणि त्यावेळी किंवा त्यानंतर जमिनीचा ताबा ज्या व्यक्तीकडे असेल ती प्रत्येक व्यक्ती त्याप्रमाणे जबाबदार राहील.

**२६४.** (१) जमिनीचा वरिष्ठ धारक किंवा तो गैरहजर असल्याचा जमिनीचा प्रत्यक्ष ताबा ज्या व्यक्तीकडे असेल ती व्यक्ती, धारण केलेल्या जमिनीवर देणे असलेल्या जमीन महसुलाबद्दल जातीने व मालमत्तेच्या रुपाने जबाबदार असेल. जमीन महसुलाचे दायित्व.

(२) जमिनीबद्दल देणे असलेल्या जमीन महसुलाची थकबाकी ही, तीत हितसंबंध असणाऱ्या व्यक्तींनी उक्त रकमेची मागणी करणाऱ्या व जमिनीवर किंवा जमिनीजवळ लावण्यात आलेल्या नोटीशीत याबाबत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या दिनांकास किंवा त्या दिनांकाच्या आत ती देण्यास कसूर केल्यास, त्या जमिनींवर व तिच्या प्रत्येक मार्गावर प्रमुख भार असेल.

**२६५.** (१) या प्रकरणान्वये कोणत्याही जमिनीवर जमीन महसुलाच्या थकबाकींस, कोणत्याही अशा जमिनीच्या किंवा तिच्या वरिष्ठ धारकांच्या कोणत्याही इतर कर्जावर, मागणीवर किंवा कोणत्याही हक्क मागणीवर—मग ते गहाण, निकालपत्र—हुकूमनामा, अंमलबजावणी, जप्ती यांच्या संबंधातीत असो वा अन्यथा कोणत्याही प्रकारचे असो— प्राधान्य देण्यात येईल. राज्य शासनाच्या हक्क मागण्यांस प्राधान्य देणे.

(२) जमीन महसुलाच्या थकबाकीव्यतिरिक्त परंतु या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये महसूली मागणी म्हणून वसूल करता येण्याजोग्या कोणत्याही पैशासंबंधातील राज्य शासनाच्या हक्क मागणीला, कोणत्याही जमिनीवरील सर्व अप्रतिभूत मागण्यांवर प्राधान्य देण्यात येईल.

**२६६.** राज्य शासनाकडून देण्यात येतील अशा आदेशांना अधीन राहून जिल्हाधिकारी, कोणत्याही जमिनींच्या संबंधात देणे असलेला महसूल ज्या व्यक्तींना, ज्या जागी व ज्या मुदतीच्या आत दिला पाहिजे. त्या व्यक्ती, त्या जागा व त्या मुदती यांचे नियमन करणारे आदेश वेळोवेळी देईल व ते नोटिशीद्वारे माहीत करून देईल व अशी नोटीस जमीन महसूल देणाऱ्या जमिनीच्या सर्व वरिष्ठ धारकांवर व ते गैरहजर असतील तर ती जमीन ज्या व्यक्तींच्या ताब्यात असेल त्या व्यक्तींवर बजावण्यात येईल : महसूल देण्याच्या संबंधात निदेश देण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

परंतु, या प्रकरणाच्या तरतुदींन्वये कोणत्याही बाबतीत बसवावयाची आकारणी, वार्षिक एक रुपयापेक्षा अधिक होत नसेल तर, जिल्हाधिकाऱ्याने राज्य शासनाच्या आदेशांना अधीन राहून अशा आकारणीऐवजी त्यास वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे अधीन राहून, जी रक्कम आकारणीच्या रकमेच्या वाजवीरीत्या समप्रमाणात असल्याचे वाटेल परंतु जी कोणत्याही बाबतीत आकारणीच्या तीस पटीहून अधिक असणार नाही. अशी रक्कम, एका ठोक रकमेच्या स्वरूपात बसविणे हे कायदेशीर असेल.

**२६७.** (१) जर कोणताही जमीन महसूल तो जेव्हा देय होईल त्यावेळी किंवा त्या मुदतीत देण्यात आला नाही तर, जिल्हाधिकाऱ्याला, ज्या दिवशी थकबाकीची रक्कम देय होईल त्याच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्या दिवसानंतर, मागणीची नोटीस वरिष्ठ धारकावर किंवा ताबा असणाऱ्या व्यक्तींवर किंवा या दोघांवर बजाविता येईल. थकबाकीची रक्कम देय झाल्यानंतर मागणीची नोटीस बजावणे.

(२) ज्या कोणत्याही व्यक्तीला अशी नोटीस देण्यात आली असेल अशा प्रत्येक व्यक्तीवर, त्याबद्दल जास्तीत जास्त दोन रुपयांची, अनुसूची च मधील कोष्टकात या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या दरानुसार ठरविलेली फी आकारण्यात येईल :

परंतु, कोणत्याही बाबतीत नोटिशीबद्दल आकारण्यात येणारी फी उक्त जमीन महसुलाच्या बाबतीत देण्यात आली असेल त्या जमीन महसुलापेक्षा अधिक असणार नाही.

(३) जर वरिष्ठ धारक किंवा, यथास्थिति, ताबा असणारी व्यक्ती, रक्कम देण्याविषयी मागणीची लेखी नोटीस बजावण्यात आल्यानंतर वीस दिवसांच्या मुदतीत देय महसुलाची फेड करण्यात कसूर करील तर, जिल्हाधिकाऱ्याने—

(क) कसूर करणाऱ्याची जंगम मालमत्ता जप्त करून व विकून ; किंवा

(ख) ज्या जमिनीबाबत महसूल देय असेल त्या जमिनीचा, मागणी पूर्ण करण्यासाठी आवश्यक असेल असा भाग जप्त करून व विकून ; किंवा

(ग) कसूर करणाऱ्याच्या इतर कोणत्याही स्थावर मालमत्तेवरील त्याचा हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंध जप्त करून व विकून ;

उक्त महसूल वसूल करणे हे कायदेशीर असेल.

अशी विक्री जाहीर लिलावाद्वारे करण्यात येईल आणि अशी विक्री त्याबद्दलची नोटीस **राजपत्रात** प्रसिद्ध केल्यानंतर, निदान पंधरा दिवसांची मुदत संपेपर्यंत करण्यात येणार नाही.

विक्री कशी करावयाची.

**२६८.** या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये करावयाची विक्री, या संहितेची कलमे १९७, १९८, १९९, २००, २०१, २०२, २०३, २०४, २०५, २०६, २०७, २०८, २०९, २१०, २११, २१२, २१३, २१४, २१५, २१८, २१९ आणि २२० यांच्या तरतुदींनुसार करण्यात येईल :

परंतु, त्याबाबतीत नमूद केलेल्या कोणत्याही पुरेशा करणास्तव विक्री वेळोवेळी पुढे ढकलता येईल आणि ज्यावेळी विक्री तीस दिवसांपेक्षा जास्त मुदतीपर्यंत लांबणीवर टाकण्यात येईल तेव्हा नवीन नोटीस देण्यात येईल. मात्र, कसूर करणाऱ्याने अशी नोटीस न देण्यास संमती दिली तर नवीन नोटीस देण्याची आवश्यकता नाही.

कसूर करणारांस पकडता व अटकेत ठेवता येईल.

**२६९.** जर कसूर करणाऱ्याच्या मालमत्तेच्या विक्रीमुळे जमीन महसुलाच्या थकबाकीसंबंधातील मागणी पूर्ण होत नसेल तर जिल्हाधिकाऱ्याने त्यास पकडण्याची व्यवस्था करणे, व ऋणकोना अटकेत ठेवण्यासाठी मुंबई शहरामध्ये त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्याअन्वये दिवशी तुरुंगात अटकेत ठेवणे हे कायदेशीर असेल व त्या कारणासाठी, कसूर करणाऱ्याबरोबर पाठविलेले जिल्हाधिकाऱ्याच्या सहीचे मागणीबाबतचे प्रमाणपत्र हे, कर्जासंबंधीच्या निकालपत्राच्या अंमलबजावणीत अटक करण्याच्या सर्वसामान्य प्रकरणांबाबत रीतसर कायदेशीर कार्यरीती अनुसरण्यात आल्याप्रमाणे शेरीफाने काढलेले आवश्यक ते अधिपत्र (वारंट) आहे असे समजण्यात येईल :

परंतु, अशी कसुरी ही हेतुपुरस्सर केलेली असल्याशिवाय आणि कसूर करणाऱ्या व्यक्तीस तिला अटक करण्याविरुद्ध किंवा अटकावून ठेवण्याविरुद्ध कारण दाखविण्याची संधी दिल्याशिवाय अशी कोणतीही अटक करण्यात येणार नाही :

परंतु, आणिखी असे की, देणे असलेली रक्कम दिल्यानंतर अशी कैदेची शिक्षा कोणत्याही वेळी संपुष्टात येईल व ती कोणत्याही बाबतीत—

(एक) देणे असलेली रक्कम पन्नास रुपयांहून अधिक असेल तर, सहा महिने मुदतीपेक्षा ; आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत, सहा आठवड्यांपेक्षा,

अधिक असणार नाही.

जप्ती व विक्रीपासून सूट.

**२७०.** हुकुमनाम्याची अंमलबजावणी करताना ज्या मालमत्तेची जप्ती व विक्की करण्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये सूट देण्यात आली असेल अशा सर्व मालमत्तेस कलम २६७ अन्वये जप्ती व विक्री करण्यापासून सूट देण्यात येईल.

(२) अशा रीतीने सूट मिळण्यास कोणती मालमत्ता पात्र आहे याबाबतचा जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय निर्णायक असेल.

**२७१.** कलमे २६२ ते २६९ च्या तरतुदींमुळे (उद्‌भवणाऱ्या कोणत्याही प्रश्नांवरील जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय [१][कलम २६२-ख. पोट-कलम (४) व (५) आणि कलम २७४ च्या तरतुदींच्या अधीन] त्याच्याशी ज्या व्यक्तींचा संबंध असेल त्या सर्व व्यक्यतींवर बंधनकारक असेल आणि त्याप्रमाणे ती अंमलात आणण्यात येईल ; परंतु अशा कोणत्याही व्यक्तीने असा निर्णय तिला कळविलेल्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाच्या कायदेशीरपणाबद्दल आक्षेप घेण्यासाठी [२][आयुक्तांकडे [३][किंवा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे ] तो अपील करील आणि त्याच्याविरुद्ध जो आदेश देण्यात येईल तो आदेश पाळील आणि अशा रीतीने फर्माविण्यात आलेला सर्व खर्च व व्याज देईल किंवा विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अपील दाखल करण्यात त्याने कसूर केली तर त्यास फर्माविण्यात येईल तेव्हा मागणी केलेली रक्कम ती देईल याविषयी जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने प्रतिपूर्ती दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय स्थगित करण्यात येईल.

प्रथमतः जिल्हाधिकाऱ्याचा निर्णयाची अंमलबजावणी करावी, परंतु प्रतिभूती दिल्यानंतर अंमलबजावणी तहकूब करता येईल.

**२७२.** कसूर करणाऱ्यांविरुद्ध चालू असलेल्या सक्तीच्या सर्व आदेशिका, त्याच्याकडून मागण्यात आलेली रक्कम त्याने अशा आदेशिकेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याकडे हरकत नोंदवून दिल्यानंतर किंवा देऊ केल्यावर किंवा मागणीच्या कायदेशीरपणाबद्दल आक्षेप घेणारे अपील त्याने [४][आयुक्तांकडे ] किंवा यथास्थिति महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे दाखल केल्यानंतर आणि उक्त अपिलांचा निर्णय करण्यात येईपर्यंत अपिलात दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्याचे [५][आयुक्तांचे ] [६][किंवा यथास्थिति महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे] समाधान होईल अशा रीतीने तरतूद केल्याशिवाय तो अधिकारक्षेत्र सोडून जाणार नाही किंवा त्यात असलेली त्याची कोणतीही मालमत्ता काढून नेणार नाही किंवा ती हस्तांतरित करणार नाही याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे [७][आयुक्तांचे ] किंवा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे ] समाधान होईल असा रीतीने त्याने प्रतिभूती दिल्यावर, थांबविण्यात येतील.

हरकत नोंदवून रक्कम दिल्यानंतर आणि अपील सादर केल्यानंतर व प्रतिभूती दिल्यानंतर सक्ती करणाऱ्या आदेशिकेची अंलबजावणी थांबविणे.

**२७३.** कलम २६९ च्या तरतुदींअन्वये काढलेल्या सर्व अधिपत्रांवर (वॉरंटांवर) किंवा ज्या व्यक्तींच्या मालमत्तेच्या संबंधात अशी अधिपत्रे (वॉरंटे) काढण्यात आली असतील अशा व्यक्तींकडून कसूर करणाऱ्यांच्या मालमत्तेची जप्ती व विक्री, यांवर अनुसूची छ मधील कोष्टकानुसार फी देण्यात येईल, आणि जेव्हा जेव्हा जप्त केलेली मालमत्ता कोण्त्याही चपराशाच्या किंवा चपराश्यांच्या स्वाधीन करण्यात येईल तेव्हा तेव्हा कामावर लावलेल्या प्रत्येक चपराशाच्या बाबतीत, तशाच रीतीने प्रत्येक दिवसासाठी पंचवीस पैसे जादा फी देण्यात येईल.

कसूर करणाऱ्याची मालमत्ता जप्त करण्यासाठी व तिची विक्री करण्यासाठी अधिपत्राच्या (वॉरंटच्या) संबंधातील फी जादा फी.

---

[१]सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २०, दुसऱ्या अनुसूचीद्वारे “ कलम २७४ च्या उपबंधांच्या अधीन ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १० अन्वये “ राज्य शासनाकडे ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ६ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधनियमाच्या कलम ७ खंड (क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ११ अन्वये “ राज्य शासन ” या मजकुराऐवजी “ आयुक्त ” हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] वरील आधिनियमाच्या कलम ७ खंड (ख) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील आधिनियमाच्या कलम ७ खंड (ग) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] अपिले.

**२७४.** [1][कलम २६२-ख, पोट-कलम (४) आणि (५) यात तरतूद केली असेल त्याच्या व्यतिरिक्त ] जिल्हाधिकाऱ्याने किंवा या प्रकरणान्वये जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करणाऱ्या त्याच्या सहायकांपैकी कोणत्याही सहायकाने किंवा हाताखालील इतर व्यक्तींना दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध [2][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे ] अपील करता येईल.

न्यायालय शुल्क.

**२७५.** मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ आणि या संहितेचे कलम ३२४ मध्ये काहीही असले तरी [4][महाराष्ट्र न्यायाधिकरणापुढील] प्रत्येक अपिलावर, या प्रकरणान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा किमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावण्यात येईल. १९५९ चा मुंबई ३६.

महसूलमुक्त जमिनी देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**२७६.** राज्य शासनाने, विनामूल्य आणि महसूलमुक्त आणि प्रदानाशी संबंधित असतील अशा इतर अटी व शर्ती असल्यास त्या अटी व शर्तींवर जमिनी देणे हे कायदेशीर असेल त्या वंशपरंपरागत असोत किंवा काही वर्षांच्या मुदतीने देण्यात आलेल्या असोत.

**मुंबई शहर भू-मापन व सीमा चिन्हे**

मुंबई शहर भू-मापनास मान्यता.

**२७७.** राज्य शासनाच्या प्राधिकारान्वये अगदी अलीकडेच केलेल्या भू-मापनास “ मुंबई शहर भू-मापन ” असे संबोधण्यात येईल आणि त्यावेळी ठरविलेल्या जमिनीच्या सीमा आणि उक्त भू-मापनाची सर्व कागदपत्रे (ही संहिता अमलात येण्यापूर्वी त्यामध्ये केलेला फेरफार किंवा दुरुस्ती यांचा समावेश करून) या प्रकरणान्वये सर्व कामकाजासाठी आणि या प्रकरणाच्या सर्व प्रयोजनांसाठी सकृतदर्शनी पुरावा म्हणून समजण्यात येतील :

परंतु जिल्हाधिकाऱ्याला, असा जमिनीत हितसंबंध असणाऱ्या पक्षकारांच्या अर्जावरून, अशा ठरविलेल्या जमिनीच्या सीमांकनास किंवा अशा कोणत्याही कायदपत्रातील कोणत्याही नोंदीत कोणताही फेरबदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची व्यवस्था करता येईल आणि जिल्हाधिकारी सक्षम न्यायालयाच्या हुकुमनाम्यानुसार किंवा आदेशानुसार असा फेरबदल किंवा दुरुस्ती करील.

राज्य शासनाने भू-मापन करण्याचा आदेश देणे आणि अधीक्षक नेमणे.

**२७८.** (१) राज्य शासनाला, त्यास योग्य वाटेल त्यावेळी, मुंबई शहरामध्ये असलेल्या जमिनीचे भूमापन करण्याचा आदेश देता येईल ; आणि अशा प्रयोजनाकरिता, भू-मापन अधीक्षकाची आणि एका किंवा अधिक सहायक भू-मापन अधीक्षकांची नेमणूक करता येईल.

(२) सहायक अधीक्षकांना जे अधिकार प्रदान करतील त्या अधिकारांचा ते वापर करतील.

जिल्हाधिकारी किंवा त्याच्या हाताखालील व्यक्ती यांना जमिनीवर प्रवेश करता येईल.

**२७९.** (१) जिल्हाधिकाऱ्याने किंवा आपल्या लेखी आदेशाद्वारे याबाबतीत योग्य रीतीने अधिकृत करण्यात आलेल्या त्याच्या सहायकांपैकी किंवा हाताखालील इतर व्यक्तींपैकी कोणत्याही सहायकाने किंवा व्यक्तीने आणि भू-मापनाच्या कामावर ठेवलेल्या अधीक्षकाने किंवा कोणत्याही इतर अधिकाऱ्याने, कमीत कमी चौवीस तासांची नोटीस दिल्यानंतर, कोणत्याही जमिनीवर उभारलेल्या भू-मापनाच्या सीमा चिन्हांची पहाणी करण्याच्या किंवा त्यात फेरफार करण्याच्या, त्यांचे नवीकरण करण्याच्या किंवा त्यात दुरुस्ती करण्याच्या कामासाठी किंवा या संहितेच्या कलम २४१ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने भू-मापन करण्याकरिता तीत प्रवेश करणे हे कायदेशीर असेल.

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २०, याच्या दुसऱ्या अनुसूचीद्वारे “ जिल्हाधिकाऱ्याने ” या मजकुरापूर्वी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ८ खंड (१) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ८ खंड (ख) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधनियमाच्या कलम ९ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२८०.** भू-मापनाच्या कामासाठी कोणत्याही जमिनीवर प्रवेश करण्यापूर्वी, भू-मापन करावयाच्या जमिनीच्या आणि त्या जमिनीच्या निकटवर्ती जमिनींच्या धारकांवर किंवा भोगवटादारांवर, आपल्या सहीने लेखी नोटीस बजावण्याची अधीक्षकास व्यवस्था करता येईल ; उक्त नोटिशीद्वारे, त्याने, आपल्या समक्ष किंवा याबाबतीत तो प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्या समक्ष विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा (अशी नोटीस बजावण्यात आल्यानंतर, तीन दिवसांपेक्षा कमी नसेल अशा) मुदतीच्या आत, सीमा दाखविण्यासाठी आणि या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असेल अशी माहिती देण्यासाठी जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत अशा जमिनीवर हजर राहण्याबद्दल, अधीक्षक त्यास फर्माबील आणि हजर राहण्यास त्यांनी कसूर केल्यास, तो किंवा असा अधिकारी, त्यांच्या अनुपस्थितीत, भू-मापनाच्या कामास प्रारंभ करील असे सुद्धा उक्त नोटीशीद्वारे कळविण्यात येईल.

*उपस्थित राहण्याकरिता जमीन धारकावर बजावावयाची नोटीस.*

**२८१.** कलम २८० अन्वये नोटीस योग्यरित्या बजावण्यात आल्यानंतर, अधीक्षकास किंवा तो प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्यास भू-मापनाच्या कामाचा प्रारंभ करता येईल—मग ज्या व्यक्तींवर नोटीसा बजाविण्यात आल्या असतील अशा व्यक्ती हजर असोत व नसोत.

*नोटीसा बजावल्या नंतरच अधीक्षकाने भू-मापनाचे काम सुरू करणे.*

**२८२.** (१) या प्रकरणान्वये ज्या जमिनीचे भू-मापन करण्यात आले असेल त्या सर्व जमिनींचा एक नकाशा आणि नोंदवही अधीक्षक तयार करील.

*भू-मापन नकाशा आणि नोंदवही.*

(२) नकाशामध्ये स्वतंत्रपणे दाखविण्यात आलेल्या आणि नोंदवहीमध्ये नमूद करण्यात आलेल्या जमिनीच्या प्रत्येक तुकड्याला दर्शक क्रमांक देण्यात येईल आणि भू-मापनाच्या वेळी उक्त जमिनीचा धारक असल्याचे दिसून येणाऱ्या व्यक्तीचे नाव नोंदवहीमध्ये नमूद करण्यात येईल.

(३) अशा नकाशात किंवा नोंदवहीत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारास बाध येणार नाही.

**२८३.** अधीक्षकास कोणत्याही वेळी या प्रणरणान्वये ज्या कोणत्याही जमिनीचे भू-मापन करावयाचे असेल किंवा जिचे भू-मापन करण्यात आले असेल अशा कोणत्याही जमिनीवर भू-मापन करण्याच्या प्रयोजनाकरिता तो योग्य म्हणून ठरवील अशा वस्तूच्या आणि इतक्या संख्येतील आणि अशा रीतीने तात्पुरती किंवा कायम सीमाचिन्हे, उभारणीची व्यवस्था करता येईल :

*अधीक्षकास सीमाचिन्हे उभारता येतील.*

परंतु, ज्यावेळी कायम इमारत, भिंत किंवा कुंपण याद्वारे सीमा ठरविण्यात आली असेल त्यावेळी कोणतीही कायम स्वरूपाची सीमाचिन्हे, उभारण्यात येणार नाही.

**२८४.** (१) कलम २८३ अन्वये कोणतीही तात्पुरती सीमाचिन्हे उभारण्यात आली असतील तेव्हा, अधीक्षकास ज्या जमिनीवर किंवा ज्या निकटवर्ती जमिनीवर अशी सीमाचिन्हे उभारण्यात आली असतील त्या जमिनीच्या धारकावर आपल्या सहीने एक लेखी नोटीस बजावण्याची व्यवस्था करता येईल ; उक्त नोटिशीद्वारे त्याने भू-मापनाचे काम पूर्ण होईतोपर्यंत अशी सीमाचिन्हे सुस्थितीत ठेवण्याबद्दल त्यास फर्माविता येईल.

*तात्पुरती सीमाचिन्हे सुस्थितीत ठेवणे.*

(२) जर अशा धारकाने, अशा नोटीशीचे पालन केले नाही तर, अधीक्षक सीमाचिन्हे दुरुस्त करील आणि त्याबद्दलचा खर्च जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे या प्रकरणाच्या तरतुदींन्वये अशा धारकांकडून वसूल करण्यायोग्य असेल.

भू-मापन फीची आकारणी करता येईल.

**२८५.** (१) या प्रकरणान्वये भू-मापन केलेल्या कोणत्याही जमिनीचा धारक अशा क्षेत्रावर आकारणी करण्यात आलेली भू-मापन फी व अशा जमिनीचे करयोग्य मूल्य देण्यास पात्र ठरेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये द्यावयाच्या भू-मापनाच्या फीच्या रकमेचे, याबाबतीत राज्य शासनाने केलेल्या नियमांनुसार जिल्हाधिकाऱ्यांकडून नियमन करण्यात येईल.

(३) पोट-कलमे (१) आणि (२) अनुसार आकारण्यात आलेली कोणतीही भू-मापन फी, मुंबई शहराचे भू-मापन पूर्ण झाल्यानंतर, उक्त फी देण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर जिल्हाधिकाऱ्यांकडून नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत देण्यात येईल ; आणि अशी भूमापन फी या प्रकरणाच्या तरतुदींन्वये जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे आकारण्यात येईल.

(४) या कलमान्वये कोणत्याही जमिनीवर आकारण्यात आलेली भू-मापन फी ज्या व्यक्तीने दिली असेल अशा कोण्त्याही व्यक्तीस अशा जमिनीशी संबंधित कलम २८२ अन्वये तयार केलेल्या नकाशातील प्रमाणित उतारा आणि नोंदवहीतील प्रमाणित उतारा विनामूल्य मिळण्याचा अधिकार असेल.

भू-मापना-संबंधातील सर्व कागदपत्रे जिल्हाधिकाऱ्या-कडे पाठविणे.

**२८६.** (१) शहराच्या कोणत्याही भागाचे भू-मापन पूर्ण झाल्यानंतर अधीक्षक अशा भागाच्या भू-मापनाच्या संबंधातील सर्व नकाशे, नोंदवह्या आणि इतर कागदपत्रे जिल्हाधिकाऱ्यांकडे ठेवील.

(२) नकाशे इत्यादी अशा रीतीने ठेवण्यात आल्याबद्दल **राजपत्रामध्ये** अधिसूचित करण्यात येईल आणि भू-मापनामध्ये हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी असे नकाशे, नोंदवह्या आणि इतर कागदपत्रे यांची विनामूल्य पाहणी करता येईल.

(३) अशा मुदतीमध्ये, जिल्हाधिकारी, आवश्यक असेल तर, आणि संबंधित पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकारांच्या अधिकारास बाध न आणता कलम २८२ अन्वये तयार करण्यात आलेला नकाशा किंवा नोंदवही विनामूल्य दुरुस्त करण्याची व्यवस्था करील.

भू-मापन नकाशा आणि नोंदवही ठेवणे.

**२८७.** (१) कलम २८२ अन्वये तयार करण्यात आलेला नकाशा व नोंदवही जिल्हाधिकाऱ्यांकडे ठेवण्यात येईल व तो आवश्यक असेल त्याप्रमाणे वेळोवेळी, कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारास बाधा न आणता, अशा नकाशात सुधारणा करण्याची आणि नोंदवहीत नोंदी दुरुस्त करण्याची व्यवस्था करील ;

परंतु, कोणत्याही व्यक्तीस या कलमाच्या प्रयोजनाकरिता जमिनीमध्ये कोणताही हितसंबंध संपादन केल्याबद्दल नोटीस देणे आवश्यक असणार नाही.

(२) जिल्हाधिकाऱ्यास नकाशाच्या कोणत्याही भागाची फेरतपासणी करण्याचा खर्च आणि असा भाग ज्या जमिनीशी संबंधित असेल त्या जमिनीवरील सर्व आकस्मिक खर्च यांची आकारणी करता येईल आणि असा खर्च अशा जमिनधारकाने देण्याजोगा असेल आणि या प्रकरणाच्या तरतुदींन्वये जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे त्याची आकारणी करण्यात येईल.

नकाशांची सुधारणा.

**२८८.** या प्रकरणान्वये राज्य शासनाकडून याबाबतीत करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशान्वये काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास या प्रकरणान्वये तयार करण्यात आलेल्या कोणत्याही नकाशात सुधारणा करण्यासाठी या प्रकरणान्वये अधीक्षकाच्या अधिकारांपैकी कोणत्याही अधिकाराचा वापर करता येईल.

**२८९.** जमिनीचा प्रत्येक वरिष्ठ धारक, त्याने धारण केलेल्या जमिनीवरील भू-मापनाची सीमाचिन्हे सुस्थितीत व चांगल्या दुरुस्त स्थितीत ठेवण्यास आणि त्यात फेरबदल करण्यास किंवा त्या काढून टाकण्यास जिल्हाधिकाऱ्यांकडून जो वाजवी खर्च करण्यात आला असेल असा प्रत्येक चिन्हांसाठी पाच रुपयांहून अधिक नसेल एवढा खर्च देण्यास जबाबदार असेल.

सीमाचिन्हे सुस्थितीत ठेवण्याची व त्यांची दुरुस्ती करण्याची जबाबदारी.

**२९०.** कोणत्याही भू-मापनाची सीमाचिन्हे नष्ट झाल्यास, खराब झाल्यास, तिला नुकसान पोहोचविण्यात आल्यास किंवा ती काढून टाकण्यात आल्यास जिल्हाधिकाऱ्याने, ज्या जमिनीचे चिन्ह अशी सीमा-निर्दिष्ट करीत असेल अशा कोणत्याही जमिनीच्या वरिष्ठ धारकावर किंवा त्याच्या गैरहजेरीत जमीन ताब्यात असणाऱ्या व्यक्तींवर उक्त जिल्हाधिकाऱ्याने सही केलेला आदेश बजावणे हे कायदेशीर असेल ; अशा आदेशाद्वारे उक्त आदेश बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत अशा वरिष्ठ धारकास किंवा जमीन ताब्यात असणाऱ्या व्यक्तीस स्वखर्चाने उक्त चिन्हाचे नवीकरण करण्यास किंवा ते दुरूस्त करण्यास सांगितले जाईल.

जिल्हाधिकाऱ्याला भू-मापनाची नवीन चिन्हे उभारण्यास किंवा त्या दुरूस्ती करण्यास वरिष्ठ धारकास भाग पाडता येईल. मागणी कशी करावी.

**२९१.** जर उक्त भूमापनाच्या सीमा चिन्हाचे उक्त मुदतीत जिल्हाधिकाऱ्यांचे समाधान होईल अशा रीतीने नवीकरण करण्यात किंवा ती दुरुस्त करण्यात आली नाही तर, जिल्हाधिकाऱ्याने किंवा त्याच्या सहायकांपैकी किंवा हाताखालच्या व्यक्तींपैकी, कोणत्याही सहायकाने किंवा हाताखालच्या व्यक्तीने किंवा यात यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे योग्यरितीने प्राधिकृत केलेल्या इतर व्यक्तीने, उक्त चिन्ह ज्या जमिनीसंबंधात असेल अशा कोणत्याही जमिनीवर प्रवेश करणे व तिचे नवीकरण करणे किंवा ती दुरूस्त करणे हे कायदेशीर असेल ; आणि अशा रितीने नवीकरण केलेल्या किंवा दुरूस्त केलेल्या प्रत्येक चिन्हांसाठी, जिल्हाधिकाऱ्याने ज्याच्या जमिनीची सीमा अशा कोणत्याही चिन्हाने निर्दिष्ट करण्यात आली असेल अशा प्रत्येक वरिष्ठ धारकावर किंवा जमिन ताब्यात असणाऱ्या व्यक्तींवर एकूण दहा रुपयांहून अधिक नसेल अशी त्यास योग्य वाटेल एवढी रक्कम आकारणे हे कायदेशीर असेल.

कसूर केल्याबर जिल्हाधिकारी किंवा सहायक यास प्रवेश करता येईल व चिन्हांचे नवीकरण करता येईल किंवा ती दुरूस्त करता येतील. चिन्हांचे नवीकरण करण्याचा किंवा ती दुरूस्त करण्याचा आकार.

**२९२.** कोणत्याही व्यक्तीस या प्रकरणान्वये करण्यात आलेल्या भू-मापनाच्या प्रयोजनाकरिता किंवा तदनुसार सीमाचिन्हे उभारण्याकरिता, कोणत्याही जमिनीसंबंधातील स्वामित्वपत्रे सादर करण्याची किंवा त्यांमधील मजकूर उघड करण्याची सक्ती करण्यात येणार नाही.

स्वामित्व-पत्राचा विशेषा-धिकार.

अनौपचारिकतेमुळे कामकाजावर परिणाम न होणे.

**२९३.** कलमे २७८ ते २९२ (दोन्ही धरून) अन्वये हाती घेतलेल्या कामकाजास, कोणत्याही अनौपचारिकतेमुळे बाध येणार नाही; मात्र या कलमामधील तरतुदींचे तत्वार्थाने व परिणामदृष्ट्या पालन करण्यात येईल.

**शासकीय जमिनी व किनाऱ्यालगतचा प्रदेश**

जमिनी व किनाऱ्यालगतचा प्रदेश यांवरील शासनाचा अधिकार.

**२९४.** मुंबई शहरातील भोगवट्यात नसलेल्या सर्व जमिनी आणि भरतीच्या पाण्याच्या खुणेखालील किनाऱ्यालगतच्या प्रदेशाचा भोगवट्यात नसलेला प्रत्येक भाग कायदेशीररीत्या अस्तित्वात असलेले लोकांचे जाण्यायेण्याचे अधिकार व इतर सर्व अधिकार यांस नेहमीच अधीन राहून, राज्य शासनाची मालमत्ता आहे, असे समजण्यात येईल व ती राज्य शासनाची मालमत्ता असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

शंकेचे निरसन व्हावे म्हणून याद्वारे असे स्पष्टपणे घोषित करण्यात येत आहे की, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, पूर्वीच्या कोणत्याही कायद्याद्वारे राज्य शासनाची मालमत्ता असल्याचे घोषित केलेल्या, भोगवट्यात नसलेल्या जमिनीवरील राज्य शासनाच्या अधिकाराला बाध येतो, असे समजले जाणार नाही.

अशा जमिनी व किनाऱ्यालगतचा प्रदेश यांचा कसा विनियोग करावा.

**२९५.** जिल्हाधिकाऱ्याने, राज्य शासनाची मंजुरी घेऊन त्यास योग्य वाटेल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून, राज्य शासनामध्ये निहित असलेल्या कोणत्याही जमिनीचा किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशाचा विनियोग करणे कायदेशीर असेल ; आणि अशा कोणत्याही बाबतीत अशा रीतीने विनियोग करण्यात आलेली जमीन किंवा किनाऱ्यालगतचा प्रदेश, केवळ अशा विहित केलेल्या रीतीने व मुदतीसाठी व अशा शर्तीस अधीन राहून धारण करण्यात येईल.

**जमिनी वगैरेचे हस्तांतरण**

जमिनीवगैरेच्या मालकीहक्काच्या हस्तांतरणाबाबत जिल्हाधिकाऱ्यास नोटीस देणे.

**२९६.** (१) राज्य शासनास जमीन महसूल देण्यास अधीन असलेल्या कोणत्याही जमिनीचा, घराचा किंवा इतर स्थावर मालमत्तेचा मालकी हक्क जेव्हा जेव्हा हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित करण्यात येईल तेव्हा तेव्हा, असे हस्तांतरण करणारी किंवा अभिहस्तांकन करणारी व्यक्ती आणि ज्या व्यक्तीकडे ते हस्तांतरीत करण्यात किंवा अभिहस्तांकित करण्यात आले असेल ती व्यक्ती, यांनी अनुक्रमे अशा हस्तांतरणाबद्दल जिल्हाधिकाऱ्याला नोटीस देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) अशी नोटीस, हस्तांतरणाचा किंवा अभिहस्तांकनाचा लेख केल्यानंतर किंवा त्याची नोंदणी केली असेल तर नोंदणीनंतर किंवा लेख नसेल तर ते हस्तांतरण किंवा अभिहस्तांकन अमलात आल्यानंतर, वीस दिवसांच्या आत देण्यात येईल.

(३) ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव कोणत्याही मालमत्तेच्या मालकी हक्कासंबंधात जिल्हाधिकाऱ्याच्या अभिलेखात दाखल केलेले असेल ती व्यक्ती मरण पावल्यास ज्या व्यक्तीकडे असा मालकीहक्क वारस म्हणून किंवा इतर रीतीने हस्तांतरित करण्यात येईल त्या व्यक्तीने त्याबाबतची नोटीस असा मृत्यू झाल्यापासून एक वर्षाच्या आत जिल्हाधिकाऱ्यास देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

नोटिशीचा नमुना.

**२९७.** (१) अनुसूची ज किंवा, यथास्थिति, अनुसूची झ च्या नमुन्यात नोटीस असेल आणि तीत उक्त नमुन्यान्वये आवश्यक असलेला सर्व तपशील स्पष्टपणे लिहिलेला असेल.

(२) जिल्हाधिकाऱ्यास तसे फर्माविणे योग्य आहे असे वाटत असेल तेव्हा, अशा नोटिशीबरोबर, अशा हस्तांतरणाचा लेख असल्यास तो लेख, ज्या जमिनीचे हस्तांतरण किंवा अभिहस्तांकन करावयाचे

असेल त्या जमिनीचा जो नकाशा जिल्हाधिकारी निदेश देईल अशा अधिकाऱ्याने काढला असेल आणि त्याच्या खरेपणाबद्दल सही केली असेल तो नकाशा आणि दवंडी पिटवून अशा हस्तांतरणाबद्दल किंवा अभिहस्तांकनाबद्दल जाहीर नोटीस दिली असल्याबद्दलचे प्रमाणपत्र, पाठविले पाहिजे.

**२९८.** निकटपूर्वीच्या दोन कलमान्वये आवश्यक असलेली नोटीस, तीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत देण्यात हयगय करणारी प्रत्येक व्यक्ती धारण केलेल्या जमिनीबद्दल जमीन महसूल म्हणून एक रुपयाहून कमी रक्कम देत असेल त्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार जास्तीत जास्त दहा रुपये दंडाच्या शिक्षेस आणि इतर कोणत्याही बाबतीत जास्तीत जास्त शंभर रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. नोटीस देण्यात हयगय केल्याबद्दल शास्ती.

**२९९.** कलमे २९६ व २९७ द्वारे आवश्यक असलेली नोटीस न देता राज्य शासनास जमीन महसूल देण्यास अधीन असेल अशी कोणतीही जमीन, घर किंवा इतर स्थावर मालमत्ता हस्तांतरित करणारी प्रत्येक व्यक्ती अशी नोटीस देण्यात येईपर्यंत किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या अभिलेखात करावयाची हस्तांतरणाची आवश्यक ती नोंद करण्यात येईपर्यंत, त्याबाबत जो जमीन महसूल देय होईल तो सर्व जमीन महसूल देण्यास राज्य शासनास जबाबदार असेल : मालकी हक्क हस्तांतरित करणारी परंतु त्याबाबत सूचना देण्याचे टाळणारी व्यक्ती महसुलास पात्र असण्याचे चालू राहणे.

परंतु, या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे जमिनीची, घराची किंवा इतर स्थावर मालमत्तेची कलम २६७ च्या तरतुदींअन्वये जप्त होण्याची किंवा विक्री होण्याची पात्रता कमी होते असे समजण्यात येणार नाही.

**३००.** (१) राज्य शासनास जमीन महसूल देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही जमिनीच्या, घराच्या किंवा इतर स्थावर मालमत्तेच्या बाबतीत किंवा त्या संबंधात, जिल्हाधिकाऱ्याच्या अभिलेखात करावयाच्या किंवा केलेल्या कोणत्याही नोंदीबाबत किंवा हस्तांतरणाबाबत कोणताही वाद किंवा प्रश्न उपस्थित करण्यात येईल तेव्हा, जिल्हाधिकारी, अशा नोंदीत किंवा हस्तांतरणात हितसंबंध असलेल्या सर्व पक्षकारांना, समन्स काढून बोलावील, त्यास आवश्यक वाटेल असा पुरावा मागवील, अशा साक्षीदारांची तपासणी करील आणि त्यानंतर तो अशा जमिनीच्या, घराच्या किंवा इतर स्थावर मालमत्तेच्या संबंधात आपल्या अभिलेखात कोणत्या नोंदी करण्यात येतील ते संक्षिप्त रीतीने चौकशी करून ठरवील. नोंदीबद्दल किंवा हस्तांतरणाबद्दल वाद असल्यास कार्यवाही.

(२) अशा कोणत्याही जमिनीचा, घराचा किंवा इतर स्थावर मालमत्तेच्या मालकीहक्क ठरविण्याबाबत सक्षम न्यायालयाने दिलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत जर कोणत्याही वेळी जिल्हाधिकाऱ्यास सादर करण्यात येईल तर जिल्हाधिकारी अशा आदेशास अनुसरून आपल्या अभिलेखात सुधारणा करील.

**३०१.** जिल्हाधिकाऱ्याच्या अभिलेखातील कोणत्याही मालकीहक्काची नोंदणी किंवा मालकीहक्काचे हस्तांतरण, ज्या जमिनीच्या, घराच्या किंवा इतर स्थावर मालमत्तेच्या बाबतीत असे कोणतेही हस्तांतरण करण्यात आले असेल किंवा अशी नोंदणी करण्यात आली असेल अशी जमीन, घर किंवा स्थावर मालमत्ता यातील शासनाच्या कोणताही अधिकार, मालकीहक्क किंवा हितसंबंध यांस कोणत्याही प्रकारे बाध येईल अशा रीतीने लागू आहे असे समजता कामा नये. नोंदीमुळे किंवा हस्तांतरणामुळे शासनाच्या अधिकारास बाध न येणे.

## कार्यपद्धती

**३०२.** (१) समन्स व कमिशन काढण्यासंबंधी आणि जिल्हा न्यायालयातील दाव्यात साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडण्यासंबंधी व त्यांना परिश्रमिक देण्यासंबंधी, त्या त्या वेळी अमलात असलेल्या दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या तरतुदी ह्या या प्रकरणाच्या तरतुदींन्वये जिल्हाधिकाऱ्याकडे हजर राहण्यासाठी समन्स काढून बोलाविलेल्या सर्व व्यक्तींना लागू असतील. समन्स वगैरेना कायदा लागू करणे. १९०८ चा ५.

(२) या प्रकरणान्वये देणे आवश्यक असलेली जी कोणतीही नोटीस देण्याचा जिल्हाधिकाऱ्यास किंवा त्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्यास अधिकार असेल ती नोटीस,—

(क) कोणत्याही व्यक्तीच्या नावे पाठविली असेल आणि—

(एक) अशा व्यक्तीच्या स्वाधीन केली असेल; तर किंवा

(दोन) तिच्या राहण्याच्या ठिकाणी आणि तिच्या गैरहजेरीत, तिच्या कुटुंबातील कोणत्याही प्रौढ व्यक्तीच्या किंवा नोकराच्या स्वाधीन केली असेल तर; किंवा

(तीन) पाकिटात घालून आणि भारतीय डाकघर अधिनियम, १८९८ याच्या प्रकरण ६ अन्वये डाकनोंदणी करून, त्याच्या शेवटच्या माहीत असलेल्या राहण्याच्या ठिकाणाचा किंवा धंद्याच्या ठिकाणाचा पत्ता लिहून पाठविली असेल तर; किंवा

(ख) अशी नोटीस कोणत्या व्यक्तीस पाठवावी याबद्दल किंवा अशी नोटीस ज्या कोणत्याही व्यक्तीवर बजावावयाची इच्छा असेल तिच्या राहण्याच्या ठिकाणाबद्दल, पत्याबद्दल किंवा धंद्याच्या ठिकाणाबद्दल जिल्हाधिकाऱ्याला शंका असेल, आणि—

(एक) ती ज्या जमिनीसंबंधी असेल त्या जमिनीवरील किंवा तिच्याजवळील एखाद्या ठळक जागी लावण्याची व्यवस्था केली असेल तर ; आणि

(दोन) ती, **राजपत्रात** किंवा त्यास योग्य वाटेल अशा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध केली असेल किंवा जागेजवळ दवंडी पिटवून जाहीर करण्यात आली असेल तर

अशी नोटीस पुरेशा रीतीने बजावण्यात आली आहे असे मानले जाईल.

## घरभाडे, फी, शास्ती वगैरे बसविणे

येणे असलेल्या रकमा महसुलाबाबतच्या मागण्या म्हणून वसूल करण्यायोग्य असणे.

**३०३.** (१) शासनाची मालमत्ता असलेल्या कोणत्याही घराच्या भोगवट्यासंबंधाने कोणत्याही व्यक्तीने देणे असलेले सर्व भाडे आणि या प्रकरणान्वये आकारता येईल अशी सर्व फी व दंडांच्या आणि शास्तीबद्दलच्या रकमा, आणि कोणत्याही जमिनीच्या किंमतीबद्दल किंवा भू-मापनाच्या सीमाचिन्हांत फेरबदल केल्याबद्दल, त्या काढून टाकल्याबद्दल, त्यांचे नवीकरण केल्याबद्दल किंवा त्यांची दुरुस्ती केल्याबद्दल किंवा अतिक्रमण बंद केल्याबद्दल किंवा ते काढून टाकल्याबद्दल या प्रकरणाच्या तरतुदींन्वये वसून करावायाच्या सर्व रकमा, या प्रकरणाची कलमे २६७ व २६९ च्या तरतुदींन्वये महसुली मागण्या ज्या रीतीने वसूल करता येतात त्याच रीतीने वसूल करण्यात येतील.

(२) कोणत्याही अधिनियमान्वये किंवा विनियमान्वये किंवा त्या अन्वयेच्या कोणत्याही नियमांन्वये किंवा राज्य शासनाशी केलेल्या कोणत्याही करारान्वये, किंवा संविदेअन्वये आकारणी म्हणून किंवा महसुलाची मागणी म्हणून किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येतील अशा जाहीर केलेल्या इतर सर्व रकमासुद्धा, या प्रकरणाची कलमे २६७ व २६९ च्या तरतुदींन्वये महसुलाची मागणी ज्या रीतीने वसूल करण्यात येते त्याच रीतीने वसूल करण्यात येतील.

(३) या प्रकरणाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींन्वये देण्याजोगी कोणतीही रक्कम देण्याबद्दल किंवा उपरिनिर्दिष्ट कोणत्याही कराराबद्दल जामीन राहिल्या असतील अशा सर्व व्यक्ती, त्यांच्या जामीनपत्राच्या अटीअन्वये जी रक्कम किंवा तिचा जो कोणताही भाग देण्यास त्या पात्र असतील ती रक्कम किंवा असा कोणताही भाग देण्यात कसूर करतील तर, अशा व्यक्ती महसूल देण्यात कसूर करणाऱ्या म्हणून कलमे २६७ व २६९ च्या तरतुदींन्वये, कार्यवाही केली जाण्यास पात्र असतील आणि कलमे २६७ व २६९ च्या तरतुदी शक्य असेल तेथवर, अशा व्यक्तींना लागू होतील.

**३०४.** मुंबई शहरात राहणाऱ्या किंवा मालकीहक्काने मालमत्ता धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून येणे असलेली आणि जमीन महसुलाची थकबाकी म्हणून करता येईल अशी जी कोणतीही रक्कम राज्यातील कोणत्याही जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने किंवा सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याने किंवा तहसीलदाराने प्रमाणित केली असेल आणि ती तिच्याकडून येणे असल्याचे अशा प्रकारे त्यांनी प्रमाणित केले असेल अशी रक्कम या प्रकरणान्वये जमीन महसुलाची थकबाकी ज्या रीतीने वसूल करता येते त्याच रीतीने मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याने वसूल करणे हे कायदेशीर असेल. येणे असलेल्या रकमांच्या वसुलीसाठी इतर जिल्हाधिकाऱ्यांना सहाय्य करण्याचा मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांचा अधिकार.

**३०५.** राज्य शासन वेळोवेळी मंजुरी देईल अशा नमुन्यात, प्रत्येक वर्णनाच्या जमिनीची, अशी जमीन ज्या सत्ताप्रकाराने आणि ज्या शर्तीवर धारण केली असेल त्या सत्ताप्रकारानुसार आणि त्या शर्तीनुसार त्यांची वेगळी नोंदवही आणि खंडाबाबतचे पत्रक तयार करून ठेवणे हे जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्य असेल. जिल्हाधिकाऱ्याने नोंदवह्या आणि खंडाबाबतचे पत्रक ठेवणे.

**३०६.** (१) राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या प्रकरणाचे उद्देश पार पाडण्याकरिता या प्रकरणाच्या तरतुदींशी सुसंगत असे नियम करता येतील. नियम.

(२) विशेषकरून आणि उपरिनिर्दिष्ट तरतुदींच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा नियमात जिल्हाधिकारी, आणि त्याचे सहायक व इतर हाताखालील व्यक्ती यांना आपली कर्तव्ये पार पाडताना मार्गदर्शन करण्यासाठी किंवा ह्या प्रकरणात स्पष्टपणे तरतूद करण्यात आली नसेल अशा या प्रकरणाच्या वादविषयाशी संबंधित असलेल्या इतर कोणत्याही कारणासाठी तरतूद करता येईल.

१८७६ चा मुंबई २. **३०७.** (१) मुंबई शहर जमीन महसूल अधिनियम, १८७६, यांच्या तरतुदींन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (विहित केलेले सर्व नियम धरून) करण्यात आलेल्या नेमणुका, प्रदान करण्यात आलेले अधिकार, उक्त अधिनियमान्वये काढण्यात आलेले आदेश व प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचना आणि आता अमलात असलेले आणि या प्रकरणामध्ये हाताळण्यात आलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींसंबंधातील तसे नियम असल्यास ते इतर सर्व नियम; मुंबई शहर भू-मापन अधिनियम, १९१५ अन्वये करण्यात आलेले कोणतेही भू-मापन किंवा उभारण्यात आलेल्या हद्दीच्या निशाण्या किंवा तयार करण्यात आलेले कोणतेही नकाशे व नोंदवह्या या प्रकरणान्वये विहित करण्यात, प्रदाने करण्यात, काढण्यात, प्रसिद्ध करण्यात, उभारण्यात आणि तयार करण्यात आल्याचे समजण्यात येईल. व्यावृत्ती. (१९१५ चा मुंबई ४.)

(२) उपरिनिर्दिष्ट अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये सुरू करण्यात आलेले सर्व कामकाज हे, मुंबई शहरात हे प्रकरण अमलात आल्यावर, या संहितेअन्वये सुरू करण्यात आलेले कामकाज म्हणून समजण्यात येईल आणि यानंतर, ते या अधिनियमाच्या तरतुदींनुसार चालविण्यात येईल.

## [१][प्रकरण पंधरा

### **महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण**

**३०८.** या प्रकरणामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(क) " अध्यक्ष " या संज्ञेचा अर्थ, न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, असा आहे.

(ख) " न्यायाधिकरण " या संज्ञेचा अर्थ, कलम ३०९ अन्वये घटित केलेले महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, असा आहे.

---

[१]सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, याच्या कलम १० अन्वये प्रकरण चौदा नंतर प्रकरण पंधरा समाविष्ट करण्यात आले.

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण.

**३०९.** (१) महाराष्ट्र राज्यासाठी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण या नावाने ओळखण्यात येणारे एक न्यायाधिकरण स्थापन करण्यात येईल.

(२) न्यायाधिकरणात अध्यक्ष व राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील इतके इतर सदस्य यांचा समावेश असेल.

अध्यक्ष व सदस्य.

**३१०.** न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्यांच्या अर्हता (वय धरून), त्यांच्या पदाची मुदत व त्यांच्या सेवेच्या शर्ती विहित करण्यात येतील अशा असतील.

पद रिकामे होणे व तात्पुरती गैरहजेरी.

**३११.** (१) अध्यक्ष किंवा इतर सदस्य, मृत्यू पावल्यामुळे, त्यांनी राजीनामा दिल्यामुळे किंवा त्यांच्या नेमणुकीची मुदत संपल्यामुळे किंवा त्यांची नेमणूक संपुष्टात आणल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे कोणतीही जागा रिकामी होईल तर, ती जागा योग्य अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून भरण्यात येईल.

(२) न्यायाधिकरणाचा कोणताही सदस्य, आजारीपणामुळे किंवा इतर वैफल्यामुळे आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास तात्पुरता असमर्थ होईल तर त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी, एकाच वेळी सहा महिन्यांपेक्षा अधिक नाही अशा कोणत्याही मुदतीसाठी, इतर कोणत्याही व्यक्तीची राज्य शासनास नेमणूक करता येईल, आणि अशा रीतीने नेमलेल्या व्यक्तीस त्या मुदतीत ज्या व्यक्तीच्या जागी तिची नेमणूक करण्यात आली असेल त्या व्यक्तीस जे अधिकार असतील तेच अधिकार असतील.

(३) जर, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परिस्थितीमध्ये अध्यक्षाचे पद रिकामे होईल तर, जेष्ठतम सदस्य, राज्य शासनाकडून अध्यक्षाची नेमणूक करून त्याचे पद भरण्यात येईपर्यंत, अध्यक्ष म्हणून काम करील.

(४) उपरोक्त पोट-कलमात उल्लेख केलेल्या कोणत्याही रिकाम्या जागेमुळे किंवा तात्पुरत्या गैरहजेरीमुळेच केवळ, न्यायाधिकरणाची बेकायदेशीररित्या रचना केली आहे असे मानण्यात येणार नाही.

प्रबंधक व उप-प्रबंधक.

**३१२.** राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विहित करण्यात येतील अशा अर्हताप्राप्त व्यक्तीची न्यायाधिकरणाचा प्रबंधक म्हणून नेमणूक करता येईल आणि तसेच, त्याच रीतीने, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा क्षेत्रासाठी विहित करण्यात येतील अशा अर्हताप्राप्त व्यक्तीची विहित करण्यात येईल इतक्या संख्येत उप-प्रबंधक म्हणून नेमणूक करता येईल.

मुख्यालय.

**३१३.** न्यायाधिकरणाचे मुख्यालय बृहन्मुंबईत असेल.

बैठकीची जागा.

**३१४.** न्यायाधिकरणाच्या बैठकी सामान्यतः मुख्यालयात, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे भरविण्यात येतील व तसेच अध्यक्ष, राज्य शासनाच्या अनुमतीने सामान्य किंवा विशेष आदेशानुसार निदेश देईल त्याप्रमाणे कामकाज चालविण्यास सोयीस्कर असेल अशा, महाराष्ट्र राज्यातील इतर कोणत्याही जागी बैठकी भरविता येतील.

न्यायाधिकरणाची अधिकारिता.

**३१५.** (१) या संहितेच्या प्रकरण तेरामध्ये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही असेल तरी, परंतु या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून अनुसूची 'ञ' मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिनियमांच्या तरतुदींअन्वये उद्‌भवणाऱ्या प्रकरणांमध्ये—

(क) जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या किंवा काढलेल्या मूळ आदेशांविरूद्ध किंवा निर्णयांविरूद्ध न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल; आणि

(ख) कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने दिलेल्या किंवा काढलेल्या आदेशाविरुद्ध किंवा निर्णयाविरुद्ध केलेल्या अपिलामध्ये, जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या किंवा काढलेल्या आदेशाविरूद्ध किंवा निर्णयाविरूद्ध न्यायाधिकरणाकडे पुनरीक्षणासाठी अर्ज करता येईल;

(२) पोट-कलम (१), खंड (ख) अन्वये, केवळ पुढील कारणांवरूनच पुनरीक्षणासाठी अर्ज करता येईल–

(एक) जिल्हाधिकाऱ्याचा आदेश किंवा निर्णय हा कायद्याविरूद्ध होता;

(दोन) जिल्हाधिकाऱ्याने कायद्यासंबंधातील महत्त्वाच्या मुद्यावर निर्णय घेण्यात कसूर केली होती; आणि

(तीन) कायद्याअन्वये घालून देण्यात आलेल्या कार्यरीतीचे पालन करताना महत्त्वाचा दोष राहिला होता व त्यामुळे न्यायदानाचा उद्देश विफल झाला होता.

(३) त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमात स्पष्टपणे जी तरतूद केलेली असेल ती वगळता राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, राज्य शासन ठरवील अशा इतर प्रकरणात अशा व्यक्ती, अधिकारी व प्राधिकारी यांच्या निर्णयाविरूद्ध व आदेशाविरूद्ध करण्यात आलेली अपिले दाखल करून त्यावर निकाल देण्याची व त्यांच्या निर्णयांचे व आदेशांचे पुनरीक्षण करण्याचीही न्यायाधिकरणास अधिकारिता असेल असा निदेश देता येईल; आणि या प्रयोजनासाठी राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूची ञ मधील नोंदींपैकी कोणत्याही नोंदीत जादा नोंदी दाखल करता येतील, तीत दुरूस्ती करता येईल, किंवा त्यामधून नोंदी वगळता येतील; आणि त्यानंतर न्यायाधिकरणास अशा बाबीच्या संबंधात अधिकारिता असेल; आणि त्या बाबतीतील इतर कोणत्याही व्यक्तीची, अधिकाऱ्याची किंवा प्राधिकाऱ्याची अधिकारिता संपुष्टात येईल.

(४) राज्य शासनाला तशाच रीतीने कोणत्याही वेळी अशी अधिसूचना रद्द करता येईल किंवा अनुसूची 'ञ' मधून कोणतीही नोंद वगळता येईल आणि अशी अधिकारिता पुन्हा स्वतःकडे घेता येईल :

परंतु, यातील कोणत्याही मजकुरामुळे अशा रीतीने अधिकारिता परत घेतल्यावर राज्य शासनास अशी कोणतीही अधिकारिता, कोणतीही इतर व्यक्ती, अधिकारी किंवा प्राधिकारी यांच्याकडे सोपविण्यास प्रतिबंध होणार नाही.

(५) त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही असले तरी, जेव्हा न्यायाधिकरणास कोणत्याही उपरोक्त बाबीत कोणत्याही व्यक्तीच्या, अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध आणि आदेशाविरूद्ध करण्यात आलेली अपिले दाखल करून घेण्याची व त्यावर निर्णय देण्याची व त्यांच्या निर्णयांचे व आदेशांचे पुनरीक्षण करण्याची अधिकारिता असेल तेव्हा, इतर कोणत्याही व्यक्तीस, अधिकाऱ्यास किंवा प्राधिकाऱ्यास उक्त बाबतीत अशा व्यक्तीच्या, अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध व आदेशाविरुद्ध करण्यात आलेली अपिले दाखल करून घेण्याची व त्यावर निर्णय देण्याची व त्यांच्या निर्णयांचे व आदेशांचे पुनरीक्षण करण्याची अधिकारिता असणार नाही.

(६) या कलमान्वये करावयाचे प्रत्येक अपील किंवा पुनरीक्षणासाठी करावयाचा अर्ज जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाच्या किंवा निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या मुदतीच्या आत दाखल करण्यात येईल. मुदत अधिनियम, १९६३ याची कलमे ४, ५, १२ व १४ यांच्या तरतुदी या असे अपील किंवा पुनरीक्षणासाठी करावयाचा अर्ज दाखल करण्याच्या बाबतीत लागू होतील. (१९६३ चा ३६.)

**३१६.** (१) न्यायालयात न्यायप्रविष्ट असलेल्या कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत न्यायाधिकरणास कोणतीही अधिकारिता असणार नाही. (विवक्षित बाबतीत अधिकारितेस प्रतिबंध.)

(२) न्यायाधिकरणाच्या मते कोणताही अधिनियम, अध्यादेश किंवा विनियम याच्या किंवा अधिनियमातील, अध्यादेशातील किंवा विनियमातील कोणत्याही तरतुदीच्या विधिग्राह्यतेसंबंधी ज्या बाबतीत प्रश्न उपस्थित होत असून ती बाब निकालात काढण्यासाठी त्याचा मते उपरोक्त अधिनियम, अध्यादेश वगैरेची विधिग्राह्यता निश्चित करणे आवश्यक आहे त्या कोणत्याही बाबीच्या संबंधातही न्यायाधिकरणास कोणतीही अधितारिता असणार नाही.

**स्पष्टीकरण.—**या कलमातील विनियम या संज्ञेचा अर्थ, मुंबई संहितेमधील कोणताही विनियम किंवा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८९७ यात किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अमलात असलेल्या सर्वसाधारण वाक्खंड अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे असलेला विनियम, असा समजावा. १८९७ चा १०.

न्यायाधिकरणास इतर कायद्यांन्वये मिळालेल्या अधिकारांस बाध येणार नाही.

**३१७.** या प्रकरणातील कोणत्याही मजकुरामुळे, कोणतीही अपिले, पुनरीक्षणासाठी केलेले अर्ज किंवा इतर कामकाज दाखल करून घेण्यास आणि त्यांचा निर्णय करण्यास न्यायाधिकरणास त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये किंवा तद्नुसार दिलेले किंवा देण्यात येतील असे कोणतेही अधिकार किंवा त्यांची कामे यांना बाध येणार नाही.

न्यायाधिकरणास दिवाणी न्यायालयाचा अधिकार असणे.

**३१८.** (१) या प्रकरणाद्वारे किंवा तद्न्वये प्रदान केलेल्या अधिकारितेचा वापर करताना शपतेवर, प्रतिज्ञेवर किंवा प्रज्ञालेखाद्वारे पुरावा घेणे; साक्षीदारांना आज्ञापत्र काढून बोलावणे व हजर राहण्यास भाग पाडणे, दस्तऐवज व महत्त्वाच्या वस्तू शोधण्यास व सादर करण्यास भाग पाडणे, कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणतेही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची कोणतीही प्रत मागवून घेणे, साक्षीदारांची जबानी घेण्यासाठी किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे या कारणांसाठी आणि विहित करण्यात येतील अशा इतर कारणांसाठी, न्यायाधिकरणास दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील, आणि *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ची कलमे १९५, ४८० व ४८२ यांच्या सर्व कारणांसाठी, न्यायाधिकरण हे दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि त्याची कार्यवाही ही, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार, न्यायालयीन कार्यवाही म्हणून मानण्यात येईल. १८९८ चा ५. १८६० चा ५.

(२) दाखल करावयाच्या कोणत्याही प्रतिज्ञालेखाच्या बाबतीत, या बाबतीत न्यायाधिकरणाने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, जबानीदारास शपथ घ्यावयास लावता येईल.

प्रथा व कार्यपद्धती.

**३१९.** (१) या प्रकरणाच्या तरतुदींस आणि राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेस अधीन राहून, अध्यक्षास न्यायाधिकरणाने खर्चाची रक्कम मंजूर करणे, कोणतीही आदेशिका-फी आकारणे, (न्यायालय शुल्क मुद्रांकाच्या स्वरुपात तिची वसुली करण्याबाबतची तरतूद धरून) न्यायाधिकरणापुढे, आपली बाजू मांडण्याचा हक्क, एकएकट्या सदस्याच्या किंवा (अध्यक्षाने न्यायाधिकरणाच्या सदस्यांमधून प्राधिकृत केलेल्या सदस्यांच्या) अध्यक्षाने घटित केलेल्या सदस्यांच्या न्यायपीठाच्या बैठकी, न्यायाधिकरणाने किंवा त्यांच्या न्यायपीठाने, त्याच्यापुढे असलेले कोणतेही कामकाज, उक्त कामकाज चालू असताना न्यायाधिकरणाचे किंवा न्यायपीठाचे सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींत बदल झालेला असला तरी निकालात काढणे, ही कामे धरून, न्यायाधिकरणाची प्रथा व कार्यपद्धती यांचे नियमन करण्यासाठी आणि सामान्यपणे, या प्रकरणाअन्वयेचे आपले अधिकार आणि आपली कामे कार्यक्षमरीतीने चालवण्यासाठी व पार पाडण्यासाठी विनियम करता येतील. कोणताही एकएक सदस्य बैठकीचे काम पहात असेल किंवा कोणतेही न्यायपीठ घटित करण्यात आले असेल त्याबाबतीत असा सदस्य किंवा न्यायपीठ न्यायाधिकरणाच्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि त्याची कामे पार पाडील.

(२) या कलमान्वये केलेले विनियम **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

विवक्षित बाबतीत राज्य शासनाची बाजू ऐकून घेणे.

**३२०.** (१) न्यायाधिकरणापुढील कोणत्याही कामकाजात, उक्त कामकाजातून कायद्यातील तरतुदीचा अर्थ लावणे हे अशा स्वरूपाचे व लोकांच्या दृष्टीने इतके महत्त्वाचे आहे की, राज्य शासनाला नोटीस देणे इष्ट आहे असे कोणत्याही अवस्थेत न्यायाधिकणास दिसून येईल तर, न्यायाधिकरण त्या शासनाला नोटीस देईल आणि त्या शासनाला त्यास योग्य वाटल्यास हजर राहाता येईल व न्यायाधिकरण त्या प्रश्नावर निर्णय देण्यापूर्वी राज्य शासनाची बाजू ऐकून घेईल.

---

*आता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ची संहिता (१९७४ चा २) पहा.

(२) राज्य शासनाच्या मते न्यायाधिकरणापुढील कोणत्याही कामकाजात, कायद्यातील तरतूदीचा अर्थ लावणे हे अशा स्वरूपाचे व सार्वजनिक दृष्ट्या इतके महत्त्वाचे आहे की, त्या प्रश्नाचा निर्णय करण्यापूर्वी राज्य शासनाची बाजू ऐकूण घेणे इष्ट आहे असे राज्य शासनाला आढळून येईल तर, त्यास अशा कामकाजात आपली बाजू मांडण्यासंबंधी न्यायाधिकरणाकडे अर्ज करता येईल; आणि न्यायाधिकरण, राज्य शासनाची बाजू ऐकूण घेतल्यावाचून त्या प्रश्नावर निर्णय देणार नाही.

**३२१.** (१) न्यायाधिकरणाने कलम ३१५ अन्वये अपील किंवा पुनरीक्षणविषयक अधिकारांचा वापर करताना दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही. राज्य शासनाकडे अपील दाखल करता येणार नाही आणि न्यायालयांच्या अधिकारितेस प्रतिबंध.

(२) त्या त्यावेळी अंमलात असेलेल्या कोणत्याही इतर कायद्यात तद्‌विरुद्ध काहीही असले तरी न्यायाधिकरणाने या संहितेअन्वये किंवा तद्‌नुसार केलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशावर किंवा निर्णयावर कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कामकाजात आक्षेप घेता येणार नाही.

**३२२.** (१) न्यायाधिकरणास स्वतः होऊन किंवा कोणत्याही हितसंबंधित पक्षकाराने अर्ज केल्यावर आणि कलम ३२० अन्वये राज्य शासनाची बाजू ऐकून घेण्यात येईल त्या बाबतीत राज्य शासनाने अर्ज केल्यावर कोणत्याही प्रकरणातील आपल्या स्वतःच्या निर्णयाचे किंवा आदेशाचे पुनर्विलोकन करता येईल व त्यासंबंधी त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देता येईल : न्यायाधिकरणाच्या आदेशांचे पुनर्विलोकन.

परंतु, न्यायाधिकरणाने ज्यावेळी निर्णय दिला त्यावेली असा पक्षकाराने योग्य खबरदीरी घेतली असून देखील त्यास कळली नव्हती किंवा तो हजर करू शकत नव्हता अशी नवी व महत्त्वाची बाब किंवा पुरावा मिळाल्याचे आढळून आले आहे याबद्दल किंवा अभिलेख पाहताक्षणीच सकृतदर्शनी काही चूक किंवा दोष असल्याबद्दल न्यायाधिकरणाची खात्री झाली असले किंवा इतर कोणतेही पुरेसे कारण असेल ते वगळता कोणत्याही पक्षकाराने केलेला असा कोणताही अर्ज दाखल करून घेण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, हितसंबंधित पक्षकारांना हजर राहण्यासंबंधी व अशा आदेशाच्या पुष्ट्यर्थ त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी नोटीस दिली असल्याखेरीज अशा निरणयात किंवा आदेशात, बदल किंवा सुधारणा करण्यात येणार नाही.

(२) कोणत्याही पक्षकारास किंवा, यथास्थिति, राज्य शासनास, पोट-कलम (१) अन्वये पुनर्विलोकनासाठीचा अर्ज न्यायाधिरणाच्या निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत करता येईल :

परंतु, मुदत मर्यादा मोजताना, दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या किंवा आदेशाच्या पेरतपसणासाठीच्या
१९६३ चा ३६. अर्जास मुदत अधिनियम, १९६३ याच्या ज्या तरतुदी लागू होतात त्या तरतूदी शक्य तेथवर या कलमान्वये पुनर्विलेकनासाठी केलेल्या अर्जास लागू होतील.

**३२३.** जर राज्य शासन किंवा, यथास्थिति, इतर सक्षम प्राधिकाऱ्याने तसेच आदेश दिले असले तर त्यांची ज्या रीतीने अंमलबजावणी करण्यात आली असती त्याच रीतीने न्यायाधिकरणाने दिलेल्या सर्व आदेशांची अंमलबजावणी करण्यात येईल. न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशांची बजावणी करण्याची रीत.

न्यायालय शुल्कासाठी तरतूद.

**३२४.** मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ मध्ये काहीही असले तरी, परंतु, कलम २७५ च्या तरतुदींना अधीन राहून, न्यायाधिकरणाकडे केलेल्या प्रत्येक अपिलावर किंवा अर्जावर, जर दाव्यातील मालमत्तेचे मूल्य दहा हजार रुपये किंवा त्याहून कमी असेल तर एक रुपयाचा आणि जर असे मूल्य दहा हजार रुपयांहून अधिक असेल तर वीस रुपयांचा, न्यायालय शुल्क मुद्रांक लावण्यात येईल : १९५९ चा मुंबई ३६.

परंतु, न्यायाधिकरण कोणत्याही संबंधित कुळवहिवाट कायद्यान्वयेच्या किंवा इतर विशेष कायद्याअन्वयेच्या कोणत्याही अधिकारांचा वापर करील किंवा कामे करील आणि उक्त कायद्यामध्ये न्यायाधिकरणाकडे करावयाच्या कोणत्याही अपिलावर किंवा अर्जावर न्यायालय शुल्क बसविण्याची तरतूद करण्यात आली असेल त्याबाबतीत या कलमातील कोणतीही गोष्ट अशी फी आकारण्यासंबंधीच्या तरतुदीस बाध आणणार नाही.

नियम.

**३२५.** (१) राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या प्रकरणाचे उद्देश पार पाडण्याकरिता या प्रकरणाच्या तरतुदींशी सुसंगत असतील असे नियम करता येतील.

(२) विशेषतः व उपरोक्त तरतुदीच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा नियमांत पुढील गोष्टींची तरतूद करता येईल :—

(क) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांच्या (वयासह) अर्हता;

(ख) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती;

(ग) प्रबंधकाच्या व उप-प्रबंधकांच्या अर्हता;

(घ) न्यायाधिकरणाकडे निहित करता येतील असे दिवाणी न्यायालयाचे इतर कोणतेही अधीकार.]

व्यावृत्ती.

**३२६.** (१) या संहितेच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी काम करणारे मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ अन्वये घटित करण्यात आलेले महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण हे या संहितेच्या तरतुदींन्वये घटित करण्यात आलेले न्यायाधिकरण म्हणून समजण्यात येईल आणि अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी अशा न्यायाधिकरणापुढे अनिर्णीत असलेले कोणतेही कामकाज, या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये न्यायाधिकरणाकडून निकालात काढण्यात येईल. १९५९ चा मुंबई ३६.

(२) उक्त अधिनियमान्वये केलेली (कोणत्याही नेमणुका किंवा नियम किंवा विनियम धरून) कोणतीही गोष्ट किंवा कृती ही, या प्रकरणाच्या तरतुदींन्वये केलेली गोष्ट किंवा कृत आहे असे मानण्यात येईल आणि नवीन नेमणूका, नियम किंवा विनियम करण्यात येईतोपर्यंत, ती अंमलात असण्याचे चालू राहील.

(३) मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ अन्वये घटित करण्यात आलेले मुंबई महसूल न्यायाधिकरण, किंवा मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ अन्वये घटीत करण्यात आलेले महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, किंवा मुंबई महसूल न्यायाधिकरण, १९५७ अन्वये रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित करण्यात आलेले महसूल मंडळ किंवा इतर प्राधिकरण यांच्या संबंधातील किंवा त्या त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामधील किंवा कोणत्याही लेकातील किंवा इतर दस्तऐवजातील त्यांच्यासंबंधीच्या कोणत्याही उल्लेकाचा अर्थ, या संहितेच्या तरतुदींन्वये रचना करण्यात आल्याचे मानण्यात आलेल्या किंवा घटित करण्यात आल्याप्रमाणेच्या न्यायाधिकरणासंबंधीचा उल्लेख असल्याचे मानण्यात येईल आणि न्यायाधिकरणास असा कोणताही कायदा, लेख किंवा दस्तऐवज या अन्वये सर्व अधिकार असतील व अशा सर्व अधिकारांचा त्यांच्याकडून वापर करण्यात येईल. १९३९ चा मुंबई १२. १९५८ चा मुंबई ३१. १९५८ चा मुंबई ३१.

## प्रकरण सोळा

### संकीर्ण

**३२७.** राज्य शासन या बाबतीत वेळोवेळी विहित करील अशा नियमांना अधीन राहून आणि अशी फी दिल्यावर, सर्व नकाशे आणि जमिनीसंबंधीचे अभिलेख, लादण्यात येतील अशा निर्बंधास अधीन राहून, वाजवी वेळात लोकांच्या तपासणीसाठी खुले असतील आणि त्यातील प्रमाणित उतारे किंवा त्यांच्या प्रमाणित प्रती, त्यासाठी अर्ज करणाऱ्या सर्व व्यक्तींस देण्यात येतील. नकाशे आणि जमिनीसंबंधीचे अभिलेख तपासणी, इत्यादीसाठी खुले असणे.

**३२८.** (१) राज्य शासनास या संहितेच्या तरतुदी अमलात आणण्याच्या कारणासाठी म्हणून, या संहितेच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे नियम करता येतील. नियम.

(२) विशेषतः आणि उपरिनिर्दिष्ट तरतुदींच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा नियमांत पुढीलपैकी एक किंवा सर्व बाबींची तरतूद करता येईल :—

(एक) कलम १३, पोट-कलम (१) अन्वये महसूल अधिकाऱ्यांस बजावणी करता येईल असे अपील, अधीक्षण व नियंत्रण याबाबतीतील इतर अधिकार व कर्तव्ये;

(दोन) कलम १४, पोट-कल (२) अन्वये मंडळ अधिकाऱ्यास आणि मंडल निरीकास तलाठ्यावर ज्या अधिकारांचा वापर करता येईल ते अधिकार आणि त्यांस जी कर्तव्ये व कामे पार पाडता येतील ती कर्तव्ये व कामे;

(तीन) कलम १५ अन्वये ज्यांना अधिकार प्रदान करण्यात येतील अशा व्यक्तींच्या अर्हता;

(चार) कलम २०, पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाच्या मालमत्तेचा विनियोग करण्याची रीत आणि पोट-कलम (५) अन्वये नोटीस देण्याकरिता करावयाचे नियम;

(पाच) कलम २३ अन्वये मोफत कुरणांत गुरे चारण्याच्या हक्कांचे नियमन करणारे नियम;

(सहा) कलम २५, पोट-कलम (१) अन्वये विवक्षित झाडे कापण्यावर प्रतिबंध घालणारे किंवा त्याचे निनियमन करणारे नियम; पोट-कलम (२) अन्वये, झाडांवरील हक्काचे मूल्य ठरविण्यासाठी भोगवटदारास ज्या रितीने जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल आणि अशा हक्काची खरेदी करता येईल ती रीत;

(सात) कलम २६ अन्वये, शासनाकडे निहित असलेली झाडे, झुडपे, जंगल किंवा इतर नैसर्गिक उत्पन्न ज्या रीतीने जतन करण्यात येईल किंवा त्याचा विनियोग करण्यात येईल ती रीत;

(आठ) कलम २८, पोट-कलम (१) अन्वये ज्या नियमांना अधीन राहून, कोणताही कर न देता सरपण नेता येईल ते नियम; आणि पोट-कलम (२) अन्वये, विशेषाधिकारांच्या वापराचे नियमन करणारे नियम;

(नऊ) कलम २९, पोट-कलम (२), खंड (ग) अन्वये ज्या नियमांना अधीन राहून भूमिधारींना भोगवटदारांच्या वर्ग एक मध्ये समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येईल ते नियम;

(दहा) कलम ३१ अन्वये किंमत देणे, लिलाव आणि बिनदुमाला जमीन देण्यासंबंधातील शर्ती यांच्या तरतुदीसह अशी जमीन देण्याबाबत नियम;

(अकरा) कलम ३२, पोट-कलम (१) अन्वये ज्या नियमांना अधीन राहून जलोढ जमिनीचा विनियोग करण्यात येईल ते नियम;

(बारा) कलम ३५, पोट-कलम (२) अन्वये ज्या नियमांना अधीन राहून जिल्हाधिकाऱ्याकडून पोट-विभागाच विनियोग करण्यात येईल ते नियम;

(तेरा) कलम ३६, पोट-कलम (३) अन्वये ज्या नियमांस अनुसरून जिल्हाधिकाऱ्यास जमीन महसुलाची थकबाकी किंवा इतर कोणत्याही येणे असलेल्या रकमा याबद्दलची दायित्वे ठरविता येतील ते नियम आणि ज्या कार्यपद्धतीस अनुसरून त्यास भोगवटा मिळविण्याबद्दलचे अर्ज निकालात काढता येतील ती कार्यपद्धती; आणि त्या कलमाच्या पोट-कलम (४) अन्वये द्यावयाचे पट्टामूल्य (प्रीमियम);

(चौदा) कलम ३८ अन्वये ज्या नियमांना अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास कोणतीही बिनदुमाला भोगवट्यात नसलेली जमीन अनुदानपत्राअन्वये किंवा संविदेअन्वये पट्ट्याने देता येईल ते नियम;

[1][(चौदा-क) कलम ४१ अन्वये शेतावरील इमारत उभारण्यासाठी किंवा तिचे नवीकरण, पुनर्बांधणी, तीमध्ये फेरफार किंवा भर घालण्याचे काम पार पाडण्यासाठी परवानगी मागण्याकरिता करावायाच्या अर्जाचा नमुना; आणि ज्यांस अधीन राहून जिल्हाधिकारी अशी परवानगी देईल त्या अटी व शर्ती;]

(पंधरा) कलम ४३ अन्वये, ज्या नियमांना अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास किंवा भू-मापन अधिकाऱ्यास, इतर प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यास प्रतिबंध करता येईल आणि जो अशा रितीने प्रतिबंध करण्यात आलेल्या प्रयोजनासाठी अशा जमिनीचा वापर करील त्या धारकास संक्षिप्त चौकशी करून काढून टाकता येईल ते नियम;

(सोळा) कलम ४४, पोट-कलम (१) अन्वये जमिनीचा इतर कारणासाठी वापर करण्यास परवानगी मिळण्याबद्दल करावयाच्या अर्जाचा नमुना; पोट-कलम (२), खंड (ग) अन्वये ज्या नियमांना अधीन राहून जमिनीचा इतर कारणांसाठी वापर करण्याची परवानगी जिल्हाधिकाऱ्याकडून देण्यात येईल ते नियम; आणि पोट-कलम (३) अन्वये ज्या शर्तींना अधीन राहून जमिनीचा इतर कारणासाठी वापर करण्याची परवानगी देण्यात आल्याचे समजण्यात येईल त्या शर्ती; कलम ४४ पोट-कलम (५) अन्वये कसूर करणारी व्यक्ती देण्यास पात्र असेल असा दंड विहित करणारे नियम; आणि त्या कलमाच्या पोट-कलम (६) अन्वये धारकास अकृषिक वापरासाठी ज्या नमुन्यात **सनद** देण्यात येईल तो नमुना;

[2][(सोळा-क) कलम ४४-क, पोट-कलम (२) अन्वये, जमिनीचा खराखुरा औद्योगिक वापर [3][किंवा विशेष वसाहत प्रकल्पासाठी वापर] करणारी व्यक्ती जमिनीच्या वापरातील बदलास प्रारंभ झाल्याच्या दिनांकाची सूचना व इतर माहिती ज्या नमुन्यात देईल तो नमुना; आणि कलम ४४-क, पोट-कलम (३), खंड (क) च्या उपखंड (एक) अन्वये, तहसीलदाराकडे सूचना पाठविण्यात झालेल्या कसुरीबद्दल जिल्हाधिकाऱ्याला ज्या नियमांना अधीन राहून शास्ती बसवता येईल ते नियम; आणि कलम ४४-क च्या पोट-कलम (५) खालील **सनदेचा** नमुना;]

(सतरा) कलम ४५, पोट-कलम (१) अन्वये परवानगीशिवाय जमिनीचा वापर केल्याबद्दलची शास्ती म्हणून द्यावयाचा दंड विहित करणारे नियम;

(अठरा) कलम ४७ अन्वये जिल्हाधिकाऱ्यास ज्या नियमांना अधीन राहून कोणत्याही जमिनीचा अकृषिक वापर नियमात बसविता येईल ते नियम;

(एकोणीस) कलम ४८, पोट-कलम (९) अन्वये गौण स्वरूपाचे खनिज पदार्थ काढणे व ते काढून नेणे या गोष्टींचे नियमन करण्यासाठी नियम;

(वीस) कलम ४९, पोट-कलम (१) अन्वये ज्या नमुन्यात अर्ज करण्यात आला पाहिजे तो नमुना;

(एकवीस) कलम ५१ अन्वये अतिक्रमण करणाऱ्यास ज्या नियमांना अधीन राहून जमीन देण्यात येईल ते नियम;

(बावीस) कलम ६० अन्वये ज्या स्थानिक क्षेत्रात कलम ५५ ची अंमलबजावणी तहकूब ठेवण्यात येईल ते स्थानिक क्षेत्रे;

(तेवीस) कलम ६६ अन्वये, पाण्याने धुपून गेलेली जमीन पूर्ववत प्राप्त झाल्यानंतर जमीन महसूल देण्यास ज्या नियमांना अधीन राहून जमीनधारक पात्र होईल ते नियम धरून, ज्या नियमांना अधीन राहून भूमिधारकास आकारणी कमी करण्याचा हक्क प्राप्त होईल ते नियम;

(चोवीस) कलम ६७, पोट-कलम (४) अन्वये ज्या नियमांस अनुसरून त्या कलमाची पोट-कलमे (२) आणि (३) अन्वये आकारणी करता येईल ते नियम;

---

[1]सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४ अन्वये खंड (चौदा-क) समाविष्ट करण्यात आला.
[2]सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ४ अन्वये खंड (चौदा-क) समाविष्ट करण्यात आला.
[3]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ३ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(पंचवीस) कलम ६८, पोट-कलम (१) अन्वये ज्या नियमांना अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याकडून महसूल म्हणून द्यावयाच्या रकमेची आकारणी करण्यात येईल ते नियम;

(सव्वीस) कलम ७२ अन्वये ज्या नियमांना अधीन राहून भोगवट्याचा किंवा दुमाला जमिनीचा विनियोग करता येईल ते नियम;

(सत्तावीस) कलम ७५ अन्वये ठेवण्यात यावयाच्या दुमाला जमिनींच्या नोंदवहीचा नमुना, त्या नोंदवहीतील प्रमाणित उतारे ज्या नियमांना अधीन राहून देता येतील ते नियम आणि त्यासाठी आकारावयाची फी;

(अठ्ठावीस) कलम ७८ अन्वये ज्या नियमांस अनुसरून, कोणत्याही क्षेत्रात, जमीन महसूल कमी करण्यात, तहकूब करण्यात किंवा त्यापासून माफी देण्यात येईल ते नियम;

(एकोणतीस) कलम ८४ अन्वये ज्या नियमांनुसार क्षेत्राचे आणि भूमापन क्रमांकांच्या व त्याच्या पोट-विभागांच्या आकारणीचे अभिलेख ठेवण्यात येतील, ते नियम;

(तीस) कलम ८५ अन्वये ज्या नियमांनुसार जिल्हाधिकाऱ्यास धारण जमिनीचे विभाजन करता येईल व तिच्यावरील आकारणीची वाटणी करता येईल ते नियम; [१][* * *]

(एकतीस) कलम ८७ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या नियमांनुसार भूमापन क्रमांकाची पोट-विभागात विभागणी करण्यात येईल आणि पोट-विभागांची आकारणी निश्चित करण्यात व सुधारण्यात येईल ते नियम; आणि ज्या भूमि अभिलेखात क्षेत्र व अशा पोट-विभागांची आकारणी नमूद करण्यात येईल ते भूमि अभिलेख;

(बत्तीस) कलम ९०, खंड (च) अन्वये सोळा आणे वर्गीकरणानुरूप घटक साधन प्रमाणातील जमिनीच्या प्रकारांची संख्या;

(तेहतीस) कलम ९४, पोट-कलम (१) अन्वये गट बनविण्याकरिता जमिनी विभागण्यासाठी आणि प्रत्येक गटासाठी प्रमाण दर ठरविण्यासाठी नियम; आणि पोट-कलम (३) अन्वये प्रत्येक भू-मापन क्रमांक व पोट-विभाग यांच्या वर्गीकरण किंमतीच्या आधारे जमाबंदी अधिकारी त्यांची ज्या रीतीने जमीन महसुलाची आकारणी निश्चित करील ती रीत;

(चौतीस) कलम ९६ अन्वये, जमाबंदीच्या प्रयोजनासाठी जमिनीच्या पिकांचे सरासरी उत्पन्न निश्चित करण्याची आणि त्या प्रयोजनासाठी चौकशी करण्याची रीत आणि जिल्हाधिकाऱ्यास प्रतिवृत्त सादर करण्याची रीत;

(पस्तीस) कलम ९७ अन्वये ज्या रीतीने जमाबंदीचे प्रतिवृत्त प्रसिद्ध करण्यात येईल ती रीत;

(छत्तीस) कलम ९९ अन्वये अनामत ठेवावयाची खर्चाची रक्कम, न्यायाधिकरणाकडून ज्या रीतीने चौकशी करण्यात येईल ती रीत; आणि खर्चाची रक्कम परत करण्यासाठी नियम;

(सदतीस) कलम १०२ अन्वये नोटीस देण्याची रीत;

[२][(सदतीस-क) कलम १०८ अन्वये भांडवलीकृत आकारणीची रक्कम ठरवण्याची रीत;]

(अडतीस) कलम ११३ अन्वये जमिनींच्या संपूर्ण बाजार मूल्याची टक्केवारी आणि निश्चित केलेल्या किंवा सुधारणा केलेल्या अकृषिक आकारणीचे प्रमाण दर ज्या रीतीने प्रसिद्ध करण्यात येतील ती रीत; आणि ज्या रीतीने पूर्ण बाजार मूल्याचा अंदाज करण्यात येईल ती रीत;

(एकोणचाळीस) कलम ११७ अन्वये, खंड (१) अन्वयेचे इतर व्यवसाय आणि खंड (५) अन्वयेची मुदत व शर्ती;

(चाळीस) कलम १२७ च्या पोट-कलम (२) अन्वये ज्या नियमांस अनुसरून जिल्हाधिकाऱ्याकडून भू-मापन फीच्या रकमेचे नियमन करण्यात येईल ते नियम;

---

[१]सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ६ द्वारे " आणि क्षेत्राच्या किंवा जमीन महसुलाच्या ज्या मर्यादाखाली विभागणी करण्याचे नाकारता येईल त्या मर्यादा " हा मजकूर वगळण्यात आला.

[२]सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ४ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(एकेचाळीस) कलम १२६ अन्वये केलेल्या कामाची ज्या रीतीने आणि ज्या नकाशात व नोंदवहीत कलम १२८ अन्वये नोंद करण्यात येईल ती रीत व ते नकाशे व त्या नोंदवह्या; आणि असे नकाशे तयार करण्याच्या खर्चासाठी ग्रामपंचायतीने द्यावयाच्या अंशदानाचे प्रमाण;

(बेचाळीस) कलम १३१ अन्वये सनदेची प्रत देण्यासाठीचे आकार किंवा फी;

(त्रेचाळीस) कलम १३६ च्या पोट-कलम (२) अन्वये, एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागाच्या सीमांची आखणी करण्यासंबंधातील जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठीचे नियम आणि वापरण्यात येणाऱ्या सीमा चिन्हांचे स्वरूप आणि जमिनधारकावर फीची आकारणी करण्यास प्राधिकार देणे;

(चव्वेचाळीस) कलम १३७ अन्वये परियोजना, योजना आणि ज्या नियमांना अधीन राहून, पोट-कलम (२) अन्वये भू-मापन अधिकाऱ्याकडून सीमांची फेर आखणी करण्यात येईल ते नियम प्रसिद्ध करण्याची रीत आणि ग्राम समितीसाठी आवश्यक असलेल्या सदस्यांची संख्या आणि कलम १३७ च्या पोट-कलम (४) अन्वये ज्या रीतीने त्या समितीची निवड करण्यात येईल ती रीत;

(पंचेचाळीस) कलम १३९ अन्वये, ज्या नियमांना अधीन राहून भूमि अभिलेख अधीक्षकास सीमा चिन्हांचे व भू-मापन चिन्हांचे वर्णन निश्चित करता येईल ते नियम आणि ज्या रीतीने त्या तयार करण्यात येतील, लावण्यात येतील, त्या सुस्थितीत ठेवण्यात येतील किंवा त्यांची दुरुस्ती करण्यात येईल ती रीत व त्या कलमाच्या पोट-कलम (३) अन्वये अशा सीमा चिन्हांचे व भूमापन चिन्हांचे आकार व त्यांची सामग्री ठरविणे;

(सेहेचाळीस) कलम १४२ अन्वये सीमा आखण्याची आणि त्याच्या पोट-कलम (१) अन्वये सीमा चिन्हांची दुरुस्ती करण्याची व त्यांचे नवीकरण करण्याची रीत;

(सत्तेचाळीस) कलम १४८ अन्वये जी इतर तपशील अधिकाराभिलेखात समाविष्ट असेल, असा त्या कलमाच्या खंड (ङ) अन्वयेचा इतर तपशील;

(अठ्ठेचाळीस) कलम १४९ च्या तिसऱ्या परंतुकान्वये तरतूद केल्याप्रमाणे ज्या आदेशान्वये परवानगी देण्यात आली असेल त्या आदेशाबाबतचा आवश्यक तो पुरावा सादर करण्यासाठीचे नियम;

(एकोणपन्नास) कलम १५०, पोट-कलम (३) अन्वये तलाठ्याने द्यावयाच्या पोचपावतीचा नमुना, पोट-कलम (४) अन्वये फेरफार नोंदवहीत आक्षेप निकालात काढण्यासंबंधातील आदेशाची ज्या रीतीने नोंद करण्यात येईल ती रीत, पोट-कलम (५) अन्वये ज्या नियमांना अधीन राहून, फेरफार नोंदवहीतील नोंदी अधिकाराभिलेखात दाखल करण्यात येतील ते नियम, पोट-कलम (६) अन्वये ज्या रीतीने फेरफार नोंदवहीतील नोंदी प्रमाणित करण्यात येतील ती रीत आणि त्या कलमाच्या पोट-कलम (७) अन्वये कुळवहिवाटीची नोंदवही ठेवण्यासंबंधात अनुसरावयाची रीत आणि कार्यपद्धती;

(पन्नास) कलम १५१, पोट-कलम (४) अन्वये पुस्तिकेत असावयास पाहिजेत अशा इतर बाबी; आणि पोट-कलम (५) अन्वये ज्या नियमांस अनुसरून पुस्तिका तयार करण्यात येईल, देण्यात येईल व ठेवण्यात येईल ते नियम आणि त्यासाठी आकारावयाची फी;

(एकावन्न) कलम १५३ च्या प्रयोजनासाठी असलेले नियम;

(बावन्न) कलम १५४ अन्वये, ज्या नमुन्यात आणि ज्यावेळी, नोंदणी अधिकाऱ्याकडून हस्तांतरणांसंबंधीची माहिती कळविण्यात येईल तो नमुना व ती वेळ;

(त्रेपन्न) कलम १५६ अन्वये तयार करावयाचे इतर भूमि अभिलेख;

(चौपन्न) कलम १७० च्या पोट-कलम (२) अन्वये, जमीन महसूल हप्त्यांनी देण्याची तरतूद करणारे आणि ज्या दिनांकास, ज्यांच्याकडे व ज्या ठिकाणी असे हप्ते देण्यात येतील असे दिनांक, अशा व्यक्ती व अशी ठिकाणे, विहित करणारे नियम;

(पंचावन्न) कलम १७९ अन्वये, ज्या नियमांना अधीन राहून सरकारजमा झालेले भोगवट्याचे अधिकार किंवा दुमाला जमिनी विकण्यात येतील किंवा अन्यथा त्याचा विनियोग करण्यात येईल ते नियम;

(छपन्न) कलम १८७ अन्वये बिनदुमाला जमिनीच्या व्यवस्थापनासाठी नियम;

(सत्तावन्न) कलम १९२, पोट-कलम (१) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने काढावयाच्या घोषणेचा नमुना;

(अठ्ठावन्न) कलम १९३, पोट-कलम (४) खालील नोटिशीचा नमुना ;

(एकोणसाठ) कलम २०५ अन्वये ज्या रीतीने मालमत्तेच्या फेरविक्रीची नवीन नोटीस देण्यात येईल ती रीत;

(साठ) कलम २३८ अन्वये सामान्य चौकशी करण्यासाठीचे नियम ;

(एकसष्ठ) कलम २३९ अन्वये प्रत काढणे, शोधणे तपासणी करणे आणि तत्सम इतर बाबी यासाठीचे आकार;

(बासष्ट) कलम ३२७ अन्वये ज्या नियमांना अधीन राहून आणि जी फी दिल्यावर, नकाशे आणि अभिलेख हे लोकांच्या तपासणीसाठी खुले असतील आणि त्यातील प्रमाणित उतारे किंवा त्यांच्या प्रमाणित प्रती देण्यात येतील ते नियम आणि ती फी ;

(त्रेसष्ट) या संहितेअन्वये ज्या बाबीसाठी नियम करता येतील अशी इतर कोणतीही बाब.

**३२९.** (१) या संहितेअन्वये केलेले सर्व नियम आघाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन असतील. नियम आगाऊ प्रसिद्ध करणे आणि नियमांचा भंग केल्याबद्दल शास्ती यासाठी तरतूद.

(२) या संहितेअन्वये कोणतेही नियम करताना, राज्य शासनाने असे विहित करणे कायदेशीर असेल की, उक्त नियमांचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती अशा उल्लंघनातून निर्माण होणाऱ्या इतर कोणत्याही परिणामांबरोबरच जिल्हाधिकाऱ्यास तिचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, लादणे योग्य वाटेल अशा एक हजार रुपयांहून अधिक नसणाऱ्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**३३०.** या संहितेअन्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल; आमि ज्या अधिवेशनात तो असा रीतीने देण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल; आणि ज्या अधिवेशनात तो असा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील, आणि **राजपत्रात** असा निर्णय अधिसूचित केला असेल तर तो नियम अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, तो अमंलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे उक्त नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही. विधानमंडळापुढे नियम ठेवणे.

[१][**३३०-क.** या संहितेत विवक्षितरीत्या तरतूद करण्यात आली असेल त्यांव्यतिरिक्त, राज्य शासनास व राज्य शासनाच्या मान्यतेस अधीन राहून, कोणत्याही आयुक्तास किंवा जिल्हाधिकाऱ्यास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, या संहितेद्वारे किंवा तद्न्वये त्यास प्रदान करण्यात आलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार व त्याच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील असा निर्बंधांच्या व शर्तीच्या, तशा शर्ती असल्यास, अधीन राहून, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा अधिकाऱ्यास सुद्धा वापरता येतील व पार पाडता येतील.] अधिकारांचे व कर्तव्यांचे प्रत्यायोजन.

---

[१] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ७ द्वारे कलम ३३०-क समाविष्ट करण्यात आले.

**३३१.** (१) कलम ६८ व प्रकरणे पाच, सहा, सात, आठ व नऊ यांच्या तरतुदी पुढील फेरफारांना अधीन राहून, दुमाला गावास आणि गावांच्या दुमाला हिश्शास लागू असतील :—

(एक) राज्य शासनाने अशा कोणत्याही गावाच्या किंवा हिश्श्याच्या धारकाशी किंवा धारकांशी केलेल्या कोणत्याही प्रसंविदेच्या किंवा कराराच्या तरतुदींना अधीन राहून, कलम ७९ अन्वये निदेश देण्यात आलेल्या कोणत्याही भू-मापनाचा किंवा कलम ८३ अन्वये निदेश दिलेल्या नवीन भू-मापनाचा आणि अशा कोणत्याही गावात किंवा हिश्श्यात उक्त प्रकरणान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही जमाबंदीचा खर्च, गावाच्या किंवा हिश्श्याच्या खंडातील किंवा महसुलातील आपल्या हिश्श्याच्या प्रमाणात, धारकाने किंवा धारकांनी देण्यायोग्य असेल ;

(दोन) राज्य शासनाने तसा निदेश दिला असेल तर असा खर्च, राज्य शासनाच्या मते ज्यांचा अशा गावातील कोणत्याही जमिनीत किंवा हिश्श्यात कोणताही हितसंबंध असेल अशा व्यक्तींच्या कोणत्याही वर्गाकडूनसुद्धा राज्य शासन निदेश देईल अशा प्रमाणात देण्यात येईल;

(तीन) अशा कोणत्याही गावात किंवा हिश्श्यात, प्रकरण पाच किंवा सहा अन्वयेची जमाबंदी सुरू केल्यानंतर अशा गावाचे किंवा हिश्श्याचे एक वा अनेक धारक त्या गावाच्या किंवा हिश्श्याच्या खंडातील किंवा महसुलातील त्याच्या/त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात, पुढील रकमा देण्यास पात्र ठरतील :–

(क) गावासाठी किंवा हिश्श्यासाठी नेमण्यात आलेल्या ग्राम अधिकऱ्यांची वेतने, यामध्ये गावातील अंशराशीकृत कुलकर्णी वतनाच्या संबंधात काही अंशराशीकृत भत्ते द्यावयाचे असल्यास त्या भत्त्यांचा समावेश होईल;

(ख) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलमे १४४, १५१ आणि १५२ याअन्वये उपकर बसविण्याचा खर्च; १९६२ चा ५.

(चार) खंड (एक) आणि (तीन) अन्वयेचे दायित्व, अशा गावाच्या किंवा हिश्श्याच्या खंडावरील किंवा महसुलावरील पहिला भार असेल;

(पाच) अशा कोणत्याही भागात किंवा हिश्श्यात धारण केलेल्या जमिनीच्या संबंधात खंड (एक) आणि (तीन) अन्वये द्यावयाची एकूण रक्कम, अधिकाराभिलेखामध्ये नमूद केलेल्या अशा गावाच्या किंवा हिश्श्याच्या धारकाकडून वसूल करण्यात येईल;

(सहा) व्यक्तींच्या कोणत्याही वर्गाकडून खंड (दोन) अन्वये देय असलेली रक्कम राज्य शासन निदेश देईल अशा रितीने, अधिकाराभिलेखात, नमूद केल्याप्रमाणे त्या वर्गाच्या सदस्यांकडून वसूल करण्यात येईल.

(२) दुमाला गावात यापूर्वी सुरू केलेल्या सर्व भू-मापन जमाबंदी, या कलमाच्या तरतुदींनुसार त्या सुरू करण्यात आल्या असल्याप्रमाणे कायदेशीर असतील.

दुमाला गावांतील जमीनधारक.

**३३२.** कलम ३३१ च्या तरतुदींन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये दुमाला गावात, भू-मापन जमाबंदी सुरू करण्यात आली असेल त्याबाबतीत, अशी भू-मापन जमाबंदी ज्या जमिनींना लागू असेल त्या सर्व जमिनींच्या धारकांना, बिन-दुमाला गावातील जमिनींच्या धारकांना या संहितेच्या तरतुदींन्वये जे हक्क आहेत आणि ते ज्या जबाबदाऱ्यांना पात्र आहेत तेच हक्क त्यांच्या भोगवट्यात असलेल्या जमिनीबाबत लागू असतील आणि त्याच जबाबदाऱ्यांस ते पात्र असतील आणि बिन-दुमाला गावातील जमिनींच्या धारकांबाबत या संहितेच्या सर्व तरतुदी, त्यास शक्य तेथवर लागू होतील.

या संहितेचा अन्वयार्थ लावणे.

**३३३.** बिन-दुमाला जमिनीलाच किंवा बिन-दुमाला जमिनीच्या धारकांनाच लागू असलेल्या या संहितेतील कोणत्याही मजकुरामुळे, दुमाला जमिनीस किंवा दुमाला जमिनीच्या धारकांच्या हक्कास किंवा अशा कोणत्याही जमिनीबाबतच्या राज्य शासनाच्या हक्कास बाध येतो असे समजण्यात येणार नाही आणि फक्त बिन-दुमाला जमिनींबाबतच्या या संहितेच्या कोणत्याही तरतुदीमुळे दुमाला जमिनीच्या कोणत्याही धारकांच्या हिताच्या बाजूने किंवा त्याविरूद्ध कोणतेही अनुमान निष्पन्न होते असे मानण्यात येणार नाही.

**३३४.** अनुसूची ट मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमिती या, याद्वारे उक्त अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने आणि त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात येत आहेत. अधिनियमीतीची सुधारणा.

**३३५.** या संहितेच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यात कोणतीही अडचण निर्माण झाली तर राज्य शासनास प्रसंगानुरूप ती अडचण दूर करण्याच्या कारणासाठी त्यास आवश्यक असल्याचे आढळून येईल व या संहितेच्या प्रयोजनांशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल : अडचण दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या संहितेच्या प्रारंभापासून एक वर्ष झाल्यानंतर, या कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

**३३६.** या संहितेच्या प्रारंभानंतर, पुढील कायदे याद्वारे निरसित करण्यात येत आहेत :— निरसन व व्यावृत्ती.

१८७६ चा मुं. २. (क) मुंबई शहर जमीन महसूल अधिनियम, १८७६;

१८७९ चा मुं. ५. (ख) मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९;

१९१५ चा मुं. ४. (ग) मुंबई शहर भू-मापन अधिनियम, १९१५;

१९५८ चा मुं. ३१. (घ) मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७;

१९१६ चा मु. प्रां. २. (ङ) मध्यप्रांत भूमि अन्यसंक्रामण अधिनियम, १९१६;

१९५५ चा मु. प्रां. २. (च) मध्यप्रदेश जमीन महसूल अधिनियम, १९५४;

१३१७ फसली चा है. ८. (छ) हैद्राबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फ;

१३५८ फसली चा है. ५८. (ज) हैद्राबाद जमीन हक्कनोंदणीपत्रक विनियम, १३५८ फ :

परंतु, अशा रीतीने अधिनियम निरसित करण्यामुळे :—

(क) अशा रीतीने निरसित करण्यात आलेल्या कोणत्याही कायद्याचा पूर्वीचा अंमल किंवा त्याअन्वये योग्य रीतीने केलेली किंवा करू न दिलेली कोणतीही गोष्ट, किंवा

(ख) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये संपादन केलेले, प्राप्त झालेले किंवा आलेले कोणतेही हक्क, विशेषाधिकार, बंधन किंवा दायित्व, किंवा

(ग) अशा रीतीने निरसित कऱण्यात आलेल्या कोणत्याही कायद्याविरूद्ध केलेल्या कोणत्याही अपराधासंबंधात आलेली कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा, किंवा

(घ) उपरोक्त असा कोणताही हक्क, विशेषाधिकार, बंधन, दायित्व, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा यासंबंधातील कोणतीही चौकशी, कार्यवाही, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना, यास बाध येणार नाही

आणि अशी कोणतीही चौकशी, कार्यवाही, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना ही जणू काही ही संहिता संमत करण्यात आली नसल्याप्रमाणे दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा करता येईल :

परंतु, आणखी असे की, या संहितेच्या प्रारंभापूर्वी, आदिवासी जमातीतील व्यक्तीने, मध्यप्रांत भूमि अन्यसंक्रामण अधिनियम, १९१६ अन्वये (जमीन) गहाण ठेऊन, पट्ट्याने देऊन, किंवा अन्य रीतीने केलेल्या कोणत्याही तात्पुरत्या अन्यसंक्रामणाचे, जणू ही संहिता संमत करण्यात आली नसल्याप्रमाणे उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार विनियमन करण्यात येईल : १९१६ चा म. प्रा. २.

परंतु तसेच, पूर्वीच्या परंतुकास आणि या संहितेच्या कोणत्याही प्रकरणात केलेल्या कोणत्याही व्यावृत्तिविषयक तरतुदींना अधीन राहून, करण्यात आलेले कोणतेही नियम, आकारण्या, नियुक्त्या व बदल्या, काढण्यात आलेल्या अधिसूचना, आदेश, समन्स, नोटिसा, वॉरंटस् आणि उद्घोषणा, प्रदान करण्यात आलेले प्राधिकरण व अधिकार, मंजूर करण्यात आलेले नमुने आणि पट्टे, भू-मापनाच्या आणि सीमांची निश्चित करण्यात आलेली चिन्हे, तयार करण्यात किंवा कायम करण्यात आलेले अधिकाराभिलेख आणि इतर अभिलेख, संपादन केलेले अधिकार, पत्करलेली दायित्वे, आणि नेमून देण्यात आलेल्या वेळा आणि जागा, यांचा समावेश करून, अशा रीतीने निरसित करण्यात आलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कृती ही, जेथवर ती या संहितेच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, या संहितेच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कृती आहे असे समजण्यात येईल; आणि या संहितेअन्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा कृतीद्वारे तिचे अधिक्रमण करण्यात आल्याशिवाय आणि अधिक्रमण करण्यात येईपर्यंत, अमलात असण्याचे चालू राहील.

संदर्भाचा अन्वयार्थ लावणे.

**३३७.** (१) राज्याच्या विदर्भ प्रदेशात अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील :—

(क) (एक) मालिक मकबुजा;
(दोन) रयत मालिक;
(तीन) पूर्ण वहिवाटदार कूळ;
(चार) भोगवटादार;
(पाच) दुमालापूर्व कूळ;
(सहा) पुरातन कूळ;
(सात) भूमिस्वामी;

यांच्या संबंधातील संदर्भ हे भगवटादार वर्ग-एक संबंधीचे संदर्भ म्हणून समजण्यात येतील; आणि

(ख) (एक) वहिवाटदार कूळ;
(दोन) रयत;
(तीन) कूळ;
(चार) कायम कूळ;
(पाच) भूमिधारी;

यांच्या संबंधातील संदर्भ हे भगवटादार वर्ग-दोन संबंधीचे संदर्भ समजण्यात येतील.

(२) कोणताही कायदा किंवा कोणताही लेख किंवा इतर कागदपत्र यातील 'मामलतदार, महालकरी, पटवारी, पटवारी मंडल' या शब्दाप्रयोगांबाबतचा कोणताही उल्लेख हा, निराळा हेतू असल्याचे दिसून येईल ते खेरीज करून, "तहसीलदार, नायब तहसीलदार, तलाठी आणि साझा" या तत्सम शब्दप्रयोगांसंबंधीचा उल्लेख असल्याप्रमाणे त्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल ; आणि कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकारी याच्यापुढे या अधिनियमाच्या सुरूवातीस अनिर्णीत असलेल्या ज्या कोणत्याही दाव्यात किंवा इतर कायदेशीर कार्यवाहीत प्रथम उल्लेखिलेल्या प्राधिकाऱ्यापैकी कोणताही प्राधिकारी पक्षकार असेल, त्या सर्व दाव्यांत किंवा कायदेशीर कार्यवाहीत, उपरोक्त प्राधिकाऱ्याबद्दल तत्सम प्राधिकारी दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

---

**अनुसूची–क**

(कलमे १७ व १८३ पहा)

**जिल्हाधिकाऱ्याने कलम १७ किंवा १८३ अन्वये काढावयाच्या अधिपत्राचा नमुना**

(मुद्रा)

प्रति,

……………………………………येथील दिवणी तुरुंगाचा प्रभारी अधिकारी

ज्याअर्थी, **क. ख.** राहणार …………………………………… व ………………… या पदावर …………… च्या कार्यालयात नोकरीत असताना त्यांस सन १९ च्या ………………… महिन्याच्या ……………………… दिनांकास …………………………… ने (येथे मागणीचा गोषवारा लिहावा) ……………………………………… प्रदान करण्याचा आदेश दिला होता ; आणि ज्याअर्थी, उक्त **क. ख.** याने उक्त आदेशाचे पालन करण्यात कसूर केली आहे, आणि म्हणून, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम १७/१८३ च्या तरतुदींन्वये असा निदेश देण्यात येतो की, तो उक्त आदेशाचे पालन करीपर्यंत किंवा, यथास्थिति, उक्त संहितेचे कलम १७ किंवा १९१ च्या तरतुदींन्वये तो आपली मुक्तचा करवून घेईपर्यंत त्यास दिवाणी तुरूंगात ठेवावे, त्याअर्थी, तुम्हास याअन्वये असे फर्माविण्यात येते की, तुम्ही उक्त **क. ख.** यास, आपल्या ताब्यातील तुरूंगात घ्यावे आणि कायद्यानुसार उपरिनिर्दिष्ट आदेश अमलात आणावा.

(मुद्रा)

दिनांक …………… माहे ……………… १९ (जिल्हाधिकाऱ्याची सही)

---

## अनुसूची–ख

### कलम १९ किंवा १९१ अन्वये आवश्यक असलेल्या बंधपत्राचा नमुना

ज्याअर्थी, मला, म्हणजे ······································ (येथे संपूर्ण नाव लिहावे) ला ························· (येथे मागणीचे स्वरूप लिहावे) ························ चा ························ ने आदेश दिला आहे आणि ज्याअर्थी, उक्त आदेश देण्याचा उक्त ·················· याचा अधिकार मला अमान्य आहे ; त्याअर्थी, जे करण्यास सांगितले आहे ते वाजवी नाही अशा वादाबद्दल ······························ च्या जिल्हा न्यायालयात या बंधपत्राच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत दावा करीन असे मी या बंधपत्रान्वये स्वतःस बांधून घेतो, आणि असे कबूल करतो की, माझ्यावर हुकूमनामा बजावण्यात आला तर तो मी पूर्ण करीन आणि खर्चासह व व्याजासह ज्या रकमा माझ्याकडून येणे होतील त्या सर्व रकमा मी देईन किंवा मी उपरिनिर्दिष्टप्रमाणे दावा दाखल करण्यात कसूर केली तर· ························· रुपयांची उपरिनिर्दिष्ट रक्कम देण्यास मला जेव्हा सांगितले जाईल तेव्हा, मी ती रक्कम देईन (किंवा, यथास्थिति, वर उल्लेख केलेले कागदपत्र किंवा मालमत्ता देऊन टाकीन) आणि तसे करण्यात मी कसूर केली तर, शासनाकडे ························ रुपयांची, रक्कम जमा करण्यास याअन्वये मी स्वतःस बांधून घेतो.

दिनांक ·····························  (सही)

---

### मुख्याने करून दिलेल्या बंधपत्रास जोडावयाच्या तारणपत्राचा नमुना

आम्ही ···························· या अन्वये उपरोक्त ···························· याचे जामीन म्हणून असे घोषित करतो की, त्याने जे करण्याचे व पार, पाडण्याचे काम वर पत्करले आहे ते सर्व तो करील वर पर पाडील आणि जर तो त्याप्रमाणे करण्यात कसूर करील तर त्या बाबतीत आम्ही राज्य शासनाकडे ···························· रुपयांची रक्कम जमा करू देण्यास बांधलेले आहोत असे याअन्वये लिहून देतो.

दिनांक ·····························  (सही)

---

## अनुसूची–ग

(कलम १२९ आणि १३० पहा)

### इमारतींच्या जागांबाबतचा सनदेचा नमुना

महाराष्ट्र शासन

प्रति,

........................................................

**ज्याअर्थी,** जमीन महसुलाची व्यवस्था व्हावी म्हणून, आणि जमिनिशी संबंधित असलेले मालकी हक्क आणि इतर हक्क यांची नोंद होऊन ते जतन करण्यात यावेत म्हणून ........................ चे ................ यातील जमिनींचे भूमापन करण्याबद्दल, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या तरतुदींन्वये राज्य शासनाने निदेश दिला आहे आणि त्याबाबतीत जरूर असणारी चौकशी करण्याचा आदेश दिला आहे ; **त्याअर्थी,** ही सनद उक्त संहितेच्या कलम १२९ किंवा १३० अन्वेय पुढीलप्रमाणे दिली आहे. म्हणजे ................................. च्या ............................. विभागांतील जमिनीचा विवक्षित तुकडा तुमच्या भोगवट्यात आहे व ............................. क्रमांकाचा ताव म्हणून जो नकाशा आहे त्यात जमिनीच्या त्या तुकड्याच्या नोंदीचा क्रमांक .......................... आहे आणि ............................. येथून ................... पर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर .......................... कडे त्याचे तोंड आहे व त्यांचे क्षेत्रफळ सुमारे ............................ चौरस मीटर आहे व त्याची आकृती व लांबी रुंदी पुढीलप्रमाणे आहे :–

उक्त भोगवट्याचा अधिकार तुमच्याकडे या अन्वये कायम केला आहे. त्यास सर्व जमीन महसुलाची माफी आहे. (किंवा तो जमीन महसुलाची वार्षिक ............................. रुपये रक्कम देण्याच्या अधीन आहे.)

तुमच्या धारणाधिकाराच्या शर्ती अशा आहेत की, भोगवट्याचा अधिकार हस्तांतरणयोग्य आणि अशा वंशपरंपरागत चालणारा आहे आणि उक्त भोगवट्याचा अधिकार त्याचा वेळोवेळी जो कोणी वैध धारक असेल अशा व्यक्तीच्या मालकी हक्काबाबत कोणतीही हरकत किंवा तक्रार न घेता, राज्य शासनाकडून चालू ठेवण्यात येईल. (फक्त महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, याच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या तरतुदींनुसार वरीलप्रमाणे जमीन महसुलाचे वार्षिक प्रदान करण्याच्या शर्तीवर उक्त भोगवट्याचा अधिकार अधीन असेल आणि ............................. पासून मोजण्यात आलेली ...................... वर्षांची मुदत संपल्यानंतर आकारणीच्या उक्त दराची फेरतपासणी करण्याच्या आणि त्यानंतर नेहमी ...................... वर्षांच्या लागोपाठच्या मुदतीने आकारणीची पुन्हा फेरतपासणी करण्याच्या दायित्वाच्या आणि उक्त आकारणी

देण्याच्या वेळाबाबत आणि पद्धतीबाबत त्या त्या वेळी जो कायदा अंमलात असेल त्या कायद्याच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी असणाऱ्या आवश्यकतेच्या अधीन असेल आणि कायद्यान्वये देणे आवश्यक असलेली उक्त आकारणी देण्यात तुम्ही कसूर कराल तर, उक्त भोगवट्याचा अधिकार आणि त्याच्याशी संबंधित असलेले सर्व हक्क आणि हितसंबंध, सरकारजमा होण्यास पात्र असतील.)

(सही)

---

**अनुसूची–घ**

(कलम २४२ पहा)

**जिल्हाधिकाऱ्याने कलम २४२ अन्वये काढावयाच्या अधिपत्राचा नमुना**

(मुद्रा)

प्रति,

........................ येथील दिवाणी तुरुगाचा प्रभारी अधिकारी.

ज्याअर्थी, **क. ख.** राहणार ........................ याने ........................ तालुक्यातल्या ................ गावातील विवक्षित जमिनीतून ........................ येथील जमिनीतून किंवा किनाऱ्यालगतच्या जमिनीतून **ड. च.** यास (किंवा स्वतःस म्हणजे उक्त **क. ख.** यास) काढून टाकण्यास **ग. घ.** यास हरकत घतली (किंवा अडथळा केला) आहे ; आणि ज्याअर्थी, अशी हरकत किंवा अडथळा चालू राहण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून उक्त **क. ख.** यास कडेकोट बंदोबस्तात, ठेवणे जरूर आहे ; त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम २४२ च्या तरतुदींन्वये, तुम्हास याद्वारे असे फर्माविण्यात येते की, तुम्ही उक्त **क. ख.** यास तुमच्या ताब्यातील तुरूंगात घ्यावे, आणि त्यास ........................ दिवस सुरक्षित ठिकाणी अटकेत ठेवण्यात यावे.

दिनांक ........................ माहे ........................ सन २०

(जिल्हाधिकाऱ्याची सही)

---

## अनुसूची–ङ

(कलम २४७ पहा)

| | महसूल अधिकारी | अपील प्राधिकारी |
|---|---|---|
| १. | उप विभागीय अधिकाऱ्याच्या हाताखालील, उप-विभागातील सर्व अधिकारी. | उप-विभागीय अधिकारी किंवा जिल्हाधिकारी याबाबतीत विनिर्दिष्ट करील असा सहायक जिल्हाधिकारी किंवा उप-जिल्हाधिकारी. |
| २. | उप-विभागीय अधिकारी सहायक जिल्हाधिकारी किंवा उप-जिल्हाधिकारी. | जिल्हाधिकारी किंवा राज्य शासन याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार ज्याच्याकडे निहित करील असा सहायक जिल्हाधिकारी किंवा उप-जिल्हाधिकारी. |
| ३. | जिल्हाधिकारी [1][ (मुंबईचा जिल्हाधिकारी धरून) ] किंवा जिल्हाधिकाऱ्यांचे अपिलीय अधिकार ज्याच्याकडे निहित करण्यात येतील असा सहायक/उप-जिल्हाधिकारी. | विभागीय आयुक्त |
| ४. | कलम [2][ १५ ] अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करणारी व्यक्ती. | राज्य शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील असा अधिकारी. |

| | भूमापन अधिकारी | अपील प्राधिकारी |
|---|---|---|
| १. | जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख, भूमापन तहसीलदार आणि जिल्हा निरीक्षक, भूमिअभिलेख, यांच्या दर्जाहून वरच्या दर्जाचे नसतील असे इतर अधिकारी. | अधीक्षक, भूमि-अभिलेख किंवा राज्य शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील असे त्याच दर्जाचे इतर अधिकारी. |
| २. | अधीक्षक, भूमि-अभिलेख आणि त्याच दर्जाचे इतर अधिकारी. | संचालक, भूमि-अभिलेख किंवा राज्य शासन या बाबतीत ज्याचेकडे भूमि-अभिलेख संचालकाचे अधिकार निहित करील असा भूमि-अभिलेख उप-संचालक. |
| ३. | जमाबंदी अधिकारी. | जमाबंदी आयुक्त. |

[1] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १२ अन्वये " (तो मुंबईचा जिल्हाधिकारी नसेल)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, याच्या कलम ८ अन्वये "१६" या आकड्याऐवजी हा आकडा दाखल करण्यात आला.

## अनुसूची–च

(कलम २६७ पहा)

### महसुलाच्या थकबाकीच्या रकमेची मागणी करणाऱ्या नोटिशीसंबंधात कलम २६७ च्या तरतुदींअन्वये द्यावयाच्या फीच्या दराचे कोष्टक

| देय महसूल | नोटीस फी रुपये |
|---|---|
| रुपये २५ पेक्षा अधिक नसेल तर .. .. .. | ०.५० |
| रुपये २५ पेक्षा अधिक, परंतु रुपये १०० पेक्षा अधिक नसेल तर .. | १.०० |
| रुपये १०० पेक्षा अधिक .. .. .. | २.०० |

---

## अनुसूची–छ

(कलम २७३ पहा)

### या संहितेच्या कलम २७३ च्या तरतुदींन्वये द्यावयाच्या फीचे कोष्टक

| ज्या रकमेबद्दल जप्ती करण्यात आली असेल ती रक्कम | फी रुपये |
|---|---|
| रुपये ५ पेक्षा अधिक नसेल तर .. .. .. | ०.५० |
| रुपये ५ पेक्षा अधिक परंतु रुपये १० पेक्षा अधिक नसेल तर .. | १.०० |
| रुपये १० पेक्षा अधिक परंतु रुपये १५ पेक्षा अधिक नसेल तर .. | १.५० |
| रुपये १५ पेक्षा अधिक परंतु रुपये २० पेक्षा अधिक नसेल तर .. | २.०० |
| रुपये २० पेक्षा अधिक परंतु रुपये २५ पेक्षा अधिक नसेल तर .. | २.५० |
| रुपये २५ पेक्षा अधिक परंतु रुपये ३० पेक्षा अधिक नसेल तर .. | ३.०० |
| रुपये ३० पेक्षा अधिक परंतु रुपये ३५ पेक्षा अधिक नसेल तर .. | ३.५० |
| रुपये ३५ पेक्षा अधिक परंतु रुपये ४० पेक्षा अधिक नसेल तर .. | ४.०० |
| रुपये ४० पेक्षा अधिक परंतु रुपये ४५ पेक्षा अधिक नसेल तर .. | ४.५० |
| रुपये ४५ पेक्षा अधिक परंतु रुपये ५० पेक्षा अधिक नसेल तर .. | ५.०० |
| रुपये ५० पेक्षा अधिक परंतु रुपये ६० पेक्षा अधिक नसेल तर .. | ६.०० |
| रुपये ६० पेक्षा अधिक परंतु रुपये ८० पेक्षा अधिक नसेल तर .. | ७.५० |
| रुपये ८० पेक्षा अधिक परंतु रुपये १०० पेक्षा अधिक नसेल तर .. | ९.०० |
| रुपये १०० हून अधिक असेल तर .. .. .. | १०.०० |

---

## अनुसूची–ज

(कलम २९७ पहा)

**लेखान्वये असेल ते खेरीज करून अन्य रीतीने हस्तांतरण करण्यात आले असेल तेव्हा, या संहितेच्या कलम २९७ अन्वये द्यावयाच्या हस्तांतरणाच्या नोटिशीचा नमुना**

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई यांस,

मी, क. ख., महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ३०२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, मालमत्तेचे पुढील हस्तांतरणाबाबत याद्वारे नोटीस देत आहे :—

| नोटिशीचा दिनांक | जिल्हाधिकाऱ्याच्या अभिलेखात मालमत्ता आता ज्या नावाखाली नमूद करण्यात आली असेल ते नाव | ज्याच्या नावे हस्तांतरित करावयाची असेल त्याचे नाव | मालमत्तेचे वर्णन | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | त्यात कोणत्या गोष्टींचा समावेश आहे | स्थान | जिल्हाधिकाऱ्याचा क्रमांक | मुंबई शहर भूमापन क्रमांक | जमिनीची लांबी-रुंदी | सीमा | |
| | | | | | | | | | |

(सही) क. ख.

# अनुसूची–झ

(कलम २९७ पहा)

**लेखाद्वारे हस्तांतरण करण्यात येईल तेव्हा, या संहितेच्या कलम २९७ अन्वये द्यावयाच्या हस्तांतरणाच्या नोटिशीचा नमुना**

प्रति

जिल्हाधिकारी, मुंबई यांस,

मी, क. ख., महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ३०२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, मालमत्तेचे पुढील हस्तांतरणाबाबत याद्वारे नोटीस देत आहे :—

| नोटिशीचा दिनांक | लेखाचा दिनांक | विक्रेता किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकितीचे नाव | मोबदल्याची रक्कम | मालमत्तेचे वर्णन | | | | | | जर लेख नोंदण्यात आला असेल तर नोंदणीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | त्यात कोणत्या गोष्टींचा समावेश आहे | स्थान | जिल्हाधिकाऱ्याचा क्रमांक | मुंबई शहर भूमापन क्रमांक | जमिनीची लांबी-रुंदी | सीमा | | |

(सही) क. ख.

## “अनुसूची–ञ

(कलम ३१५ पहा)

| अनुक्रमांक | अधिनियमाचे नाव | पुढील तरतुदींच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या प्रकरणातील आदेशाविरुद्धची किंवा निर्णयाविरुद्धची अपिलीय किंवा पुनरीक्षणविषयक अधिकारिता |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) | कलम २४, कलम २७, खंड (ख) खेरीज करून कलम ५९, कलम ६५, कलम ६६. |
| २ | हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५० (सन १९५० चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक २१). | कलम १८, पोट-कलम (२), कलम ४४, पोट-कलम (१), कलम ४७, कलम ४८, कलम ४९, कलम ७१, कलम ७५. |
| ३ | मध्यप्रदेश (संपदा, महाले, दुमाला जमिनी) स्वामित्वाधिकार नाहिसे करण्याबाबत अधिनियम, १९५० (सन १९५१ चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक १). | कलम २४, कलम २५, कलम २६, कलम २७.”. |

## अनुसूची—ट
## सुधारण्यात आलेल्या अधिनियमिती

(कलम ३३४ पहा)

| अनुक्रमांक (१) | क्रमांक व वर्ष (२) | संक्षिप्त नाव (३) | सुधारणाची व्याप्ती (४) | |
|---|---|---|---|---|
| १ | सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १०. | मुंबई महसूल क्षेत्राधिकार अधिनियम, १८७६. | कलम ११ मधील " कोणत्याही दिवाणी न्यायालायाने " या मजकुराऐवजी "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मध्ये अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय कोणत्याही दिवाणी न्यायालयाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल. | १९६६ चा महा. ४१. |
| २ | सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७. | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८. | १. प्रकरण ५-ट वगळण्यात येईल ;<br>२. कलम ७० मध्ये खंड (नअ) वगळण्यात येईल ;<br>३. कलम ७४, पोट-कलम (१), खंड (ट) वगळण्यात येईल ;<br>४. कलम ८१, पोट-कलम (१) च्या कोष्टकातील, कलम ६६-अ संबंधातील नोंदी वगळण्यात येतील.<br>५. कलम ८२, पोट-कलम (२), खड (लअ) वगळण्यात येईल. | |
| ३ | सन १९५० चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक २१. | सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ अन्वये पुन्हा अधिनियमित वैधकरण करण्यात व आणखी सुधारण्यात आल्याप्रमाणे हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५०. | १. प्रकरण ५-अ वगळण्यात येईल.<br>२. कलम ९६, पोट-कलम (१) मधील कोष्टकातील कलमे ५०-ड व ५०-फ संबंधातील शेवटच्या दोन नोंदी वगळण्यात येतील ;<br>[१][* *] | |
| ४ | सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९९. | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८. | १. प्रकरण ९ वगळण्यात येइल ;<br>२. कलम १०७, पोट-कलम (१), खड (झेड) वगळण्यात येईल ;<br>३. कलम ११७, पोट-कलम (१) मधील कोष्टकातील कलम ९३ संबंधीच्या सर्व नोंदी वगळण्यात येतील. | |

[१]सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३, दुसरी अनुसूची याअन्वये ही नोंद वगळण्यात आली.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई